27-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

AJIT/ SBT/ MMP/ 10:30

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: मराठी भाषेचा विकास व संवधर्नासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय

**मु.शी.**: मराठी भाषेचा विकास व संवधर्नासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय या विषयावर श्री दिवाकर रावते,डॉ.नीलम गोऱ्हे,डॉ.दीपक सावंत श्री.परशुराम उपरकर वि.प.स. यानी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

(चर्चा पुढे चालू...)

**उपसभापती** : मराठीच्या विषयावर अपूर्ण राहिलेली अल्पकालीन चर्चा आता पुढे सुरु करण्यात येईल. आता या चर्चेला माननीय मुख्यमंत्री उत्तर देखील.

श्री.अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय,नियम 97 अन्वये मराठी भाषेचा विकास व संवर्धनासाठी या सभागृहात गेल्या आठवड्यापासून चर्चा सुरु आहे. या चर्चेत भाग घेताना अनेक सन्माननीय सदस्यांनी मौलिक सूचना केल्या आहेत. त्या सूचना लक्षात घेऊन शासनाची भूमिका विशद करण्यासाठी मी सभागृहात उभा आहे.

मराठी भाषेचा विकास व संवर्धनासंदर्भात सभागृहाच्या भावना, जनतेच्या भावना आणि त्याबाबत शासनाची भूमिका ही एकच आहे, त्यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. ही बाब लक्षात घेता मराठी भाषेचा विकास व संवर्धनासाठी अधिक लक्ष केंद्रीत केले पाहिजे, फोकस ॲप्रोच असला पाहिजे त्या अनुषंगाने कामास गती मिळावी म्हणून मराठी भाषेकरिता एक वेगळा विभाग व्हावा अशी लोकप्रतिनिधी आणि जनतेची भावना होती. ही बाब लक्षात घेऊन मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी एक स्वतंत्र विभाग व्हावा अशाप्रकारची भूमिका शासनाने स्वीकारली आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यास मंजुरी दिली. मराठी विभाग हा सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारित होता. या विभागाच्या अधिपत्याखाली राजभाषा व त्यासंबंधीच्या सर्व बाबी, भाषा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण.....

संचालनालय, हिंदी परीक्षा व राज्य मराठी विकास संस्था इत्यादी विषय आहेत. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य विश्वकोष निर्मिती मंडळ इत्यादी विषय अंतर्भूत आहेत. शालेय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृती, मराठी कला या संदर्भातील उत्तम पुस्तकांना उत्तेजन देण्याकरिता पुस्तक निवड करणे हे विषय आहेत. भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ वगैरे बाबी वेगवेगळ्या विभागामार्फत हाताळण्यात येत होत्या. मराठी भाषेच्या संदर्भात ज्या काही गोष्टी करणे अपेक्षित होत्या त्यावर लक्ष केंद्रीत करण्याबाबत आपण कुठे तरी कमी पडत होतो.

सन 1966 पासून मराठी भाषेचा विकास आणि संवर्धनासाठी वेगवेगळे शासन निर्णय काढलेले आहेत. तसेच या संदर्भात सभागृहात वेळोवेळी चर्चा देखील झालेली आहे. परंतु हे सर्व अधिक प्रभावीपणे झाले पाहिजे. अन्य राज्यात तेथील भाषा मोठ्या प्रमाणात बोलल्या जातात, त्याकडे लक्ष केंद्रीत करण्यात आले. महाराष्ट्रात सुध्दा मराठी भाषेला तेवढेच महत्व आहे. परंतु त्याची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी या अनुषंगाने काही गोष्टी झाल्या पाहिजेत. याठिकाणी मराठी भाषेचा विकास व संवर्धनावर चर्चा करीत असताना आपली पुढील वाटचाल, रुपरेषा कशी असावी याबाबत गेल्या आठवड्याभरात सन्माननीय सदस्यांकडून सूचना करण्यात आल्या आहेत.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.अजित शिगम 10.35

श्री.अशोक चव्हाण...........

सभापती महोदय, राज्याचे सांस्कृतिक धोरण नुकतेच जाहीर करण्यात आले आहे.सांस्कृतिक धोरणाच्या माध्यमातून मराठी भाषे विषयीसुध्दा काही मुद्दे उपस्थित झालेले आहेत .सांस्कृतिक धोरण जाहीर करण्यापूर्वी शासनाने एका तज्ज्ञ समितीची नियुक्ती केली होती त्या समितीने या कामामध्ये बरेच योगदान दिलेले आहे. या समितीने राज्याचे सांस्कृतिक धोरण कसे असावे यासाठी निश्चित अशी भूमिका व्यक्त केली होती त्यासाठी या समितीने लोकांकडून हरकती आणि सूचना मागविल्या होत्या आणि त्याचा अभ्यास केल्यानंतरच सांस्कृतिक धोरणाचा मसुदा अंतिम करण्यात आला होता.

सभापती महोदय, सांस्कृतिक धोरणामध्ये मराठी भाषेच्या संदर्भात ज्या बाबी अंतर्भूत आहेत त्यामध्ये भाषा भवन स्थापन करणे, बोली अकादमी स्थापन करणे,विश्वकोश महामंडळाचे बळकटीकरण करणे, प्रमाण भाषा मराठी कोष सध्या नाही त्यामुळे प्रमाण भाषा मराठी कोश निर्माण करणे, वेगवेगळे कोश निर्माण करणे त्याचबरोबर केन्द्रीय सरकारी कार्यालयामध्ये ज्या प्रमाणे हिंदी अधिकारी असतात त्याप्रमाणें महाराष्ट्रातील या कार्यालयामध्ये सुध्दा मराठी अधिकारी नेमण्यासाठी केन्द्राकडे आग्रह धरणें ,मराठी युनिकोड फॉन्टचा, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या प्रसारासाठी वापर करणे अशा प्रकाराचे अनेक विषय सांस्कृतिक धोरणामध्ये अंतर्भूत करण्यात आलेले आहेत. निवडणुकापूर्वी कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेसच्या दोन्ही पक्षाच्या संयुक्त जाहीरनाम्यामध्ये असा उल्लेख करण्यात आला होता की,मराठी भाषेच्या संवर्धनासाठी उपाययोजना करण्यासाठी विधिमंडळाची समिती स्थापन करण्यात येईल तेव्हा अशी समिती स्थापन करण्याची बाब देखील त्यात अंतर्भूत आहे. ज्या प्रमाणे केन्द्रामध्ये केन्द्रीय हिंदी सल्लागार समिती आहे आणि गृहमंत्री त्या समितीचे अध्यक्ष आहेत तशा प्रकारे महाराष्ट्रातसुध्दा मराठी भाषेच्या संवर्धनासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाची समिती स्थापन करण्याची बाब देखील अंतर्भूत करण्यात आलेली आहे तसेच राज्यभाषेच्या व्यवहारात मराठी भाषेचा वापर अधिक होण्यासाठी भाषा सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. श्री.नरेंद्र चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने एक समिती गठीत केली आहे त्यामुळे मराठी भाषेच्या संदर्भात पुढच्या काळात जे काही धोरण आखणे अपेक्षित आहे त्यामध्ये मदत होऊ शकेल. किंबहुना या सभागृहामध्ये या संदर्भात जी काही चर्चा झालेली आहे ती फक्त चर्चाच न राहता प्रत्यक्षात त्या चर्चेची अंमलबजावणी शासनाच्या धोरणातून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण..........

व्यक्त झाली पाहिजे. त्याचप्रमाणे यासंबंधीचे धोरण ठरविले जात असतांना त्या धोरणाची अंमलबजावणी कशा प्रकारे होत आहे यासबंधी वेळोवेळी संबंधित समित्याच्या माध्यमातून आढावा घेण्यात आला तर ख-या अर्थाने या चर्चेचा उपयोग होणार आहे अन्यथा हे सर्व जी.आर. कागदोपत्रीच राहतील. सभागृहातील चर्चेच्या वेळी तुम्ही आम्ही ज्या काही भावना व्यक्त केल्या आहेत त्या भावना केवळ सभागृहापुरत्याच मर्यादित न राहता ख-या अर्थाने त्याची अंमलबजावणी राज्यात झाली पाहिजे अशी शासनाची देखील अपेक्षा आहे.

सभापती महोदय, केन्द्रीय कार्यालये आणि बॅकाच्या व्यवहारामध्ये जी भाषा वापरली जाते त्यासबंधी वेळोवेळी चर्चा केली जाते. आपण त्रिभाषा सूत्र स्वीकारले आहे. आपल्याला हे माहीत आहे की, इंग्रजीमध्ये फॉन्टस आहेत त्यामुळे इंग्रजीचा वापर तेथे केला जातो हिंदीचा फॉन्ट असल्यामुळे बॅकेच्या आणि केन्द्रीय कार्यालयामध्ये हिंदी भाषेचा वापर केला जातो परंतु मराठी भाषेचा क्वचितच वापर होत असल्याचे पहावयास मिळते. किंबहुना केन्द्रीय कार्यालयामध्ये मराठी भाषेचा वापर व्हावा यासाठी त्रिभाषा सूत्र आपण स्वीकारले आहे त्याप्रमाणे प्रत्यक्षात अंमलबजावणी व्हावी अशी अपेक्षा आहे.परंतु ती अपेक्षा पूर्ण होत नाही याबाबतीत सभागृहात वेळोवेळी आक्षेप घेण्यात आला आहे.

सभापती महोदय, केन्द्रीय मंत्र्यांनासुध्दा मी या बाबतीत पत्र लिहिलेले आहे.या संदर्भात दोन्ही सभागृहामध्ये एकमताने आपण ठराव मंजूर केला होता. किंबहुना या सभागृहामध्ये माननीय सभापतींनी हा ठराव मंजूर करुन घें्तला होता आणि खालच्या सभागृहामध्ये माननीय अध्यक्षांनी हा ठराव मंजूर करुन घें्तला होता त्या ठरावाला सर्वानी समर्थन दिले होते त्या ठरावात जो उल्लेख केला होता त्याची अंमलबजावणी सर्व केन्द्रीय कार्यालयामध्ये व्हावी अशा प्रकारची अपेक्षा असून याबाबतीत केन्द्र सरकारनेसुध्दा मला अनुकूल प्रतिसाद दिला होता. त्याबाबतीत लवकरच माहिती घेऊन मी सभागृहासमोर ठेवीन.जेवढी केन्द्रीय कार्यालये आहेत त्या सर्व कार्यालयामध्ये तसेच बॅकांमध्ये मराठी भाषेचा वापर व्हावा अशा प्रकारची अपेक्षा शासनाची आहे.

3..

श्री.अशोक चव्हाण

सभापती महोदय, मराठी भाषेच्या विकासासंबंधी तसेच संवर्धनासंबंधीच्या चर्चेच्या अनुषंगाने सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली होती त्या चर्चेमध्ये त्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले होते त्या अनुषंगाने मी जरुर माझे मत या ठिकाणी व्यक्त करणार आहे. श्री.नरेंद्र चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे त्या समितीची कार्यकक्षा काय आहे याबाबतीत देखील सभागृहामध्ये सन्माननीय सादस्यांकडून विचारणा केली आहे. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या विविध कोशांमध्ये सुधारणा व नवीन प्रचलित शब्दांचा अंतर्भाव करुन कोश अद्ययावत करणे हा त्यातील महत्वाचा भाग राहणार आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण...

परिभाषा निर्मिती, परिभाषा कोशांचे पुर्नमुद्रण, परिभाषेतील अत्यावश्यक परिक्षण करणे, शब्द व्युत्पत्ती, मराठी परिभाषिक संज्ञांच्या समस्या सोडविणे व विविध विषयांवरील भावी समस्यांना, उप समित्यांना त्यांच्या कामामध्ये मार्गदर्शन करणे असा त्यामध्ये एक भाग राहणार आहे. वेळोवेळी आढावा घेऊन मराठी भाषा अभिवृध्दीसाठी नवनवे उपाय व कार्यक्रम आखून मार्गदर्शन करणे, मराठी भाषेचे धोरण ठरविणे अशाप्रकारची अपेक्षा नरेंद्र चपळगावकर यांच्या समितीकडून आहे. मला खात्री आहे की, नरेंद्र चपळगावकर यांचा या क्षेत्रामध्ये असलेला अनुभव, न्यायाधीश म्हणून त्यांनी केलेले उत्तम काम लक्षात घेता, हे काम ते उत्तम व व्यवस्थितपणे करु शकतील. या कामामध्ये अत्यंत अभ्यासू व्यक्ती म्हणून त्यांचा निश्चितच उपयोग होणार आहे.

सभापती महोदय, वाहनांच्या नंबर प्लेट मराठीमध्ये लिहिण्यात याव्यात, त्याबाबत दंड भरण्यात आलेली इंग्रजीमधील पावती मराठीमध्ये असावी, तत्संबंधित सर्व अर्जाचे इंग्रजीमध्ये असलेले नमुने मराठीमध्ये असावेत. तसेच, परिवहन विभागाच्या कारभाराचे मराठीकरण कां होत नाही? असा उल्लेख याठिकाणी करण्यात आला आहे. वाहनांच्या नंबर प्लेटच्या बाबतीत मला मुद्दाम नमूद केले पाहिजे की, वाहने ही फक्त महाराष्ट्रापुरती मर्यादित नाहीत. आपला मुद्दा जरी चांगला असला तरी मोटर व्हेईकल ॲक्ट हा केंद्र सरकारचा कायदा आहे. त्या कायद्यामध्ये आज असलेल्या तरतुदी लक्षात घेता मराठीमध्ये किंवा कोणत्याही स्थानिक भाषेमध्ये नंबर प्लेट लिहिण्याची तरतूद नाही. यामध्ये एवढाच मुद्दा मर्यादित आहे की, ही वाहने अन्य राज्यांमध्ये सुध्दा जातात, ती फक्त महाराष्ट्रापुरती मर्यादित नाहीत. या वाहनांवरील नंबर प्लेट मराठीमध्ये असल्यामुळे ही वाहने अन्य राज्यामध्ये गेल्यानंतर त्यांच्यावर कारवाई करणे, किंवा त्यांचे नंबर घेण्याच्या बाबतीत आरटीओ किंवा पोलिसांना कारवाई करावयाची असेल तर त्यामध्ये नवीन प्रश्न निर्माण होतात. म्हणून त्यामधून मार्ग कसा काढता येईल हे आपल्याला तपासून पहावे लागेल. आपला मुद्दा स्तुत्य असला तरी याबाबतीत केंद्र सरकारचा कायदा असल्यामुळे आपल्याला मराठी भाषेमध्ये नंबर प्लेट करणे शक्य आहे काय? हे तपासून पहावे लागेल. आपण म्हटल्याप्रमाणे् आरटीओचे अर्जाचे नमुने मराठीमध्ये करण्यास हरकत नाही. तो विषय फार अवघड नाही. राज्यातील आरटीओच्या कार्यालयामधील अर्जाचे नमुने हिंदीमध्ये असावेत, इंग्रजीमध्ये असावेत आणि मराठीत देखील असावेत. अशाप्रकारे तीन भाषांमध्ये अर्जाचे नमुने छापण्यास अवघड नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री.अशोक चव्हाण...

आणि म्हणून त्याबाबतीत निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे की, बँक व केंद्र सरकारच्या कार्यालयामध्ये त्रिभाषा सूत्राची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत संबंधितांना आपण सूचना द्याव्यात अशाप्रकारे माननीय केंद्रीय गृहमंत्र्यांना 5 जून 2010 रोजी एक पत्र पाठवून विनंती केली आहे. त्यानंतर दिनांक 15 जून 2010 रोजी माननीय राज्यमंत्र्यांच्या दालनामध्ये बैठक झाली. त्या बैठकीमध्ये राज्यातील केंद्रीय कार्यालये, प्राधिकरण यामध्ये त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी होते की नाही याची तपासणी करण्याकरिता भाषा संचालनालयाच्या अंतर्गत असलेल्या अधिकाऱ्यांचा गट निर्माण करुन त्या गटाने बँका अथवा इतर कार्यालयांच्या मुख्यालयांमध्ये जाऊन पहाणी करावी असे ठरविण्यात आले. आणि म्हणून अशाप्रकारे एन्फोर्समेंटमार्फत विविध कार्यालयामध्ये प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी होते की नाही हे पाहिले जाणार आहे. केंद्रामध्ये हिंदी सल्लागार समितीची पध्दत आहे, त्या सल्लागार समित्या केंद्रीय कार्यालयामध्ये जाऊन हिंदी भाषेचा वापर होतो की नाही याची रँडमली पहाणी करतात. तशाप्रकारची कार्यवाही आपल्या राज्यामध्ये करण्यामध्ये काही अवघड आहे असे मला वाटत नाही. आणि म्हणून त्याकरिता समिती गठीत करुन त्या समितीच्या कार्यकक्षा आपल्याला ठरविता येतील.

विद्यापीठाचा कारभार मराठी भाषेतून व्हावा अशी सूचना करण्यात आली. त्याचप्रमाणे शिक्षण विभागाच्या आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संदर्भात आपण काही नव्याने सूचना केल्या आहेत. या संदर्भात जे जी.आर. निघाले आहेत त्यांची अंमलबजावणी करण्यामध्ये काहीही अडचण नाही. एकीकडे शैक्षणिक क्षेत्रामध्ये बट्टयाबोळ झाल्याबाबत आपण सभागृहात तक्रार करतो. आणि म्हणून याचा फायदा शैक्षणिक क्षेत्रामध्ये कसा होईल? किंबहुना, त्यामध्ये अडचणी निर्माण होणार नाहीत या दृष्टीने चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने कामकाज करावे. त्याबाबतीत आपणाकडून करण्यात आलेल्या नवीन सूचना नरेंद्र चपळगावकर समितीकडे सुपूर्द करता येतील. आणि त्यांच्या माध्यमातून आपल्याला पुढील काम पार पाडता येईल. उच्च न्यायालयामध्ये मराठी भाषेचा वापर करावयास पाहिजे. आज न्यायालयामध्ये मराठीमधून कामकाज सुरु आहे, त्यासाठी एक विशिष्ट संगणक प्रणाली सुरु करण्यात आली आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

अनेक न्यायालयात मराठीतून निर्णय देण्यात येऊ लागलेले आहेत. न्यायालयाच्या कामकाजामध्ये सुध्दा मराठीतून जजमेंन्ट द्यावेत अशा सूचना करण्यात आलेल्या आहेत. मला सांगण्यास हरकत नाही की, शासनाने दिनांक 31 ऑगस्ट,2000 रोजी एक अधिसूचना काढलेली आहे. त्या अधिसूचनेच्या अनुषंगाने राज्यातील जिल्हा स्तरीय सर्व फौजदारी व दिवाणी न्यायालयांची भाषा वर्जित प्रयोजने वगळून मराठी असेल असे घोषित केलेले आहे. सदर धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने उच्च न्यायालयानेही दि.9-12-2005 च्या परिपत्रकान्वये दुय्यम न्यायालयातील न्यायीक अधिकाऱ्यांना 50 टक्के कामकाज मराठीतून करण्याच्या बाबतीत निर्देश दिलेले आहेत. आता नेमके 50 टक्के कसे काम करायचे हे मी समजून घेण्याचा प्रयत्न केला. सभापती महोदय, शासनाने जे परिपत्रक काढलेले आहे त्याला न्यायालयांनी त्याला प्रतिसाद दिलेला आहे.किमान 50 टक्के निर्णय व जज्जमेन्ट्स मराठीतून व्हावेत अशी अपेक्षा आहे. शासनाने पुन्हा 2007 च्या परिपत्रकान्वये दुय्यम न्यायालयात दाखल करावयाचे दावे मराठीतून दाखल करण्याबाबतच्या सूचना सर्व विभाग प्रमुखांना आणि कार्यालय प्रमुखांना दिलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी नेमकी किती होते हा विषय वेगळा आहे. परंतु हे झाले पाहिजे. न्यायालयामध्ये सुध्दा मराठी भाषेचा वापर करुन जज्जमेन्ट्स डिलिव्हर झाले पाहिजेत अशी भूमिका शासनाने घेतलेली आहे या संदर्भात 2005 ला निर्णय झालेला आहे. त्याची पुन्हा 2007 ला आठवण करुन देण्यात आलेली आहे आणि त्याची अंमलबजावणी वेळोवेळी करण्यात येत आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम खात्याने माईल स्टोनवरील नावे मराठीतून लिहिली पाहिजेत. त्याचबरोबर एस.टी.महामंडळाच्या एस.टी.ची तिकीटे इंग्रजीतून देण्यात येतात ती मराठीतून दिली गेली पाहिजेत अशा सूचना काही सन्माननीय सदस्यांनी केलेल्या आहेत. याबाबतीत विभाग स्तरावर जे निर्णय घ्यावयाचे आहेत. ते छोटया स्वरुपातील निर्णय असले तरी ते निश्चितपणे घेणे अशक्य आहे असे मला वाटत नाही. या बाबतीतील तपासून निर्णय घेण्याच्या सूचना संबंधित विभागाला निश्चितपणे दिल्या जातील. माईल स्टोनच्या बाबतीत तसेच एस.टी. महामंडळाकडून मराठीत तिकीट देण्याच्या बाबतीतील सूचना देण्यात येतील. त्याबाबतीत काही अडचण आहे असे मला वाटत नाही.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी मराठी विभागासाठी दहा कोटी रुपये दिल्याची थोडीशी खंत व्यक्त केली आहे. नवीन विभाग सुरु केलेला आहे. त्यामुळे पैशामुळे काही अडचण निर्माण होईल असे नाही. ज्या दिवशी दहा कोटी रुपये संपतील त्या दिवशी पुढचे पैसे उपलब्ध करुन देण्यात येतील. पैशामुळे विभागाचे काम अडत आहे किंवा पैसे नाहीत म्हणून विभागाचे काम थांबलेले आहे असा हा विषय नाही. मराठी भाषेच्या प्रसाराच्या संदर्भात जेवढा निधी या विभागाला वेगळा लागेल तो निधी निश्चितपणे दिला जाईल. या विभागासाठी वेगळे सचिव नेमण्यात आलेले आहेत. या विभागासाठी वेगळे उप सचिव तसेच जो स्टाफ पाहिजे जो देण्याच्या त्याबाबतीतील निर्णय झालेला आहे. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक हाय पॉवर समिती निर्माण करुन या विभागाला अधिक पदे लागणार असतील तर ती त्यांना द्यावीत अशा प्रकारच्या सूचना मुख्य सचिवांना देण्यात आलेल्या आहेत त्यामुळे ही सर्व कामे मार्गी लागलेली आहेत. या सगळया गोष्टीमध्ये व्यवस्थित समन्वय आलेला आहे. ज्या अनुषंगाने वेगवेगळया विभागाचे जे प्रश्न होते ते या पुढे राहणार नाहीत.

सभापती महोदय, महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळातून उत्कृष्ट ग्रंथाच्या भाषांतराची योजना राबविण्यात येत आहे. भाषा सल्लागार समितीच्या बैठकीत हा मुद्दा निश्चितपणे चर्चेला घेता येईल.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत. संगणकावरील मराठीचा मेल उघडला असता मराठीचा फॉन्ट कधी आकृती तर कधी दुसरा असतो यासाठी मराठीचा फॅान्ट जगभर एकच असला पाहिजे असे धोरण राज्य सरकारने ठरविणे अतिशय आवश्यक आहे. सभापती महोदय, हा मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. संगणकाच्या आजच्या युगामध्ये इंटरनेटवरील एकंदर सर्वच पत्र व्यवहार कधीकधी इंग्रजीमध्ये होतो. आज जगात सगळीकडेच मराठी माणसे आहेत. किंबहुना मराठी भाषा समजणारी माणसे अनेक देशामध्ये आहेत. त्यामुळे युनिकोडचे काम झाले पाहिजे. मला या सभागृहात सांगताना अतिशय आनंद होत आहे की, युनिकोडचे 70 टक्के काम पूर्ण झालेले आहे आणि पुढील तीन महिन्यात ते 100 टक्के पूर्ण होईल.त्यामुळे हा प्रश्न मार्गी लागेल. युनिकोड होणे हे संगणकाच्या मार्फत मराठी भाषेच्या प्रसाराच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल आहे. माहिती व तंत्रज्ञानामुळे ज्या सुधारणा झालेल्या आहेत

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

त्यामुळे  प्रशासकीय कामामध्ये गती आलेली आहे. मला असे वाटते की, 100 टक्के मराठीचा फॉन्ट झाल्यानंतर संपूर्ण जगामध्ये मराठीचा प्रसार करण्याच्या संदर्भात फार मोठा टप्पा पार पडणार आहे ज्यामुळे सगळीकडे मराठीचा एकच फॉन्ट उपलब्ध होईल त्यातून सर्व पत्र व्यवहार आणि सर्व करस्पॉन्डन्स मराठीतून करण्यासाठी निश्चितपणे फायदा होईल.

सभापती महोदय, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सर्व जाहिराती केवळ मराठीतून दिल्या जाव्यात या संदर्भातील दक्षता घेण्यात यावी अशी सूचना अनेक सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .......

मला असे वाटते की, आपण 1980 मध्ये मराठी भाषिक वृत्तपत्रांमध्ये देण्यात येणाऱ्या जाहिराती मराठीत व इतर भाषिक वृत्तपत्रातील जाहिराती हिंदीत देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. एमपीएससीच्या रिक्रुटमेंटच्या संदर्भात मराठीत जाहिराती असल्याच पाहिजेत. अन्य भाषांबरोबर मराठीत जाहिराती असण्याबद्दल तक्रार नाही. एखादी जाहिरात जर इंग्रजीमध्ये किंवा हिंदीत येत असेल तर मराठीतून आलीच पाहिजे ही दक्षता घेतली जाईल आणि राज्यातील सर्व वृत्तपत्रांमध्ये एमपीएससीच्या जाहिराती देत असताना त्या मराठीत सुध्दा असतील ही दक्षता निश्चितच घेतली जाईल.

सभापती महोदय, बारावीपर्यंत इंग्रजी हा विषय कंपल्सरी आहे परंतु मराठी विषय कंपल्सरी नाही असाही उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. आम्ही या बाबतीत विभागाची बैठक निश्चित घेऊ. चपळगावकर समितीसमोर आपल्याला जे काही विषय त्यांच्या विचारार्थ ठेवावयाचे आहेत त्यामध्ये हा विषय आपल्याला चर्चेला ठेवता आला पाहिजे आणि त्यातून नेमके राज्याचे धोरण कसे असावे, एकीकडे आपण पाहतो की, कर्नाटकमध्ये कन्नडच्या बाबतीत हा प्रकार होऊ लागला आहे म्हणून हे करीत असताना राज्यामध्ये वाद निर्माण करण्याची शासनाची निश्चितच भूमिका नाही. पण मराठीचा अवमान होणार नाही आणि मुलांना मराठी शिकण्याच्या संदर्भात आवड निर्माण व्हावी याकरिता शैक्षणिक धोरणामध्ये नेमके काय करणे महत्वाचे आहे याबाबतीत चपळगावकर समितीने धोरणात्मक निर्णय सुचवावेत जेणेकरुन हा विषय सुध्दा आपल्याला मार्गी लावता येईल आणि त्याबाबतीत निश्चितपणे आपल्याला निर्णय घेता येईल.

सभापती महोदय, टॅक्सी परवाने देण्याच्या बाबतीत या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. मोटार व्हेईकल ॲक्टचा उल्लेख मी मुद्दाम करतो कारण याबाबतीत मागच्या काळामध्ये फार गदारोळ झाला होता आणि वस्तुस्थिती काय आहे हे मला सभागृहाला अवगत केले पाहिजे. केंद्राचा जो मोटार व्हेईकल ॲक्ट आहे त्यामध्ये महाराष्ट्रात ज्याला आपल्याला टॅक्सीचे परमीट द्यावयाचे आहे त्याबाबतीत असे म्हटले आहे की, "He should have working knowledge of Marathi and any other local language" मराठी त्याला ज्ञात असले पाहिजे. किमान त्याला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .......

बोलता तरी आले पाहिजे. ज्ञात म्हणजे किमान वर्कीन्ग नॉलेज असे आपण म्हणू, ते नॉलेज तरी त्याला असले पाहिजे. त्याचबरोबर लोकल लँग्वेज म्हणजे महाराष्ट्रामध्ये हिंदी बोलतात, गुजराथी बोलतात. तामीळनाडूमध्ये जर हा ॲक्ट पाहिला तर त्यामध्ये असे म्हटले आहे की, "The person should have working knowledge of Tamil and any other local language" त्याला तामीळ भाषा आली पाहिजे तसेच लोकल लँग्वेज म्हणजे त्यांनी तामीळमध्ये तरी बोलावे किंवा इंग्रजीमध्ये तरी बोलावे अशी अपेक्षा आहे. त्या ठिकाणी ज्याला तामीळ भाषा येत नाही ते इंग्रजी बोलतात. सागण्याचा मुद्दा एवढाच आहे की, हा केंद्राचा ॲक्ट आहे. मोटार व्हेईकल ॲक्टमध्ये तरतुदी आहेत. आपण जर कायदा नीट पाहिला तर त्यामध्ये ज्या तरतुदी आहेत त्यासंदर्भात जी गल्लत होते किंवा जे गैरसमज निर्माण केले जात आहेत त्याबाबत सांगू इच्छितो की, कायद्यात जी भूमिका अंतर्भूत आहे तीच भूमिका राज्य शासनाने स्वीकारलेली आहे, हे मला या ठिकाणी मुद्दाम नमूद केले पाहिजे.

सभापती महोदय, त्याचबरोबर मराठी ही संगणकाची, माहिती तंत्रज्ञानाची तसेच व्यापाराची भाषा झाली पाहिजे अशी सूचना या ठिकाणी करण्यात आली. माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या निदर्शनास आम्ही ही बाब आणू. मराठी विद्यार्थ्यांना हे विषय सुलभ व्हावेत यासाठी या विषयात परिभाषा कोश तयार करण्याच्या बाबतीत भाषा सल्लागार समितीसमोर आम्ही निश्चितपणे प्रस्ताव ठेऊ. परिभाषा कोश तयार करीत असताना सरळ सोपे, फार क्लिष्ट असेल तर काही उपयोग होणार नाही त्यामुळे सरळ सोप्या पध्दतीने मराठी भाषेचा वापर आणि प्रसार कशा पध्दतीने करणे शक्य आहे याबाबतीत निश्चितपणे विचार करता येईल. त्याचबरोबर शासकीय, निमशासकीय महामंडळे या सगळ्या बाबतीत मराठीचा वापर शंभर टक्के झाला पाहिजे याबाबतीत सूचना आहेतच. शासकीय कामकाज संपूर्णपणे मराठीत व्हावे याबाबत शासनाच्या सूचना आहेतच. त्यामुळे तशी शासनाची भूमिका आहेच. विज्ञान क्षेत्रातील, व्यापार क्षेत्रातील मराठी मातृभाषा असलेले मुस्लीम, आदिवासी या समितीमध्ये आहेत काय असा मुद्दा या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. आपण समिती नेमलेली आहे. मला वाटते की, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी ही

...3....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. अशोक चव्हाण .......

सूचना केली होती. आपण श्री. चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली भाषा सल्लागार समिती नेमलेली आहे. त्याबाबतीत त्यांनी सभागृहात सूचना केलेल्या आहेत. समितीमध्ये आपण तज्ज्ञ नियुक्त करीत असताना कोण हिंदू आहे की मुस्लीम आहे किंवा अन्य कोण आहे याचा विचार कधीच करीत नाही. या क्षेत्रामध्ये जे तज्ज्ञ आहेत, ज्यांना याची काही माहिती आहे, मग ते कोणीही असो त्यांचा यामध्ये अंतर्भाव करण्याची माझी तयारी आहे. ही समिती आपण गठीत केलेलीच आहे पण आणखी कोणी तज्ज्ञ असतील तर त्यांना सुध्दा निश्चितपणे यामध्ये अंतर्भूत करता येईल आणि त्यांचेही मार्गदर्शन आपल्याला घेता येईल्.

सभापती महोदय, मला असे वाटते की, यासंदर्भात जे महत्वाचे मुद्दे समोर आलेले आहेत त्यामध्ये भाषा संचालनालयात अनुवादकांची संख्या कमी आहे, ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/ प्रथम श्री.बरवड 10:55

श्री.अशोक चव्हाण.....

अनुवादकांची 42 पदे मंजूर आहेत, त्यापैकी 25 पदे भरलेली आहेत, 11 पदे रिक्त आहेत. अनुवादकांची मोठया प्रमाणात गरज आहे. परंतु ब-याच वेळा जाहिरात देऊन सुध्दा उमेदवार मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. अनुवादाकांची जी कमतरता आहे त्याबाबत निश्चित लक्ष घातले जाईल आणि रिक्त जागा भरल्या जातील.

सभापती महोदय, या चर्चेचा जो सारांश आहे, त्याबाबत मी उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या नवीन विभागासंबंधी ज्या अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत त्या अपेक्षा या विभागाच्या माध्यमातून पूर्ण करण्याच्या दृष्टीने जे जे अपेक्षित आहे ते सर्व केले जाईल. मला वाटते की, ही चांगली सुरुवात आहे. मध्यंतरी खंड पडला होता. हे मान्य करावे लागेल. ज्या गतीने काही गोष्टी व्हावयास पाहिजे होत्या त्या गतीने होत नव्हत्या. त्याबाबत निर्णय होणे अपेक्षित होते. परंतु या सगळया गोष्टी आता मार्गी लागतील आणि त्याच्यातून जे समोर येत आहे त्यातून निश्चितपणे चांगले घडावे अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, मला एक गोष्ट याठिकाणी मुद्दाम सांगितली पाहिजे. परदेशामध्ये मराठी भाषिक नागरिक मोठया प्रमाणावर आहेत. मी काही दिवसांपूर्वी सिंगापूरला मराठी मंडळाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिलो होतो. सिंगापूर सारख्या ठिकाणच्या एका शाळेमध्ये एक उत्कृष्ट मराठी लायब्ररी निर्माण केलेली आहे. काही मराठी पुस्तकांचा केवळ मुलेच नाही तर बाहेरचे सदस्य किंवा स्थानिक भारतीय लोक आहेत ते सुध्दा त्या मराठी लायब्ररीचा उपयोग करुन घेतात. परवाच सचिवांना सांगून राज्यात जे उत्तम मराठी वाङमय आहे, मराठी पुस्तके आहेत, कादंब-या आहेत, त्याची 1 हजार पुस्तके सिंगापूरमधील त्या लायब्ररीसाठी पाठविली आहेत. इतर देशामध्ये मराठी भाषिक आहेत त्यांना मराठी साहित्य असेल, कादंब-या असतील, मराठी लिखाण असेल, त्याचा फायदा व्हावा असा प्रयत्न आहे. अनेक वेळा तेथे गेल्यावर यासंदर्भातील मागण्या केल्या जातात. विशेषत: बृहन् महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनामध्ये मराठी संवर्धनाच्या संदर्भातील काही कल्पना मांडल्या जातात. मराठी शाळेचे प्रश्न काही ठिकाणी आहेत. तेथील शाळेत मराठी विषयाचे शिक्षक उपलब्ध होत नाहीत, अशाप्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. राज्यामध्ये

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण.....

याबाबत काळजी घेत असताना अन्य देशांमध्ये मराठी भाषिक लोक स्थायिक झालेले आहेत त्यांचाही विचार या सभागृहाच्या माध्यमातून केलेला आहे, त्यासाठी धोरण आखले गेले पाहिजे असे मला वाटते. त्यामुळे इतर ठिकाणच्या मराठी भाषिकांना त्याचा उपयोग होऊ शकेल. भाषा संचालनालयाच्या माध्यमातून नवीन विभाग निर्माण करीत आहोत, त्याच्या माध्यमातून अधिक चांगले काम केले जाईल. ज्या ज्या सूचना सभागृहाच्या माध्यमातून वेळोवेळी येतील त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील. तसेच त्या समितीमध्ये दोन्ही सभागृहातील सदस्यांचा समावेश करुन या कामात प्रभावीपणे लक्ष देता यावे आणि त्यातून नवीन निर्णय घेता यावेत अशी अपेक्षा व्यक्त करुन मी आपली रजा घेतो, जय हिंद, जय महाराष्ट्र.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अपेक्षा भंग झाला की, खूप वाईट वाटते. आम्ही असा आग्रह धरला की, माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे. या उत्तरामध्ये होय, मराठीच, असे आपण ठाम सांगाल असे अपेक्षित होते. या राज्यात अनेक मुख्यमंत्री होऊन गेले. परंतु आपण मराठीसाठी समिती नेमून या प्रश्नाला चालना देण्याचा मनोदय व्यक्त केला आहे त्याबाबत मी माननीय मुख्यमंत्र्यांना मनापासून धन्यवाद देतो. तो मनोदय पूर्ण होईल त्यावेळी आपले अभिनंदन जरुर करु. मी या प्रश्नाबाबत सभागृहात वारंवार उभा राहतो. ही चर्चा कशासाठी उपस्थित केली होती ? मराठीचे धोरण जाहीर करण्याची भूमिका घेतली ती महाराष्ट्राच्या राज्य सरकारला अत्यंत भूषणावह बाब होती. आम्हाला असे वाटले होते की, आम्ही मागील 44 वर्षांपासून मराठीसाठी लढा देत आहोत. त्यामुळे मराठीच्या धोरणबाबत आम्हाला बोलण्याचा जो अधिकार आहे त्या अधिकारानुसार बोलले पाहिजे म्हणून आम्ही ही चर्चा उपस्थित केली होती. आपल्याकडे ज्या अधिका-यांनी माहिती दिली त्याच्याबद्दल मी खेद व्यक्त करतो. माननीय मुख्यमंत्र्यांच्या मनोदयाबद्दल खेद व्यक्त करीत नाही. मी येथे जे मांडले होते की, सध्या जे धोरण आहे त्याचीच अंमलबजावणी होत नाही. परंतु अधिका-यांनी तेच आपल्या हातामध्ये दिले आहे. केंद्रीय बँकांमध्ये सभागृहात मंजूर केलेल्या ठरावाची अंमलबजावणी होत नसेल तर त्याबाबत जिल्हाधिका-यांची जबाबदारी आहे. आतापर्यंत त्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे जिल्हाधिका-यांविरुध्द हक्कभंग

3.....



NTK/ SBT/ MMP/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

प्रस्ताव दाखल करण्याचा माझा हक्क मी राखून ठेवत आहे. आपण जोपर्यंत कारवाई करीत नाही तोपर्यंत ते बधत नाहीत.

मी चार दिवसांपूर्वी 5 मोठया बँकांमध्ये गेलो होतो. तेथे भानगड करता येते, राडा करता येतो, काचा तोडता येतात. धमाल करता येते हे सोपे आहे. परंतु या सदनामध्ये मराठी भाषेचा प्रस्ताव सुरु आहे आणि त्याला माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत, त्यापूर्वी तुम्ही मराठी भाषेची अंमलबजावणी का करीत नाही हे विचारण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत असे त्यांना सांगितले होते. त्यावेळी लोकांना असे वाटले असेल की शिवसेनेच्या पध्दतीने हे करणे सोपे असते. त्याला वेळ लागत नाही. परंतु मराठी भाषेला सन्मानित करण्यासाठी कोणाला अवमानित का करावे ? म्हणून मी त्या बँकांमध्ये गेलो होतो.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

केन्द्रीय कार्यालयामध्ये कुणी आपल्यावर मेहरबानी करीत नाही. हे झालेच पाहिजे असा आग्रह आपण धरला पाहिजे. 50 वर्षामध्ये हे का झाले नाही ? आपण त्यांना सांगायला पाहिजे होते की जर तुम्ही 15 दिवसामध्ये हे केले नाही तर त्या संदर्भात कडक कारवाई केली जाईल. माननीय मुख्यमंत्र्यांनी चपळगावकर समिती नेमली, परिभाषा कोश तयार करण्याच्या संदर्भात सांगितले. या चांगल्या गोष्टी त्यांनी केल्या.

सभापती महोदय, वाहनांच्या नंबर प्लेट्स बाबत मुख्यमंत्री महोदयांनी खुलासा केला. मी हे सांगू इच्छितो की, शासनातील अधिकारी हे माननीय मुख्यमंत्र्यांना नीट माहिती देत नाहीत.नीट ब्रिफिंग करीत नाहीत.  केन्द्रीय कायद्यानुसार स्थानिक भाषेत नंबर प्लेट लावता येते. ती इंग्रजीमध्येही लावली पाहिजे. पण स्थानिक भाषेमध्ये नंबर प्लेट लावावी अशा प्रकारची तरतूद केन्द्रीय कायद्यामध्ये आहे. हे मला माहीत आहे. कारण मी परिवहन मंत्री होतो आणि नंबर प्लेट मराठीमध्ये लावण्यासंबंधी मी आग्रह धरला होता. नंबर प्लेटच्या संदर्भात या सभागृहामध्ये जेव्हा चर्चा झाली होती त्यावेळी आताचे गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी सांगितले होते की वाहने इतर राज्यामध्ये ये-जा करीत असतात त्यामुळे नंबर प्लेट इंग्रजीमध्ये लिहावी लागते.  परंतु टॅक्सी, रिक्षा, ग्रामीण भागातील एस.टी. ही वाहने तर बाहेरच्या राज्यात जात नाहीत. मग या वाहनांच्या नंबर प्लेट पूर्णत: मराठीमध्ये करायला काय हरकत आहे ? इतर राज्यामध्ये जाणा-या वाहनांच्या संदर्भात कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता नंबर प्लेट इंग्रजीमध्ये ठेवा. परंतु राज्यातच वाहतूक करणा-या टॅक्सी, रिक्षा, एस.टी.गाड्या यांच्या नंबर प्लेट मराठीत करा. हे करतो म्हणून शासनाने सांगितले. त्याला दीड वर्ष झाले. मराठी नंबर प्लेट लावल्यामुळे दंड केला जात होता, तो कशासाठी करता असा तो विषय होता.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी जेव्हा असे सांगितले की, "महाराष्ट्रामध्ये परमीट देताना ते मराठी भाषेतच असले पाहिजे" त्यावेळी आख्ख्या महाराष्ट्राने त्यांचे अभिनंदन केले. त्यांनी जेव्हा ही घोषणा या सभागृहामध्ये केली त्यावेळी मला कै. शंकरराव चव्हाण यांची आठवण झाली. आता 15 दिवसानंतर त्यांना असे सांगावे लागले की, त्याला मराठी भाषेचे ज्ञान अवगत असले पाहिजे, मराठी भाषा आली पाहिजे, मराठी लिहिता आले पाहिजे  आणि

(श्री. दिवाकर रावते....

अन्य कोणत्याही भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे असे सांगितले. मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी केन्द्राच्या दडपणाखाली राहू नये. अन्य राज्ये केन्द्राला जुमानत नाहीत. आपण या महाराष्ट्रामध्ये अशी ठाम भूमिका घ्यावी की मराठी आलेच पाहिजे.

सभापती महोदय, ग्रामपंचायती पासून मंत्रालयापर्यन्त मराठीतून नाव लिहिताना अद्याक्षरेदेखील इंग्रजीमध्ये लिहिली जातात. माझे नाव मराठीमध्ये लिहिताना मी दि.ना.रावते असे लिहितो. मी डी.एन.रावते असे लिहीत नाही. तसेच माननीय मुख्यमंत्र्यांना त्यांचे नावे अ.एस.चव्हाण असे मराठीमध्ये लिहिता येणार नाही. परंतु सगळे अधिकारी अशाच प्रकारे नाव लिहितात. यासंदर्भात शासनाने 1963 साली परिपत्रक काढलेले आहेत. त्यामध्ये दंडाची देखील शिक्षा ठेवलेली आहे. ते परिपत्रक घेऊन मी फिरतो. हे परिपत्रक 1963 साली काढले आणि आज 2010 सालामध्ये त्या परिपत्रकाच्या अंमलबजावणीसाठी मला पाठपुरावा करावा लागत आहे हे दुर्दैव आहे. ग्राम पंचायती, जिल्हा परिषदा, नगरपरिषदा यांना जे हजेरी पुस्तक देण्यात येते ते इंग्रजीमध्ये दिले जाते. ते मराठीत दिले पाहिजे. मी काही वेगळ्या गोष्टी मांडल्या नाहीत. शासनाने जी जी काही परिपत्रके या संदर्भात काढलेली आहेत त्याची अंमलबजावणी करा, जे आहे ते करा.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहिराती बाबत सांगितले. एमपीएससीची जाहीरात मराठीतून येण्यासंबंधी मी स्वत: पत्र लिहिले. जिल्हा परिषदा आणि नगरपरिषदांच्या जाहिराती मराठीतून आल्या पाहिजेत. टेंडर मराठीतच असले पाहिजे. एवढे जरी झाले तरी अंबानी सारख्या मोठ्या उद्योजकांना त्यांच्या कार्यालयामध्ये मराठी येणा-या माणसाची नेमणूक करावी लागेल. त्यासाठी एका माणसाला नोकरी लागेल. म्हणून मराठीचा आग्रह धरला तर त्यामुळे नोक-या निर्माण होतील अशी अपेक्षा मी व्यक्त केली होती.

सभापती महोदय, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी एक समिती नेमण्यात आलेली आहे. आम्हाला मराठी भाषेच्या संदर्भात ज्या ज्या काही सूचना करावयाच्या आहेत त्या आम्ही समितीकडे पाठवू. काही गोष्टी आपण केल्या, पण भाषा संचालक केव्हा नेमणार आहात ? वर्षानुवर्षे हा विषय प्रलंबित आहे. या ठिकाणी मी कुसुमाग्रजांचा उल्लेख केला होता. त्यासंदर्भात मी एक गोष्ट आपल्याला वाचून दाखवतो, म्हणजे त्याचे गांभीर्य आपल्या लक्षात येईल.

....नंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

सभापती महोदय, माझ्याकडे डॉ.वि.ना.श्रीखंडे यांनी लिहिलेल्या ".....आणि दोन हात" या पुस्तकाची प्रत उपलब्ध आहे. डॉ.श्रीखंडे यांनी इंग्लंडमध्ये एफ.आर.सी.एस.चे शिक्षण घेतले आणि रुग्णांची सेवा करण्यासाठी ते भारतात परत आले. त्यांनी त्यांच्या पुस्तकामध्ये भाषेसंबंधी जे लिहिले आहे ते डोळ्यात अंजन घालणारे आहे. त्यात असे म्हटले आहे की, "भारतामध्ये शिक्षणाचा मसुदा तयार करण्यात आला १८२८ च्या सुमारास. काहींचे मत भारतीय भाषा समृध्द आहेत, तेव्हा त्या भाषेमधूनच भारतीयांना शिक्षण द्यावे असे होते. या विचारसरणीच्या लोकांना म्हणतात, इंडॉलॉजिस्ट. दुसऱ्या गटाला वाटले की, इंग्रजीमधूनच शिक्षण द्यावे. या विचाराची सरशी झाली. ही कामगिरी मेकॉलेवर १८२८ साली सोपविण्यात आली. त्याने आपण काय करणार आहोत हे ब्रिटिश पार्लमेंटमध्ये विशद केले. मेकॉले याने आपल्या मुलाला पत्र लिहून कळविले की, मला हिंदुस्थानामध्ये जन्माने भारतीय पण विचाराने इंग्रज झालेले लोक तयार करायचे आहेत. मी असा मसुदा तयार केला आहे की, पुढील काही वर्षामध्ये मी जे शिक्षण देणार आहे त्यामुळे तीन उद्दीष्टे मी गाठणार आहे. १) कोणत्याही माणसाला त्याच्या मातृभाषेतून नीट बोलता येणार नाही." हे आज आपण अनुभवतो आहोत. "२) भारतीय कपडे घालणे त्याला कमीपणाचे वाटेल आणि ३) धर्मावरील निष्ठा फक्त कर्मकांडापुरतीच शिल्लक राहील." हेही आपण अनुभवतो आहोत. एका इंग्रज अधिकाऱ्याने त्याच्यावर शिक्षणाचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी सोपविल्यानंतर त्याने ब्रिटिश पार्लमेंटमध्ये १८२८ साली विधान केले आणि सांगितले की, हिंदुस्थानातील लोकांना पूर्णपणे इंग्रज करुन टाकू. ते धोरण त्यांनी अंमलात आणले. तुमच्या आमच्या दुर्दैवाने आपण ते अनुभवतो आहोत. या संदर्भातील संशोधन चपळगावकर समितीला करण्यास सांगावे. मेकॉले याने जे सांगितले ते सत्यात उतरले आहे. म्हणून मला शासनाकडून अपेक्षा आहे. त्यादृष्टीने मी बोललो आहे. "मराठीच" ही ठाम भूमिका घेतली पाहिजे.

सभापती महोदय, न्यायालयामधून मराठी भाषेचा अवलंब झालाच पाहिजे. मी दीड तास या प्रस्तावावर भाषण केले. मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले की, आम्ही करु. याठिकाणी सांगण्यात आले की, एका वर्षात ३० टक्के मराठी भाषेतून निकाल दिले जात होते तेही बंद केले. पूर्णपणे इंग्रजी भाषेतून निकाल द्यायला सुरुवात झाली आहे. ३० टक्क्याचे प्रमाण ५० टक्क्यावर गेले असते तर ठीक होते. परंतु तसे न होता मराठी भाषेतून निकाल देणे बंद केले गेले. न्यायालयात मराठी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

भाषेचा आग्रहाने वापर झाला पाहिजे अशी आमची मागणी आहे. 'बॉम्बे हायकोर्ट'चे 'मुंबई हायकोर्ट' करण्यात केंद्र सरकारला कोणती अडचण येत आहे? माननीय मुख्यमंत्री वारंवार दिल्लीला जात असतात. केंद्र सरकारपुढे हा विषय मांडून हा प्रश्न धसास लावावा अशी विनंती करतो. दुसरा मुद्दा मांडला तो रेल्वे स्थानकांना ब्रिटिशांची नावे दिलेली आहेत त्यासंबंधीचा होता. ती नावे पुसून टाकण्याचे ठरविले तर पुसून टाकण्याचा निर्णय घेतील. वेगवेगळया रेल्वे स्थानकांची ब्रिटिश काळातील नावे बदलून पर्यायी नावे देण्याबाबत जी सूचना केली आहे त्यासंबंधीचा ठराव सभागृहात मांडून मंजूर करुन घ्यावा व तो केंद्र सरकारकडे पाठवावा अशी विनंती करतो. धन्यवाद.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मी फक्त दोन सूचना करणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी मराठी भाषेच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय दमदार पाऊल उचलले आहे. चपळगावकर समितीमध्ये एकाही मुस्लीम व्यक्तीचा समावेश केलेला नाही. महाराष्ट्रामध्ये जे मुस्लीम आहेत ते उत्तरप्रदेशातून आलेले आहेत असे समजले जाते ही अतिशय चुकीची गोष्ट आहे. उर्दू आणि मराठी भाषा जाणणारे अनेक विद्वान मुस्लीम आहेत. ज्यांनी साहित्याची निर्मिती केली, मराठी नाटके लिहिली. त्यांची नावे मी माननीय मुख्यमंत्र्यांना देईन. सभापती महोदय, जर्मन भाषा विकसित करण्यासाठी खेड्यापाड्यामध्ये ती कशारितीने वापरली जाते याचा सर्व्हे करुन जर्मन भाषा समृध्द करण्यात आली. त्याच धर्तीवर महाराष्ट्रामध्ये खेड्यापाड्यात मराठी भाषेचा भरपूर वापर होतो. फक्त संस्कृतच्या अनुषंगाने मराठी भाषेचा विकास करण्याची धडपड सुरु झालेली आहे ती चुकीची आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मराठी साहित्याची विक्री वाचकांना हवी असते. माननीय मुख्यमंत्रीमहोदय, आपले डिस्ट्रिब्यूशन अतिशय कमजोर आहे. कुठेही भाड्याने जागा घेऊन पुस्तक विक्री करणे पुस्तक भांडाराच्या मालकांना परवडत नाही. नगरपालिका, महापालिका आणि जिल्हा परिषदांमार्फत मराठी साहित्याची विक्री करण्याकरिता गाळे उपलब्ध करुन दिले तर मोठया प्रमाणात साहित्याची विक्री होण्यास मदत होईल. साहित्य प्रदर्शनात करोडो रुपयांची पुस्तक विक्री होते. लोकांना साहित्य घ्यायचे असते. परंतु आज नवी मुंबईमध्ये एकही मराठी पुस्तकांची विक्री करणारे दुकान नाही.

नंतर आय.१.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .......

दादरला येऊन ही पुस्तके घ्यावी लागतात. या वर्षात निदान शासनाने याबाबत स्पेसिफिक विचार केला तर बरे होईल. त्याचबरोबर मराठी अधिकाऱ्यांबाबत विचार मांडले त्या अनुषंगाने माझी अशी सूचना आहे की, अशा मराठी अधिकाऱ्यांची यादी केली पाहिजे. उदाहरणच द्यावयाचे म्हटले तर मुंबई दूरदर्शनच्या वृत्त विभागाचे डायरेक्टर श्रीमती मुखर्जी मॅडम या आहेत. मराठीतून बातम्या देण्याचा हा विभाग असून खऱ्या अर्थाने इतर ठिकाणी सुध्दा मराठी अधिकारी उपलब्ध असताना या पदावर अमराठी व्यक्ती आहेत. अर्थात त्या केपेबल नाही असे मला म्हणावयाचे नाही परंतु 7-7, 8-8 वर्षे अशी अमराठी व्यक्ती तेथे राहिल्यानंतर दूरदर्शनच्या बातम्यांची परिस्थिती आपल्याला माहीत आहे की कशी आहे. अशा बातम्यांवर मराठी अधिकारी असला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

डॉ. दीपक सावंत : महोदय, ज्याप्रमाणे कर्नाटक राज्याने सुप्रीम कोर्टाचा निर्णय बाजूला ठेवून आयसीएसई आणि सीबीएसई साठी त्रिभाषा सुत्री लागू केली त्याप्रमाणे मुंबई व महाराष्ट्रातील संपूर्ण आयसीएसई व सीबीएसई शाळांमध्ये सुध्दा मराठी विषय कम्पल्सरी करण्याचा निर्णय शासन घेणार काय ?

श्री. अशोक चव्हाण : महोदय, काही चांगल्या सूचना सन्माननीय सदस्यांनी केल्या आहेत म्हणून त्यांना प्रतिसाद देण्यासाठी मी उभा आहे. राज्यात दरवर्षी मराठी साहित्य संमेलन भरते तेव्हा प्रकाशकांच्या वतीने मराठी पुस्तके तसेच वेगवेगळे ग्रंथ विक्रीसाठी मोठमोठे स्टॉल्स उभारले जातात. तेव्हा अशी पुस्तके वाचन आणि खरेदी करण्यासाठी वाचकांची गर्दी उसळते पण ही संधी फक्त वर्षातून एकदाच असते, असे मला वाटते. तसेच सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्या अनुषंगाने राज्यशासनाच्या वतीने जिल्ह्याच्या ठिकाणी अशा प्रकारची प्रकाशने उपलब्ध व्हावीत म्हणून अशा पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्याच्या बाबतीत निर्णय घेण्यात येईल. त्याचप्रमाणे निरनिराळ्या जिल्ह्यात प्रकाशकांना एकत्र आणून मराठी ग्रंथ व साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून किमान एक गाळा उपलब्ध करुन देण्याबाबतचे आदेश ताबडतोब निर्गमित केले जातील. त्याचबरोबर आयसीएसई व सीबीएसई माध्यमाच्या शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करण्याबाबत सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली त्या अनुषंगाने मला

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण ........

असे सांगावयाचे आहे की,  यासंदर्भात आपण समिती नेमलेलीच आहे ती समिती याबाबतची वस्तुस्थिती पडताळून पाहणार आणि त्यावर विचार करेल.

श्री. हेमंत टकले : महोदय, आपल्याकडे अमेरिकन कौन्सिलेटचे कार्यालय मुंबईमध्ये आहे. ज्यावेळेस मराठी नाट्य संमेलन अमेरिकेत ठरले होते तेव्हा व्हिसा घेण्यासाठी ज्या मुलाखती घेतल्या जातात त्या मुंबई येथील कार्यालयातच घेतल्या जात असल्याने त्या सर्वांचा नंबर लागणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती.  तेव्हा लक्षात आले होते की, मराठी लोकांनी मराठीतून मुलाखती देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.  परंतु मुंबईतील अमेरिकन कौन्सिलेटमध्ये मराठी भाषा समजणाऱ्या दोनच व्यक्ती कार्यरत आहेत, गुजराती भाषा समजणाऱ्या व्यक्ती मात्र 7 आहेत. कौन्सिलेट जर मुंबईत असेल तर मराठी भाषा समजणारे लोक देखील जास्त प्रमाणात तेथे सेवेत घ्यावे, अशी माझी शासनाला सूचना आहे.

**उपसभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपलेली आहे. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक 11.45 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.14 ते 11.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्याबाबत**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असतांना या सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नसणे हे शासनाला शोभादायक नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कॅबिनेटमंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आपण शासनाला समज दिली पाहिजे. सभागृह स्थगित न करता शासनाला आपण समज द्यावी.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**(अल्पसूचना प्रश्न क्रमांक 9009)**

**(प्रेस: येथे सोबतचा अल्प सूचना प्रश्न क्रमांक 9009 छापावा.)**

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( श्री. भास्कर जाधव, श्री. अशोक चव्हाण यांच्याकरिता)

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबईमध्ये सध्या पाऊस पडल्यामुळे आता पाण्याची टंचाई थोडी कमी झाली आहे. परंतु काही दिवसापूर्वी मुंबईत पाण्याची टंचाई जाणवत होती त्यामुळे मुंबईत पाण्याचा यक्ष प्रश्न तयार झाला होता व या पार्श्वभूमीवरच हा अल्पसूचना प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. या अल्पसूचना प्रश्नाच्या उत्तरात असे म्हटले आहे की, "मुंबई शहराच्या पाणी पुरवठयासाठी पावसाच्या पाण्यावर असणारे अवलंबन कमी करण्यासाठी समुद्राचे पाणी गोड करुन वापरण्याबाबत शासनाने मुंबई महानगरपालिकेस सूचना दिलेल्या आहेत." शासनाने मुंबई महानगरपालिकेस सूचना दिल्या असल्या तरी आपण त्यांना सिंगापूरला जाण्यामध्ये खोडा घातला आहे हे विसरता येणार नाही. प्रश्न क्रमांक 4 च्या संदर्भात उत्तरात असे म्हटले आहे की, "शिष्टमंडळाला शासनाने अनुमती नाकारली असे म्हणणे वस्तुस्थितीस धरुन नाही." त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, समुद्राचे खारे पाणी गोड करुन जनतेस वापरण्यासाठी ते उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय ? तसेच यासाठी जी काही कार्यप्रणाली आहे ती सिंगापूरमध्ये बसविण्यात आली असून सिंगापूरमध्ये खारे पाणी गोड करण्याचा प्रयोग यशस्वी झालेला आहे. त्यामुळे सिंगापूर येथे खारे पाणी गोड पाणी करण्याचा प्रयोग आपल्या येथे करण्यासाठी राज्य शासनाने कोणती भूमिका घेणार आहे व त्यासाठी शासन कोणती पावले टाकणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांच्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, राज्य शासनाने खारे पाणी गोड करण्याच्या संदर्भात महानगरपालिकेचे अधिकारी, राज्य शासनाचे अधिकारी आणि बीआरसीचे अधिकारी यांना बरोबर घेऊन एकत्रित अभ्यास करण्याचा निर्णय घेतला असून बीआरसी बरोबर प्रोजेक्ट टायअप करण्याचा निर्णय घेतला आहे. चेन्नई पेट्रो कॉर्पोरेशन लि.चेन्नई कंपनी मार्फत खारे पाणी गोड करण्याचा प्रकल्प चेन्नई मध्ये सुरु आहे. या प्रकल्पाची पाहणी सुध्दा राज्य शासनाच्या वतीने करण्यात आलेली आहे. या करिता जागा कोणती असावी यासाठी जागेची सुध्दा पाहणी करण्याचे काम समितीने केलेले आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अ.सू.क्र.9009.....

श्री.भास्कर जाधव...

त्याकरिता 4 जागा पाहण्यात आल्या आहेत. हा जो प्रकल्प आहे तो शासन करणार नसून PPP तत्त्वावर करणार आहे. सदर प्रकल्पासंबंधी निविदा काढण्याची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी चेन्नईचा उल्लेख केला आहे. चेन्नईमध्ये आंघोळीसाठी, कपडे धुण्यासाठी, शौचालयासाठी प्रक्रिया केलेले पाणी वापरतात. मी नेहमी चेन्नईला जातो. तेथे पिण्यासाठी बिस्लेरीचाच वापर करण्यात येतो. तेव्हा मुंबई येथे पिण्या योग्य पाणी करण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,हा प्रकल्प अत्यंत प्राथमिक स्वरूपात आहे. मी येथे थोडी माहिती देऊ इच्छितो. एक हजार लिटर पाणी द्यायचे असेल तर दहा रूपये खर्च येतो. तेवढेच पाणी झोपडपट्टीवासियांसाठी द्यावयाचे असेल तर रूपये 2.25 पैसे खर्च येतो, तर सोसायटीला पाणी द्यायचे असेल तर रूपये 3.50 पैसे इतका खर्च येतो. वाणिज्यिक वापरासाठी एक लिटर पाणी द्यायचे असेल तर आपण रूपये 10/- ते रूपये 60/- पर्यंत दर आकारतो. अशा पद्धतीने आपले सध्याचे पाण्याच्या देयकाचे विवरण आहे. आपण खारे पाणी गोडे करण्याचा निर्णय घेतल्यानंतर एक हजार लिटर पाण्यासाठी जवळ जवळ रूपये 50/- इतका खर्च येईल, असा प्राथमिक अहवाल आहे. त्यामुळे पाण्याचा उपयोग वाणिज्यिक पद्धतीने करावा किंवा कसा हा विचार करण्यासारखा भाग आहे. त्यामुळे या क्षणी तरी पिण्या योग्य पाणी शुध्द करण्याचा विचार करता येणार नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा प्रकल्प महाराष्ट्र शासनाला, मुंबई महानगरपालिकेला आर्थिकदृष्ट्या व्हायेबल वाटतो का ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी येणाऱ्या खर्चाची माहिती दिली आहे. व्हायेबल वाटणे आणि न वाटणे हा नंतरचा भाग आहे. मुंबई शहरात दिवसेंदिवस होत असलेल्या पाणी टंचाईचा विचार करता पाण्याचे रिसायकल करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. पाण्याच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर या प्रकल्पाचा पर्याय म्हणून विचार करणे आपल्याला भाग आहे.

...........

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अल्पसूचना प्रश्न क्रमांक 9005**

(प्रेस : येथे सोबतचा अल्प सूचना क्रमांक 9005 छापावा)

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा.फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता)

अ.सू.प्र.क्र.9005....

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, अपंग व्यक्तींना शासकीय रूग्णालयातून दाखले देण्यासंबंधातील हा प्रश्न आहे. राज्यातील अपंग व्यक्तींना शासकीय रूग्णालयातून सिव्हील सर्जन यांच्या कायार्लयातून अपंगाचे दाखले प्रदान केले जातात. ठाणे जिल्ह्यामध्ये 10 नगरपालिका, 7 महानगरपालिका आहेत. तसेच आदिवासी भाग देखील आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये सिव्हील सर्जन कार्यालयाकडून अपंग व्यक्तींना कधीच वेळेवर दाखले मिळत नाहीत. मध्यंतरी सिव्हील सर्जन कार्यालयाकडून आठवड्यातून दोन दिवस दाखले देण्याचे काम सुरू होते. त्यामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब, आदिवासी लोकांना दोन दिवस तेथेच थांबावे लागत होते. त्यामुळे त्यांची अडचण होत असे. आठवड्यातील सर्व दिवशी अपंगांसाठी दाखले देण्याचे शासनाने मान्य केलेले आहे. शासनाचे दररोज दाखले देण्याचे आदेश असताना सुद्धा आठवड्यातून दोन दिवस दाखले का दिले जातात ? यामध्ये कोणाची दिरंगाई झाली आहे किंवा हलगर्जीपणा झाला आहे ?

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्प सूचना प्रश्न क्रमांक 9005..

श्री.रामनाथ मोते...

माझा दुसरा प्रश्न असा की, सिव्हील सर्जनचे कार्यालय पहिल्या मजल्यावर आहे त्यामुळे अंध आणि अपंगाना पहिल्या मजल्यावर जाण्यास अडचणीचे होते. उत्तरात नमूद केलेले आहे की, पहिल्या मजल्यापर्यंत रॅम्प बांधण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. रॅम्पचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत सिव्हील सर्जन तळमजल्यावर येऊन अंध व अपंगांना प्रमाणपत्र देतील काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, अंध व अपंगांना प्रमाणपत्र देण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये सिव्हीज सर्जन, आर.एम.ओ., ऑर्थोपेडीक, ऑप्थाल्मेटीक स्पेशालिस्ट त्या समितीमध्ये असतात. हे खरे आहे की, अपंगाना दर दिवशी प्रमाणपत्र देण्यात यावे असा शासन निर्णय आहे. परंतु ठाणे जिल्ह्यामध्ये अपंगाना दोनच दिवस प्रमाणपत्र देण्यात येते होते. याबाबत त्यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, प्रमाणपत्र देणारे डॉक्टर हे स्पेशालिस्ट असतात. त्यांच्याकडे वेगवेगळ्या प्रकारची प्रमाणपत्रे घेण्यासाठी लोक येत असतात. वृध्दांना प्रमाणपत्र देणे, संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना प्रमाणपत्र देणे, हेल्थ प्रमाणपत्र इत्यादी प्रकारची प्रमाणपत्रे द्यावी लागतात. त्यासाठी त्यांनी कामाची विभागनी करुन दोन दिवस वृध्दांना प्रमाणपत्र देण्यासाठी ठेवले आहेत, दोन दिवस अंध व अपंगाना प्रमाणपत्र देण्यासाठी ठेवले आहेत अशाप्रकारे त्यांनी नियोजन केलेले आहे. परंतु असे करणे चुकीचे आहे हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी केलेले नियोजन रद्द केले आहे. स्पेशालिस्ट डॉक्टर्संना ओ.पी.डी.ला जावे लागते ओ.टी.मध्ये जावे लागते. आपण रोज प्रमाणपत्र देण्याचे ठरविले तर डॉक्टर्संना इतर रुग्णांकडे पाहण्यास वेळ मिळणार नाही. तेव्हा अपंगांना रोज प्रमाणपत्र देणे योग्य आहे की दोन दिवस प्रमाणपत्र देणे योग्य आहे याबाबत एक्झामीन करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, सिव्हील सर्जनचे कार्यालय पहिल्या मजल्यावर असल्यामुळे अपंगांना तेथे जाणे गैरसोयीचे होते म्हणून आम्ही त्यांच्यासाठी रॅम्प बांधण्याचे प्रस्तावित केले आहे. रॅम्प बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र लिहिणार असून रॅम्पची कुठे आवश्यकता आहे याचा आढावा घेऊन त्याप्रमाणे लवकरात लवकर अंमलबजावणी करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्प सूचना प्रश्न क्रमांक 9005..

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे फार मोठा जिल्हा आहे. ठाणे जिल्ह्याचे तीन जिल्हे होऊ शकतील इतका मोठा जिल्हा आहे. ठाणे जिल्ह्यात अपंगांना प्रमाणपत्र मिळण्यात फार मोठ्या अडचणी येतात, त्यांना फार त्रास सहन करावा लागतो. काही वेळा त्यांच्याकडे पैशाची मागणी केली जाते अशाप्रकारच्या तक्रारी आमच्याकडे आलेल्या आहेत. मोखाडा, तलासरी, विक्रमगड इत्यादी ठिकाणाहून अंध व अपंग प्रमाणपत्र घेण्यासाठी येतात. काही वेळा सिव्हील सर्जन मंत्रालयात मिटींगसाठी गेलेले असतात त्यामुळे त्यांना पुन्हा फेऱ्या माराव्या लागतात. तेव्हा अपंगाना विभागवार प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था करण्यात येईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सिव्हील सर्जनला फक्त जिल्ह्याच्या पातळीवर प्रमाणपत्र देण्याचे अधिकार होते. परंतु आता शासनाने जी.आर.काढून ग्रामीण भागात वैद्यकीय अधीक्षकांना विशेष तज्ज्ञांच्या उपलब्धतेनुसार प्रमाणपत्र देण्याचे अधिकार दिलेले आहेत. कारण समितीमध्ये स्पेशालिस्ट डॉक्टर्स असणे गरजेचे आहे. अपंगाची गैरसोय होऊ नये म्हणून हा निर्णय घेण्यात आलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण हॉस्पीटलमध्ये रॅम्प करणार आहात ही चांगली गोष्ट आहे. माझा प्रश्न आहे की, अपंगांना तळमजल्यावर प्रमाणपत्र मिळण्याची व्यवस्था करण्यात येईल काय ?

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 12.00

अल्पसूचना.प्र.क्र.9005

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ज्या ठिकाणी शक्य असेल त्या ठिकाणी तळमजल्यावर हे कार्यालय राहील त्याचबरोबर ठाण्यामध्ये सुध्दा डॉक्टर्सनी तळमजल्यावर येऊन अंध अपंग व्यक्तींना सर्टिफिकेट देण्याची प्रथा आहे.

डॉ.दीपक सावंत : परंतु अंध अपंग व्यक्तींना तपासणी करण्यासाठी वरच्या मजल्यावर जावे लागते तेव्हा दोन दिवस सर्टिफिकेट देण्यापुरते हे कायार्लय तळमजल्यावरच कार्यान्वित क रण्यात येणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, केवळ दोन दिवस सर्टिफिकेट देण्यात येत नाही तर आता रोजच असे सर्टिफिकेट देण्याची व्यवस्था केली जाते. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे त्या बाबत तेथील स्ट्रक्चर कसे आहे हे पाहून शक्य असेल तर तळमजल्यावर तातडीने ही व्यवस्था करण्यात येईल.

**सभापती** : अल्पसूचना प्रश्न संपले आहेत.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : लेखी उत्तरे

मु.शी. : तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव (श्री.भाऊसाहेब कांबळे) : सभापती महोदय, मी आपल्या अनूमतीने सोमवार, दिनांक 19 जुलै 2010 व बुधवार, दिनांक 21 जुलै 2010 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**सभापती** : सोमवार, दिनांक 19 जुलै 2010 व बुधवार, दिनांक 21 जुलै 2010 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे .

---

( प्रेस : सोबत जोडलेली यादी येथे छापावी )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 12.00

पृ.शी. : लेखी उत्तरे

मु.शी. : अतारांकित प्रश्नोत्तराची सहावी, सातवी,आठवी,नववी,दहावी अकरावी,बारावी,तेरावी,चौदावी ,पंधरावी, सोळावी व सतरावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव ( श्री.भाऊसाहेब कांबळे ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी ,अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी ,पंधरावी सोळावी व सतरावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी ,अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी ,पंधरावी सोळावी व सतरावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे..

( प्रेस : सोबत जोडलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या याद्या येथे छापाव्यात )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मु.शी. तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

प्रा.फौजिया खान (महिला व बाल विकास राज्यमंत्री ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने केन्द्र शासनाच्या सकस आहार योजनेअंतर्गत मागविण्यात आलेल्या निविदांना दिलेली स्थगिती " या विषयावरील श्री.रामदास कदम, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर यांच्या दिनांक 6 एप्रिल 2010 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 5021 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे

( प्रेस : कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी. मु.शी. कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.विजय वडेट्टीवार (जलसंपदा व ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लोक आयुक्त यांचे दिनांक 14 मार्च 2001, 21 मे 2001, 28 फेब्रुवारी 2002, 9 एप्रिल 2002, 22 एप्रिल 2002, 21 नोव्हेंबर 2002, 12 जून 2009 व 5 ऑक्टोबर 2009, आणि उप लोकआयुक्त यांचे 28 सप्टेंबर 2000, 17 डिसेंबर 2002, 18 डिसेंबर 2002, 19 जानेवारी 2009 आणि 12 जून 2009 चे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक
ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने वर्ष 2009-2010 मधील वितरीत तरतूद व मार्च 2010 अखेर खर्चाच्या जिल्हा निहाय तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने वर्ष 2009-2010 मधील वितरीत तरतूद व मार्च 2010 अखेर खर्चाच्या जिल्हा निहाय तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोदावरी, मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन 2008-2009 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो

**सभापती** :वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे

--

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन 2008-2009 चा अकरावा वार्षिक वित्तीय अहवाल सभसगृहासमोर ठेवतो

**सभापती** :वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

6.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादितचे सन 2005-2006, 2006-2007, 2007-2008, व 2008-2009 चा अनुक्रमे पहिला, दुसरा , तिसरा व चौथा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत

--

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादिचा सन 2008-2009 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन 2006-2007 व 2007-2008 चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन 2008-2009 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे .

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने जिल्हा परिषद ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / नाशिक / धुळे / नंदुरबार / जळगाव / अहमदनगर / पुणे / सातारा / सांगली / सोलापूर / कोल्हापूर / औरंगाबाद / जालना / परभणी / हिंगोली / बीड / नांदेड / उस्मानाबाद / लातूर / अमरावती / अकोला / वाशिम / बुलढाणा / यवतमाळ / नागपूर / वर्धा / भंडारा / गोंदिया / चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा परिषदांचे सन 2008-2009 चे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थंच्या लेख्यावरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन सदतिसावा अहवाल सन 2007-2008 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 1 एप्रिल 2009 ते 31 मार्च 2010 या कालावधीत शासनाच्या वेगवेगळया विभागांतर्गत संस्था, उपक्रमांनी घेतलेल्या कर्ज, कर्ज रोखे व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमी विषयीचे विवरणपत्र सभागृहाच्या माहितीसाठी सादर करीत आहे.

**सभापती** : विवरणपत्र सभागृहास सादर झाले आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (अल्पसंख्यांक विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या वेळी उप मुख्यमंत्र्यांनी दिनांक 22 मार्च 2010 रोजी विधानपरिषदेत मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : अधिक माहिती छापावी.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. शनिवार दिनांक 24 जुलै 2010 रोजी "राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या वाढीव पदांच्या" संदर्भात नियम 93 अन्वये सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या चर्चेच्या वेळी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी "त्या संदर्भात मंगळवारपर्यंत आदेश काढण्याची कार्यवाही करण्यात येईल" असे आश्वासन दिले होते. आज मंगळवार व अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. तेव्हा तशाप्रकारचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्यात आले आहेत काय? याबाबत या सभागृहाला माहिती मिळाली पाहिजे. त्याचप्रमाणे शुक्रवार, दिनांक 16 जुलै, 2010 रोजी "वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांमधील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्नाच्या चर्चेच्यावेळी निर्णय देतांना आपण या संदर्भात दोन-तीन दिवसात बैठक घेण्यात येईल असे सांगितले होते, ती बैठक अजून झालेली नाही. हे अधिवेशन आज संपणार असल्यामुळे ही बैठक केव्हा घेण्यात येईल याबाबत माहिती मिळाली तर मी आपला आभारी होईन.

**सभापती** : सोमवारी किंवा मंगळवारी याबाबत बैठक घ्यावी अशी माझी कल्पना होती. परंतु त्यानंतर माझी प्रकृती बरी नसल्यामुळे एक-दोन दिवसात मला त्यासाठी वेळ देता आला नाही. येत्या आठवडयात या संदर्भात आपणा सर्वांना बोलावून घेऊन व तसेच माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री. बाळासाहेब थोरात व माननीय वित्तमंत्र्यांना बोलावून घेऊन बैठक घेण्यात येईल. त्या दिवशी एकूण तीन बैठका घेण्यात येतील. त्याचप्रमाणे माननीय शालेय शिक्षणमंत्र्यांनी मंगळवारपर्यंत आदेश काढण्याबाबत आश्वासन दिले होते. त्याबाबतची पूर्तता आज दिवसभरामध्ये करण्यात यावी.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, होय.

----

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधेयकांना संमती व अधिसंमती

**सभापती** : विधानपरिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची यादी प्रधान सचिव वाचून दाखवतील.

सह सचिव : विधानपरिषदेने पारित केलेली पुढील विधेयके विधानसभेकडून संमत करण्यात आली.

1) सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 8 - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2010
2) सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 9 - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, 2010

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. मोहन जोशी (समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा पहिला अहवाल ( सन 2010-2011) सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : अंदाज समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. सुभाष चव्हाण (समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा पहिला, दुसरा व तिसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा पहिला, दुसरा व तिसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

**पृ.शी./मु.शी.**: विनंती अर्ज सादर करणे.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करणे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ( समिती प्रमुख): सभापती महोदय, ("दिनांक 10 जून, 2009 रोजी विधानपरिषदेत झालेल्या चर्चेनंतर दैनिक लोकसत्ताच्या दिनांक 12 जून, 2009 रोजीच्या अंकात सुझलॉन एनर्जी लि.च्या वतीने काढण्यात आलेल्या प्रसिध्दी पत्रकात "सुझलॉनचे आजवरचे यश हे केवळ आमच्या पवन ऊर्जा क्षेत्रातील आकड्यांचे नसून एकूणच जागतिक उद्योग-व्यवसाय क्षेत्रात एक कर्तव्यदक्ष व सामाजिक जाणिवेचे भान असलेली कंपनी असा सुझलॉनचा सार्थ लौकीक आहे. असे असतानाही काही असामाजिक प्रवृत्ती आपल्या क्षुद्र वैयक्तिक स्वार्थापोटी कंपनीवर बिनबुडाचे आरोप करु पाहात आहेत." असा महाराष्ट्र विधानपरिषदेच्या कामकाजावर टिकाटिप्पणी करणारा मजकूर प्रसिध्द केल्यामुळे उद्‌भवलेल्या महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांच्या विशेषाधिकार भंगाच्या व सभागृहाच्या अवमानाच्या प्रकरणासंदर्भातील") या विषयावरील विशेष हक्क समितीचा अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहास सादर करतो.

. सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात या सभागृहामध्ये चर्चा झाली होती. सुझलॉन कंपनी पवन चक्कीच्या क्षेत्रामध्ये या राज्यात काम करते. सातारा असेल, नंदूरबार असेल, धुळे असेल, किंवा अन्य ठिकाणी पवन चक्क्यांच्या माध्यमातून पवन ऊर्जा निर्मितीचे काम या कंपनीच्या माध्यमातून केले जाते. या संदर्भात शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या आणि त्यांना व्यवस्थित मोबदला दिला गेला नाही त्यामुळे त्यांचे एक्स्प्लॉयटेशन झाले अशा प्रकारची दिनांक 10 जून,2009 रोजी या सभागृहात चर्चा झाली आणि या चर्चेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्यामुळे सभापती महोदय, आपल्या माध्यमातून हा प्रस्ताव विशेष हक्क समितीकडे आला. विशेष हक्क समितीने सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांची साक्ष घेतली. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांची साक्ष घेतली. सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांची साक्ष घेण्यात आली तसेच त्या कंपनीच्या अधिकाऱ्यांची साक्ष घेण्यात आली आणि त्यांची उलट तपासणीही घेण्यात आली. हे सर्व कामकाज समितीच्या माध्यमातून करण्यात आले. समितीने हा अहवाल दिलेला आहे. समितीने अनकंडिशनल ॲपॉलॉजी मागितलेली आहे. ज्या दैनिकाच्या पानावर मजकूर प्रसिध्द





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी...

करण्यात आला होता व ज्या मजकुरामुळे हा विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव आणावा लागला होता त्याच दैनिकातील त्याच पानावर आणि त्याच जागेवर या कंपनीने मोठी जाहिरात देऊन सभागृहाची आणि सन्माननीय सदस्यांची माफी मागितलेली आहे त्यामुळे हे प्रकरण येथेच थांबविण्यात यावे, अशा प्रकारचा प्रस्ताव मी या सभागृहाला सादर करीत आहे.

**सभापती** : विशेष हक्क समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-----

यानंतर श्री. बरवड...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन बाबत

श्री. सय्यद ज़मा : सभापति महोदय, विशेष हक्क समिति की रिपोर्ट माननीय समिति प्रमुख ने यहां पर प्रस्तुत की है. पिछले अधिवेशन में 23 मई को मैंने एक हक्क भंग की सूचना दी थी. इस सूचना के बारे में मुझे जानकारी नहीं मिली है. मेरा आपसे अनुरोध है कि अगर वह सूचना मंजूर की गई है तो उस पर विचार किया जाए और यदि वह सूचना नामंजूर की गई है तो उसकी जानकारी हमें मिलनी चाहिए.

**सभापती** : आपल्या मुद्याची नोंद घेतलेली आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी. /मु. शी.** : विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ( समिती प्रमुख ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"महाराष्ट्र विधान परिषद विशेष हक्क समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या

(1) श्री. पांडुरंग फुंडकर, माननीय विरोधी पक्ष नेते, विधान परिषद यांनी श्री. श्रीनिवास कर्वे, सह आयुक्त, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अमरावती यांचे विरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण,

(2) श्री. पांडुरंग फुंडकर, माननीय विरोधी पक्ष नेते, विधान परिषद यांनी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेगाव, जि. बुलढाण आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगाव यांचे विरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण,

या दोन्ही प्रकरणांवरील विशेष हक्क समितीचे अहवाल सादर करण्याकरिता म. वि. प. नियम 178 (1) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी."

प्रस्ताव प्रस्तुत झाला

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे हक्कभंग प्रस्ताव मांडून एक ते दीड वर्षाचा कालावधी होत आहे. त्या अधिकाऱ्याने या राज्याच्या गृहमंत्र्याला कोर्टात खेचले, विशेष हक्क समितीच्या अध्यक्षाला कोर्टात खेचले. यावर सभागृहामध्ये अनेकदा चर्चा झाली. जात पडताळणीची हजारो प्रकरणे अमरावती विभागामध्ये पडून आहेत. असे असताना ते ॲरोगंट अधिकारी त्याच ठिकाणी त्याच जागेवर अजूनही आहेत. त्यांची बदली केली जाईल असे आश्वासन माननीय

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

मंत्रिमहोदयांनी दिले होते. परवा या राज्याचे संबंधित विभागाचे मंत्रिमहोदय लिफ्टमध्ये भेटले असता त्यांनी सांगितले की, तो अधिकारी फार ॲरोगंट आहे, वाईट आहे. मी सांगितले की, आपल्या विभागाच्या अंतर्गत त्याची बदली करण्याचे आश्वासन दिले आहे. त्याबाबत मंत्रिमहोदय असे म्हणाले की, काय करावयाचे ? त्या अधिकाऱ्याला ताबडतोब निलंबित केले पाहिजे अशी भावना माननीय मंत्रिमहोदयांनी व्यक्त केली. सभापती महोदय, आम्ही विशेष हक्क समितीसमोर साक्षीसाठी गेलो. दोन तीन बैठका होऊन सुध्दा तो अधिकारी साक्षीला येत नाही, इतकी त्यांची ॲरोगंसी चालू आहे. म्हणून हे प्रकरण लवकरात लवकर निकाली निघाले पाहिजे अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी या ठिकाणी जी भूमिका मांडली त्या भूमिकेचे मी समर्थन करतो. श्री. श्रीनिवास कर्वे यांच्या विरुध्द विशेषाधिकार भंगाचे प्रकरण आपल्या माध्यमातून समितीकडे आलेले आहे. समितीने श्री. कर्वे यांना नोटीस बजावली. समितीसमोर बाकीच्या साक्षीदारांच्या साक्षी पूर्ण झालेल्या आहेत. श्री. कर्वे यांना साक्षीला बोलविणार आहोत. एकदा त्यांना साक्षीला बोलावले होते पण ते आले नाहीत. त्यांना आणखी एकदा समितीसमोर बोलवून या प्रकरणासंबंधी जो काही अहवाल द्यावयाचा असेल तो समिती देईल.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी....

लवकरात लवकर याबाबत कार्यवाही केली जाईल एवढेच मी सभागृहाला आश्वासन देतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्याकडे हक्कभंगाचे प्रस्ताव दिले होते त्याचे काय झाले ते मला समजले नाही. श्री.दिलीपकुमार सानंदा यांच्याविरुध्द मी हक्कभंगाची सूचना दिलेली आहे, डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्याविरुध्द मी हक्कभंगाची सूचना दिलेली आहे, शेतक-यांच्या आत्महत्या या विषयाच्या संदर्भात माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांच्या विरोधात मी हक्कभंगाची सूचना दिलेली आहे. माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांच्याविरुध्द हक्कभंगाची सूचना दिलेली आहे, रेल्वेच्या संदर्भात मी हक्कभंगाची सूचना दिली आहे. राम प्रधान समितीच्या अहवालाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री, मुख्य सचिव यांच्याविरुध्द मी हक्कभंगाची सूचना दिलेली आहे. श्री.एच.बी.पटेल, सचिव, विधी व न्याय विभाग यांच्याविरुध्द मी हक्कभंगाची सूचना दिलेली आहे. आयबीएन या वाहिनी विरुध्द मी हक्कभंगाची सूचना दिलेली आहे ती आपल्यापर्यंत पोहोचली आहे की नाही ते मला माहीत नाही. पण यासंबंधी मला काही वाचण्यास मिळाले नाही, आपल्याकडे ही प्रकरणे दिल्यानंतर मला त्याबाबत काही कळविण्यात आलेले नाही. या प्रकरणांना 2-2 वर्षे झालेली आहेत. डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी जाहीरपणे वर्तमानपत्रात लिहिले होते की, मी सकाळी 11 वाजल्यापासून रात्री 11 पर्यंत सभागृहाच्या गॅलरीत बसलो असताना सभापतींनी देखील 'मिलिजुली भगत' करुन असे शब्द वापरले आहेत. मला माझ्या या सर्व हक्कभंगांच्या सूचनांबाबत आपल्याकडून मार्गदर्शन व्हावे अशी मी अपेक्षा व्यक्त करीत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी श्री.दिलीपकुमार सानंदा यांच्याविरुध्द हक्कभंगाची सूचना दिलेली आहे. श्री.सानंदा यांनी आपल्याला नोटीस दिलेली आहे. या सभागृहाच्या पीठासीन अधिका-यांना त्यांनी नोटीस दिलेली आहे. त्यांनी अशी धमकी दिलेली आहे की, माझ्याविरुध्द जर तुमच्या सभागृहात चर्चा झाली तर मी तुम्हाला हायकोर्टात खेचीन. पीठासीन अधिका-यांना धमकी दिल्यानंतरही हे प्रकरण वर्षानुवर्षे प्रलंबित आहे. त्याचाही लवकर निकाल लावण्यात यावा अशी मी विनंती करतो.

**सभापती** : याबाबत मी जरुर लक्ष घालतो. प्रस्ताव असा आहे की,...

2....

श्री.जयंत प्र.पाटील : माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी श्री.कर्वे यांच्या बाबतीत आता सांगितले आहे. मी देखील विशेष हक्क समितीचा सदस्य आहे. श्री.कर्वे हे समितीसमोर कधीच आले नाहीत. म्हणजे सभागृहापेक्षा ते मोठे आहेत काय ? श्री.कर्वे हक्कभंग समितीच्या अधिकाराला आव्हान देत आहेत. ते समितीचे अधिकार कमी करीत आहेत. ते सेवानिवृत्त होण्यापर्यंत वाट पाहिली जाणार आहे का ? श्री.कर्वे हे शासनाचे जावई आहेत का ? माननीय मंत्री महोदयांनी असे आश्वासन दिले होते की, त्यांना निलंबित केले जाईल. माननीय विरोधी पक्ष नेते मागील 3-4 अधिवेशनामध्ये हा प्रश्न मांडत आहेत. मागील अधिवेशनात त्यांना निलंबित केले जाईल असे कबूल केले होते. समितीने श्री.कर्वे यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी 3-4 वेळा दिलेली आहे. परंतु ते समितीसमोर येण्यास तयार नाहीत. ही गंभीर बाब आहे. या सभागृहाचे महत्व ते अधिकारी कमी करीत असतील, अधिकार कमी करीत असतील तर त्याबाबत आपल्याकडून न्याय मिळाला पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना सांगू इच्छितो की, हक्कभंग समितीला व्यापक अधिकार आहेत. त्यातील पहिली पायरी अशी आहे की, त्यांना रितसर नोटीस देऊन समितीसमोर बोलविले जाते. त्यांनी समितीसमोर येण्यास नकार दिला असेल तर समितीकडून त्याच्या पुढची कार्यवाही केली जाते. त्याबाबत यापूर्वी विधानसभेमध्ये पायंडा पडलेला आहे.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, यासंदर्भात मी एकच माहिती देऊ इच्छितो की, श्री.कर्वे यांना समितीने नोटीस दिलेली आहे. ते समितीसमोर आले नाहीत तर त्यासंबंधी काय करावयाचे याबाबत समिती स्वतंत्र निर्णय घेईल.

सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये श्री.कर्वे यांच्यासंबंधी शासनाने स्पष्टपणे भूमिका जाहीर केली होती की, कोणत्याही परिस्थितीत श्री.कर्वे हे सध्या असलेल्या जागेवर राहणार नाहीत. त्यांना दुसरीकडे हलविले जाईल आणि त्यांना कोणतेही काम दिले जाणार नाही. परंतु आज माहिती उपलब्ध झाली आहे की, श्री.कर्वे आजही अमरावती येथे कार्यरत आहेत. याबाबत शासनाची भूमिका काय आहे ते मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी यासंदर्भात कालच सभागृहात सांगितलेले आहे की, श्री.कर्वे यांना दोन दिवसात कार्यमुक्त केले जाईल आणि चौकशी केली जाईल.

यानंतर श्री.शिगम.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विशेषाधिकार भंगाच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यासंदर्भात त्यांनी विचारणा केली. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी देखील विशेषाधिकार भंगाची सूचना दिलेली आहे. त्याबाबत पुढे काय कार्यवाही झालेली आहे ?

**सभापती** : या विशेषाधिकार भंगाच्या सूचनांबाबत आता लगेच मला काही सांगता येणार नाही. ही प्रकरणे प्रलंबित आहेत ही वस्तुस्थिती आहे. याबाबतीत मी स्वत: लक्ष घालीन.

श्री. सय्यद जमा : मैने जो हक्कभंग की सूचना दी है, उसके बारे में जानकारी प्राप्त नही हुई है.

**सभापती** : मी लक्ष घालतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विनंती अर्ज सादर करणे

श्री. सुभाष भोईर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मौजे कळवा, तालुका व जिल्हा ठाणे येथील जमिनी कायमस्वरुपी शेतक-यांना मिळण्याबाबत" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : विनंती अर्ज सभागृहाला सादर झाला आहे. हा विनंती अर्ज प्रतिवृत्त सादर करण्याकरिता विनंती अर्ज समितीकडे सोपविण्यात आला आहे. प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाल्यावर त्याची प्रत प्रत्येक सदस्याकडे पाठविली जाईल.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## माननीय गृहमंत्र्यांनी केलेल्या निवेदनाबाबत

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, काल माननीय गृहमंत्र्यांनी तुरुंगाच्या संदर्भात या सभागृहामध्ये निवेदन केले होते. निवेदनातील विषय फार गंभीर आहे. त्या निवेदनाच्या प्रती आम्हाला मिळालेल्या नाहीत. त्या निवेदनाच्या अनुषंगाने आम्हाला काही शंका विचारावयाच्या आहेत. परंतु माननीय गृहमंत्री आणि गृहराज्यमंत्री देखील सभागृहामध्ये हजर नाहीत. त्यांना सभागृहामध्ये हजर राहाण्यास सांगावे. तसेच निवेदनाच्या प्रती सदस्यांना मिळण्याची व्यवस्था करण्याच्या सूचना द्याव्यात.

**सभापती** : सन्माननीय कृषीमंत्री श्री. बाळासाहेब थोरात सभागृहामध्ये हजर आहेत. मी त्यांचे या गोष्टीकडे लक्ष वेधतो. सन्माननीय गृहमंत्र्यांनी काल सभागृहामध्ये जे निवेदन केले त्याच्या प्रती सभागृहातील सन्माननीय सदस्यांना उपलब्ध होतील हे पहावे. तसेच त्यानुषंगाने सन्माननीय सदस्यांना काही प्रश्न विचारावयाचे असतील तर त्यासाठी सन्माननीय गृहमंत्र्यांना किंवा सन्माननीय गृहराज्यमंत्र्यांना सभागृहामध्ये उपस्थित राहाण्यास सांगावे.

श्री. बाळासाहेब थोरात : होय.

---

## नियम 93च्या सूचनांसंबंधी

**सभापती** : आज नियम 93 अन्वयेच्या सूचना चर्चेसाठी घेण्यात येणार नाहीत.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

...नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ SBT/ KTG/ MMP/ 12:30

**राज्यातील झुणका भाकर केंद्रांना अनुमती मिळणेसंबंधी**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी आपल्या अनुमतीने एक महत्वाचा विषय उपस्थित करु इच्छितो. कामकाजात सहकार्य केल्याबाबत आताच मला एक पत्र आपल्याकडून प्राप्त झाले. त्या पत्रात आपण पुन्हा निवडून आल्याबद्दल व या पदावर विराजमान झाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. आपण कृतज्ञता व्यक्त करीत असताना, आपला सन्मान होत असताना मी क्षणभर भावनाविवश होऊन म्हणालो होतो की, सत्तारुढ पक्षातील माननीय सभापतींचा एवढा सन्मान वाटत असेल तर त्यांनी झुणका भाकर केंद्राबाबत शासनाला आवर्जून वारंवार विनंती केली व ती मान्य केली तर त्यांचा खरोखरच सन्मान होईल. माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. आतापर्यंत माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे, माननीय श्री.विलासराव देशमुख, पुन्हा एकदा माननीय श्री.विलासराव देशमुख हे तत्कालीन मुख्यमंत्री आणि आताचे मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांच्यासमक्ष कामकाज सल्लागार समितीमध्ये या विषयावर चर्चा झालेली होती. सदनामध्ये शासनाने जे आश्वासन दिले ते पूर्ण करण्याच्या संदर्भात काय करता येईल? या संदर्भात निर्णय होण्यासाठी पुढील मुख्यमंत्र्यांची वाट पहावी अशी अपेक्षा आहे का? याबाबत भूमिका स्पष्ट होती. माननीय सभापती महोदयांनी त्यांच्या दालनात आपणासमवेत नागपूर अधिवेशन काळात बैठक घेतली होती. त्या बैठकीत असा प्रश्न उपस्थित झाला होता की, राज्यात 4000 झुणका भाकर केंद्रांपैकी 700 ते 725 झुणका भाकर केंद्रे सुरु आहेत. जी केंद्रे सुरु आहेत ती वगळून इतर झ ुणका भाकर केंद्रांबाबत मी सूचना मांडली होती की, ती झुणका भाकर केंद्रे महिला बचत गटांच्या ताब्यात द्यावीत. जेणेकरुन त्यांच्या व्यवसायास चालना मिळू शकेल. हा विषय माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकडे सोपविण्यात आला. त्यांनी याबाबत प्रस्ताव सादर करावा असे सांगण्यात आले होते. आता चार वर्षे उलटून गेली तरी तो प्रस्ताव सादर झालेला नाही. प्रत्येक अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

मागील अधिवेशनात साताऱ्यातील झुणका भाकर केंद्रांबाबत राजमाता कल्पनाराजे यांनी केलेल्या विनंतीचा विषय मी मांडला होता. त्यांनी नव्याने केलेली विनंती मी याठिकाणी सांगितली होती. त्या संदर्भात आपण निदेश दिले होते. तेथील झुणका भाकर केंद्रांबाबत मंत्रीमहोदयांनी स्पष्ट शब्दात लेखी कळविले होते की, पुढील निदेश येईपर्यंत कारवाई करु नये.

..2..

श्री.दिवाकर रावते....

अशा प्रकारचे आदेश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिल्यामुळे पुढील निदेश येईपर्यंत राज्यातील झुणका भाकर केंद्रे सुरु आहेत. परंतु मुंबईतील ताडदेव येथील झुणका भाकर केंद्रावर रोज पोलीस जातात आणि हप्ता गोळा करतात, अन्यथा सामान उचलून नेतात. हा त्रास ताबडतोब थांबला पाहिजे. माननीय मंत्रीमहोदयांनी सातारा जिल्हयातील झुणका भाकर केंद्रांबाबत जे निदेश दिले ते राज्यातील सर्व झुणका भाकर केंद्रांना लागू करावेत अशी माझी विनंती आहे. हा प्रश्न याच अधिवेशनात आपण मार्गी लावावा अशी विनंती आहे. पाच वर्षापासून हा विषय प्रलंबित आहे. झ ुणका भाकर केंद्रचालक लोंबकळलेल्या अवस्थेत आहेत. त्यांना अधिकारी सतावत आहेत. नको त्या मार्गाने त्यांचा छळ करीत आहेत. मुंबई महापालिकेच्या जागेवर जी झुणका भाकर केंद्रे सुरु आहेत त्याबाबत मुंबई महापालिकेने 'अन्नपूर्णा योजना' म्हणून ती केंद्रे सुरु ठेवण्यास मान्यता दिली आहे. परंतु मुंबई शहरात शासकीय जागेवरील झुणका भाकर केंद्रांबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. शासकीय जागेवर ही केंद्रे सुरु असल्यामुळे मुंबई महापालिकेला त्या संदर्भात निर्णय घेता येत नाही अशी स्थिती आहे. आम्ही वारंवार विनंती करायची आणि आपण निदेश द्यायचे हे आम्हाला योग्य वाटत नाही. या सदनाची इभ्रत आहे, या सदनाचा सन्मान आहे, सदनाची स्वत:ची गरिमा आहे. ती गरिमा टिकून रहावी अशी विनंती करतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा विषय वर्षानुवर्षे सभागृहात उपस्थित होत आहे. युती सरकार पायउतार झाल्यानंतर सत्तेवर आलेल्या आघाडी सरकारने राज्यातील झुणका भाकर केंद्रे बंद करण्याचा निर्णय घेतला. काही जिल्हयातील झुणका भाकर केंद्रांना सील ठोकण्यात आले. काही जिल्हयातील झुणका भाकर केंद्रे ज्यांना वितरीत केली होती त्यांच्याच मार्फत सुरु आहेत. या संदर्भात निर्णय झाला पाहिजे अशी आम्ही वारंवार मागणी केल्यानंतर आपण पुढाकार घेऊन सरकारला निदेश दिले होते, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो.

नंतर टी.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

महोदय, आपणच सभापतीस्थानी होते तेव्हा हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळेस आपण स्वत:हून शासनाला निर्देश दिले आणि जे वक्तव्य केले ते खरोखरच भावनाप्रधान असेच होते. त्यानंतर माननीय सभापतींच्या दालनात देखील यासंदर्भात बैठक झाली होती, पण अद्यापही तो निर्णय झालेला नाही. म्हणून जोपर्यंत यासंबंधीचा निर्णय होत नाही तोपर्यंत किमान ज्यांच्या नावाने झुणका भाकर केंद्रे होती परंतु गेल्या पाच वर्षापासून ती सील करण्यात आली आहेत त्याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. खरे म्हणजे तेंव्हापासून शासनाचा कोणताही निर्णय झाला नाही तरी देखील ती सील करण्यात आली आहेत. मी हे समजू शकतो की, काही लोकांनी ही झ ुणका भाकर केंद्रे भाड्याने दिली म्हणून सील करण्यात आली परंतु सर्वच लोकांनी अशी केंद्रे भाड्याने दिलेली नाहीत त्यांचीही सील करुन या लोकांवर अन्याय केला आहे. तसेच ज्यांच्या नावाने ही झुणका भाकर केंद्रे चालविण्यासाठी दिलेली होती त्यांनी 25 हजार रुपये खर्च करुन बांधकाम केले आणि शासनाचे देखील काही अनुदान त्यात खर्च झालेले आहे. परंतु ती पाच वर्षापासून बंद असल्यामुळे आणि शासनाचा निर्णय अद्यापही होत नसल्याने ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये अशी झुणका भाकर केंद्रे सील करण्यात आली त्यांचे सील काढून अशी केंद्रे पुन्हा चालविण्याची परवानगी शासनाने दिली पाहिजे. तसेच ज्या दिवशी शासनाचा निर्णय होईल तो निर्णय सर्व राज्यातील केंद्रांसाठी लागू होईल. आज या केंद्रांची अशी अवस्था आहे की, राज्यात काही ठिकाणी अशी झुणका भाकर केंद्रे सुरु आहेत तर काही ठिकाणी त्यांना सील ठोकण्यात आले आहे. म्हणून हे सील ताबडतोबीने काढून त्यांना ती पुन्हा सुरु करण्याची परवानगी देण्यात यावी अशी आपल्यामार्फत मी शासनाला विनंती करीत आहे. आपण ज्याप्रमाणे या कामासाठी पुढाकार घेतला होता तशीच भूमिका आज देखील घ्यावी आणि या लोकांवरील अन्याय दूर करावा, अशी आपणास विनंती करीत आहे.

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदयांचे मी लक्ष वेधू इच्छितो की, सभागृहात राज्यातील झुणका भाकर केंद्रांच्या अनुषंगाने बऱ्याच वेळा चर्चा उपस्थित झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे. अद्याप शासनाने या अनुषंगाने कोणतीच पॉलिसी निश्चित केलेली नाही. अशी पॉलिसी जोपर्यंत शासन निश्चित करीत नाही तोपर्यंत ज्यांना झुणका भाकर केंद्रे चालविण्यासाठी दिलेली आहे

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ........

त्यासंदर्भात माझे स्पष्ट मत आहे की, आपण पुढाकार घ्यावा. कारण आज सकाळी 11.30 वाजताच मला अशा झुणका भाकर केंद्रांच्या संदर्भात बुलडाणा जिल्ह्यातून दोन फोन आले. शासनाकडून अशा विषयाच्या बाबतीत एवढी दिरंगाई होत असेल तर ती अक्षम्य अशीच आहे. म्हणून माझी अशी सूचना आहे की, आपण याविषयाच्या अनुषंगाने तातडीने निर्णय घेऊन किमान जी केंद्रे चालू आहेत ती चालू ठेवण्याची परवानगी द्यावी आणि जी बंद आहेत ती सुरु करण्याची परवानगी द्यावी. तसेच यासंदर्भात पॉलिसी ठरल्यानंतर तो निर्णय संपूर्ण राज्यासाठी लागू होईलच.

**<u>पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनसंबंधी</u>**

श्री. हुसैन दलवाई : महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, झुणका भाकर केंद्रांच्या बाबतीत बरीच गडबड झाली होती म्हणून युतीचे मुख्यमंत्री आल्यानंतर ती केंद्रे बंद करण्याचा निर्णय झाला होता.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. हुसैन दलवाई यांना मी सांगू इच्छितो की, ज्या झ ुणका भाकर केंद्रांच्या बाबतीत वाद होता त्याबद्दल कोणाचाही आक्षेप नाही. पण अशा प्रकारे निर्णय घेऊन चांगल्या योजनांना हरताळ फासण्याचा हा प्रयत्न होत आहे, ते अक्षम्य असेच आहे.

श्री. अनिल देशमुख : महोदय, मधल्या काळात एकदा माननीय महसूल मंत्र्यांबरोबर बैठक लावली होती. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनाही त्या बैठकीसाठी बोलाविले होते......अडथळा........ठीक आहे, कदाचित आपल्याला ते निमंत्रण मिळाले नसेल. परंतु ती बैठक होऊ शकली नव्हती. परंतु आता एक महिन्याच्या आत अशी बैठक पुन्हा आयोजित करुन राज्यातील झुणका भाकर केंद्रांबाबतचा अंतिम निर्णय घेण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : तोपर्यंत ज्या झुणकाभाकर केंद्राना सील लावलेले आहेत ते काढावयास लावा. बुलढाणा जिल्हयातील झुणकाभाकर केंद्राना गेल्या 5-6 वर्षापासून सील लावलेले आहे व इतर जिल्हयात झुणकाभाकर केंद्र सुरु आहेत तर बुलढाणा जिल्हयाने आपल्यावर काय अन्याय केलेला आहे ? राज्यातील एकाच जिल्हयावर आपण अशा प्रकारे अन्याय करणे योग्य नाही, म्हणून जोपर्यंत झुणकाभाकर केंद्राच्या संदर्भात शासनाची बैठक किंवा अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत ज्या झुणका भाकर केंद्राना सील लावण्यात आलेले आहेत ते काढून टाकण्याबाबतच्या सूचना देण्याची आवश्यकता आहे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, हा प्रश्न केवळ बुलढाण्या पुरताच मर्यादित आहे असे नाही तर शासनाच्या आदेशानुसार इतर ठिकाणी सुध्दा तहसीलदारांनी जागा परत घेतलेल्या आहेत.

**उपसभापती** : माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, झुणका भाकर केद्राच्या संदर्भात शासन एक महिन्याच्या आत निर्णय घेईल. त्यामुळे शासनाचा निर्णय एक महिन्याच्या आत झाला नाही तर ज्या दिवशी एक महिना पूर्ण होईल त्या दिवशी सील उघडण्यास परवानगी दिली जाईल...

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, झुणकाभाकर केंद्राच्या संदर्भात एक महिन्याच्या आत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 93 च्या निवेदनाबाबत

**उपसभापती** : आतापर्यंत नियम 93 अन्वयेच्या सूचनांची जी निवेदने आलेली आहेत ती आपण चर्चेला घ्यावयाची का ?

श्री. सय्यद ज़मा : माननीय सभापति महोदय ने ऐसा कहा है कि आज 93 की सूचना के निवेदन नहीं लेंगे.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, निवेदनाच्या संदर्भातील गांभीर्य आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. सन्माननीय सदस्यांची अशी भावना असते की, निवेदन आल्यानंतर उत्तरही आले पाहिजे. आता आपण निवेदन दिल्यानंतर त्याला लेखी उत्तरे दिली जातील. म्हणून विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित विषयावर इमिडिएट सूचना देऊ शकतात. नियम 93 च्या निवेदनाच्या संदर्भात मा. सभापती महोदयांनी नुकताच निर्णय घेतला आहे की, सभागृहापुढील आजचे कामकाज पाहता सभागृहासमोर जी निवेदने आलेली आहेत ती चर्चेला घेतली जाणार नाहीत. तसेच सभागृहात आज 22-23 निवेदने चर्चेसाठी आलेली आहेत.

**उपसभापती** : या विषयाच्या संदर्भात काय करावयाचे याचा निर्णय सभागृहानेच घ्यायचा आहे. कारण एवढी सर्व निवेदने चर्चेसाठी घेतली तरी एक एका मिनिटात एक निवेदन पूर्ण होत नाही.

श्री. विनोद तावडे : नियम 93 ची निवेदने चर्चेसाठी घेतली पाहिजेत.

(एकाच वेळेस अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे बोलतात ते बरोबर आहे. अधिवेशन सुरु झाल्यापासूनच निवेदने येत नाहीत असे आम्ही सातत्याने बोलत आहोत. 93 ची निवेदने पटलावर ठेवण्याची परंपरा गेल्या चार अधिवेशनापासून सुरु आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. आता नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदन घेतली जातील. पहिले निवेदन स.स. श्री. तनवाणी यांनी दिलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील आहे. परंतु सन्माननीय सदस्य अनुपस्थित असल्यामुळे मी निवेदन क्रमांक 2 पुकारतो.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, निवेदन क्रमांक एक मध्ये माझे दुस-या क्रमांकावर नाव असल्यामुळे मला प्रश्न विचारण्याची संधी देण्यात यावी.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( एकाचवेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 93 ची निवेदन अशी घेतली जात असतील आणि त्यांना अशा प्रकारे न्याय दिला जात असेल तर ते योग्य नाही. वाटले तर आपण नियम 93 ची निवदेन घेऊच नका. अशा प्रकारे विषयाला न्याय मिळणार नाही. त्यामुळे निवेदने हा विषयच कामकाजातून ड्रॉप करावा.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य काहीही न बोलता बर्हिगमन करतात.)

-----

**लक्षवेधी सूचने बाबत**

**उपसभापती** : ठीक आहे. आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील. लक्षवेधी सूचना क्रमांक 1, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी मांडावी.

**पृ.शी.**: मराठवाडयातील 38 आश्रमशाळेतील शिक्षक कर्मचा-यांचे वेतन रोखल्याबाबत

**मु.शी.**: मराठवाडयातील 38 आश्रमशाळेतील शिक्षक कर्मचा-यांचे वेतन रोखल्याबाबत सर्वश्री विक्रम काळे, हेमंत टकले, सतीश चव्हाण, रमेश शेंडगे, श्रीमती उषाताई दराडे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

---

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य पुन्हा सभागृहात येतात.)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, निवेदनाचे काय झाले ?

**उपसभापती** : यासदर्भातील मी निर्णय दिलेला आहे. मी निवेदने पुकारली होती त्यावेळेस आपण सर्व सभागृहाच्या बाहेर निघून गेलात. आपण मुद्दाम अडवणूक करण्याचा प्रयत्न करु नका. मी पुढील लक्षवेधी सूचना पुकारली आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**पृ. शी.** : पुसद (जि.यवतमाळ) येथील विद्या गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या अध्यक्षांनी केलेला लाखो रूपयाचा भ्रष्टाचार

**मु. शी.** : पुसद (जि.यवतमाळ) येथील विद्या गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या अध्यक्षांनी केलेला लाखो रूपयाचा भ्रष्टाचार यासंबंधी सर्वश्री राजेंद्र मुळक,जैनुद्दीन जव्हेरी,एम.क्यू.जमा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सय्यद जमा (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुसद (जि.यवतमाळ) येथील विद्या गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या अध्यक्षांनी केलेला लाखो रुपयांचा भ्रष्टाचार, याप्रकरणी फौजदारी चौकशी करण्याबाबत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पुसद यांनी विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांना दिनांक 25 जानेवारी, 2010 रोजी पत्र देऊनही अद्याप कोणतीही कारवाई न होणे, सदर गृहनिर्माण संस्थेचे प्लॉट बेकायदेशीर विकण्यात येणे, संस्थेचे रेकॉर्ड जाळणे, अशाप्रकारे केलेल्या भ्रष्टाचारामुळे ही संस्था बरखास्त करुन नेमणूक करण्यात आलेल्या प्रशासकानेही मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करणे, परिणामी संस्थेतील सर्वसामान्य सभासदांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, याप्रकरणी सर्व संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके (सहकार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद जमा : सभापती महोदय, शासनाने दिलेल्या लेखी उत्तराने माझे समाधान झाले आहे.

........

(दोन्ही बाजूकडील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सभागृहाचे कामकाज आपण सर्वांच्या संमतीने करीत असतो. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांसह विरोधी पक्षातील माननीय सदस्यांना विनंती केली होती की, आपण थांबा. लक्षवेधी सूचना होऊ द्या. सर्वांनी मिळून निर्णय घेऊ या. त्यानंतर खाली बसा असे माननीय विरोधी पक्ष नेत्यांना बोलणे अयोग्य आहे. कृपया विरोधी पक्षाला आपण तितक्याच सन्मानाने वागवले पाहिजे. झालेल्या प्रकाराबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. आता आपण सर्वांनी आपल्या जागेवर जाऊन बसावे.

.........

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 93 च्या निवेदनासंबंधी</u>**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 93 अन्वयेची निवेदने ही सभागृहाच्या कामकाजाचा एक भाग आहे. अधिवेशन सुरू झाल्यासून प्रत्येक दिवशी सन्माननीय सदस्य म.वि.प.नियम 93 अन्वयेची सूचना देतात. तो त्यांचा अधिकार आहे. आपण दर दिवशी शासनाने निवेदन करावे असे निदेश देता. पण गेल्या 2 आठवड्यापासून 93 ची निवेदने सभागृहाच्या पटलावर आली नाहीत. दरम्यानच्या काळात आपण शासनाला निदेश दिले की, नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने ताबडतोब आली पहिजेत. एवढेच नव्हे तर संसदीय कार्य मंत्र्यांनी संबंधित विभागाला कळवावे असे देखील आपण म्हणालात. असे असताना निवेदने सभागृहासमोर आली नाहीत. आजचा अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. आज 30 ते 32 निवेदने आली आहेत. नियम 93 च्या सूचनेवर शासनाकडून तातडीने उत्तर अपेक्षित असते. सन्माननीय सदस्यांचा प्रत्येक प्रश्न महत्त्वाचा असतो म्हणूनच ते म.वि.प.नियम 93 अन्वये सूचना देऊन आपला प्रश्न उपस्थित करीत असतात.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

सन्माननीय सदस्यांनी वेळेवर नियम 93 अन्वये सूचना दिल्या ही त्यांची चूक नाही. आम्ही दिलेल्या सूचनांवरील काही विषयांबाबत "शासनाने निवेदन करावे" अशाप्रकारचे निदेश आपल्याकडून देण्यात येतात. आपण निवेदन करण्याच्या सूचना दिल्यानंतरही विभागाकडून वेळेवर निवेदने करण्यात येत नाहीत. आता शेवटच्या दिवशी 52 निवेदने आली आहेत. इतक्या मोठ्या संख्येने आलेली निवेदने चर्चेला घ्यावीत की न घ्यावीत असा निर्णय होईपर्यंत आपण निवेदने घेण्यास सुरुवात केली. पहिले निवेदन हे सन्माननीय सदस्य श्री. किशनचंद तनवाणी आणि सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी दिलेल्या नियम 93 अन्वये सूचने संदर्भातील होते. आपण श्री.किशनचंद तनवाणी यांचे नाव पुकारले, परंतु ते सभागृहात उपस्थित नव्हते म्हणून सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर हे प्रश्न विचारण्यासाठी उठले. त्याच वेळी आपण दुसरे निवेदन पुकारले. आपणास इतक्या घाई गर्दीने या सूचना घ्यावयाच्या असतील तर त्या न घेतलेल्या चांगले. आम्हाला निवेदन वाचण्यास वेळ तरी मिळाला पाहिजे. आम्हाला 10 मिनिटांपूर्वी हा निवेदनांचा गठ्ठा देण्यात आला. आम्ही ही सर्व निवेदने केव्हा वाचायची ? ही पध्दत चुकीची आहे. या संदर्भात यापूर्वीही असे प्रश्न निर्माण झालेले आहेत. परंतु ते आजपर्यंत दुरुस्त झालेले नाहीत. अशाप्रकारे कामकाज होणार असेल तर नियम 93 अन्वये सूचना घ्यायच्या नाहीत अशाप्रकारचा निर्णय आपणास कामकाज सल्लागार समितीमध्ये घ्यावा लागेल. नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदनावर प्रश्नोत्तरे झाली पाहिजेत. तरच त्या प्रश्नाला न्याय मिळू शकेल. आम्हाला प्रश्न उपस्थित करण्याची संधी मिळणार नसेल तर विधिमंडळाच्या नियमावलीचा काय उपयोग आहे ? याठिकाणी नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदन प्राप्त झालेली आहेत त्यावर सन्माननीय सदस्यांना एक-दोन प्रश्न विचारण्याची संधी द्यावी जेणेकरुन प्रश्नाला न्याय मिळू शकेल. असे करावयाचे नसेल तर आपण ही पध्दत बंद केलेली बरी. पुढील अधिवेशनात काय करायचे ते आम्ही नंतर ठरवू. परंतु अशापध्दतीने कामकाज करणे योग्य नाही असे मला वाटते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, मी नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदने घेण्यास सुरुवात केली होती. एकेका सूचनेवर तीन-चार सन्माननीय सदस्यांची नावे असतात. ज्यावेळी आपणाकडे वेळ असतो त्यावेळी पहिल्या क्रमांकावरील सन्माननीय सदस्य अनुपस्थित असतील तर आपण दुसऱ्या क्रमांवरील सन्माननीय सदस्यास प्रश्न विचारण्याची संधी देतो. परंतु एखादा विषय सभागृहात उपस्थित झाल्यानंतर ती सभागृहाची प्रॉपर्टी बनते आणि त्यावर कोणत्याही सदस्यास बोलण्याचा अधिकार असतो हे मानणाऱ्यांपैकी मी आहे. मी सुरुवातीस सांगितले की, आज आपल्यासमोर भरपूर कामकाज आहे. हे कामकाज आपणास पूर्ण करावयाचे असेल तर काही काही गोष्टींबाबत आपणास निर्णय घ्यावा लागेल.

ही गोष्ट खरी आहे की, सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये सूचना दिल्यानंतर त्यातील काही सूचनांबाबत निवेदन करण्याच्या सूचना शासनाला देण्यात येतात. परंतु ही निवेदने येण्यास प्रशासनाकडून दिरंगाई होते. ही दिरंगाई निश्चितपणे अक्षम्य आहे. शासनाने निवेदन करावे असे आदेश दिल्यानंतर त्याबाबतचे निवेदन दोन-चार दिवसांत करण्यात आले पाहिजे हा शिरस्ता पाळला गेला पाहिजे. मध्यंतरी काही दिवस एकही निवेदन आले नव्हते. आता एकदम 52 निवेदने चर्चेला आलेली आहेत. प्रत्येक निवेदनावर मी एक प्रश्न विचारण्याची संधी देतो. आता आपण 52 निवेदने चर्चेला घ्यावयाची म्हटली तर त्यासाठी किमान दोन तास जातील. आपण नेहमीच सहकार्य करता त्या भावनेतून मी हे सांगितलेले आहे. निवेदने चर्चेस घेण्यास माझा विरोध नाही. मी येथे सर्व निवेदने घेतो. सन्माननीय सदस्यांनी निवेदनावर फक्त एक प्रश्न विचारावा असा नियम आहे त्याचे मी पालन केलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्यावर ही पाळी आणणाऱ्या सरकारच्या बाबतीत गांभीर्याने बोलले पाहिजे. आपण आमची समजूत काढत आहात. आपण निदेश दिल्यानंतर चार दिवसांत निवेदन आले पाहिजे. यापूर्वी मागील अधिवेशनात शेवटच्या दिवशी निवेदनाचा गठ्ठा आला असता त्यावर आम्ही काही बोललो नाही, दुसऱ्या अधिवेशनात सुध्दा तसाच अनुभव आला. उत्तरे फेकायची आणि निघून जायचे अशी सरकारला सवय लागली आहे. Government has now not remained answerable सरकारला उत्तर देण्याचे उत्तरदायित्व राहिलेले नाही. आम्ही

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

येथे कशासाठी काम करायचे ? आपण आम्हाला संरक्षण देणार नाहीत काय ? प्रत्येक अधिवेशनात शेवटच्या दिवशी निवेदनाचे गठ्ठे फेकून द्यायचे आणि निघून जायचे हे बरोबर नाही. आम्हाला प्रत्येक निवेदन वाचावे लागते. त्यातून मार्मिक प्रश्न काढावे लागतात, तरच आम्हाला उत्तर मिळते. कारण ही निवेदने बनवाबनवीची असतात. आपल्याला पाहिजे तसे उत्तर अधिकाऱ्यांकडून कधीच दिले जात नाही. मंत्र्यांच्या माध्यमातून अधिकारी आपल्या पोळ्या भाजत असतात. याठिकाणी सरकार महाराष्ट्राला उत्तर देण्यासाठी येते. विरोधी पक्ष सरकारकडून उत्तरे घेत असतो. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी एकदम गठ्ठे आले हे एकदा झाले, दोनदा झाले हे समजू शकतो. परंतु असे प्रकार आता वारंवार होत आहेत. सरकारला याची सवय लागली आहे. अधिवेशन सुरु झाल्यानंतर आम्ही ही बाब निदर्शनास आणली होती. त्यावर आपण कोणतीही कारवाई केली नाही असे मी म्हणणार नाही. परंतु सरकार इतके ढिम्म आहे की, आम्हाला तर मोजतच नाही. परंतु आपण दिलेल्या आदेशांचे देखील पालन करीत नाही.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते............

एवढी सूज आणि एवढा माज त्यांना बहुमताचा आलेला आहे. हे प्रकार आम्ही किती दिवस चालू द्यावयाचे ? का म्हणून आम्ही चालू द्यावयाचे ? प्रत्येक वेळा अधिवेशन संपण्याच्या शेवटच्या दिवशी विधेयके आणली जातात. त्यामुळे आम्हाला पुरेसा वेळ मिळत नाही. विधेयक मांडल्यानंतर आम्हाला वाचावयास वेळ मिळाला पाहिजे इतकेच नव्हे तर उप सूचना द्यावयाची असेल तर त्याकरता पुरेसा वेळ मिळाला पाहिजे. परंतु तसे न होता अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विधेयके आणली जातात व बिले घाई घाईने मंजूर केली जातात. ही बिले मंजूर करुन घेण्यासाठी आपण आपले गुड विल वापरता आणि आमच्या बरोबर तुमचे जे चांगले संबंध आहेत त्याचा वापर करुन ही बिले लवकर मंजूर करुन द्या अशी आपण विनंती करीत असता त्यामुळे लवकर बिले मंजूर होतात व माननीय मंत्री महोदयांना असे वाटते की आपले कामकाज झालेले आहे.अशा प्रकारे कामकाज चालवण्याची सरकारची पध्दत योग्य आहे काय ? हे सरकार आहे काय ? सभापती महोदय, अशा प्रकारे कामकाज चालविणे आम्हाला बिलकूल मंजूर नाही.सभापती महोदय, आम्ही जर सभात्याग केला तर आपल्याला राग येतो. वेल मध्ये येऊन घोष्णा दिल्या तर आपल्याला बरे वाटत नाही. पंरतु असे प्रकार का घडत आहेत याचा विचार केला पाहिजे सरकारची जी नकारात्मक प्रवृत्ती आहे त्या प्रवृत्तीला आपण कधी वेसण घालणार आहात काय ? असा आमच्या पुढे प्रश्न निर्माण झाला आहे.सभापती महोदय, पीठासीन अधिकारी म्हणून आपण ही वेसण घालणार आहात किंवा नाही ? सदनाचा गरिमा सांभाळण्याची जबाबदारी आपल्यावरच असल्यामुळे ती जबाबदारी आपण पार पाडली पाहिजे तसेच सत्ताधारी पक्ष असो आणि विरोधी पक्ष असो आपल्या दृष्टीने दोन्हीही पक्ष सारखेच आहेत. विविध प्रश्नाच्या संदर्भात जनतेला उत्तरे मिळाली पाहिजेत. आम्ही नियम 93 ची सूचना देतो त्यावर निवेदन करण्यास आपण शासनाला निदेश देत असता त्याप्रमाणे निवेदने वेळेवर यावयास पाहिजेत परंतु ती वेळेवर न येता शे्ंवटच्या दिवशी सगळी निवेदने येतात अशा प्रकारे काम करण्याची सरकारची पध्दत योग्य आहे काय ? नियम 93 च्या सूचने संबंधी नियमात काय तरतूद करण्यात आली आहे हे आपण वाचून पहा.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय,सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी नियम 93 अन्वयेच्या सूचनेसंबंधी जी भूमिका मांडली आहे त्याबाबतीत मला काही म्हणावयाचे नाही. नियम 93 ची सूचना मांडणे आणि त्यावर सरकारकडून अपेक्षित उत्तरे मिळविणे हा आपला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी....

हक्क आहे आणि अधिकारही आहे. विरोधी पक्ष म्हणून नियम 93 ची सूचना मांडण्याचे आयुध आपल्याला देण्यात आलेले आहे. या अधिवेशनामध्ये सकाळी 10.30 पासून रात्री जवळजवळ सात आठ वाजेपर्यत कामकाम गेल्या कित्येक दिवसापासून केले जात आहे. कालच्या कामकाजपत्रिकेमध्ये दोन दिवसाचे कामकाज दाखविण्यात आले होते.नियम 93 च्या सूचना आता घेण्यात येऊ नयेत किंवा सन्माननीय सदस्यांना नियम 93 च्या अनुषंगाने उत्तरे मिळू नयेत अशी आमची भूमिका नाही. परंतु आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दोन अत्यंत महत्वाचे ठराव दाखविण्यात आलेले आहेत. कोकण विकासाच्या संदर्भात काल चर्चा सुरु करण्यात आली होती पंरतु ती चर्चा अर्धवट राहिली होती. ती चर्चा आज आपल्याला पूर्ण करावयाची आहे त्याचप्रमाणे आदिवासीच्या संबंधी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यावर देखील आज चर्चा पूर्ण करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे दोन महत्वाच्या चर्चा व्हावयास पाहिजेत. आज नियम 93 च्या सूचना संबंधी शासनाकडून अधिक उत्तरे मिळतील अशी अपेक्षा करण्यात येऊ नये. कोकणाच्या सदर्भात तसेच आदिवासींच्या संदर्भात जी चर्चा अर्धवट राहिलेली आहे ती चर्चा आपण पूर्ण करावी अशी मी सत्ताधारी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्याच्या वतीने आपल्याला विनंती करतो

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड गुरुनाथ कुलकर्णी यांनी ही बाब मान्य केली की नियम 93 ची सूचना देणे हे विरोधी पक्षाचे महत्वाचे आयुध आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे . परंतु त्यांनी असेही सागितले की, अन्य दोन ठरावही महत्वाचे आहेत याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की,नियम 93 च्या सूचनेच्या संदर्भात तीन महत्वाचे निकष आहेत त्यानुसार तो मुद्दा तातडीचा आणि गंभीर असला पाहिजे, सरकारशी निगडीत असला पाहिजे आणि सार्वजनिक हिताशी संबंधित असला पाहिजे . नियम 93 अन्वये सूचना देण्याचा विरोधी पक्षाला खास अधिकार देण्यात आलेला आहे हा अधिकार सत्ताधारी पक्षाला देण्यात आलेला नाही. परंतु विरोधी पक्षाच्या हत्याराची धार अगोदर कमी केली आहे , आता ती तलवारही काढून घेण्यात येत आहे चटावरील श्राध्द घालावे त्याप्रमाणे शेवटच्या दिवशी 50-50 निवेदने सभागृहासमोर आणली जातात. चटावरील श्राध्द उरकून घेण्याची सरकार पक्षाला जी सवय लागली आहे ती अत्यंत घृणास्पद आहे..तसेच सभागृहाचा अपमान करणारी आहे ................



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** सन्माननीय सदस्यांनी आपले विचार थांबवावे. आता मी नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन घ्यावयास सुरुवात करतो. इतर विषयावर चर्चा करुन वेळ घालविणे मला योग्य वाटत नाही . आता मी नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक वाचतो सन्माननीय सदस्यांना त्यावर जे काही प्रश्न विचारावयाचे असेल ते त्यांनी विचारावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपल्या निर्णयाबद्दल आम्हाला काहीही बोलावयाचे नाही...........

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, विधानपरिषदेच्या नियमावलीमध्ये नियम 93 अन्वये सूचनेच्या संदर्भात असलेल्या नियमानुसार मी दहा मिनिटे भाषण करु शकतो.परंतु याठिकाणी शासनाच्या संबंधित खात्यांकडून जाणीवपूर्वक उशिराने निवेदने पाठविली जात असतील, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पाठविली जात असतील तर शासनाच्या या कृतीचा आम्ही तीव्र शब्दामध्ये निषेध करतो.आणि निषेध म्हणून आज आपण नियम 93 अन्वये सूचनेच्या निवेदनावर चर्चा घेऊ नये अशी आपणास विनंती करतो.

**उपसभापती** : या संदर्भात शासनाला सुस्पष्ट सूचना देऊ इच्छितो की, या आसनावरुन नियम 93 अन्वये सूचनेच्या संदर्भात "शासनाने निवेदन करावे" असे पुकारल्यानंतर उशिरात उशिरा चौथ्या दिवशी सभागृहामध्ये निवेदन आले पाहिजे. आणि त्यानंतर जर उशिरा निवेदन आले तर त्या संदर्भात कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये चर्चा करुन त्यासंबंधी पुढील निर्णय घेण्यात येईल. तेव्हा यानंतर नियम 93 अन्वये सूचनांच्या बाबतीत शासनाकडून चार दिवसात निवेदन करण्यात आले पाहिजे अशा सुस्पष्ट सूचना मी शासनास देत आहे.

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, होय.

**उपसभापती** : सभागृहामध्ये उपस्थित असलेल्या सर्व मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, आता जर एखादी नियम 93 अन्वये सूचना देण्यात आली व ती जर मला चर्चेला घ्यावीशी वाटली तर ती पुकारली जाईल. त्यामुळे कुणीही सभागृह सोडून जाऊ नये.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे, नवी-मुंबई परिसरामध्ये गॅसवर चालणाऱ्या वाहनांसाठी अपुरा पडत असलेला सी.एन.जी. गॅस पुरवठा

**मु. शी.** : ठाणे, नवी-मुंबई परिसरामध्ये गॅसवर चालणाऱ्या वाहनांसाठी अपुरा पडत असलेला सी.एन.जी. गॅस पुरवठा यासंबंधी सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे व नवी-मुंबई परिसरातील गॅसवर चालणाऱ्या वाहनांसाठी अपुरा पडत असलेला सी.एन.जी. गॅस पुरवठा, सी.एन.जी.वाहनांच्या प्रमाणात सी.एन.जी. पंप उपलब्ध नसल्याने प्रत्येक पंपावर लांबच लांब रांगा लागत असणे, यामुळे वाहतुकीची होत असलेली कोंडी व वाहनचालकांची होणारी कुचंबणा, याबाबत स्थानिक प्रतिनिधिनी शासनाकडे निवेदने देऊन तातडीने उपाययोजना करण्याची वारंवार केलेली मागणी, तथापि, परिस्थितीत कोणताही फरक न पडणे, परिणामी ठाणे, नवी-मुंबई परिसरातील हजारो रिक्षाचालक व वाहनचालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

श्री. सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, हा अत्यंत जिव्हाळयाचा विषय आहे. ठाणे जिल्हयामध्ये विशेष करुन ठाणे शहरामध्ये सी.एन.जी. चे पंप कमी असल्यामुळे आणि गॅसचा तुटवडा होत असल्यामुळे संपूर्ण शहर ठप्प होत असते. या ठिकाणी निवेदनामध्ये म्हटले आहे की, "1.11 लक्ष किलो प्रती दिन क्षमतेचे एकूण 9 सी.एन.जी. भरणा केंद्र ठाणे येथे उभारण्यात आले आहे. आणि 0.45 लक्ष किलो प्रती दिन क्षमतेची एकूण 5 सी.एन.जी. भरणा केंद्र नवी मुंबईत उभारण्यात आले आहेत". सभापती महोदय, याठिकाणी कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, भाईंदर या ठिकाणाहून हजारो रिक्षा ठाणे शहरामध्ये येतात. परंतु सी.एन.जी. च्या कमतरतेमुळे सर्व रिक्षा ठाणे शहरातील प्रत्येक पंपावर रांगेमध्ये उभ्या असतात. त्यामुळे वहातुकीची प्रचंड कोंडी होते. ही कोंडी सोडवावयाची असेल तर त्याठिक्ाणी सी.एन.जी. चे पंप तातडीने सुरु केले पाहिजेत. निवेदनामध्ये "चालू वित्तीय वर्षामध्ये 34,000 किलो प्रती दिन क्षमतेचे 2 अतिरिक्त सी.एन.जी. भरणा केंद्र ठाणे येथे उभारण्याचे प्रस्तावित आहे" असे म्हटले आहे. हे दोन सी.एन.जी. भरणा केंद्र आपण किती दिवसात उभारणार आहात? दुसरा प्रश्न असा की, ठाणे शहरामध्ये इतर सर्व शहरामधून रिक्षा मोठया प्रमाणात येत असल्यामुळे येथील रिक्षांना त्याचा त्रास होतो व वहातुकीला प्रचंड अडथळा निर्माण होतो. याबाबत निवेदनात असे म्हटले आहे की, "6 सी.एन.जी. भरणा केंद्र कल्याण, भिवंडी आणि डोंबिवली येथील परिसरात सी.एन.जी. भरणा केंद्र उभारण्यासाठी लागणारी जागा तसेच गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी विविध स्थानिक स्वराज्य संस्थांकडून आवश्यक परवानगी मिळाल्यावर उभारण्यात येणार आहे". हे 6 सी.एन.जी. भरणा केंद्र तातडीने उभे केले पाहिजेत. त्याचप्रमाणे ठाण्याचे वाढते नागरीकरण लक्षात घेता 2 सी.एन.जी. केंद्र आपण किती दिवसात उभारणार आहात? त्याचप्रमाणे इतर प्रस्तावित 6 सी.एन.जी. केंद्र आपण किती दिवसात उभारणार आहात?

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ SBT/ प्रथम श्री. सरफरे.... 13:05

श्री. सचिन अहिर :सभापती महोदय, ठाण्यामध्ये एक सी.एन.जी. केंद्र दिनांक 15-7-2010 रोजी म्हणजे याच महिन्यात चालू करण्याचे काम केलेले आहे. दोन महिन्यात पुढचे सी.एन.जी.चे स्टेशन ठाण्यात चालू करण्यात येईल. सभापती महोदय, सी.एन.जी. केंद्र तात्काळ सुरु करता येत नाही. कारण त्यासाठी जमीन लागते. डिस्ट्रिब्युटर्स लागतात. या सर्व अडचणी आहेत. पण याबाबतीत शासनाचे प्रयत्न चालू आहेत. महानगर गॅस कंपनी बरोबर एक बैठक घेण्यात आलेली आहे नवी मुंबईमध्ये टी.एम.सी.च्या डेपोमध्ये केंद्रे घेता येतील काय? जेथे जेथे शासनाची जमीन आहे तिचा चेंज ऑफ युजर करुन घेऊन या पर्पजसाठी ती जमीन राखीव करता येईल काय? दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे महानगर गॅसचे एक टारगेट आहे. वर्षाला किमान 20 सी.एन.जी. केंद्र प्रस्तावित करुन उभारण्याची त्यांची मानसिकता आहे. त्यासाठी लागणारी जागा शासनाच्या स्तरावर उपलब्ध करुन देण्याचा तसेच टी.एम.सी., नवी मुंबई यांच्या डेपोमध्ये देखील हे केंद्र उभारण्याचा प्रयत्न शासन स्तरावर केला जाणार आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, हा अत्यंत गरजेचा विषय आहे. जनतेच्या चलनवलन व दळणवळणाशी निगडित विषय आहे. निवेदनामध्ये असे म्टटले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थेकडून जागा उपलब्ध झाली तर वगैरे वगैरे. स्थानिक स्वराज्य संस्थेकडे जागा आहे ती शासनाने त्यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी. शासनाने याबाबतीत पुढाकार घेतला तर त्या जागा उपलब्ध होऊ शकतात. नाही तर हजारो रिक्षांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. सभापती महोदय, अडीच तीन वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. त्यामुळे ही सहा केंद्रे तातडीने बैठक घेऊन किती दिवसात उपलब्ध करुन देण्यात येतील?

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्याप्रमाणे ठाण्याच्या संदर्भात निर्णय घेतला तर आज जो पुरवठा करण्यात येत आहे तो भरपूर प्रमाणात करण्यात येत आहे. या ठिकाणी प्रश्न एवढाच आहे की, सी.एन.जी.केंद्र आणि सी.एन.जी.केंद्रामध्ये लागणारी पाईप लाईन हा महत्वाचा भाग आहे. अनेक वेळा लोडशेडिंग असल्यामुळे पेट्रोल किंबहुना गॅस अपलोड करावे लागते. त्यामुळे देखील अडचण येते. ठाणे जिल्हयात ठाणे, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ या ठिकाणी ही केंद्रे उभारण्याचा प्रयत्न आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे प्रयत्न करण्यात येत आहेत. ज्या ठिकाणी पेट्रोल, डिझेलची केंद्रे आहेत त्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

ठिकाणी देखील सी.एन.जी.चे केंद्र उभे करण्याचा प्रयत्न लवकरात लवकर करण्यात येईल. त्यासाठी जी जागा उपलब्ध करावी लागेल ती देखील लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करु.

. श्री. सुभाष भोईर : सभापती महोदय,एका अत्यंत महत्वाच्या विषयावर सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. ठाणे शहरातील सी.एन.जी. केंद्र हे या शहराच्या मध्यभागी असल्यामुळे वाहतुकीला खोळंबा होतो. आणि दुर्घटना होण्याचा प्रश्न वारंवार निर्माण होत असतो. कळवा, मुंब्रा आणि घोडबंदर रोडवर सी.एन.जी. केंद्र असावे अशा प्रकारची वारंवार मागणी करण्यात आलेली आहे. मुंब्रा, कळवा विभागातील सर्व रिक्षाधारकांना ठाणे शहरात येऊन सी.एन.जी.चा भरणा करावा लागतो. त्यामुळे ठाण्यात मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होते. म्हणून शासन मुंब्रा, कळवा आणि घोडबंदर रस्त्यावर काही उपाययोजना करणार आहे काय? ठाण्यातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सी.एन.जी. केंद्र इतर ठिकाणी जेथे वाहतूक कोंडी होणार नाही तेथे करण्यात येणार आहे काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, जागा उपलब्ध झाली तर इतर ठिकाणी सी.एन.जी. केंद्र उभारण्याचे धोरण राज्य शासनाचे आहे.

---

**<u>लक्षवेधी सूचना क्र. 1 बाबत</u>**

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझी लक्षवेधी सूचना घेण्यात यावी.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे आपली लक्षवेधी सूचना पुकारण्यात आली तेव्हा आपण सभागृहात नव्हता.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मी त्यावेळी मिटिंग मध्ये होतो.

**उपसभापती** : मिटिंग महत्वाची आहे की, लक्षवेधी सूचना महत्वाची आहे?

आता लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील.

..3..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक नऊ (ब) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 154 या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 154 ही निवेदने कृपया छापावीत.)

---

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 1 ते 154 लक्षवेधी सूचनेवरील निवेदने आज सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत. या सभागृहाचे कामकाज कसे करावे हे आपणच आम्हाला सांगावे. 154 लक्षवेधी सूचनांची निवेदने आज सभागृहाच्या पटलावर ठेवली जात आहेत. पावसाळी अधिवेशन 10 दिवसाचे घेतले जात आहे. पावसाळी अधिवेशन एक महिन्यावरुन दहा दिवसांवर आणले आणि अशा पध्दतीने इतक्या घाईगर्दीमध्ये कामकाज आटोपले जात असेल तर हे पावसाळी अधिवेशन घेण्याचे बंद करा. सभापती महोदय, हे काय चालले आहे ? आता सर्वच कामकाज पटलावर ठेवावे.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय सभापतीशी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पूर्ण अधिवेशनच पटलावर ठेवा.

श्री. दिवाकर रावते : कामकाजाच्या बाबतीत आपले काय नियंत्रण आहे ?

**उपसभापती** : या 154 लक्षवेधी सूचना स्वीकृत होत्या.

श्री. विनोद तावडे : पूर्ण अधिवेशनच पटलावर ठेवा.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर आसनस्थ व्हावे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण माननीय संसदीय कार्य मंत्री यांना बोलवावे. तोपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

( काही मंत्रिमहोदय विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांशी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. अब्दुल सत्तार : (बसून) आम्ही रात्री दहा दहा वाजेपर्यंत बसतो....

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. दिवाकर रावते : आम्ही तुमचे नोकर आहोत काय ? सभापती महोदय, हे काय चालले आहे ?

**उपसभापती** : सभागृहामध्ये कामकाज करण्यासारखी परिस्थिती नसल्यामुळे सभागृहाची बैठक मी दुपारी 1.30 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.13 ते 1.30 वाजेपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी एक अत्यंत गंभीर विषय सभागृहात मांडत आहे. या अधिवेशनाच्या संदर्भात माननीय राज्यमंत्री श्री.अब्दुल सत्तार जे बोलले ते आम्हाला अत्यंत गंभीर वाटत आहे. या सदनाचे कामकाज वाढविण्याची मागणी आम्ही नेहमी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत करीत असतो. हे अधिवेशन एक दिवसाने वाढविता येईल किंवा नाही यासंबंधी विधानसभेच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत चर्चा झाली. सोमवार, मंगळवार आणि बुधवार असे तीन दिवस अधिवेशन वाढवावे की नाही याबाबत चर्चा झाली. सभागृहासमोर भरपूर कामकाज असल्यामुळे हे अधिवेशन एक आठवडाभर वाढवावे अशी आम्ही शासनाला विनंती केल्यावरही ते वाढविण्यात आले नाही. ही सर्व वस्तुस्थिती असताना माननीय मंत्री महोदय श्री.अब्दुल सत्तार असे बोलले की, आम्ही रात्री 10-10 वाजेपर्यंत बसतो. जणू काही ते आमच्यावर मेहेरबानी करीत आहेत. सरकार तुम्ही चालवित आहात. लाल दिव्याच्या गाडया तुमच्याकडे आहेत. तुम्ही मंत्री आहात. या सभागृहाचे कामकाज चालविण्याची संपूर्ण जबाबदारी सरकारची असताना आम्ही उशिरापर्यंत बसतो असे बोलणे म्हणजे ही सरकारची आमच्यावर मेहेरबानी आहे का ? नागपूरच्या अधिवेशनामध्ये या सदनाच्या कामकाजाची वेळ संध्याकाळी 6 पर्यंत असते, त्याबाबतची नियमातील तरतूद आम्हाला वाचून दाखविली होती. संध्याकाळी 6 नंतर कामकाज चालणार नाही असे सांगितले होते. त्या नियमाला मुरड घालून आम्ही सरकारला नेहमी सहकार्य करतो. सभापती महोदय, कधी कधी आपण आम्हाला भाषण आटोपते घ्यावे असे म्हटल्यावर आम्ही आपला शब्द पडू देत नाही. आमच्या भावना, आमचे भाष्य आम्ही मध्येच थांबवित असतो. एवढे सहकार्य करीत असतानाही माननीय मंत्री महोदय, आम्ही रात्री 10-10 वाजेपर्यंत बसतो असे म्हणत आहेत ते योग्य नाही.

सभापती महोदय, आज मराठी भाषेच्या चर्चेच्या वेळी मला व्यक्तिगत खूप वाईट वाटले. माननीय श्री.अशोक चव्हाण हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत. ते काँग्रेस पक्षाचे असतील, परंतु ते राज्याचे माननीय मुख्यमंत्री आहेत. सरकार मराठी भाषेसंबंधी धोरण आखणार आहे. त्याबाबतच्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

प्रस्तावावर सकाळी चर्चा चालू होती. त्यावेळी सत्तारुढ पक्षाच्या बाजूला या सदनामध्ये कोण कोण उपस्थित होते ते सांगतो. माननीय मंत्री श्री.अजित पवार हे होते, माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे, माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम, माननीय मंत्री श्री.सुभाष झनक आणि माननीय मंत्री श्रीमती फौजिया खान हया उपस्थित होत्या. हे मंत्री उपस्थित होते. सदस्यांपैकी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले, श्री.सय्यद जमा आणि श्री.सुभाष चव्हाण हे काही मिनिटांच्या फरकाने सभागृहात आले. आपल्या राज्याचे माननीय मुख्यमंत्री हे काँग्रेस पक्षाचे आहेत, ते या चर्चेला उत्तर देणार आहेत हे काल जाहीर झाले होते. आज सकाळी ते 10 वाजता येतील म्हणून आम्ही धावतपळत आलो. आज माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांचा वाढदिवस असल्यामुळे त्यांना शुभेच्छा देण्यासाठी आम्ही सकाळी 7.30 वाजता गेलो होतो. माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार होते म्हणून आम्ही इतक्या सकाळी तेथे गेलो होतो. तुमच्या मुख्यमंत्र्यांच्या मागे 5 सदस्यही का नसावेत ? हे राज्याला शोभादायक आहे का ? माननीय मंत्री श्री.अजित पवार हे सभागृहात आले होते. ते राष्ट्रवादीचे प्रमुख आहेत. विरोधी पक्षाने उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री उपस्थित असताना सभागृहात सन्माननीय सदस्यांनी उपस्थित राहण्याची सरकार पक्षाची जबाबदारी नाही ? ही गंभीर परिस्थिती आम्ही सकाळी अनुभवली आहे. माननीय मंत्री श्री.अजित पवार हे असे बोलल्याचे आम्ही वाचले आहे की, साधा सलाम सुध्दा न मारता नामनियुक्त सदस्य म्हणून तुम्ही येथे येता. काही खर्च न करता येता. ज्यांना सलाम सुध्दा मारावा लागत नाही, असे 12 सदस्य या सभागृहात येतात. त्या सन्माननीय सदस्यांची ही जबाबदारी नाही का ?

सभापती महोदय, काल सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे मराठी भाषेच्या प्रस्तावावर भाषण करीत होते. मी नेहमी अन्य सन्माननीय सदस्यांची भाषणे मागे बसून ऐकत असतो. माझी ती सवय आहे. आमच्या पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य जेवणासाठी बाहेर गेले होते, त्यांना सभागृहात येण्यासाठी 10 मिनिटे उशीर झाला होता. परंतु एका वर्तमानपत्राने अशी बॅनर लाईन टाकली की, रामदास कदम यांच्या मागे एकही माणूस नाही. ठीक आहे, हे आमचे झाले. परंतु आज सकाळच्या परिस्थितीबाबत उद्या काय छापून येते ते बघतो.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, आज सकाळी आपले आगमन झाल्यावर सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नव्हते. माननीय सदस्य श्री.विनोद तावडे मला असे म्हणाले की, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. त्यावर मी म्हणालो की, तुम्ही हा मुद्दा काढू नये. कारण सभागृह स्थगित केल्यानंतर माननीय सभापतींना आसनावरुन जावे लागेल व सभागृहात परत यावे लागेल. पीठासीन अधिका-यांच्या आदरासाठी कॅबिनेट मंत्री नसतानाही आम्ही सभागृहाचे कामकाज चालू दिले. सभागृहाचे कामकाज 10 मिनिटे चालू राहिल्यावर मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना म्हटले की, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. त्याचवेळी माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख हे सभागृहात आले.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, आम्ही नियम, प्रथा यांच्या बाहेर जाऊन सभागृहामध्ये कामकाज करण्याच्या बाबतीत सहकार्य करीत असतो. असे असताना मंत्री महोदयांनी येथे असे विधान केले की, "आम्ही रात्री 10-10 वाजेपर्यन्त बसतो. त्यांनी केलेले विधान आक्षेपार्ह आहे. म्हणून त्यांनी आपले विधान मागे घेतले पाहिजे. सरकार चालवायचे की नाही हे तुम्ही ठरावा, नाही तर मंत्र्यांना घरी बसवा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय श्री. अब्दुल सत्तार यांनी केलेले विधान मी देखील ऐकले आहे. 93च्या सूचनांसबंधी नीट निर्णय व्हायला पाहिजे असा आम्ही आग्रह धरीत होतो. त्याच वेळी माननीय मंत्री महोदय खाली बसून कॉमेण्टस् करीत होते. त्यांनी केलेले कॉमेण्टस् मी ऐकले आहेत. ते असे म्हणाले की, "आम्ही रात्री 10-10 वाजेपर्यन्त बसतो. नियमाप्रमाणे सभागृहाचे कामकाज सायंकाळी 6.00 वाजेपर्यन्त चालले पाहिजे. मला आठवते मागील अधिवेशनामध्ये आणि या अधिवेशनामध्ये देखील रात्री 9.30 वाजेपर्यन्त प्रस्तावावर चर्चा झाल्या त्यावेळी आम्ही देखील सभागृहामध्ये बसलो होतो. हे अधिवेशन सुरु झाल्यापासून पहिला दिवस सोडला तर रोजच सभागृहाची विशेष बैठक होत आहे. एका विशिष्ट परिस्थितीमध्ये सभागृहाची विशेष बैठक व्हावी असे अपेक्षित आहे. परंतु या अधिवेशनामध्ये रोजच सकाळी 10.30 वाजता विशेष बैठक घेण्यात आली. या विशेष बैठकीला हजर राहण्यासाठी लांब राहाणा-या सदस्यांना घरुन 8.30- 9.00 वाजता निघावे लागते. सकाळी 10.30 ते रात्री 9.00 वाजेपर्यन्त आम्ही कामकाज करतो. सभापती महोदय, आपण आपल्या आसनावरुन आम्हाला निदेश दिल्यानंतर आम्ही त्याचे पालन करतो. आपण सांगितले दोन बिले काढून द्या, तीन बिले काढून द्या की ती आम्ही काढून देतो. कामकाज करण्यासाठी आम्ही सहकार्य करीत असतो. दुसरे असे की, या सभागृहामध्ये बिलांवर चर्चा होण्यापूर्वी त्या आधी ती सदस्यांना वाचण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला पाहिजे. मला आठवते की या सदनाचे ज्येष्ठ सदस्य कै. मधुकरराव सरपोतदार हे आम्हाला नेहमी सांगत असत की, बिल हे असे अस्त्र आहे की त्याचे कायद्यामध्ये रुपांतर होत असते, तो कायदा राज्याला लागू होत असतो आणि त्याचे बरे वाईट परिणाम समाजावर होत असताना. म्हणून कायदा जनतेच्या हिताचा झाला पाहिजे या दृष्टीने बिलाचा अभ्यास करुन त्यावर चर्चा केली पाहिजे. आता परिस्थिती अशी आहे की, विधानसभेमध्ये बिल मंजूर झाले की ते लगेच विधानपरिषदेमध्ये मांडले जाते आणि मंजूर करण्यात येते. सन्माननीय सदस्यांना वाचायला वेळ

(श्री. पांडुरंग फुंडकर....

मिळणार नाही अशा त-हेने या बिलाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना देण्यात येतात. असे असताना बिले मंजूर करण्यासाठी आम्ही शासनाला सहकार्य देत असतो. अशा परिस्थितीत "आम्ही 10-10 वाजेपर्यन्त बसतो" अशा प्रकारचे विधान मंत्री महोदयांनी करणे आक्षेपार्ह आहे. सभागृहातील कामकाज करुन घेण्याची जबाबदारी सरकारची आहे. अधिवेशन एक आठवडा वाढवावे अशा त-हेचा आग्रह आम्ही कामकाज सल्लागार समितीमध्ये धरला होता. विधानसभेच्या कामकाज सल्लागार समितीमध्ये 1 दिवस अधिवेशन वाढविण्यासाठी 1 तास चर्चा झाली. आठवडाभर अधिवेशन वाढविण्याचा आग्रह असताना केवळ 1 दिवस वाढविण्यात आला. सभापती महोदय, सभागृहापुढील सारे कामकाज 8-9 दिवसात आटोपण्याचा प्रयत्न करण्यात आला. तरी देखील आम्ही सहकार्य केले. असे असताना माननीय मंत्री महोदय, "आम्ही रात्री 10-10 वाजेपर्यन्त बसतो" असे म्हणत असतील तर ती फार आक्षेपार्ह बाब आहे. आम्ही काही येथे वेठबिगार नाही. सभागृहापुढील कामकाज करुन घेण्याची जबाबदारी ही सरकारची आहे. बिले मंजूर करुन घेण्याची जबाबदारी सरकारची आहे. असे असताना जणूकाही मंत्री महोदय आमच्यावर, विरोधी पक्षावर उपकारच करतात अशा त-हेचे विधान त्यांनी केलेले आहे. त्यांनी आपले शब्द मागे घेतले पाहिजे. ज्यावेळी ते आपले शब्द मागे घेतील त्याच वेळी सभागृहाचे कामकाज सुरु होईल. माननीय मंत्री महोदय आता सभागृहामध्ये हजर नाहीत. त्यांना आपण बोलावून घेऊन त्यांचे शब्द मागे घेण्यास सांगावे अशी मी आपणास विनंती करतो.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय राज्यमंत्री श्री.अब्दुल सत्तार यांना सभागृहात येण्याबाबत निरोप देण्यात आला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री सभागृहात उपस्थित होईपर्यंत सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी स्थगित करावी. त्यांना विषयाचे गांभीर्य कळले पाहिजे. सभागृह चालविण्याची जबाबदारी शासनाची असते हे त्यांना कळले पाहिजे.

**उपसभापती** : माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी माननीय राज्यमंत्री श्री.अब्दुल सत्तार यांना सभागृहात येण्याबाबत तातडीने निरोप द्यावा.

श्री.दिवाकर रावते : माननीय सभापती महोदय, सभागृहाची बैठक पाच मिनिटांसाठी स्थगित करावी अशी आमची विनंती आहे.

**उपसभापती** : सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 2.15 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.40 ते 2.15 पर्यंत मध्यंतरासाठी स्थगित झाली.)

-------------

नंतर 2ई.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, सभागृहात नियम 93 अन्वयेच्या सूचनां तसेच लक्षवेधी सूचनांबाबत आम्ही आज आपल्याबरोबर चर्चा करीत होतो तेव्हा माननीय मंत्री महोदय श्री. अब्दुल सत्तार यांनी बसूनच कॉमेंट्स केल्या की आम्ही रात्री 10-10 वाजेपर्यंत बसतो. मी मघाशीच सांगितले की शासनाच्या वतीने जरी 10 वाजेपर्यंत बसत असले तरी सभागृह चालविण्याची जबाबदारी प्रामुख्याने सत्ताधारी पक्षाची आहे विरोधी पक्षाची नाही. विधिमंडळाच्या नियमाप्रमाणे सभागृहाच्या कामकाजाची वेळ सायंकाळी 6 वाजेपर्यंतच असते, 6 वाजेपर्यंतच सभागृहाची बैठक चालली पाहिजे. त्यानंतर कामकाज होऊ नये अशी अपेक्षा असताना देखील विरोधी पक्षाकडून नेहमीच सहकार्य दिलेले आहे. या अधिवेशनात सुध्दा दररोजच सभागृहाची विशेष बैठक घेऊन काम केलेले आहे, एवढे कामकाज होते. कालच्या दिवसाचे कामकाज पाहिले तर जवळपास 3 दिवसांचे कामकाज एकाच दिवशी दाखविले होते. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत आम्ही अधिवेशनाचा कालावधी 8 दिवसांनी वाढविण्याची मागणी केली होती परंतु ती मान्य झाली नाही. उलट विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत मात्र फक्त एक दिवसाचे कामकाज वाढविण्यापुरताच मुद्दा असताना देखील एक तास भर त्यावर चर्चा झाली. आपली बैठक मात्र लवकरच संपली. असे असताना देखील आपल्या निदेशानुसार आम्ही सहकार्य करण्याचा प्रयत्न करतो परंतु सरकारमध्ये बसलेले मंत्री महोदय अशा प्रकारे विरोधी पक्ष म्हणून आम्हाला डिवचत असतील आणि ते सुध्दा 10-10 वाजेपर्यंत उशिरा सभागृहात बसतात अशा उपकार करण्याच्या आविर्भावात ते बोलत असतात. वास्तविक सभागृह चालविण्याची जबाबदारी ही सत्ताधारी पक्षाचीच आहे आणि आम्ही सहकार्य करण्याची भूमिका घेतो म्हणून 10 वाजेपर्यंत बसतो. असे असतानाही उपकार केल्यासारखे मंत्रीच बोलत असतील तर ते योग्य नाही. वास्तविक सभागृहात आमचा विषय वेगळाच सुरु होता परंतु अशा प्रकारे जर मंत्रीच कॉमेन्ट्स करीत असतील तर विरोधी पक्ष म्हणून आम्हीच कशासाठी सहकार्य करायचे ? म्हणून मंत्री महोदयांनी त्यांचे शब्द मागे घ्यावेत आणि आपण त्यांना तसे निदेश आपण द्यावेत अशी माझी विनंती आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अब्दुल सत्तार : महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या म्हणण्यानुसार मी सभागृहात काही बोललो ते रेकॉर्डवर तरी आहे काय ? माझी विनंती अशी आहे की, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते बोलताना बोलले की, मंत्र्यांना माज चढला .....अडथळा.......त्यावेळेस मी सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांना विनंती केली होती की, आम्ही सुध्दा 10-10 वाजेपर्यंत बसतो त्यामुळे माजण्याचा प्रश्नच नाही. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांच्याकडून आपण खात्री करु शकता. ....अडथळा......आपण ज्येष्ठ सदस्य आहात, मी आपल्याबद्दल कसे बोलणार आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अब्दुल सत्तार...

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. उपरकर साहेब उपस्थित आहेत. मी काय बोललो होतो ते तुम्ही त्यांनाही विचारुन बघा.

श्री. परशुराम उपरकर : आम्ही 10-10 वाजेपर्यंत बसतो असे तुम्ही म्हणाले होते.

श्री. अब्दुल सत्तार : ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणाले होते की, "मंत्र्यांना माज चढला आहे". तरीही सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर मी माझे शब्द मागे घेतो व आपण सुध्दा आपले शब्द मागे घ्यावेत अशी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : आम्हाला या ठिकाणी ज्या पध्दतीने काम करावे लागते... "इजा,बिजा, आणि तिस-यांदा तुम्ही निवडून आल्यामुळे तुम्हाला बहुमताचा माज आला आहे त्यामुळे हे सर्व घडते आहे,"असे मी म्हणालो होतो. तरीही सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. अब्दुल सत्तार चार वेळेस म्हणाले की, "आम्ही दहा वाजेपर्यंत बसतो." त्यामुळे या विषयाच्या संदर्भात माझी नम्र विनंती आहे की, जर मा.अब्दुल सत्तारभाईंना दहा दहा वाजेपर्यंत बसण्याचा त्रास होत असेल तर त्यांना मंत्रीमंडळातून मुक्त करुन सिल्लोड मध्ये काम करु द्यावे असा माझा विषय होता.

**उपसभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदयांनी त्यांचे शब्द मागे घेतलेले आहेत. कोकणावरील प्रस्तावावरील चर्चेजा आता आपण सुरुवात करु या.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा होणे आवश्यक आहे.

**उपसभापती** :कोकणाच्या प्रस्तावावर अजून किती सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे ? सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांना यासंदर्भात काही मुद्दा मांडावयाचा दिसतो.

...2..

**औचित्याच्या मुद्याबाबत**

श्री. गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, आपण मला संधी दिल्याबद्दल धन्यवाद. राज्यातील 400 वैद्यकीय अधिका-यांच्या अर्जावर मागची तारीख टाकून त्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे जवळपास सर्व जिल्हयात वैद्यकीय सेवेवर परिणाम झालेला आहे. हे सर्व लक्षात घेता मा. मुख्यमंत्रीमहोदयांनी नांदेड शहरात तसेच इंदिरा गांधी मेडीकल कॉलेज येथील वैद्यकीय सेवा विस्कळीत होऊ नये म्हणून "अ" व "ब" गट वैद्यकीय अधिका-यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या त्या बदल्यांना स्थगिती देण्यात आलेली आहे. अकोले जिल्हयात "अ" व "ब" गट वैद्यकीय अधिका-यांच्या बदल्यामुळे तेथील वैद्यकीय सेवा विस्कळीत झालेली आहे. म्हणून या सभागृहाला आपल्या माध्यमातून विनंती करतो की, अकोला जिल्हयातील वैद्यकीय अधिका-यांच्या बदल्यांना आपण स्थगिती द्यावी ही विनंती.

**उपसभापती** :शासनाने या विषयाची नोंद घेऊन पूर्तता करावी.

श्री. बाळासाहेब थोरात : होय.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, सभागृहात आरोग्य मंत्री उपस्थित आहेत त्यामुळे त्यांनी शासनाच्या कार्यवाहीबाबत सभागृहाला अवगत करावे.

प्रा. वर्षा गायकवाड : होय.

( एकाच वेळेस अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी जो विषय उपस्थित केलेला आहे त्या भागात मी सुध्दा राहणारा आहे. अकोला येथील जनरल हॉस्पिटलच्या "अ" व "ब" गट वैद्यकीय अधिका-यांच्या बदल्या मागच्या डेट टाकून करण्यात आलेल्या आहेत. व त्या ठिकाणी नागपूर मेडीकल कॉलेजमधील असोसिएट प्रोफेसर गेलेले आहेत. परंतु हे असोसिएट प्रोफेसर नागपूरहून अकोला येथे ये जा करतात तसेच शनिवार व रविवारी हे असोसिएट प्रोफेसर गावी असतात. या ठिकाणच्या दवाखान्यात गंभीर अशी स्थिती निर्माण झालेली आहे. अकोले येथील हॉस्पिटलमध्ये आता डॉक्टर्स नाहीत त्यामुळे नांदेड व इतर ठिकाणी ज्या प्रमाणे बदल्यांना स्टे दिलेला आहे तसाच स्टे अकोला जिल्हयाला दिला पाहिजे. अकोला येथील हॉस्पिटलमध्ये दोन जिल्हयाचे पेशंट जात असतात. त्यामुळे अकोला येथील डॉक्टरांच्या बदल्यांना ताबडतोब स्टे दिला जावा अशी विनंती आहे.

प्रा.वर्षा गायकवाड : होय. यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, कोकणाचा प्रस्ताव घ्यायचे देखील ठरले आहे. अंतिम आठवडा प्रस्ताव देखील घ्यावा. मात्र तो, कामकाज पत्रिकेप्रमाणे घ्यावा.

**उप सभापती** : सभागृहाचे कामकाज करताना कामकाजाबाबत काही तडजोड करावी लागली तर ती सभागृहाच्या अनुमतीने करण्यात येते.

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, कोकणाच्या प्रस्तावावर चर्चा सुरू झालेली आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की,कोकणाच्या प्रस्तावावर किती जणांना बोलायचे आहे हे मी विचारले होते. त्यावेळी आपण सभागृहात नव्हता.

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, कोकणाच्या प्रस्तावावर तीन दिवस चर्चा झालेली आहे. आपल्याला जर कोकणच्या प्रस्तावावर चर्चा करायची नव्हती तर मग सभागृहासमोर प्रस्ताव कशाला आणला ? आमची आज रात्रौ 12.00 वाजेपर्यंत बसण्याची तयारी आहे. कामकाजाबाबत शॉर्टकट मारून चालणार नाही.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, अंतिम आठवडा प्रस्तावावर देखील काल चर्चा सुरू झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर हे ऑन लेग आहेत. माझी सभागृहाला विनंती आहे की, आपण अंतिम आठवडा प्रस्तावावर प्रथम चर्चा करू या.

(दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

येथे सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित आहेत. सभागृहाचे नेते आणि माननीय विरोधी पक्ष नेते यांच्याशी कोणते कामकाज प्रथम घ्यायचे याबाबत चर्चा करण्यासाठी सभागृहाची बैठक मी दहा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.29 ते 2.40 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी**.: आदिवासींचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी शासनास आलेले अपयश

**मु.शी**.: आदिवासींचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी शासनास आलेले अपयश या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे सर्वश्री रामनाथ मोते, परशुराम उपरकर, केशवराव मानकर,वि.प.स. यांचा प्रस्ताव

प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला

**उपसभापती** : म.वि.प. नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावावरील अपूर्ण राहिलेली चर्चा आता पुढे सुरु करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर हे ऑन लेग होते. ते आता भाषणास सुरुवात करतील.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय,अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

आदिवासींच्या प्रश्नासंदर्भात मी काल काही मुद्दे मांडले आहेत. मागील अधिवेशनात मी अर्धा-तास प्रश्नाद्वारे आदिवासींच्या प्रश्नासंदर्भातील विषय उपस्थित केला होता. त्यावेळी मला उत्तर देताना सांगण्यात आले होते की, ".. कुंपणच शेत खात आहे, आदिवासीपर्यंत पैसे पोहोचत नाहीत, जे पैसे शिल्लक राहतात ते दुसरीकडे वळविण्यात येतात. त्याठिकाणी आर्थिक गळती आहे."

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

सभापती महोदय, आदिवासींच्या प्रश्ना संदर्भात मी चार मुद्दे विषय मांडणार आहे. पहिला मुद्दा आरोग्य विषयक आहे. महाराष्ट्रात 1 कोटीच्या आसपास आदिवासी लोकसंख्या आहे. परंतु त्यांच्यासाठी चांगल्या प्रकारची आरोग्यसेवा उपलब्ध नाही. ठाणे जिल्ह्यामध्ये तर आरोग्य विभागात कर्मचाऱ्यांची वाणवा आहे. ठाणे जिल्हा फार मोठा असूनही या जिल्ह्याचे अजून विभाजन केलेले नाही. या जिल्ह्यातील अदिवासी लोकांना मुख्यालयी येण्यासाठी 110 ते 120 कि.मी.पर्यंत प्रवास करावा लागतो. ठाणे जिल्ह्यात आठ आदिवासी तालुके आहेत. आपण एका बाजूला वाहतुकीच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी मेट्रो रेले किंवा मोनो रेल अशी पर्यायी व्यवस्था करीत आहोत तर दुसरीकडे ठाणे जिल्ह्यात रेल्वे सेवा नाही, तेथील आदिवासींनी रेल्वे पाहिलेली नाही तर मग त्यामध्ये बसून प्रवास करण्याचा विषय सोडून द्या. मुंबईपासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या आदिवासी भागातील ही परिस्थिती आहे. ही विषमता कशासाठी आहे ? तेथील आदिवासी लोक म्हणतात की, आम्ही माणसे नसून ढोर आहोत. आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाविरुध्द ते आवाज ऊठविल्याशिवाय राहणार नाहीत.

सभापती महोदय, आदिवासींच्या आरोग्यबाबत, रोजगाराबाबत, आश्रमशाळांबाबत किंवा आदिवासींकरिता काढलेल्या वेगवेगळ्या योजनांच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर त्यांच्यापर्यंत कोणत्याही प्रकारच्या सोयीसुविधा पोहचत नहीत. आज त्यांची अवस्था अतिशय वाईट आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांनी आमच्या येथील ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन केले. परंतु त्यांची पाठ फिरल्यानंतर तेथील डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांनी देखील त्यांच्या पाठोपाठ ठाणे मुख्यालयाची बस पकडली. आज ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर्स आणि नर्सेसचा तुटवडा आहे. औषधांची वाणवा आहे. आदिवासींना त्यांच्यासाठी योजना असल्याचे सांगण्यात येते. परंतु त्या योजना फक्त कागदावर असतात. आदिवासींच्या डोळ्यात धूळफेक करुन चालणार नाही. आदिवासींकरिता असलेल्या सर्व योजना त्यांच्यापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. आज ठाणे जिल्ह्यातील आरोग्य विभागात 36 टक्के पदे रिक्त आहेत. त्याठिकाणी निवासी अधिकारी नाहीत. डॉक्टर्स नाहीत. तेथे 194 उप केंद्रे बांधलेली नाहीत. मुलास सर्पदंश झाल्यास त्यास उपचारासाठी ठाणेपर्यंत यावे लागते आणि ठाणे हे आदिवासी पाड्यापासून 100 ते 150 अंतरावर आहे आणि मुलास वेळेवर उपचार न मिळाल्यास त्याचा मृत्यू होतो.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर..

त्या ठिकाणी मागच्या वर्षी 4 आदिवासी मुले सर्प दशांने मृत्यूमुखी पडली होती. त्याचबरोबर संपूर्ण राज्यामध्ये जवळजवळ 68 मुले संर्पदंशाने मृत्यूमुखी पडली होती असे सरकारच्याच अहवालामध्ये म्हटलेले आहे. डहाणू येथील आदिवासी मुले संर्पदशांने मृत्युमुखी पडल्यानंतर मी त्या ठिकाणी भेट देण्यासाठी गेलो होतो त्यावेळची तेथील परिस्थिती अत्यंत वाईट होती. ही घटना घडल्यानंतर जवळजवळ 18 आश्रमशाळांना मी भेटी दिल्या होत्या. त्या ठिकाणी पिण्याचे पाणी नव्हते, स्वच्छतागृहे नव्हती, स्नानगृहे नव्हती, वहया, पुस्तके, गणवेश आणिं शालेय साहित्य दिले गेले नव्हते त्या ठिकाणी बुरसटलेली डाळ दिली होती आणि किडलेले धान्य दिले होते, अपुरा आहार अपुरे वर्ग आणि अपुरी निवासव्यवस्था होती. त्या आश्रमशाळेतील मुलींसाठी टॉयलेटची तसेच स्नानगृहाची देखील व्यवस्था नव्हती त्यामुळे या मुलींना आश्रमशाळेपासून दोनशे ते तीनशे मिटर्स अंतरावर पहाटेच्या वेळी लवकर उठून नैसर्गिक विधीसाठी व स्नानासाठी जावे लागते. या आश्रमशाळेच्या इमारती मोठया प्रमाणावर गळतात. आश्रमशाळेच्या अवस्थेसंबंधी जेवढे बोलावे तेवढे कमीच आहे. सर्व आश्रमशाळांच्या इमारती अद्ययावत करण्यात येतील असे माननीय मत्रिमहोदयांनी मागच्या वेळी सांगितले होते परंतु प्रत्यक्षात तसे झालेले नाही मोखाडा,जव्हार, विक्रमगड,डहाणू इत्यादी भागातील आश्रमशाळांमधील अवस्था काय आहे हे माननीय मंत्री महोदयांनी जाऊन पहावे. तेथील परिस्थितीमध्ये काहीही सुधारणा झालेली नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे इमारतीच्या दुरुस्तीचे काम देण्यात आलेले आहे व त्याकरता निधीसुध्दा देण्यात आला आहे परंतु निधी दिल्यानंतरसुध्दा या इमारतीचे बांधकाम झालेले नाही वा त्याची दुरुस्ती केली जात नाही. सध्या आश्रमशाळाच्या इमारतीची जी अवस्था आहे त्यात सुधारणा करण्यात आली पाहिजे असे मला या चर्चेच्या निमित्ताने सुचवावयाचे आहे. सभापती महोदय, दुर्बल आणि शोषित समाजासाठी हे शासन काम करीत आहे नेहमीच सागितले जाते त्याचबरोबर " खूप खूप शिक ग पोरी, ताठ मानेने जगशील तरी " असे भिंतीवर लिहिले जाते परंतु या समाजातील मागासलेल्या मुलींना अशा प्रकारची सुविधा पुरविल्या जात असतील तर पालक आपल्या मुलां मुलींना त्या शाळेमध्ये पाठविणारच नाहीत.

श्री.संजय केळकर..

सभापती महोदय , रोजगाराच्या बाबतीत मला एक मुद्दा मांडावयाचा आहे. वारली पेंटींग संपूर्ण देशामध्ये प्रसिध्द आहे. आदिवासी मुले , मुली आणि महिला वारली पेंटींग करीत असतात मोठमोठया मॉल्समध्ये उपलब्ध होणार नाही असे चांगले गिफ्ट आर्टिकल तयार होत असते परंतु वारली पेटीगसाठी मार्केट उपलब्ध नाही म्हणून शासनाने वारली पेंटींगसाठी मार्केट उपलब्ध करुन दिले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. त्याचबरोबर वारली पेंटींगसाठी शासनाकडून मदत मिळाली नाही, सरकारकडून जर आर्थिक ताकद मिळाली नाही तर वारली पेंटींगचा कधी ना कधी तरी अस्त होईल म्हणून वारली पेंटींगसाठी शासनाने मदत दिली पाहिजे तसेच मार्केट उपलब्ध करुन दिले पाहिजे असे मला या चर्चेच्या निमित्ताने शासनाला सुचवावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला खावटी कर्जासंबंधी बोलावयाचे आहे. विक्रमगड मध्ये 10 हजार आदिवासींना खावटी कर्ज मिळावे यासाठी यादी तयार करण्यात आलेली आहे परंतु प्रत्यक्षात मात्र् 2500 आदिवासींना खावटी कर्ज देण्यात आलेले आहे तेव्हा जास्तीत जास्त आदिवासींना खावटी कर्ज कसे मिळेल ,आदिवासीना जास्तीत जास्त आर्थिक ताकद कशी मिळेल या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत आणि आज आदिवासीचे शोषण चालू आहे हे प्रकार बंद व्हावेत असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे.

सभापती महोदय, यानंतर मला आदिवासी मुलांच्या गळतीच्या संदर्भात एक मुद्दा मांडावयाचा आहे. पाचवी नतर आदिवासी मुला मुलीची गळती होत असते आणि आठवी नंतर गळतीचे प्रमाण अधिकच वाढत जाते तेव्हा आदिवासी मुला मुलीची गळती होणार नाही याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. या लोकांनी स्वत:च्या पायावर उभे रहावे या दृष्टीने शासनाकडून जे काम व्हावयावस पाहिजे ते होत नाही असे मला दुर्देवाने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, आदिवासी भागातील कुपोषणाच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार येथे मांडलेले असल्यामुळे त्याच्या तपशीलामध्ये मी पुन्हा जाऊ इच्छित नाही. शासकीय अनुदानित 1100 आश्रमशाळा आहेत त्यातील निम्म्या शाळा शासनामार्फत चालविल्या जातात आणि निम्या शाळा अनुदानित संस्था मार्फत चालविल्या जातात . परंतु त्या ठिकाणी डबल स्टॅन्डर्ड लावले जाते अशा प्रकारे भेदाभाव का करण्यात येतो हे मला समजत नाही दोन्ही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर..

आश्रमशाळांमध्ये आदिवासी मुले शिक्षण घेत असतात परंतु शासकीय शाळेतील विद्यार्थ्यामागे 1200 रुपये दिले जातात आणि अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यामागे 630 रुपये दिले जातात तेव्हा अशा प्रकारे भेदभाव करुन विद्यार्थ्यावर अन्याय करण्यात येऊ नये असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, अनुदानित आश्रमशाळेतील वर्गांना मान्यता मिळवावयाची असेल तर त्याकरता संबंधित कार्यालयामध्ये सारखा पाठपुरावा करावा लागतो वारंवार फे-या मारल्यानतरच मान्यता दिली जाते . त्याचप्रमाणे इमारतीच्या बांधकामासाठी ज्या प्रमाणात सहकार्य मिळावयास पाहिजे त्या प्रमाणात दिले जात नाही त्यामुळे या खात्यावरील आणि यंत्रणेवरील विश्वास कमी कमी व्हावयास लागला आहे. भ्रष्टाचाराच्या बाबतीत सांगावयाचे म्हणंजे भ्रष्टाचाराची अनेक उदाहरणे आहेत. अनुसूचित जमाती कल्याण समितीने नाशिक येथे भेट दिली होती त्या समितीमध्ये सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर होते त्यामुळे या भेटीच्या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपकर यांच्याकडे भ्रष्टाचाराची अनेक उदाहरणे आहेत.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री मोहन जोशी )**

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

आणि म्हणून ज्या ज्याठिकाणी भ्रष्टाचार झाला त्याची आपण लाचलुचपत विभागामार्फत चौकशी करु असे सांगितले, परंतु चौकशी केली नाही. 35 कोटी रुपयांचे साहित्य आदिवासी आयुक्तालयातर्फे निविदा न मागविता खरेदी करण्यात आले. हे साहित्य कुणाकडून खरेदी करण्यात आले याची चौकशी करावयास पाहिजे अशी मी मागणी करतो.ठाणे जिल्हयातील जव्हार तालुक्यात आदिवासींना शेळया, मेंढया, व म्हशी खरेदी करुन त्यांचे वाटप करण्याची योजना होती. परंतु त्यामध्ये 445 बोगस प्रकरणे सापडली असून त्यांची देखील शासनाने चौकशी केली पाहिजे. आणि प्रशासनामधील ज्या अधिकाऱ्यांनी हा भ्रष्टाचार केला आहे, त्याचे योग्य ते शासन त्यांना झाले पाहिजे अशी माझी मागणी आहे. त्याचप्रमाणे घरकुल योजनेमध्ये सुध्दा मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचे आपणास पहावयास मिळते. यामध्ये निकृष्ट घरकुलांचा वेगळा विषय आहे, परंतु जव्हार तालुक्यामध्ये 64 घरकुले बांधलेली नाहीत, ती आदिवासींना देण्यात आलेली नाही. तरीसुध्दा त्या घरकुलांचे पैसे जर कुणी हडप करीत असेलतर त्याची सुध्दा चौकशी केली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, आदिवासी लोकांचा विकास झाला पाहिजे म्हणून आपण याठिकाणी या प्रस्तावाच्या माध्यमातून मागणी करीत आहोत. परंतु आदिवासींच्या विकासाच्या नावाखाली त्यांची थट्टा करण्याचे काम आपण करीत आहोत. मागील वेळी पुणे येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये आदिवासींमधील हुशार मुलींना एअर होस्टेसचे प्रशिक्षण तसेच तरुण आदिवासी मुलांना विमान सेवेमध्ये ॲकोमोडेट करण्यासाठी प्रशिक्षण देण्याची योजना स्वीकारण्यात आली.परंतु प्रशिक्षण घेतलेल्या एकाही आदिवासी मुलांचे विमान सेवेमध्ये सिलेक्शन करण्यात आले नाही.एअर होस्टेस म्हणून आदिवासी मुलींचे सिलेक्शन न करण्याचे कारण सांगतांना आदिवासी मुली दिसायला सुंदर नसतात. अशाप्रकारचा शेरा माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी मारल्यानंतर त्यांनी दिलगीरी व्यक्त करुन आपला शेरा बदलला. आणि म्हणून आपण ज्या योजना निर्माण करता त्या पूर्णपणे त्यांच्यापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. प्रशिक्षित आदिवासी तरुणांना योग्य पध्दतीने रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. नाही तर आजचा आदिवासी नेहमी "आदिवासी ढोर नाही, ढोर नाही, माणूस आहे माणूस आहे" हे म्हणतो ते चुकीचे नाही. त्याला आज माणसासारखे वागविले जात नाही.त्याला आपण स्वत:च्या पायावर उभे केले पाहिजे. अनेक गुणी आदिवासी मुले आदिवासी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री. संजय केळकर...

भागामध्ये आहेत. म्हणून या प्रस्तावाच्या माध्यमातून सरकारने गंभीरपणे त्यांच्याकरिता योजना राबवितांना आश्रमशाळांच्या विषयामध्ये, आरोग्य केंद्राच्या विषयांमध्ये आणि रोजगाराच्या विषयांमध्ये तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. तरच एकविसाव्या शतकामध्ये हा आदिवासी बांधव जगाच्या बरोबरीने येऊ शकतो. तेवढी ताकद आणि बुध्दिमत्ता त्याच्यामध्ये आहे असे सांगून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, आदिवासी आश्रमशाळांच्या संदर्भात या सभागृहामध्ये सातत्याने चर्चा उपस्थित करण्यात येते. आणि ही चर्चा झाल्यानंतर व एखादी घटना घडल्यानंतर या सभागृहामध्ये नियम 93 अन्वये सूचना किंवा लक्षवेधी सूचना देण्यात येते. त्यानंतर माननीय मंत्री किंवा माननीय राज्यमंत्र्यांकडून त्याबाबतीत अनेक प्रकारच्या उपाय योजना सुचविण्यात येतात याची सर्व माननीय सदस्यांना कल्पना आहे. मूळ मुद्दा असा आहे की, प्रत्येक आश्रमशाळेच्या ठिकाणी एक महिला अधीक्षक नेमण्यात येईल अशाप्रकारचे आश्वासन यापूर्वी देखील माननीय मंत्री नामदार श्री.बबनराव पाचपुते साहेबांनी दिले आहे. परंतु या नेमण्यात आलेल्या महिला अधीक्षक खरोखरच त्या आश्रमशाळेमध्ये रहातात की नाहीत हे पहाण्यासाठी पहाणी यंत्रणा किंवा मूल्यमापन यंत्रणा डिपार्टमेंटमार्फत केली असेल तर तिला किती यश मिळाले आहे हे आपण सांगावे. त्याचप्रमाणे आपण सातत्याने पाहिले आहे की, आश्रमशाळेतील मुलींची गर्भधारणा झाली आहे की नाही याबाबत महिला कर्मचाऱ्यांमार्फत अवैध पध्दतीने त्यांची तपासणी करण्यात येते. त्या संदर्भात मी नियम 93 अन्वये सूचना देखील दिली होती. आणि म्हणून विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहातील माननीय सदस्यांच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीमध्ये काम करीत असतांना या समितीमार्फत आदिवासी विकास विभागाने मिळून आदिवासी आश्रमशाळांची पहाणी करण्याकरिता एखादी नियमित यंत्रणा निर्माण करता येईल काय हे पहावे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे......

महिलांचे हक्क आणि कल्याण समिती आदिवासी आश्रमशाळांच्या बाबतीत काही काम करु इच्छिते परंतु तो विषय इतर समित्यांकडे असतो त्यामुळे महिलांचे हक्क व कल्याण समिती काही करु शकत नाही. म्हणून आदिवासी विकास विभागाने या संदर्भात महिलांचे हक्क व कल्याण समितीला सहकार्य करावे. तसेच मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आदिवासी आश्रमशाळांकडे लक्ष देण्यात यावे अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी आरोग्याच्या संदर्भात बोलावयाचे आहे. मला आरोग्याच्या बाबतीत अतिशय अस्वस्थता वाटते. आदिवासी महिलांमध्ये, आदिवासी समाजामध्ये आरोग्याच्या बाबत जागृती करणारे आरोग्य विभागामार्फत स्वंयसेवक नेमण्यात येतात आणि त्यांच्यासाठी कोटयवधी रुपयाचा निधी वापरण्यात येतो पण या स्वंयसेवकांना 200 ते 400 रुपये मानधन देण्यात येते. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत हे स्वंयसेवक वर्षानुवर्षे काम करीत असतात. म्हणून त्यांच्या स्वत:च्या आरोगयाकडे तसेच सुरक्षिततेकडेही लक्ष देण्याची गरज आहे. यासंदर्भात मी या ठिकाणी एक उदाहरण देऊ इच्छिते. राजस्थानमध्ये महिला सामर्थ्य म्हणून एक कार्यक्रम राबविला गेला यामध्ये महिलांची एक संघटना तयार करण्यात आली. त्या महिला संघटनेमधील महिलांना सक्षम करण्यासाठी शासनाने काय करायचे हे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे आदिवासी पाडयांवर काम करणाऱ्या ज्या अंतर्गत स्वंयसेविका किंवा अंगणवाडी सेविका आहेत त्यांना कशा पध्दतीने सुरक्षितता देता येईल त्यांना आर्थिक दृष्टया स्वत:च्या पाययावर कसे उभे करता येईल यादृष्टीने काही कार्यक्रम केला तर त्या काही तरी काम करु शकतील नाही तर त्यांचेच शोषण होताना दिसते.

सभापती महोदय, नेहमी वेगवेगळया विषयांवर अंतिम आठवडा प्रस्तावाच्या माध्यमातून चर्चा करण्यात येते आणि त्याबाबत ठोस अशा उत्तराची अपेक्षा करण्यात येते. आदिवासींसाठी केंद्र सरकारचे पैसे येतात तसेच राज्य शासनाचाही निधी देण्यात येतो. परंतु रोजगार हमी योजनेचा पैसा आदिवासीसाठी वापरला जाऊ शकतो याकडे राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा अंतिम आठवडा प्रस्ताव घेण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचा ज्या राज्यांमध्ये कमीत कमी निधी वापरला जातो त्यामध्ये महाराष्ट्र राज्य आहे. हाताला काम मिळत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

नाही म्हणून आज सुध्दा आदिवासी स्थलांतर करतात. म्हणून केवळ आदिवासी विकास विभागापुरता विचार माननीय मंत्रिमहोदयांनी करु नये. आपण स्वत: कामगार चळवळीतून नगर जिल्हयातील असंघटित मजुरांसाठी काम करीत करीत येथपर्यंत पोहोचलेले आहात. त्यामुळे आदिवासींसाठी रोजगार हमी योजनेचा उपयोग कसा करता येईल या दृष्टिकोनातून राज्य शासनाने कार्यक्रम राबविल्याशिवाय फक्त आदिवासी विकास विभाग काही काम करु शकेल असे मला वाटत नाही. म्हणून रोजगार हमी योजना राष्ट्रीय रोजगार हमी योजना आणि महाराष्ट्राची रोजगार हमी योजना ही आदिवासी विभागात चांगल्या प्रकारे राबविणे हे देखील या अंतिम आठवडा प्रस्तावचे उत्तर होऊ शकेल. धन्यवाद.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MMP/

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय,आदिवासींचा विषय अतिशय महत्वाचा आहे. मुंबईच्या जवळ राहणाऱ्या आदिवासीपेक्षाही दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींचा विषय अतिशय महत्वाचा आहे. सभापती महोदय, या ठिकाणी जे मुद्दे मांडण्यात आलेले आहेत त्या मुद्यांची मी पुनरावृत्ती करणार नाही.

सभापती महोदय, आदिवासी उपयोजनेंतर्गत जो नियतव्यय येतो आणि खर्च होतो त्यामध्ये सन 2008-2009 मध्ये 2055 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. सगळयात महत्वाचे असे की, वाहतूक आणि दळणवळण यापैकी वाहतुकीवर 533 कोटी 21 लाख रुपये खर्च झालेले आहेत तर पूरनियंत्रणावर 259 कोटी 93 लाख रुपये खर्च झालेले आहेत. या दोनच विषयावर 800 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. सभापती महोदय, दळणवळण विभागावर एवढा खर्च का होतो.? याचे कारण असे की, अहिरीचे धान भरडायला द्यावयाचे असेल तर ते जवळच्या राईस मिल वर न देता लांब अंतरावरच्या 170 कि.मी. अंतरावर असलेल्या वडशाच्या राईस मिलवर दिले जाते. सामोसीचे धान गोंदियाला दिले जाते म्हणजे वाहतुकीवरील खर्च जाणूनबुजून वाढविला जातो. म्हणून माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, वाहतुकीवर होणाऱ्या खर्चाकडे लक्ष देण्यात यावे तसेच हा खर्च तपासण्यात यावा. मागच्या वर्षी पूर नियंत्रणावर 259 कोटी रुपये कसे खर्च झाले.? हा सुध्दा महत्वाचा विषय आहे. दोन हजार कोटी रुपयापैकी 800 कोटी रुपये या दोन विषयावर खर्च होतात आणि 1200 कोटी रुपये बाकीच्या दहा विषयावर खर्च होतात. कृषिवर तीन कोटी रुपये खर्च झालेले आहेत. ज्यावर खर्च करावयास पाहिजे त्यावर खर्च केला जात नाही. सभापती महोदय. खावटी कर्ज हा महत्वाचा विषय आहे. ग्रामीण भागामध्ये आदिवासी क्षेत्रामध्ये एकात्मिक आदिवासी विकास महामंडळा मार्फत धान्य खरेदी करण्यात येते.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

ही खरेदी एवढयासाठी करता की, व्यापारी धान्य लुटतात म्हणून व्यापाऱ्यांना खरेदी करु द्यावयाचे नाही. एकात्मिक ग्रामीण आदिवासी विकास महामंडळच खर्च करील. महामंडळ खरेदी करते तेव्हा हमी भावाने 850 रुपये प्रती क्विंटल या दराने खरेदी करते. दुर्दैवाची गोष्ट अशी की, फेब्रुवारी महिन्यात आदिवासींकडून माल खरेदी केलेला असताना त्यांचे अद्याप पैसे दिलेले नाहीत. आता लावणी करण्याचे दिवस आहेत. आदिवासी श्रीमंत नाहीत, ते व्यापारी आहेत की ठेकेदार आहेत ? कमी दराने विकत घेतलेल्या धानाचे पैसही मिळालेले नाहीत. त्यांच्याकडून धान घेताना 850 रुपये दराने घेतले जातात आणि त्यांना देताना मात्र 2000 रुपये दराने विकले जाते. म्हणजे आदिवासी विकास विभाग आदिवासींच्या कल्याणासाठी आहे की, आदिवासींना लुटण्यासाठी आहे, असा आमच्यासमोर प्रश्न आहे. एकटया गडचिरोली जिल्हयातील आदिवासींचे 50 लाख रुपये सरकारने द्यावयाचे आहेत. त्यांचे पैसे देण्याची व्यवस्था झालेली नाही.

सभापती महोदय, वसतिगृहातील जेवणाचे टेंडर निघालेले नाही. जून महिन्यामध्ये शाळा सुरु झाल्या आहेत, आता जुलै महिना संपत आला आहे. परंतु अद्याप टेंडर न निघाल्यामुळे त्या मुलांवर उपाशी राहण्याची वेळ आलेली आहे. हे काम तर शासनाने प्रथम केले पाहिजे. ज्या गोष्टी प्रथम केल्या पाहिजेत त्याकडे शासनाचे लक्ष नाही. हे टेंडर का काढले जात नाही ते समजत नाही. हे टेंडर आयुक्तांकडे गेले आहे असे सांगितले जाते. ते टेंडर मंजूर करण्यासाठीही आयुक्तांकडे वेळ नाही ? आदिवासी मुलांविरुध्द हे षडयंत्र रचलेले आहे का ? शासनाने हे टेंडर ताबडतोब मंजूर करावे आणि त्या मुलांना न्याय द्यावा. गडचिरोली जिल्हयाचे शासनाने 50 लाख रुपये द्यावयाचे आहेत ते ताबडतोब देण्याची व्यवस्था करावी अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, माननीय पंतप्रधान यांचे देशातील सर्व मुलांना 100 टक्के शिक्षण देण्याचे स्वप्न आहे. या मुलांना शिक्षण द्यावयाचे असेल तर प्रथम राज्यातील सर्व गावे रस्त्याने जोडलेली पाहिजेत. दुर्गम भागामध्ये रस्ते नाहीत, अंगणवाडया नाहीत, पाणी नाही. ती माणसे माणूस म्हणून नाही तर जनावरासारखी जगत आहेत. त्याठिकाणी कोणतेही अधिकारी जात नाहीत. त्यांना रेशनवर धान्य मिळत नाही अशा परिस्थितीत ते जीवन जगत आहेत. अशा परिस्थितीत





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

100 टक्के मुलांना शिक्षण देण्याचे स्वप्न कसे पूर्ण होणार ते सांगावे. महाराष्ट्राचा सुवर्ण जयंती महोत्सव साजरा करण्यासाठी मोठमोठी पोस्टर्स लावली आहेत त्यासाठी मोठया प्रमाणात खर्च केला जात आहे, परंतु या आदिवासींचे शासन पैसे देत नाही. त्यांच्या विकासाचे पैसे देत नाही. शासनाने विमानतळ बांधण्याचा कार्यक्रम मोठया प्रमाणात हाती घेतला आहे. परंतु हे श्रीमंत लोकांचे चोचले आहेत. श्रीमंतांचे चोचले पुरविण्यासाठी शासनाकडे पैसा आहे, परंतु आदिवासी भागात रस्ता नाही, एस.टी.सुरु करण्यासाठी शासनाकडे पैसा नाही. स्वातंत्र्य मिळून 63 वर्षानंतरही ही परिस्थिती असेल तर त्याचाही विचार केला पाहिजे.

आदिवासी भागातील आश्रमशाळांमध्ये 25 टक्के शिक्षकांची पदे रिक्त आहेत. दहावीमध्ये चांगल्या गुणांनी पास व्हावयाचे असेल तर आठवी, नववी व दहावीतील मुलांसाठी गणित, इंग्रजी व विज्ञान हे तीन विषय महत्वाचे असतात. परंतु मी आदिवासी विभागामध्ये फिरत असते तेव्हा ती मुले रडून सांगतात की, आम्हाला 3-3 वर्षे विज्ञान, गणित व इंग्रजी या विषयाचे शिक्षकच नाहीत. वास्तविक हे तिन्ही विषय महत्वाचे आहेत. जे विषय महत्वाचे आहेत त्याचे शिक्षक शासनाने दिले पाहिजेत. एवढे सुध्दा आदिवासी भागातील आश्रमशाळेतील मुलांसाठी शासनाने करु नये ? तेथील 25 टक्के शिक्षकांची पदे रिक्त असतील तर त्याचा पैसा कोठे जातो ? केवळ आदिवासींच्या नावाने बोर्ड लावले म्हणजे आदिवासींचा विकास होत नसतो. प्रत्यक्षात आदिवासी क्षेत्रात गेल्यावर ती मुले डोळयात पाणी आणून आम्हाला सांगत असतात ही वस्तुस्थिती आहे. कमीत कमी सर्व विषयांचे शिक्षक शासनाने भरले पाहिजेत.

सभापती महोदय, लाहेरी या अतिशय दुर्गम भागामध्ये मी गेले होते. त्याठिकाणच्या बिल्डिंगचे जुने दरवाजे काढून नवीन दरवाजे लावण्यात येणार आहेत. एक वर्ष झाल्यानंतरही त्या दरवाजांची ऑर्डर देता आली नाही ? एक वर्षापासून मुले व मुली उघडयावर झोपत आहेत. त्या मुलांचे हाल होत आहेत. त्या मुलांनी असे सांगितले की, एक वर्षापासून शासनाकडे दरवाजांची मागणी केलेली आहे. भाजीचे टेंडर मंजूर करण्याचे अधिकार प्रकल्प अधिका-यांना दिले पाहिजेत. परंतु ते टेंडर सुध्दा वर्षभर मंजूर होत नाही. भाजीचे टेंडर सुध्दा आयुक्तांकडे, शासनाकडे पाठविले जाते त्यामुळे मुलांना भाजी शिवाय जेवण दिले जाते.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

सभापती महोदय, मी एका आश्रमशाळेला भेट दिली असता तेथील डायनिंग हॉलमध्ये बक-या चरत असल्याचे मी पाहिले होते, बाथरुममध्ये कोंबडया पाहिल्या आहेत. त्या कोंबडया कोणाच्या, तर शिक्षकांच्या होत्या. कोंबडया बाथरुममध्ये असतील आणि जेवणाच्या खोलीत बक-या बांधल्या जात असतील तर तर ती मुले म्हणजे कोंबडया व बक-या आहेत का ?

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 15:05

(श्रीमती शोभा फडणवीस..

याचा कोठे तरी आपण विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, आश्रमशाळेतील मुला-मुलींना अंगाचा जो साबण दिला जातो तो कोणत्या कंपनीचा दिला जातो हे माननीय मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे. त्या साबणाला अजिबात फेस येत नाही उलट अंगाच्या कातडीला इजा होते. त्या साबणामध्ये रेतीचे बारीक बारीक कण असतात. तुम्ही आपल्या घरामध्ये चांगला साबण वापरता. मग आश्रमशाळेतील मुला-मुलींना देखील तशा प्रकारचा चांगला साबण वापरण्यासाठी द्या. तुमच्या मुला-मुलींप्रमाणेच ही आश्रमशाळेतील मुले-मुली आहेत, ती या राज्याचे आणि देशाचे उद्याचे भविष्य घडविणारी आहेत. सभापती महोदय, आश्रमशाळेतील मुलामुलींना शिक्षण घेताना आनंद वाटला पाहिजे अशा त-हेच्या सुविधा त्यांना दिल्या पाहिजेत आणि त्या देण्याची माणुसकी या विभागातील अधिका-यांना आणि मंत्री महोदयांना नसेल तर ते दुर्दैवच म्हणावे लागेल. या आदिवासींच्या नावाने आश्रमशाळा काढून अधिका-यांनी मोठे व्हायचे आणि आदिवासींच्या मुला-मुलींनी काय कुत्र्या-मांजरा सारखे जीवन जगायचे ? ही परिस्थिती बदलली पाहिजे. मी मेळघाट येथील रायपूरच्या आश्रमशाळेत गेले होते त्यावेळी तेथील मुलांना जेवणामध्ये भाजी देण्यात आली नव्हती. मी चौकशी केली त्यावेळी आदल्या दिवशी एक क्विंटल भाजी खरेदी करण्याचे रेकॉर्डवर दाखविण्यात आले होते. मग आदल्या दिवशी खरेदी केलेली एक क्विंटल भाजी गेली कुठे ? सभापती महोदय, एका आश्रमशाळेमध्ये संगणक दिले होते. आमच्या आदिवासी मुलांना संगणकाचे ज्ञान मिळेल,ती संगणक शिकतील याचा मला आनंद झाला. परंतु वस्तुस्थिती अशी होती की ज्या आश्रमशाळेमध्ये लाईट नाही, खोल्या नाहीत त्या आश्रमशाळेला संगणक दिले आणि शिक्षिकेला काम नसल्यामुळे तिला पगार दिला नाही. अशा त-हेने हे शासन आदिवासींची घोर फसवणूक करीत आहे.

सभापती महोदय, आणखी एक महत्वाची बाब मला आपल्या निदर्शनास आणावयाची आहे ती म्हणजे आदिवासी भागामध्ये कानडी प्रकल्प अधिकारी दिलेले आहेत. त्या अधिका-यांना मराठी येत नाही आणि हिंदी देखील येत नाही. आदिवासींना हिंदी थोडे फार समजते परंतु कानडी अजिबात समजत नाही. मग अशा प्रकारचे कानडी प्रकल्प अधिकारी आपण नेमले तर ते आदिवासींचा विकास कसा काय करणार ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

सभापती महोदय, एका गंभीर मुद्याकडे मी या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छिते. तो विषय म्हणजे आश्रमशाळेतील मुला-मुलींचे होणारे लैंगिक शोषण. एका प्रोजेक्ट आफिसरने एका 9 वर्षाच्या मुलाला गच्चीवर नेऊन त्याच्यावर अतिप्रसंग केला. केवळ मुलांवरच नाही तर मुलींवर देखील अतिप्रसंग केले जातात. आदिवासी आश्रमशाळेतील मुला-मुलींचे लैंगिक शोषण केले जात आहे. आश्रमशाळेतील मुलींच्या खोल्यांच्या दरवाजाला कड्या असल्या पाहिजेत असा नियम आहे. पण त्यांच्या खोल्यांच्या दरवाजाला कड्या नसतात. त्या मुली आपल्या पेट्या दरवाजाला लावून आपले संरक्षण करतात. मुलींच्या खोल्यांना कड्या का लावल्या जात नाहीत ? तुम्ही तुमच्या मुलींच्या संरक्षणाची जबाबदारी चोख बजावता ना, तर मग आदिवासींच्या मुली काय सडकेवर पडलेल्या आहेत काय ? आश्रमशाळेतील मुलींच्या संरक्षणाची जबाबदारी तुम्ही घेतली पाहिजे.

सभापती महोदय, 5 वर्षापूर्वी आदिवासी मुला-मुलींच्या होणा-या लैंगिक शोषणाच्या संदर्भात महिलांची एक कमिटी नेमली होती. त्यावेळी त्या कमिटीने 27 मुली आणि 17 मुलांच्या बाबतीत घडलेल्या अतिप्रसंगाच्या संदर्भात त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. पण त्यानंतर दुसरी कोणतीही कमिटी शासनाने होऊ दिली नाही आणि आश्रमशाळेत येऊ दिली नाही. याचा अर्थ काय ? अनेक आश्रमशाळेतील अधीक्षिकेची पदे रिक्त आहेत. चंद्रपूरच्या शासकीय आश्रमशाळेमध्ये अधीक्षिका नाहीत. तेथे कामाठी असतो. तो रात्री मुलींचे कसले संरक्षण करणार ? कुंपणच शेत खाते अशी परिस्थिती आहे. शिक्षणाची आवड असल्यामुळे त्या मुली घरी सांगू शकत नाहीत. अशा प्रकारे मुंलीचे शोषण होत असेल तर ती अतिशय गंभीर बाब आहे.

सभापती महोदय, या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा वांझोटी होऊ नये, आदिवासींना, त्यांच्या मुला-मुलींना या चर्चेच्या माध्यमातून न्याय मिळेल, त्यांचा विकास होईल अशी अपेक्षा मी व्यक्त करते. केवळ "बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल" असे म्हणत विठ्ठलाचे दर्शन घेण्या पेक्षा आदिवासींच्या गरीब मुलांना न्याय दिला तर ती विठ्ठलाची श्रेष्ठ भक्ती होईल एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

---

...नंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**हिंदकेसरी मारुती माने यांच्या दु:खद निधनाबाबत**

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : महाराष्ट्राचे आणि देशाचे नामवंत कुस्तीगिर श्री.मारुती माने यांनी ऑलम्पिकमध्ये खेळून देशपातळीवर आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्र राज्याचे नाव कोरलेले आहे. ते आज आपल्यामध्ये नाहीत. सभागृहामध्ये कालच त्यांच्या औषधोपचाराचा खर्च शासनाने द्यावा या संदर्भातील मुद्दा मांडण्यात आला होता. परंतु दुर्दैवाने आज सकाळी त्यांचे निधन झालेले आहे. त्यांच्या निधनाबाबत सभागृह तीव्र दु:ख व्यक्त करीत आहे. सभागृहातील दोन्ही बाजूच्या सदस्यांच्या भावना त्यांच्या कुटुंबियांना कळविण्यात येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

----

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:**आदिवासींचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी शासनास आलेले अपयश

**मु.शी.:** आदिवासींचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी शासनास आलेले अपयश यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, परशुराम उपरकर, केशवराव मानकर यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, प्रस्तावावर झालेल्या चर्चेबद्दलचे उत्तराचे भाषण सुरु होण्यापूर्वी सभागृहाच्या वतीने हिंदकेसरी मारुती माने यांना श्रध्दांजली वाहण्यात आली ही महत्वाची गोष्ट आहे. आमचे ते श्रध्दास्थान होते.

सभापती महोदय, राज्यातील आदिवासी समाज दुर्लक्षित आहे, किंबहुना या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या अनुषंगाने जी चर्चा झाली त्या निमित्ताने माननीय विरोधी पक्षनेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी आदिवासींच्या विकासाकडे शासनाचे लक्ष वेधले त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. महाराष्ट्रामध्ये आदिवासींची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ८५.७७ लाख इतकी असून एकूण लोकसंख्येच्या मानाने हे प्रमाण ८.८५ टक्के म्हणजे ९ टक्क्याच्या आसपास आहे. शासनाने सुकथनकर समिती नेमली होती. त्या समितीच्या शिफारशीप्रमाणे आदिवासी विकासासाठी स्वतंत्र बजेट देण्याचे काम तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय श्री.शरद पवार यांनी केले. त्याप्रमाणे आदिवासी विकास विभागाला स्वतंत्र बजेटची व्यवस्था करण्यात येत आहे. त्या बजेटप्रमाणे या राज्यात काम होत आहे ही वस्तुस्थिती आहे. स्वतंत्र बजेटची तरतूद करताना हीच अपेक्षा होती की, आदिवासी समाजाला शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा पुरविण्याबरोबरच त्यांना मूळ प्रवाहात आणायचे. त्यासाठी जे जे आवश्यक आहे ते करण्यासाठी निधीची कमतरता भासू नये आणि जास्तीत जास्त निधी खर्च करुन या जंगलामध्ये राहणाऱ्या आदिवासी समाजाला मूळ प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

आदिवासी समाजाच्या एकूण ४५ जाती आहेत. त्यामध्ये कोलाम, कातकरी आणि बडा माडिया या तीन आदिम जमाती आहेत. महाराष्ट्र हे पुढारलेले राज्य

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते........

आहे असे म्हटले जाते. या राज्यात सुध्दा आदिम लोक वास्तव्य करीत आहेत. बडा माडिया जमातीचे लोक झाडावर राहतात. कातकरी जमातीच्या लोकाच्या फक्त कमरेवर वस्त्र असते तर कोलाम जमातीचे लोक फारच छोट्या घरात राहतात ही वस्तुस्थिती आहे. या सर्व जमातीच्या लोकांना मूळ प्रवाहात आणण्यासाठी स्वतंत्र बजेट देण्याचा निर्णय झाल्यानंतर या समाजाची किती प्रगती झाली याचे सिंहावलोकन करण्याची वेळ आलेली आहे. या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने हा आदिवासी समाजाच्या विकासाचा प्रश्न आहे हे लक्षात आले हे महत्वाचे आहे. या समाजाकडे अधिक लक्ष द्यावे लागेल, त्यादृष्टीने प्रक्रिया सुरु आहे. परंतु प्रत्यक्षात काय झाले आहे? आदिवासी विकास विभागाकडे स्वतंत्र यंत्रणा नाही. त्यामुळे या समाजाला वर आणण्यासाठी या विभागाला 'वाटप डिपार्टमेंट' असे स्वरुप प्राप्त झालेले आहे.

माझ्याकडे या विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली त्यावेळी मी आमच्या पक्षाच्या नेत्यांना सांगितले होते की, माझा आणि आदिवासींचा काय संबंध आहे? संबंध आहे म्हणूनच तुमच्याकडे या खात्याची जबाबदारी देण्यात येत आहे असे मला सांगितले गेले. मी या खात्याच्या कारभारामध्ये लक्ष घालण्यास सुरुवात केली तेव्हा लक्षात आले की, मागील तीन वर्षात या खात्याकडून कोणकोणत्या विभागाला किती निधी देण्यात आलेला आहे. २००८-०९, २००९-१० आणि २०१०-११ या तीन वर्षात कृषि विभागाला अनुक्रमे ६९ कोटी रुपये, ७१ कोटी रुपये आणि यावर्षी ९४.५ कोटी रुपये देण्यात आले. ग्रामविकास विभागाला अनुक्रमे ५४४ कोटी रुपये, १९३.८५ कोटी रुपये आणि घरकुलाच्या योजनेसाठी २८५.४६ कोटी रुपये देण्यात आले. विशेष कृति कार्यक्रमासाठी ३० कोटी रुपये देण्यात आले. पाटबंधारे विभागाला अनुक्रमे २५५.९३ कोटी रुपये, गेल्या वर्षी २६७ कोटी रुपये आणि यावर्षी १५५ कोटी रुपये दिले असून आणखी १०० कोटी रुपये द्यायचे आहेत. विद्युत विकासासाठी २००८-०९ मध्ये ३७ कोटी रुपये, २००९-१० मध्ये ६३.५ कोटी रुपये दिले.

नंतर २ओ.१...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते .....

ग्रामीण भागात सुधारणा करण्यासाठी भरीव तरतूद केली असून त्या प्रमाणात निधी दिलेला आहे. दळणवळण विभागासाठी देखील आम्ही तरतूद केली आहे. त्यातून या भागातील रस्ते, पूल बांधणे यासाठी सन 2008-09 मध्ये 573.30 कोटीची तरतूद केली होती, मागील वर्षी ही तरतूद 435 कोटी एवढी होती, यावर्षी सुध्दा तेवढाच खर्च होणार आहे. आरोग्य सेवेसाठी आपण 140-150 कोटी रुपये देत आहोत. उरलेल्या पैशांमध्ये 60:40 चा रेश्यो तयार असून त्यातील 60 टक्के रक्कम जिल्हाधिकाऱ्यांकडे दिली जाईल व त्यातून टीएसपी वर खर्च करावयाचा आहे. उर्वरित रकमेत बाकीची इतर कामे त्यात गणवेश व इतर सुधारणा करण्यासाठी हा खर्च करावयाचा असतो. एवढा निधी आपण देत असताना त्यातून कामे होतात की नाही, त्याच कामासाठी हा पैसा खर्च होतो की नाही याचे ऑब्झर्व्हेशन करण्याचे अधिकार मात्र आमच्या विभागाला बिलकूल नाही. समजा रस्त्याच्या कामासाठी निधी दिला तर त्यातून बिगर आदिवासी विभागाकडून रस्त्याचे काम सुरु होते आणि आदिवासी भाग असलेल्या ठिकाणापर्यंत, शिवपर्यंत सोडून दिले जाते पण त्यावर आमचे नियंत्रण नसते. असे असतानाही अधिकाऱ्यांची मानसिकता आम्हाला कबूल करायला पाहिजे. पाटबंधारेच्या संदर्भात बोलत असताना लघु पाटबंधाऱ्यासाठी आम्ही पैसे दिले असता नाशिकला जी समिती पाहणी करण्यासाठी गेली होती त्या समितीने अहवाल दिला की लघु पाटबंधाऱ्याच्या अंतर्गत जो निधी दिला होता त्यातून अत्यंत निकृष्ठ दर्जाची कामे झाली आहेत, त्या बंधाऱ्यांमध्ये पाणीच साठले नाही, ही वस्तुस्थिती आहे. याबाबत शासनाने चौकशी करण्याचे ठरविले आहे.........

श्री. जयंत प्र.पाटील : मंत्री महोदय सभागृहात जे उत्तर देत आहेत ते चुकीचे आहे. कारण आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी भागातील कामे करण्यासाठी जो निधी दिला जातो तो खर्च होतो की नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी याच विभागाची आहे. बिगर आदिवासी विभागातून रस्त्यांची सुरुवात होते आणि आदिवासी भागापर्यंत नेऊन सोडतात अशी परिस्थिती आहे तर आपल्या विभागाचे अधिकारी काय करतात, त्यांच्यावर कारवाई का होत नाही हा महत्वाचा भाग आहे, म्हणून मंत्री महोदयांनी अशा प्रकारचे उत्तर देणे ही योग्य नाही.

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, खरोखरच आमच्या विभागाला हा अधिकार नाही आणि तो मिळावा हीच आमची मागणी आहे. कारण निधीचे वाटप केल्यानंतर तो खर्च होतो की नाही हे पाहण्याचा अधिकार आम्हाला नसतो त्यादृष्टीनेच सुधारणा करण्याची आमची तयारी आहे. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांना मी भेटलो, मंत्रिमंडळाच्या बैठकीतही चर्चा केली आहे की आमच्या विभागाकडून पैसे दिल्यानंतर त्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार आम्हाला मिळावा याचा विचार करणे आवश्यक आहे.

श्री. राम पंडागळे : महोदय, आदिवासींची परिस्थिती राज्यात अत्यंत वाईट असताना देखील मंत्री महोदय जे उत्तर देत आहेत त्यात त्यांची उदासीनताच दिसून येत आहे. आदिवासींचे या राज्यात संरक्षण केले जात नाही आणि माननीय मंत्री सांगत आहेत की आमच्या विभागाला या खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे काहीच अधिकार नाहीत.

श्री. बबनराव पाचपुते : जास्त माहिती देणे चुकीचे वाटत असेल तर मी माहिती कमी करतो. एका बाजूला आदिवासी सुधारला पाहिजे, त्याची शैक्षणिक उन्नती झाली पाहिजे, त्याच्या राहणीमानाचा स्तर उंचावला पाहिजे, दरडोई उत्पन्न वाढले पाहिजे यासाठी काय उपाययोजना करणे आवश्यक आहे हे सांगितले जात नाही. पण आदिवासी भागात काय काय नाही हे सांगण्यात येते. म्हणून त्यांच्या सुधारणांबाबतच्या उपाययोजना सुचविल्या तर बरे होईल. कारण त्या अनुषंगाने शासन प्रयत्न करु शकते. यापूर्वीच्या मंत्र्यांनी काय केले या वादात मी जाऊ इच्छित नाही, कारण मला राजकारण करावयाचे नाही. म्हणून पूर्वीचे मंत्री कोण होते हे काढण्यापेक्षा मला करावयाचे ते मी करणार आहे....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

सभापती महोदय, आदिवासींसाठी शासनाने कन्यादान योजना सुरु केलेली आहे. आदिवासी समाजामध्ये ब-याच ठिक्‍ाणी साखरपुडा होतो, मुले होतात व नंतर त्यांचे लग्न होत असते. मुलाचे लग्न झाले म्हणजे वडिलांचे लग्न लवकर होईल अशी आदिवासी समाजामध्ये प्रथा आहे. त्यामुळे ज्यांना मुले झालेली आहे परंतु त्यांचे लग्न झालेले नाही अशांचा सुध्दा आपण कन्यादान योजनेत समावेश केला आहे. व त्यासाठी 15000 रुपयांचे पॅकेज दिलेले असून त्यासंदर्भात नवीन जीआर सुध्दा काढलेला आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी आदिवासी आश्रमशाळेच्या जमिनीच्या संदर्भात विचार व्यक्त केलेले आहेत. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, अनेक आश्रमगृहाला तसेच वसतिगृहाला जागा नाही ही वस्तुस्थिती आहे. आदिवासींच्या आश्रमशाळा तसेच वसतिगृहाला लागणा-या जमिनीसाठी आपण स्वतंत्र जीआर काढला असून जागा खरेदी करावयाची असेल तर रेडीरेकनरपेक्षा 20 टक्क्यापर्यंत जास्त दराने खरेदी करण्याची परवानगी पीओला दिलेली आहे. 20 टक्क्यापेक्षा जास्त दराने जागा खरेदी करावयाची असेल तर उपायुक्तांना परवानगी देण्यात आलेली आहे. त्यापेक्षाही जास्त दराने म्हणजे रेडीरेकनरपेक्षा डबल दराने जमीन खरेदी करावयाची असेल तर आयुक्तांना त्यासंदर्भात परवानगी देण्यात आलेली आहे. त्यापेक्षाही जास्त दराने जमिनीची खरेदी करावयाची असेल तर त्यासाठी मंत्रालयातून परवानगी दिली जाते. ही पध्दत सुरु झाल्यामुळे राज्यात आदिवासी आश्रमशाळा तसेच वसतिगृहांना आता जमिनी उपलब्ध होऊ लागल्या आहेत.

सभापती महोदय, आदिवासी मुलांना इंग्रजी शाळेमध्ये शिक्षण मिळावे यासाठी केंद्रसरकारने यासंदर्भात 36 कोटी रुपये दिले असून आपल्याला 66 तालुक्यांमध्ये एक एक इंग्रजी शाळा सुरु करावयाची आहे. तसेच अकरावी व बारावीची वसतीगृहे जिल्हयाच्या ठिकाणी सुरु केली जाणार आहे.

सभापती महोदय, आदिवासी आश्रमशाळेतील गळीतचे प्रमाण अडीच ते तीन टक्के आहे. आश्रमशाळेच्या बाहेर हेच गळतीचे प्रमाण 43 टक्के आहे. गळतीचे प्रमाण थांबविण्याची कारणे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

सुध्दा आम्ही शोधलेली आहेत. गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी सुवर्ण जयंती वर्षानिमित्त शिष्यवृत्त्ी योजना सुरु केलेली आहे. आई वडीलांनी आपल्या मुलाला जर इ.4 थी पर्यंत शाळेत घातले तर 1000 रुपये शिष्यवृत्ती दिली जाते, पाचवी ते सातवीपर्यंत मुलाला शिकवले तर दीड हजार रुपये व आठवी ते दहावी पर्यंत शिकवले जात असेल तर त्या मुलाच्या वडीलांना 2000 रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तीमुळे निश्तिपणे गळतीचे प्रमाण कमी होईल. गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी शिक्षकांनाही आदेश दिलेले आहे. जर मुलगा शाळेत 7 दिवस आला नाही तर त्या शिक्षकाने मुलाच्या घरी जाऊन त्याचे कारण शोधले पाहिजे आणि 10 दिवसाच्या वर मुलगा शाळेत आला नाही तर हेडमास्तरांनी घरी जाऊन चौकशी केली पाहिजे असा निर्णय घेतल्यामुळे गळतीचे प्रमाण कमी होत आहे. सर्वशिक्षा अभियानात यावर्षी 30 हजार मुले जास्त आलेली आहेत.

सभापती महोदय, खावटी कर्जाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. आतापर्यंत आपण खावटी कर्ज 2 लक्ष रु.देत होतो परंतु यामध्ये वाढ करुन आता खावटी कर्ज 4 लाख रुपये देत आहोत. आतापर्यंत साधारणत: 79 टक्क्याचे खावटी कर्ज वाटप झालेले आहे. येत्या 10-12 दिवसात खावटी कर्जाचे पूर्ण वाटप केले जाणार आहे.

सभापती महोदय, अनेक ठिकाणी वीज नाही ही वस्तुस्थिती आहे. ज्या ठिकाणी वीज नाही त्या ठिकाणी विजेचा पुरवठा सोलार आणि विंड वरुन देता येईल का याची पाहणी केली व हा प्रयोग यशस्वी झाला. यासाठी केंद्राकडून 75 टक्के व आपल्याला केवळ 25 टक्के द्यावयाचे आहे. या योजनेमुळे गेल्या दोन तीन वर्षात महाराष्ट्रातील एकही गाव अंधारात राहणार नाही हे मी या ठिकाणी सांगू इच्छितो. या केंद्राला केंद्रशासनाने मान्यता देखील दिलेली आहे. सौर कंदील उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात सुध्दा आम्ही पुढाकार घेतलेला आहे. विद्यार्थ्यांच्या गणवेशाच्या संदर्भात 35 कोटी रुपयांची खरेदी झालेली आहे. 35 कोटी रुपयांची खरेदी निविदा न काढता झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे. आतापर्यंत आपल्याला 9 टक्के रक्कम मिळालेली आहे परंतु

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

ही रक्कम थोडी थोडी लॅप्स होऊन आतापर्यंत 8 हजार कोटी रुपये परत गेलेले आहेत. परंतु यावर्षी आपण हे पैसे लॅप्स होऊ दिले नाहीत. गणवेशाचे कापड, बोर्डिंग साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे. या वस्तू आपण आरसीच्या रेटनुसारच खरेदी केल्या असून बाकीची खरेदी केली नाही ही वस्तुस्थिती आहे. ही खरेदी केली नसती तर हे पैसे लॅप्स झाले असते व त्यासाठी आपल्याला दुस-या माध्यमातून पैसे उभे करावे लागले असते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते...

मधल्या काळातील गणवेशाचे वाटप शिलाईमुळे राहिले आहे. यात कापड खरेदीचे आर.सी.चुकीचे झाले होते. 9 कोटी 28 लाख रूपये एवढी किंमत असताना आपल्याला 14 कोटी रूपये द्यावे लागले असते. म्हणजे जवळ जवळ साडे पाच कोटी रूपये जास्त द्यावे लागले असते. मी येथे असेही सांगू इच्छितो की, असा प्रकार करणारे जे कोणी आहेत त्यांना प्रतिबंध करण्याचे काम आम्ही निश्चितपणे करणार आहोत. एवढेच नव्हे तर आता आम्ही रस्ते, पाटबंधारे यासाठी जादा निधी देत आहोत. याबाबत माननीय उप मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून ज्यावेळी निविदा निघतात त्यावेळी आम्हाला कळविले पाहिजे असे मी सांगणार आहे. जो पर्यंत आम्हाला कळविण्यात येणार नाही तो पर्यंत आम्ही बिलाला मान्यता देणार नाही अशा प्रकारची भूमिका घेणार आहोत.

आज आपल्या राज्यात अनुदानित, विनाअनुदानित अशा मिळून 1100 आश्रमशाळा आहेत. यात किती मुले हजर असतात, किती शिक्षक हजर असतात हे पाहिले पाहिजे. हा विषय गंभीर आहे. मी वन मंत्री असताना सहा शाळांना भेट दिली होती. ज्यावेळी मी शिक्षकाला दम मारून विचारले असता त्याने मी खरा शिक्षक नाही, मी बदली शिक्षक आहे असे सांगितले. मी तपासणी केली त्यावेळी 11 मुले शाळेत हजर होती. जेव्हा मी अमरावतीला गेलो त्यावेळी त्या शाळेतील शिक्षक त्याच्या घरी टी.व्ही.बघत होता. त्यावेळी त्या शिक्षकाने सांगितले की, शाळेत 68 मुले हजर होती. वन परिसरामध्ये शाळा असल्यामुळे तो शिक्षक त्याच्या बदली दुसऱ्या शिक्षकाला पाठवत होता. त्यामुळे मुलांच्या व शिक्षकांच्या हजेरीसाठी बोटाचे ठसे दर्शविणारे यंत्र बसविण्याचा निर्णय घेतला. अनुदानित शाळांचे अनुदान वाढविण्यासंबंधी देखील मागणी करण्यात येते. त्यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, पटसंख्येनुसार अनुदान न देता हजेरी नुसार आता अनुदान द्यावे लागेल. शिक्षकांना दिवसातून 3 वेळा हजेरी नोंदवावी लागेल, तर विद्यार्थ्यांना 5 वेळा हजेरी नोंदविण्याचा कार्यक्रम आपण करीत आहोत. यामध्ये फायदा होणार आहे. आश्रमशाळेची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी 15 दिवसांचा कार्यक्रम हाती घेतली आहे. पुण्याच्या यशदा संस्थेकडून प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम आम्ही आखलेला आहे. विद्यार्थ्यांमध्ये सुधारणा होण्यासाठी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते...

उच्च न्यायालयामध्ये पी.एल.दाखल करण्यात आली होती. त्यानुसार आयोग नेमला आहे. तत्संबंधीचा अहवाल आल्यानंतर त्यात ज्या काही सुधारणा सुचविल्या असतील त्या सुधारण्याचा निश्चित प्रयत्न करण्यात येणार आहे. यात देखील फायदा होऊ शकतो.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी स्त्री अधीक्षिका व वॉचमन नेमण्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. स्त्री अधीक्षिका व वॉचमन नेमण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. राहिलेल्या शाळांसंबंधी आम्ही लवकरच निर्णय घेणार आहोत. पूर्वी विद्यार्थ्यांना जानेवारी महिन्यामध्ये गणवेश मिळत होते. पण आता आम्ही 2 गणवेश देण्याचे ठरविले असून 15 ऑगस्ट पूर्वी विद्यार्थ्यांना गणवेश मिळणार आहेत. तसेच दिवाळीपर्यंत नाईट ड्रेस देण्याचा देखील निर्णय घेतला आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते..

गोंडवाना विद्यापीठ सुरु करुन त्यास 25 कोटी रुपये दिलेले आहेत. सैनिकी शाळांमधील विद्यार्थ्यांना 20 हजार रुपये अनुदान देण्यात येत होते ते आता 50 हजार रुपयांपर्यंत दिलेले आहे. एकूण 2500 विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळत आहे.

आश्रमशाळा अद्ययावत करण्यासाठी एक सल्लागार समिती नेमली असून या समितीने केलेल्या सूचना ताबडतोब अमलात आणल्या जातील. आदिवासी मुलांना उच्च दर्जाचे इंग्रजी शिक्षण मिळावे यासाठी 64 तालुक्यांमध्ये इग्रंजी शाळा व 16 तालुक्यांमध्ये ज्युनिअर कॉलेज काढण्याचा निर्णय घेतलेला आहे. आपल्या या योजनेस केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. आश्रमशाळेतील शिक्षकांना नामांकित संस्थेतून प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम सुरु केलेला आहे. आदिवासी जात पडताळणी समितीचे बळकटीकरण करण्यासाठी एक तीन दिवसांची कार्यशाळा घेतलेली आहे. त्या कार्यालयाचे संगणकीकरण करणे, त्यांना स्टाफ देणे आणि निधी उपलब्ध करुन देणे इत्यादी निर्णय घेतलेले आहेत. अधिकाऱ्यांनी चुका केल्या असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, प्रसंगी त्यांची बदली किंवा त्यांना बडतर्फही करण्यात येईल.

जे विद्यार्थी शाळा सोडून गेले आहेत त्यांना परत बोलावून त्यांना व्यावसायिक शिक्षण देण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेला आहे. आठवी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी छोटे छोटे कोर्स सुरु करुन त्यांना आय.टी.आय.मध्ये संधी देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

आदिवासींना त्यांच्या वन जमिनी परत मिळाल्या पाहिजेत. आदिवासींना त्यांच्या जमिनी परत मिळण्याचे प्रमाण खूप कमी होते. आता आम्ही मोठ्या प्रमाणावर हे काम घेतले असून 15 ऑगस्ट पर्यंत हे काम पूर्ण होईल. आदिवासींना त्यांच्या अधिकाराच्या जमिनी देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

आदिवासींना वनउपजाच्या आधारावर तेंदू पत्त्याचे पैसे द्यावयास लागलो आहोत. बाकीची कामे देखील तातडीने करावयाची आहेत त्याबाबत काही अडचण असेल तर ती दूर केली जाईल.

घरकुल योजने अंतर्गत 6 लाख आदिवासींना घरे द्यावयाची आहेत. आपण दरवर्षी सात-आठ हजार आदिवासींना घरे दिली तरी सर्व आदिवासींना घरे देण्यासाठी जवळपास 70 वर्षे लागतील. यावर तोडगा काढण्यासाठी शासनाने लिडकॉम संस्थेबरोबर करार करण्याचा विचार सुरु

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते..

आहे. घरांसाठी लागणारे सहा-सात हजार कोटी रुपये जागतिक बँकेकडून किंवा अन्य बँकेकडून घेऊन तीन वर्षात सर्व आदिवासींना घरे उपलब्ध करुन देण्याची महत्वाकांक्षी योजना राबवित आहोत. (अडथळा) आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला तर मी सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकेन. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या प्रश्नाचे उत्तर मला आता देता आले नाही तर मी आपणास लेखी उत्तर देईन..

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आतापर्यंत सर्व विद्यार्थ्यांना गणवेश आणि पुस्तके दिलेली आहेत. समोरच्यांना प्रश्न सोडवायचे नाहीत तर प्रश्न वाढवावयाचे आहेत. जी चांगली कामे आहेत त्याविषयी बोलायचे नाही ,फक्त आरडाओरड करुन आम्ही काही तरी करतो.. आम्हालाच फक्त आदिवासींची काळजी आहे असे दाखवावयाचे. त्यांना विकास नको आहे. ज्यांनी चुकीची कामे केली त्यांच्यावर कारवाई केलेली आहे तर काही शाळा रद्द केलेल्या आहेत. पैसे मिळविण्याचा व्यवसाय बंद केलेला आहे. आम्ही पुस्तक आणि गणवेशाचे वाटप केलेले आहे. आम्ही कुठेही मागे राहिलेलो नाही. सुधारणांच्या संदर्भातील काही सूचना असतील तर त्याचा जरुर विचार करु.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, आदिवासी विकास मंत्र्यांना मला असे विचारावयाचे आहे की, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना किडे आणि अळ्या पडलेले जेवण दिले जाते त्यामध्ये सुधारणा करण्यात येईल काय ?

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य घोषणा देत बहिर्गमन करतात)

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )**: सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

------

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कोकण विकासासाकडे शासनाचे सातत्याने झालेले दुर्लक्ष

**मु.शी.**: कोकण विकासासाकडे शासनाचे सातत्याने झालेले दुर्लक्ष या विषयावर ॲड.गुरुनाथ कुलकर्णी, सर्वश्री हुसेन दलवाई, अनिल तटकरे, विजय सावंत, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री राजन तेली, जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला.)

**तालिका सभापती** : कोकणच्या प्रस्तावावरील अपूर्ण राहिलेली चर्चा आता सुरु होत आहे. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे ऑन लेग आहेत. ते आपल्या भाषणास सुरुवात करतील.

भाई जगताप : सभापती महोदय, कोकणावरील चर्चेस दुपारी 3.00 वाजता सुरुवात होणार होती. परंतु ही चर्चा 3.00 वाजता सुरु झाली नाही, तेव्हा आम्हाला कोकणच्या चर्चेसाठी वेळ वाढवून देण्यात यावा अशी विनंती आहे.

**तालिका सभापती** : आपण कोकणासाठी भरपूर वेळ देऊ.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश् बिनसाळे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, कोकणाच्या विकासाच्या संदर्भात एका महत्वाच्या विषयावर या ठिकाणी चर्चा करण्यात येत आहे.त्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय,काल पर्यटनाच्या संदर्भात बोलत असतांना मी असे सांगितले होते की, कोकणाच्या विकासासाठी शासनाने चार सूत्री कार्यक्रम ठरविलेला आहे. कोकणामध्ये जर पर्यटनाचा विकास करावयाचा असेल तर ख-या अर्थाने सरकारच्या वतीने कोणत्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे याचा विचार करण्याची वेळ आली आहे. रस्ते, पाणी,वीज या सारख्या ज्या मूलभूत सुविधा पर्यटनाच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहेत त्या सुविधा तातडीने कोकणामध्ये उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगायाचे आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये जाण्यासाठी प्रवासाचा जो वेळ आहे तो जेव्हा कमी होईल त्याच वेळी कोकणातील पर्यटन वाढू शकेल. तेव्हा हा वेळ कमीत कमी कसा करता येईल या दृष्टीने शासनाने काही पावले उचलली तरच कोकणामध्ये पर्यटनामध्ये वाढ. होऊ शकेल. रत्नागिरी येथे बोटी तयार करण्याच्या दृष्टीने शासनाकडून काही प्रयत्न करण्यात येणार आहे किंवा नाही त्याचबरोबर त्या ठिकाणी सर्व प्रकारची विमाने उतरण्याची व्यवस्था होणार आहे किंवा नाही .? ही कामे जर राज्य शासनाने केली तर कोकणातील पर्यटनाच्या वाढीला मोठा हातभार लागेल. सिंधुदुर्ग मधील चिचीच्या विमानतळाचे काम वेगाने सुरु करण्यात आले तर सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पर्यटन वाढीस लागणार आहे.सभापती महोदय, गेल्या अनेक वर्षापासून आम्ही सतत ऐकत आहोत की मुंबईहून शिवडी -न्हावा -शेवा असा पूल तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे कोकणात
जाणा-या माणसाचा प्रवासाचा जवळजवळ दीड ते दोन तासाचा वेळ वाचणार आहे. त्यामुळे रत्नागिरी, दापोली हा भाग दोन ते अडीच तासांनी अधिक जवळ येणार आहे . त्याचबरोबर कशेळी घाटामध्ये बोगदा करण्यात येणार आहे असे आम्हाला या पूर्वी सांगण्यात आले होते. त्यावेळी मी जरी सभागृहात सदस्य म्हणून नसलो तरी सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य माझे मित्र आहेत . कशेळी घाटातून बोगदा करण्यात येणार असून या कामाला लवकरच सुरुवात होणार आहे असे ते मला सांगत होते.या कामाचे सर्व्हेक्षण झालेले आहे परंतु या कामामध्ये प्रगती झाली असल्याचे आज तरी दिसून येत नाही. सभापती महोदय, कोकणात जाण्यासाठी आज जो प्रवासाला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे ....

वेळ लागतो तो वेळ कशा प्रकारे कमी करण्यात येणार आहे याचा विचार होणे गरजेचे आहे. कोकणामधून कोकण रेल्वे गेली आहे. त्यामुळे प्रवासाचा वेळ काही प्रमाणात निश्चितपणे कमी झाला आहे.परंतु सागरी मार्गाचा जर योग्य पध्दतीने वापर केला तर अधिक बरे होईल असे मला सांगावयाचे आहे या पूर्वी दमानिया शिपींग कॉर्पोरेशनची स्पीड बोट होती आणि साडे तीन तासामध्ये ती बोट रत्नागिरीला पोहोचत होती. अशा प्रकारच्या सुविधा आणखी वाढविण्यासाठी सरकारने निर्णय घेणे आवश्यक आहे. पर्यटनाचा विकास होण्याच्या दृष्टीने ज्या काही मुलभूत सुविधा देण्याची आवश्यकता आहे ती सरकारने तातडीने दिली पाहिजे. पर्यटनाच्या विकासाकरिता केवळ हॅाटेल्स बांधण्याची गरज नाही. हॅाटेल्स बांधण्याचे काम अनेक खाजगी कंपन्या करण्यास तयार आहेत परंतु पर्यटनाच्या दृष्टीने ज्या मूलभूत सुविधा आवश्यक आहेत त्या सुविधा राज्य सरकारने त्वरित द्यावयास पाहिजे. असे मला या चर्चेच्या निमित्ताने शासनाला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे.कोकणातील जे समुद्र किनारे आहेत ते अधिक सेफ असणे आवश्यक आहेत. सिंधुदुर्ग,रायगड आणि रत्नागिरी जिल्हयातील समुद्र किनारे पाहिले तर ते सेफ नाहीत तसेच व्यवस्थितपणे मेन्टेन केलेले नाहीत. परंतु गोव्यातील समुद्र किनारे पाहिले तर ते चांगल्या प्रकारे मेन्टेन केलेले आहेत आणि प्रोटेक्टेड आहेत .कोकणातील समुद्र पर्यटन जर वाढवावयाचे असेल तर कोकणातील बिच सेफ करण्यासाठी ब्रेक वॉटरची निर्मिती करण्यात येणार आहे काय ? तेथील बिच ओपन सी मध्ये आहेत त्यामुळे ब्रेक वॉटरच्या माध्यमातून ते बिच सेफ करण्यात येणार आहे की नाही हा खरा महत्वाचा प्रश्न आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे...

याठिकाणी वारंवार मागणी करण्यात येते की, कोकणामध्ये सर्व प्रकारच्या मुलभूत सुविधा वाढवावयाच्या असतील, पर्यटन व्यवसाय वाढवावयाचा असेल तर फार मोठी आर्थिक तरतूद करावी लागेल. कोकणाला जवळ जवळ 3 मुख्यमंत्री मिळाले आहेत. तसेच माननीय मंत्री श्री. तटकरे साहेब हे अर्थमंत्री म्हणून लाभले आहेत. त्यांनी आपल्या अर्थसंकल्पाच्या भाषणामधून कोकणासाठी भरभरुन देण्याचा प्रयत्न केला आहे. आज कोकणामध्ये पर्यटन उद्योगाकरिता अलाईड इंडस्ट्रीज आहेत, त्यांना सुध्दा शेती व्यवसायाचा दर्जा दिला पाहिजे, इन्फ्रास्ट्रक्चरच्या सुविधा दिल्या पाहिजेत. त्यामध्ये टॅक्स हॉलिडे, इन्कम टॅक्स एक्झम्शन दिले तर कोकणामध्ये पर्यटन व्यवसायाची निर्मिती करण्यासाठी अनेक मंडळी येण्यास तयार आहेत. कोकणामध्ये अनेक नामवंत मंडळी आहेत, त्यांची घरे मोठी आहेत. ही मंडळी कोकणामध्ये ब्रेड अँड ब्रेकफास्ट सारख्या सुविधा निर्माण करु शकतील. त्याकरिता त्यांना प्रशिक्षण व प्रोत्साहन देण्याचे काम सरकारच्या माध्यमातून झाले पाहिजे. कोकणामध्ये फिशिंग हा एक महत्वाचा उद्योग आहे. या उद्योगासाठी लागणाऱ्या मूलभूत सुविधा आपण उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. कोकणामध्ये आज मालवणचे बंदर आहे, रत्नागिरीमध्ये भाटये बंदर आहे, त्याचप्रमाणे आचऱ्याचे बंदर आहे त्याठिकाणी योग्य प्रकारच्या जे.टी बांधलेल्या नाहीत. योग्य प्रकारे कोल्ड स्टोअरेजची व्यवस्था करण्यात आलेली नाही. कोकणामध्ये मत्स्योद्योगासाठी लागणारे बर्फ निर्मिती करणारे उद्योग निर्माण झाले नाहीत. आणि म्हणून माझी सरकारला विनंती आहे की, फिशरीज उद्योगासाठी लागणाऱ्या सुविधांची निर्मिती फिशरीज टर्मिनल ॲथॉरिटीच्या माध्यमातून ..

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये कोकणाच्या प्रश्नावर चर्चा सुरु आहे, याअगोदर अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली आहे. मघाशी माननीय सभापतींबरोबर झालेल्या चर्चेनंतर दोन निवेदने करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यापैकी पहिले निवेदन माननीय गृहमंत्र्यांकडून करण्यात येणार होते, त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासंबंधीचे दुसरे निवेदन एक तासामध्ये करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. आता घडयाळामध्ये चार वाजले असून अधिवेशन संपण्याची वेळ जवळ येत चालली आहे. याठिकाणी सरकारकडून आम्हाला चुना लावण्याचे काम असेच चालू रहाणार आहे काय? असे म्हटले तर आपल्याला राग येईल. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.प्रकाश बिनसाळे...

सभागृहामध्ये मी असे बोलणे बरोबर नाही याची मला जाणीव आहे. परंतु सकाळपासून पाच वेळा आठवण करुन देखील या सभागृहामध्ये निवेदन करण्यात येत नाही. आम्ही याठिकाणी मुद्दा उपस्थित केल्यानंतर "देतो" असे सांगावयाचे, याठिकाणी उपस्थित असलेल्या कॅबिनेट मंत्र्यांपैकी कुणी तरी उभे राहून "होय" असे सांगतात. परंतु त्यानंतर पुढे काय करतात?

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : मी संबंधित मंत्रिमहोदयांना बोलावून घेतो.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, कोकणामध्ये मत्स्याद्योग हा एक अत्यंत महत्वाचा उद्योग आहे. आज कोकणामध्ये उपलब्ध असलेल्या सुविधा पाहिल्यानंतर या उद्योगासाठी आवश्यक असणाऱ्या योग्य प्रकारच्या जे.टी बांधण्यात आलेल्या नाहीत. योग्य प्रकारचे कोल्ड स्टोअरेज नाही, योग्य प्रकारची आईस फॅक्टरी नाही. असेल तर ती दोन-दोन किलोमीटर अंतरावर आहे. आणि म्हणून ही व्यवस्था सुधारण्याकरिता फिशिंग टर्मिनल ॲथॉरिटी अशाप्रकारची योजना सरकारने अंमलात आणून ती तातडीने राबविणे गरजेचे आहे. पर्यटनासाठी लागणारी अलाईड इंडस्ट्री निर्माण करणे, आणि इन्फ्रास्ट्रक्चरच्या सुविधा निर्माण करणे, दहा वर्षाचे टॅक्स हॉलिडे, इन्कम टॅक्समध्ये एक्झम्शन, अशापध्दतीने ज्या सुविधा निर्माण करावयाच्या आहेत त्याच पध्दतीने फलोत्पादन प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना मोठया प्रमाणात सुविधा देणे गरजेचे आहे. कोकणचा विकास करावयाचा असेल तर इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट आणि त्याचबरोबर टॅक्स हॉलिडेज सारख्या दोन गोष्टी सरकारने केल्या पाहिजेत. या दोन गोष्टी आपण निर्माण केल्या तर अनेक उद्योगपती कोकणामध्ये येऊन आपला उद्योग करतील. आणि त्या माध्यमातून मोठया प्रमाणात रोजगार निर्माण होईल. पर्यटन उद्योग हे रोजगार निर्मितीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे व मोठे माध्यम आहे. त्या माध्यमातून मोठया प्रमाणात रोजगार निर्माण होईल. कोकणातील स्थानिक माणसाला नोकरीऐवजी पर्यटन व्यवसायामध्ये यावयाचे असेल तर त्याकरिता कोकणातील वेगवेगळया शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून, सरकारने टूरिझम व हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्रीसाठी प्रशिक्षण देण्याची सुविधा तातडीने निर्माण केली पाहिजे. तसेच, मुंबई ते गोवा या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या प्रस्तावाला आणखी गती देऊन हे काम केले तर कोकणाला लवकरच चांगले दिवस येतील.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे.....

माननीय श्री. तटकरे हे या राज्याचे अर्थमंत्री आहेत त्यामुळे कोकणातील जनतेची यांच्याकडून फार मोठी अपे्क्षा आहे. ती अपेक्षा ते पूर्ण करतील असा विश्वास मी व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द समाप्त करतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

-x-

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आघाडी सरकारने निवडणुकी पूर्वी कोकण पॅकेज जाहीर केले. दर वर्षी कोकणासाठी पैशाची तरतूद करणार आणि कोकाणामध्ये पैशाचा पाऊस पडणार. पाऊस जास्त पडला की पूर येतो आणि त्याची वाट आम्ही पहात आहोत. पण पाऊसच पडला नाही. कोकण पॅकेजमध्ये 5232 कोटी रुपयाची तरतूद करण्यात येईल असे त्यावेळी जाहीर करण्यात आले. निवडणुकीमध्ये जाहीरनामा दिला आणि त्या जाहीरनाम्यावर मते मिळविली . माननीय मंत्रिमहोदय, श्री. सुनील तटकरे पुन्हा अंतुलेंच्या मतदारसंघामध्ये निवडून आले. आम्ही थोडे दुर्लक्ष केले आणि ते निवडून आले.

सभापती महोदय, गेल्या वर्षी 2009-2010या वर्षामध्ये फक्त 1256 कोटी रुपये खर्च करण्यात आला त्यापैकी 318 कोटी रुपये फक्त एमएमआडीएमध्ये खर्च करण्यात आले. एमएमआरडीएचे बजेट वेगळे आहे. त्यामुळे त्यात एमएमआरडीएचे फसवे आकडे या ठिकाणी देण्यात आलेले आहेत. 100 कोटी रुपये नगरपालिकांसाठी आणि नगरांच्या विकासासाठी खर्च करण्यात आले आहेत.

सन 2009-2010 या वर्षाच्या पॅकेजमध्ये 3000 कोटी रुपये खर्च होईल असे सांगण्यात आले पण प्रत्यक्ष खर्च 1256 कोटी रुपये करण्यात आला. 318 कोटी रुपये एमएमआरडीएवर 100 कोटी नगरपालिकेवर आणि 437 कोटी रुपये इरिगेशनवर खर्च करण्यात आले आहेत. हे पैसे कशासाठी खर्च करण्यात आले? तर जुन्या कामाची बिले देण्यासाठी खर्च करण्यात आले आहेत. आणि ती देखील अर्धवट बिले देण्यात आलेली आहेत. 850 कोटी रुपये कुठे खर्च करण्यात आले हे दाखविण्यात आले नाही. एकही नवीन योजना घेण्यात आली नाही. त्यामुळे यामध्ये फसवेगिरी करण्यात आलेली आहे. कोकणाला पूर्णपणे फसविण्यात आलेले आहे.

नवीन मंत्रिमंडळामध्ये कोकणाकडे अर्थमंत्रिपद आलेले आहे त्यामुळे कोकणच्या पॅकेजमध्ये आणखी भर पडेल अशी आमची अपेक्षा आहे. तीन हजार कोटी रुपये दर वर्षी खर्च करण्यात येतील असे सांगण्यात आले होते त्या बाबतीत वाढ करण्यात येईल अशी अपेक्षा आम्ही करतो.

सभापती महोदय, मी कोकण पॅकेजचे आणखी वाभाडे काढू शकतो पण वेळ अपुरा आहे. किनाऱ्यावर पाण्याची पातळी वाढत आहे. कां वाढत आहे? तर कोकणामध्ये नवीन नवीन प्रकल्प येत आहेत. किनाऱ्यावर भराव टाकला जात आहे. त्यामुळे पाण्याचे प्रवाह बदलत आहेत. त्यामुळे या ठिकाणी खऱ्या अर्थाने धूपप्रतिबंधक बंधाऱ्यांची गरज आहे.कोकण पॅकेजमधील 25 कोटी रुपये प्रत्यक्ष खर्च होतील असे सांगण्यात आले. पण एकही रुपया खर्च झालेला नाही.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ प्रथम कु.थोरात 15:50

श्री.जयंत प्र.पाटील.....

माझ्याकडे सरकारी आकडेवारी आहे. प्रत्यक्षात एक रुपयाही त्या कामावर खर्च झालेला नाही. म्हणून ख-या अर्थाने धूपप्रतिबंधक बंधारे हे वेगळया प्रकारचे बांधले गेले पाहिजेत. त्यासाठी वेगळी तरतूद केली पाहिजे. अर्थमंत्री म्हणून वेगळी तरतूद केली पाहिजे. कोकणाचा विकास करावयाचा असेल तर धूपप्रतिबंधक बंधारे कसे होतील यादृष्टीने माननीय मंत्री महोदयांनी काम केले पाहिजे. 2000 मीटरचे बंधारे बांधले पाहिजेत. श्रीवर्धन शहरामध्ये लोकांनी 1200 मीटर बंधा-याची मागणी केली आहे. परंतु तरतूद केवळ 200 मीटर बंधारे बांधण्याची केली आहे. त्यामुळे 1000 मीटरपर्यंत समुद्राचे पाणी येते. म्हणजे या कामासंबंधी कोणतेही नियोजन केलेले नाही. अनेक किना-यावरुन शहरांमध्ये मोठया प्रमाणात समुद्राचे पाणी शिरत आहे. त्यामुळे किनारे नष्ट होण्याची शक्यता आहे. मंत्री महोदयांचा मतदार संघ समुद्र किना-याजवळचा आहे. पूर्वी रोहा व माणगांवचा काही भाग सोडला तर त्यांना खाडी कशी असते ते माहीत नव्हते. परंतु आता त्यांचा मतदार संघ श्रीवर्धन झाला असल्यामुळे त्यांना किनारा कसा असतो हे माहीत झाल्याने ते बोलू लागले आहेत. म्हणून या कामासाठी भरीव तरतूद करावी अशी विनंती करीत आहे.

सभापती महोदय, शासनाने बंदरांचा विकास करीत असताना 740 किमीपर्यंत एकही ब्रेक वॉटर वॉल बांधलेली नाही. माननीय मंत्री महोदयांचे वाढदिवसाचे फोटो मी पाहिले आहेत. ते युरोपला गेले होते. त्यांचे वहिनींबरोबरचे फोटो मी पाहिले आहेत. मागील 2-3 वर्षांपासून त्यांनी अभ्यास दौरे करण्यास सुरुवात केल्याचे मी पहात आहे. परंतु राज्यातील समुद्र किना-यांची परिस्थिती कशी आहे ? 740 कि.मी.पर्यंत एकही ब्रेक वॉटर वॉल अस्तित्वात नाही. मलेशियामध्ये एकेक किलोमीटरवर वॉल आहे. सन्माननीय सदस्य श्री.बिनसाळे यांनी सांगितले की, शासनाने जलवाहतूक सुरु केली पाहिजे. शासनाने त्याचा अभ्यास केलेला आहे का ? आपल्याकडे ब्रेक वॉटर वॉल नाही. आपल्याकडे 665 किलोमीटरपर्यंतचा किनारा ओपन सी मध्ये आहे. मुरुड, अलिबाग, श्रीवर्धनचा थोडासा भाग सोडला तर 665 किलोमीटरपर्यंत 8 महिने जल वाहतूक होऊ शकेल. उर्वरित काळामध्ये साधी बोट सुध्दा फिरु शकत नाही. आपल्याकडे मांडव्याला सुध्दा ब्रेक वॉटर वॉल होऊ शकली नाही. ते काम 16 कोटींचे होते. आज ते काम 40 कोटींचे झालेले

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.जयंत प्र.पाटील.....

आहे. सभागृहात माजी अर्थ मंत्री माननीय श्री.जयंत पाटील हे आलेले आहेत. त्यांनी देखील मांडव्याचे काम करण्यात येईल अशी 4-5 वेळा सभागृहात घोषणा केली होती. परंतु तेथे अद्याप एकही दगड लावण्यात आलेला नाही. पश्चिम महाराष्ट्रातील नेते हुशार असतात. कोकणासाठी दरवर्षी बजेटमध्ये तरतूद केल्याचे दाखविले जाते. परंतु प्रत्यक्षात खर्च केला जात नाही....

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्या जिल्हयाचा मी पालक मंत्री होतो. मी स्वत: सांगितले होते की, त्या जेट्टीचा विस्तार करावा. त्यासाठी पैशाची सुध्दा तरतूद केली होती. त्या कामाची प्रक्रिया सुरु होण्यास जवळजवळ अडीच वर्षे लागली आहेत.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:55

(श्री जयंत पाटील...

पुन्हा काम चालू केले. त्यावेळी देखील पैशाची तरतूद केली. थोडे फार काम झालेले आहे. त्या कामाकडे दुर्लक्ष केलेले नाही. परंतु काळाच्या ओघात काम पूर्ण झाले नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने एवढेच सांगायचे आहे की, कोकणाला लाभलेल्या समुद्र किनारपट्टीचा उपयोग कोकणाच्या आर्थिक उन्नतीसाठी होऊ शकतो. या ठिकाणी माझ्या आधीच्या वक्त्यांनी कोकणातील पर्यटनाच्या संदर्भात वेगवेगळे मुद्दे मांडलेले आहेत. कोकणामध्ये कृषक उद्योगाला प्राधान्य देऊन त्यासाठी विविध सवलती द्यायला पाहिजे. मी कृषी बँकिंग क्षेत्रामध्ये काम करणारा कार्यकर्ता आहे. कोकणातील शेतक-याला कृषक उद्योगाला प्रोत्साहित केले तर त्याला नाबार्ड आणि केन्द्र शासनामार्फत मदत मिळू शकते. याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी ठोस स्वरुपाचे आश्वासन द्यावे. कोकणातील शेतक-याला वीज बिलामध्ये विविध करामध्ये, कर्जावरील व्याजामध्ये सवलती देण्याची तसेच तो ॲग्रीकल्चरल टुरिझमकडे वळण्यासाठी त्याला व्याजामध्ये सवलत आणि सबसिडी देण्याची घोषणा करावी अशी माननीय मंत्री महोदयांना विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कोकणाच्या विकासाच्या संदर्भात नियम 260 अन्वये जो अंतिम आठवडा प्रस्ताव या ठिकाणी सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. अशा त-हेचा प्रस्ताव त्यांनी मांडला याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, कोकणाच्या विकासाच्या संदर्भात या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. कोकणाच्या विषयावर या सदनातील सन्माननीय सदस्य एकजुटीने आणि एकमताने उभे राहिले. या सदनातील 50 टक्के सदस्य हे कोकणातील आहेत. तरी देखील कोकणावर अन्याय होत आहे असे सातत्याने बोलावे लागत आहे. या वर्षी कोकणतील अर्थमंत्री झाल्यानंतर सर्व कोकणी माणसांना त्याचा अभिमान वाटला. पण आता 1 वर्ष झाल्यानंतर कोकणी माणूस निराश व्हायला लागला आहे. अर्थसंकल्पामध्ये कोकणासाठी भरभरुन दिले परंतु त्याबाबतीत कोणतीही अंमलबजावणी न झाल्यामुळे कोकणी माणसाच्या पदरी निराशा आलेली आहे. कोकणी माणूस हा अभ्यासक आणि चिकित्सक आहे. सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी देखील कोकणाची कशी उपेक्षा होत आहे हे सांगितलेले आहे. सभापती महोदय, सन्माननीय अर्थमंत्री श्री. सुनील तटकरे यांना मी या चर्चेच्या निमित्ताने सांगू इच्छितो की, त्यांना जर कोकणामधील एक जबरदस्त नेता व्हायचे असेल, भविष्यामध्ये कोकणी माणसाने आपली आठवण काढावी असे त्यांना वाटत असेल तर कोकणातील पर्यटन व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, पाटबंधारे, फळप्रक्रिया उद्योग इत्यादी कामासाठी भरघोस निधी देण्याची आवश्यकता आहे. माननीय मंत्री महोदयांनी कोकणामध्ये विकासाच्या दृष्टीकोनातून दोन-तीन वर्षे खर्च केला तर पर्यटन व्यवसाय, मत्स्यव्यवसाय, फळप्रक्रिया उद्योग, शेती यापासून हे राज्य चालविले जाईल इतका महसूल आणि परकीय चलन या राज्याला मिळेल. मी माननीय मंत्री महोदयांना हे ठामपणे सांगू इच्छितो की, कोकणाच्या हिताच्या दृष्टीने ते जो काही निर्णय घेतील त्याबाबतीत या सदनातील 50 टक्के सदस्य त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहातील, त्यांनी घेतलेल्या निर्णयाला पाठिंबा देतील.

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...नंतर श्री. भोगले...

श्री.परशुराम उपरकर..........

याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी कोकणच्या पॅकेजबद्दल उल्लेख केला आहे. मी त्याबद्दल भाष्य करणार नाही. भर पावसामध्ये, ऐन निवडणुकीच्या काळात २४ जून रोजी मंत्र्यांची सहल कोकणात आयोजित केल्याप्रमाणे सकाळी अनेक मंत्री आले, दुपारी जेवण केले आणि सायंकाळच्या विमानाने मुंबईला परत गेले. अशा प्रकारची एक दिवसाची सहल कोकणात आयोजित केली होती. सर्वांनी माशांवर ताव मारला. वास्तविक त्याबद्दल बोलू नये. कोकणी माणूस उदार मनाचा आहे. वेळप्रसंगी स्वत:कडे काही नसले, उपाशी असला तरी पाहुण्यांना जेवण घालणार अशी वृत्ती असते. माननीय पालकमंत्र्यांनी सर्व पाहुण्यांना खायला घातले. आता सिंधुदूर्ग जिल्हयाचा भरपूर विकास होणार असे आम्हाला अपेक्षित होते. परंतु विकास काही झाला नाही. म्हणूनच आज याठिकाणी माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी आम्हाला या प्रस्तावावर बोलण्याची संधी प्राप्त करुन दिली.

सभापती महोदय, कोकण विकासासाठी शासनाने ३९३२ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. नियोजन विभागाचे प्रधान सचिव श्री.सुनील सोनी यांच्या सहीने दिनांक २५ ऑगस्ट, २००९ रोजी जी.आर.निर्गमित करण्यात आला. तीन वर्षात टप्प्याटप्प्याने निधी दिला जाईल असे सांगितले गेले. पर्यटन कृती आराखडा तयार करण्यासाठी २००९-१० आणि २०१०-११ या दोन वर्षात ६० कोटी रुपयांचा निधी दिला जाईल असे सांगण्यात आले. यापैकी किती निधी दिला गेला आणि काय विकास झाला? हे मंत्रीमहोदयांनी सभागृहाला सांगावे अशी माझी विनंती आहे. पर्यटनाचे एक तरी स्थळ विकसित झाले का? पर्यटक येतात ते पर्यटन स्थळांची पाहणी करण्यासाठी येत असतात. प्रत्येक जिल्हयातील समुद्र स्थळे, धार्मिक स्थळे, पर्यटन विकास, ॲप्रोच रोड दोन वर्षात ६० कोटी रुपये दिले जातील असे सांगितले. प्रत्यक्षात किती निधी दिला गेला? सीआरझेडमध्ये असलेल्या पर्यटन स्थळांच्या विकास कामांसाठी ३ कोटी रुपये दिले. एका बाजूला धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांसाठी दोन वर्षाकरिता अनुक्रमे २५-२५ कोटी रुपयांची तरतूद केली. दुसऱ्या बाजूला शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक ३१ ऑक्टोबर, २००९ च्या जी.आर.मध्ये काय म्हटले आहे? समुद्र किनाऱ्यावरील धूप रोखण्यासाठी किनाऱ्यावरील जनतेच्या जीवित व मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या चारही जिल्हयात धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यासाठी २००९-१० या वर्षाकरिता २५ कोटी रुपये आणि २०१०-११ या वर्षाकरिता २५ कोटी रुपये असे

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर........

एकूण ५० कोटी रुपये मंजूर केले असून ही तरतूद जिल्हा नियोजनामधून करण्यात यावी. शासनाने एका बाजूला पॅकेज मंजूर केले आणि दुसऱ्या बाजूला जिल्हा नियोजनाची तरतूद ६० कोटी रुपयांवरुन ९२ कोटी रुपये दर्शविण्यात आली. त्यातूनच ५० कोटी रुपयांची तरतूद करावी असे शासनाने कळविले. जिल्हा नियोजन व विकास मंडळातील सदस्यांना वाटले की, सरकारने ६० कोटी रुपयांवरुन ९२ कोटी रुपयांपर्यंत रक्कम वाढवून दिली. परंतु जिल्हा नियोजन व विकास मंडळाला शासनाकडून १५० कोटी रुपयांचा निधी प्राप्त होत होता, तो निधी ९२ कोटी रुपये इतका करण्यात आला. सिंधुदूर्ग जिल्हयातील पाटबंधारे प्रकल्पांची हीच स्थिती आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी कोकणातील पाटबंधाऱ्यांचा विषय याठिकाणी मांडला आहे. गेल्या आर्थिक वर्षात कोकणातील पाटबंधाऱ्यांच्या कामासाठी ९२७ कोटी आणि यावर्षी ४०० कोटी रुपये दिले जाणार होते. मागील हिवाळी अधिवेशनात दिनांक २३.१२.२००९ रोजी कोकण पॅकेजच्या विषयावरील लक्षवेधी सूचनेला माननीय राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात उत्तर देत असताना असे सांगितले होते की, सरकार शब्द दिल्याप्रमाणे निधी देणार आहे. प्रत्यक्षात शासनाने कोकणाला काय दिले?

सभापती महोदय, मी याठिकाणी कणकवली तालुक्याती तरंदळे पाटबंधारे बंधाऱ्याचे उदाहरण देऊ इच्छितो. या बंधाऱ्याचे ८० ते ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या त्या जमिनीचा मोबदला देण्यासाठी ११ कोटी रुपयांचा ॲवॉर्ड मंजूर झाला. परंतु पाटबंधारे विभागाने फक्त २ कोटी रुपये पुनर्वसन विभागाकडे वर्ग केले आहेत. जमिनीचा मोबदला म्हणून ८ कोटी रुपये देणे शिल्लक ठेवले आहे. पाटबंधारे कामासाठी भरपूर निधी दिला जाईल असे सांगितले जाते......

नंतर २वाय.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .......

तिलारीचा प्रकल्प मूळ 45 कोटीचा असताना त्याची किंमत आता 1200 कोटीवर गेली आहे. अशा प्रकारे वेळेत प्रकल्पांची कामे पूर्ण न झाल्याने चार-चार पटीने किमती वाढलेल्या आहेत. अशा अपूर्ण प्रकल्पांना भरीव निधी देण्याची गरज आहे. कोकणाला लाभलेल्या 720 कि.मी. लांबीच्या किनाऱ्यावर मच्छिमारी करणाऱ्या मच्छिमारांना फयान सारख्या वादळांना तोंड द्यावे लागत आहे तरी देखील त्यांच्या पदरात मात्र काहीच पडत नाही. शासनाने फयान वादळामुळे नुकसान झालेल्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी 4 कोटीचा निधी दिला पण त्यातील फक्त 1.22 कोटीचेच वाटप झाले असून 2.78 कोटी एवढी रक्कम शासनाकडे परत आली आहे. या मच्छिमारांना दिलासा द्यावा असे शासनाला वाटत असेल तर मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, परवा मी गोवा राज्याने मच्छिमारांबाबत जो जी.आर.काढलेला आहे तो दाखविला होता, त्यानुसार मच्छिमारांना 4 टक्के व्याज दराने कर्ज देण्याची योजना गोवा राज्याने आखली. त्याच धर्तीवर आपल्या राज्यातही अशी योजना आखून या मच्छिमारांना कर्जाची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत. कोकणातील देवगड, सर्जेकोटसारखी बंदरे विकसित करण्याचे काम चालले आहे. अशा बंदरामधून मासे विक्री करणे, त्यांचे लिलाव करण्याचे काम चालले आहे पण त्या ठिकाणी फिशरीज टर्मिनल ऑथॉरिटी निर्माण करण्याची गरज आहे. अशी ऑथॉरिटी निर्माण करुन त्या माध्यमातून मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळण्याचे काम होऊ शकते. त्याचबरोबर पर्यटनाच्या माध्यमातून अनेक भागातून फिशरीज व्हिलेज निर्माण करण्यासारखी परिस्थिती सुध्दा कोकणात आहे. कारण बऱ्याच पर्यटकांना समुद्र आवडतो. आज या टर्मिनल बरोबर समुद्र किनाऱ्यावर देखील अशा प्रकारे पर्यटक येत असताना मत्स्यव्यवसाय विभागाने आपल्या सर्व यंत्रणा राबविणे आवश्यक आहे. कारण व्यवस्थितपणे बोटी चालविण्याचे काम हाच विभाग करु शकतो म्हणून अशा प्रकारच्या टर्मिनलला राष्ट्रीय महामार्गाला जोडून मुलभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या तर अशा पर्यटनाच्या माध्यमातून कोकणातूनच राज्याला मुबलक प्रमाणात महसूल मिळू शकेल, अशी मी ग्वाही देतो. त्याचबरोबर कोकणात आंबा, जांभूळ, कोकम तसेच काजू ही फळे मुबलक प्रमाणात मिळतात. अशा फळांवर प्रक्रिया उद्योग जास्तीत जास्त निर्माण केले तर त्यातूनही राज्याला बराच महसूल मिळू शकतो. आपण 1:9 अशी योजना जाहीर करतो पण हे करीत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपकर .....

असताना कोकणातील किती प्रकल्प या योजनेत येतात आणि त्यांचे मार्केटिंग कशा पध्दतीने होणार याचाही अभ्यास करण्याची गरज आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून युतीच्या काळात जाहीर केला गेला. त्यावेळेस टाटा कन्सल्टन्सीने त्याचा रिपोर्ट सुध्दा तयार केला आणि त्याच्या आधारे प्रयत्न केले. सिंधुदुर्ग आणि कोकण पूर्णपणे विकसित केला जाईल आणि जो आनंदवाडीचा प्रकल्प स्थगित झाला तो पुन्हा चालू करुन तेथे संपूर्ण राज्यासाठी एक मॉडेल प्रकल्प केंद्रशासनाच्या निधीतून सुरु झालेला आहे त्याची देखरेख करण्यासाठीच फिशरीज टर्मिनल ऑथॉरिटी निर्माण करण्याची गरज आहे. अशा प्रकारे मी वर ज्या ज्या सूचना केल्या त्यांच्यासंबंधीचा निर्णय घेण्याबाबतची घोषणा मंत्री महोदयांनी करावी, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-----

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी कोकणाच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रस्ताव या ठिकाणी मांडल्याबद्दल मी त्यांचे मी मनापासून स्वागत करतो. या प्रस्तावाच्या संदर्भात माझी एकच अपेक्षा आहे की, गेल्या 4 वर्षापासून या सभागृहात कोकणच्या विषयावर सातत्याने चर्चा उपस्थित होत असते. मागील 3 वर्षापूर्वी कोकणाच्या विषयावर जेव्हा चर्चा झाली होती त्यावेळेस माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी उत्तर दिले होते. त्या चर्चेमध्ये इरिगेशन, राष्ट्रीय महामार्ग, सागरी महामार्गाबाबत त्यांनी उत्तर दिले होते. परंतु आजपर्यंत यासंदर्भात काहीही झाले नाही. आज पहिल्याप्रथम कोकणातील माणूस राज्याचा अर्थमंत्री झालेला आहे. माझी खात्री आहे की, आजच्या चर्चेला एक वेगळे महत्व आहे. आजच्या या चर्चेमुळे कोकणाला न्याय मिळेल अशी अपेक्षा करतो कारण 1980 साली सागरी महामार्गाची सुरुवात झाली होती. माननीय अंतुलेसाहेबांनी सागरी महामार्गाच्या कामाला सुरुवात केली होती. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी सांगितले आहे की, कै. बाळासाहेब भारदे यांनी 1961 मध्ये या सभागृहात सागरी महामार्गाचे महत्व सांगितले होते. या सागरी महामार्गाचा खर्च 30 वर्षापूर्वी 500 ते 550 कोटी रुपये होता परंतु या सागरी महामार्गासाठी 67 कोटी रुपयांची तरतूद दाखवलेली आहे. कोकणातील 41 पुलांपैकी 38 पुलांचे काम पूर्ण झाले आहे. रायगडमध्ये अजून 3 पूल व्हावयाचे आहेत. या पुलांचा खर्च 1700 ते 1800 कोटी रुपये आहे. मी एक महिन्यापूर्वी देवगड ते रत्नागिरी हे अंतर दीड तासात पार करुन आलो होतो. या ठिकाणी ॲप्रोच रोड थोडे शिल्लक आहेत. माननीय मंत्रीमहोदयांनी सागरी महामार्गासाठी 67 कोटी रुपये दिले आहेत हे पैसे जर असेच 30-40 वर्षे देत राहिलात तरी कोकणाच्या सागरी महामार्गाचे काम पूर्ण् होणार नाही एवढे मी या ठिकाणी सांगू इच्छितो. 30-40 वर्षात कोकणातील सागरी महामार्गाचे काम पूर्ण होईल असे मला वाटत नाही. सागरी महामार्ग कसे पूर्ण होतील यादृष्टीने प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. यावर्षी शासनाने बदंराच्या संदर्भात धोरण जाहीर केलेले आहे. कोकणामध्ये चार बंदरे आहेत मग जैतापूर ते कोल्हापूर महामार्ग, रेडी ते बेळगाव व विजयदुर्ग ते कोल्हापूर हे महामार्ग पूर्ण करण्यासाठी किमान 500 कोटी रुपये खर्च येणार आहे त्यामुळे यासंदर्भात शासन विचार करणार आहे की, नाही ? कोकणाची भूमी म्हणजे निसर्गाला पडलेले एक सुंदर स्वप्न आहे. मुंबई आणि गोव्याला जागतिक

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली .....

पातळीवर महत्व प्राप्त झालेले आहे. गोवा आणि मुंबई यांच्यामधील कोकण हा दुवा आहे. कोकणातील पर्यटनाच्या व्यवसायाला चालना दिली तर कोकणातील माणूस पुढे जाऊ शकेल.

केरळ, राजस्थान, गोवा, दिल्ली या राज्याने पर्यटनावर भर दिलेला आहे. जगामध्ये प्रत्येक देशाने पर्यटनाला महत्व दिले आहे. परंतु दुर्दैवाने पर्यटन या विषयाकडे महाराष्ट्र शासनाने लक्ष दिले नाही ही वस्तुस्थिती आहे. 1998 मध्ये सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झाला होता. मला मंत्रीमहोदयांना विचारावयाचे आहे की, गेल्या 12 वर्षात आपण सिंधुदुर्गच्या पर्यटनासाठी किती पैसे उपलब्ध करुन दिले आहेत ? तीन वर्षापूर्वी आंग्रे बेटासाठी शासनाने 5 कोटी रुपये दिले होते परंतु ते 5 कोटी रुपये सुध्दा खर्च करण्यात आले नाहीत. यावर्षीच्या बजेटमध्ये पहिल्यांदाच 5 कोटी रुपये दिलेले आहे ते सुध्दा जाहिरातीसाठी दिले आहेत. शासनाने कोकणासाठी 10 वर्षात एकही पैसा न देता केवळ पर्यटन पर्यटन, म्हणून घोषणा दिलेल्या आहेत. कोकण विभागातील पर्यटनाच्या संदर्भातील कृती आराखडा तयार करणे यासाठी 60 कोटी रुपये दाखवले आहेत. हे पैसे बाराव्या वित्त आयोगाचे आहेत. प्रत्येक जिल्हयातील समुद्र किनारा आणि धार्मिक स्थळे यांच्यासाठी ॲप्रोच रोड तयार करणे यासाठी कोणत्याही प्रकारचा निधी दिलेला नाही. कोकणासाठी सिंधुदुर्ग पर्यटन विकास महामंडळ तयार करण्याचा कॅबिनेटचा निर्णय आहे परंतु यावर अद्यापपावेतो पाच पैशाची सुध्दा तरतूद करण्यात आलेली नाही. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, दोन वर्षाच्या आत सी वर्ल्डचे काम पूर्ण करणार आहोत. यासाठी राज्य शासनाने काहीही निधी दिलेला नाही. पर्यटन हा महत्वाचा विषय आहे, पर्यटनामुळे रोजगार निर्माण होणार आहे यासंदर्भात आम्ही सातत्याने विचार मांडतो परंतु त्याचा काही एक उपयोग होत नाही. गेल्या चार वर्षात बाराव्या वित्त आयोगाचे 180 कोटी रुपये मिळाले आहेत परंतु हे पैसे एमटीडीसीने खर्च केलेले नाहीत, एमटीडीसी कडे कोणत्याही प्रकारचा स्टाफ नाही. त्यामुळे आपण बाराव्या वित्त आयोगाचे 180 कोटी रुपये कसे खर्च करणार आहात ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ श्री.जुन्नरे.. 16:15

श्री.राजन तेली...

एमटीडीसीने एकही पैसा खर्च केलेला नाही. 180 कोटी रूपयांपैकी एक रूपया देखील खर्च केलेला नाही. केरळ सरकार दरवर्षी 100 कोटी रूपये जाहिरातीसाठी खर्च करते. त्यांची पर्यटनासंबंधातील जाहिरात युरोप, दुबई येथे देखील केली जाते. राज्यामधील सगळ्या टीम ऑपरेटरना तेथे आणले जाते. त्याप्रमाणे जाहिरात आपले राज्य शासन करणार आहे काय ?

सभापती महोदय, कोकणामध्ये विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सुंदर किल्ले आहेत. समुद्र किनारा आहे. अंबोली सारखे हिल स्टेशन आहे. तेव्हा पर्यटनाचा विकास होण्याच्या दृष्टीने शासन नेमके काय करणार आहे ? वित्त मंत्री श्री.सुनील तटकरे, आपल्याकडून कोकणाच्या फार अपेक्षा आहेत. केरळ राज्याने प्रत्येक राज्यात जाहिरात केलेली आहे. दुबई, युरोपमध्ये जाहिरात केली आहे. महाराष्ट्र तसा प्रयत्न करणार आहे काय ? असा माझा प्रश्न आहे. कोकणामध्ये स्पेशल इकॉनॉमी झोन करा. दर अधिवेशनामध्ये पश्चिम महाराष्ट्राचा ऊसा संबंधीचा एक तरी प्रश्न येतो. म्हणूनच मला शासनाला विनंती करावयाची आहे की, शासनाने दरवर्षी कोकणासाठी 500कोटी रूपये पाच वर्षासाठी पर्यटन विकासासाठी रिटर्न बेसिसवर द्यावेत. कोकणामध्ये निसर्ग फार सुंदर आहे. त्याचा पर्यटन विकासासाठी वापर करावा. आपण येथे बेरोजगाराची चर्चा करतो. कोकणात पर्यटनाला वाव असल्यामुळे काही प्रमाणात रोजगार देखील निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कोकणातील पर्यटनाला चालना देण्यासाठी शासन 500 कोटी रूपये देणार आहे काय ? असा माझा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, कोकणात 92 पाटबंधाऱ्यांचे प्रकल्प आहेत. या वर्षी या प्रकल्पांसाठी रूपये 729.49 कोटी देण्याचे कबूल केले आहे. प्रत्यक्षात रूपये 419.28 कोटी दिलेले आहेत. तसेच, 350 कोटी रूपयांची ठेकेदारांची बिले देणे बाकी आहेत. प्रत्यक्षात काहीही झालेले नाही. तीन वर्षामध्ये शासन 1500 कोटी रूपये कोकण पॅकेज अंतर्गत देणार आहे. पण आता पाटबंधारे प्रकल्पांची किंमत 6 हजार कोटीच्या आसपास आहे. जुने प्रकल्प अपूर्ण असल्यामुळे येणाऱ्या 10 ते 15 वर्षाच्या काळात एकही नवीन पाटबांरे प्रकल्प शासनाला हाती घेता येणार नाही. तेव्हा जुने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे हे देखील सभागृहाला कळले पाहिजे. 50 कोटी रूपयाच्या प्रकल्पाची आजची किंमत 1500 कोटी ते 2000 कोटी एवढी झाली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली...

आहे. दहा वर्षानंतर या सगळ्या प्रकल्पांची किंमत अनेकपटीने वाढणार आहे. त्यामुळे जे भूमिपुत्र आहेत त्यांना न्याय मिळत नाही. सभापती महोदय मला आपण थोडा वेळ द्यावा. माननीय वित्त मंत्री सभागृहात उपस्थित असल्यामुळे मी दोनच विषय हाताळणार आहे. पाटबंधाऱ्यांचे अपूर्ण अवस्थेत असलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासन कोणती भूमिका घेणार आहे हे सांगावे. 25 कोटी रूपये दुरूस्तीसाठी देण्याचे शासनाने कबूल केले आहे. पण एक रूपयाची तरतूद देखील झाली नाही. तसेच ठेकेदारांचे थकलेले रूपये 350 कोटी रूपये शासन कधी देणार आहे ? तेव्हा पाटबंधाऱ्यांचे प्रकल्प मुदतीत पूर्ण होणार आहेत काय ? हे शासनाने निश्चितपणे सांगावे.

सभापती महोदय, कोयना प्रकल्पासंबंधीचा विषय नेहमी सभागृहात येतो. 62 टीएमसी पाणी समुद्रात वाहून जाते. गेली चार वर्षे मी यासंबंधी प्रस्ताव देत आहे. डिसेंबरमध्ये प्रस्ताव चर्चेला आला होता. तथापि, तो पुढे ढकलण्यात आला. 62 टीएमसी समुद्राला जाऊन मिळणारे कोयनेचे पाणी आपण अडविले तर ते सिंधुदुर्ग, रत्नागिरीसाठी शेतीच्या कामासाठी वापरता येऊ शकेल. एवढेच नव्हे तर मुंबईपर्यंत ते पाणी आणता येईल.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली....

कोकणात 15 लाख 68 हजार हेक्टर क्षेत्रावर पीक घेऊ शकतो, त्यापैकी 1 लाख 04 हजार हेक्टर क्षेत्रावर सिंचनाची व्यवस्था आहे. म्हणजे फक्त 5 टक्के सिंचन क्षमता आहे. विदर्भात 57 हजार हेक्टर क्षेत्रावर पीक घेण्यात येते, त्यापैकी 10 लाख हेक्टर क्षेत्रावर सिंचन आहे. म्हणजे 16 टक्के सिंचन क्षमता आहे. मराठवाड्यामध्ये 56 लाख हेक्टर क्षेत्र असून त्यातील 9 लाख हेक्टर क्षेत्रावर सिंचनाची व्यवस्था आहे,म्हणजे 16 टक्के सिंचन क्षमता आहे. मराठवाडा आणि विदर्भात 16 टक्के तर कोकणात फक्त 5 टक्के सिंचन क्षमता आहे. एका विभागात जास्त सिंचन क्षमता तर दुसऱ्या भागात कमी सिंचन क्षमता, हा दुजाभाव कशासाठी ? तेव्हा याबाबत गांभीर्याने विचार होण्याची आवश्यकता आहे. माननीय वित्त मंत्री हे कोकणातील आहे. तेव्हा त्यांनी कोकणासाठी जास्त निधी द्यावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, गेली चार वर्षे मच्छिमारांचा प्रश्न सभागृहात उपस्थित होत आहे. अधिकारी जुनी आकडेवारी दाखवित असल्यामुळे कोकणात माशांचा दुष्काळ जाहीर करण्यात येत नाही. आज कोकणातील सर्व मच्छिमार बांधव अडचणीत आहेत. मच्छिमारांना डिझेल कोटा वाढवून द्यावा अशी मागणी मी मागील अधिवेशनात केली होती. कर्नाटक राज्यात मच्छिमारांना 10 रुपये लीटरने रॉकेल दिले जाते. तर गुजरात राज्यात मच्छिमारांना गॅस कीट देण्यात येते. या दोन्ही राज्यांत मच्छिमारांना ज्या सुविधा पुरविण्यात येतात त्या सुविधा राज्य सरकारने पुरवाव्यात अशी माझी मागणी आहे. तसेच शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्यात येतो त्याप्रमाणे मच्छिमारांना देखील चार टक्के दराने कर्ज देण्यात यावे. मच्छिमार व्यवसाय आपणास तीन हजार कोटी रुपयांचे परकीय चलन मिळवून देऊ शकतो इतकी क्षमता या व्यवसायामध्ये आहे. मच्छिमार व्यवसायातून चांगला रोजगार उपलब्ध होऊ शकतो. तेव्हा या व्यवसायाकडे पाहण्याची दृष्टीकोन शासनाने बदलून मच्छिमारांसाठी काय करता येईल याबाबतचे धोरण जाहीर करावे अशी माझी विनंती आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली....

सभापती महोदय, नॅशनल फिशरीज डेव्हलपमेंट बोर्डाकडून जेट्टीसाठी 100 टक्के अनुदान मिळते. तसेच हार्बर डेव्हलपमेंटसाठी देखील अनुदान मिळते. माननीय श्री.शरद पवार केंद्रात कृषी मंत्री आहेत त्यांच्या अखत्यारित हा विषय येत आहे. या विभागाला दरवर्षी सात हजार कोटी रुपयांचे बजेट आहे. गुजरात सरकारने नॅशनल फिशरीज डेव्हलपमेंटकडून जेट्टी आणि हार्बर डेव्हलपमेंटसाठी निधी मिळण्यासाठी धोरण आखलेले आहे. गुजरात सरकारच्या धर्तीवर नॅशनल फिशरीज डेव्हलपमेंट कडून जेट्टी, हार्बर डेव्हलपमेंटसाठी निधी आणण्यासाठी माननीय वित्त मंत्री महोदयांनी प्रयत्न करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, कोकणातील फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग उभारावेत या विषयाची मी लक्षवेधी सूचना दिली होती. या लक्षवेधी सूचनेवर कोणत्या विभागाने उत्तर द्यावे यावर चार दिवस वाद सुरु होता. फलोत्पादन मंत्री म्हणत होते हा आमचा विषय नाही, पणन मंत्री म्हणत होते आमचा विषय नाही, उद्योग मंत्र्यांनी सांगितले की, आमचा काही संबंध नाही. शेवटी त्या लक्षवेधी सूचनेचे उत्तर पणन मंत्री महोदयांनी दिले. कोकणात साधारणत: 29 लाख 49 हजार 611 हेक्टर क्षेत्रावर काजू, आंबा,कोकम इत्यादींची लागवड होते. कोकणातील 20 टक्के फळांवर प्रक्रिया केल्यास कोकणातील शेतकऱ्यांना दरवर्षी 700 ते 800 कोटी रुपये मिळू शकतील असा अहवाल कोकण कृषी विद्यापीठाने अहवाल दिलेला आहे. धान्यापासून वाईन बनविण्यात येते म्हणून वाद निर्माण झाला. परंतु आज कोकणातील करवंद, जांभूळ, काजूचे बोंड इत्यादीसाठी लागवड करावी लागत नाही. ही फळे अगदी सहज उपलब्ध होतात. त्यापासून वाईन बनविता येईल. आज परदेशातील फ्रान्स, ब्राझील, अमेरिका, मलेशिया देशांमध्ये फळांच्या उत्पन्नाच्या 70-80 टक्के फळांवर प्रक्रिया केली जाते. हीच आकडेवारी भारतामध्ये फक्त दोन टक्के आहे तर कोकणात फक्त दीड टक्के आहे. कोकणात फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग उभारल्यास, पर्याटनास वाव दिल्यास तर कोकण देशाला मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळवून देईल इतकी समृध्दी कोकणामध्ये आहे. शासनाचा कोकणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन चांगला नाही. माननीय वित्त मंत्री कोकणातील आहेत तेव्हा कोकणाला न्याय मिळवून देतील अशी आमची अपेक्षा आहे. कोकणातील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली....

पर्यटन, कृषी, मच्छिमार इत्यादी विषयाला न्याय दिला आणि कोकण पॅकेजचे पैसे वेळेवर दिल्यास कोकण देशाच्या आर्थिक तिजोरीमध्ये भर टाकेल अशी मी खात्री आपणास देतो. विदर्भावर अन्याय होतो म्हणून वेगळया विदर्भाची मागणी सातत्याने होत आहे. याठिकाणी विदर्भापक्षा कोकणातील आमदार जास्त आहेत. त्यामुळे राजकीय प्रभाव कोकणाचा राहणार आहे हे देखील विसरुन चालणार नाही. कोकणावर अन्याय होतो म्हणून कोकण वेगळा करावा अशी कोकणातील आमदारांनी भावना व्यक्त केली तर ते चुकीचे ठरणार नाही. तेव्हा कोकणावर अन्याय करु नका कोकणचा अंत पाहू नका एवढे बोलून आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

-------

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी कोकणच्या विकासाच्या संदर्भात महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावासंबंधी माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी तसेच त्या प्रस्तावाला मनापासून पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कोकण विकासाच्या संदर्भात, कोकणात असलेल्या अडचणीच्या संदर्भात कोकणवासीयांना ज्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे त्या बाबतीत सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत आणि शासनाला काही सूचना केल्या आहेत. या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या, ज्या सूचना केल्या वा जे काही विचार मांडले आहेत त्या विचारांशी मी पूर्णपणे सहमत आहे. या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी जे विचार मांडले वा जे मुद्दे मांडले आहेत त्याला मी मनापासून पाठिंबा देतो आणि त्या मुद्यांची पुनरावृत्ती न करता कोकणाच्या विकासाच्या दृष्टीने जे दोन तीन मुलभूत प्रश्न आहेत ते प्रश्न या ठिकाणी थोडक्यात मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 371 (2) अन्वये कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक मंडळ स्थापन करण्यात यावे यासाठी दोन्ही सभागृहाने एकमताने ठराव मंजूर केला होता परंतु अशा प्रकारचा ठराव मंजूर होऊनही दुर्दैवाने त्या ठरावाची अंमलबजावणी होऊ शकली नाही. कोकणाचा ख-या अर्थाने विकास करावयाचा असेल, कोकणाच्या 720 किलोमिटर लांबीच्या सागरी किनारपट्टीला न्याय द्यावयाचा असेल, कोकणात राहणा-या लोकांचा विकास करावयाचा असेल तर अशा प्रकारे कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक मंडळ स्थापन होणे आवश्यक आहे तेव्हा हे वैधानिक मंडळ स्थापन करण्यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे ? अशा प्रकारचे स्वतंत्र वैधानिक मंडळ स्थापन करण्यात येणार आहे की नाही या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, अन्य विभागातील आरोग्य, तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, सिंचन, पर्यटन इत्यादी क्षेत्राच्या विकासाचा आणि कोकणातील या क्षेत्रातील विकासाची जर तुलना केली तर या सर्व क्षेत्रामध्ये इतर विभागाच्या तुलनेने कोकणामध्ये अनुशेष आहे असे आपल्याला दिसून येईल. ही गोष्ट शासनाला देखील मान्य आहे. तेव्हा कोकणातील अनुशेष दूर करण्यासाठी शासन कोणती

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते .....

उपाययोजना करणार आहे या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात उल्लेख करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, कृषी आणि सिंचन या दोन विभागाप्रमाणेच पर्यटन हा विभाग सुध्दा तितकाच महत्वाचा आहे. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हयाला पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीने काही सुविधा उपलब्ध करुन देणे ही शासनाची जबाबदारी आहे परंतु शासनाने या सुविधा उपलब्ध करुन न दिल्यामुळे ख्-या अर्थाने कोकणामध्ये पर्यटनाचा विकास होऊ शकला नाही असे दुर्देवाने सांगावेसे वाटते. कोकणातील पर्यटनाचा विकास करण्यासाठी अन्य राज्याच्या तुलनेने राज्य सरकार कोणत्या उपाययोजना करणार आहेत ? असे मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे. कोकणाचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्याच्या दृष्टीकोनातून माननीय मंत्री महोदयांनी आपली भूमिका स्पष्ट करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

अनेक माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. कोकणातील लोकांचे समाधान करण्यासाठी, त्यांना दिलासा देण्यासाठी कोकणामध्ये मंत्रिमंडळाची बैठक घेऊन पॅकेज जाहीर करण्यात आले. कोकणाला पॅकेजचे पैसे देण्याचे मान्य करण्यात आले परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी झाली नाही. पॅकेजच्या माध्यमातून शासनाने वेगवेगळया योजना सुरु करणे आवश्यक होते, त्यासाठी निधी देणे आवश्यक होते. परंतु त्यापैकी काहीही झाले नाही. शासनाने पॅकेजमधून निधी देण्याचे मान्य केले, नवीन योजना हाती घेण्याचे मान्य केले, त्या योजनांच्या माध्यमातून कोकणचा विकास करण्याचे मान्य केले, त्या पॅकेजच्या माध्यमातून पैसे देण्याचे मान्य केले, ते खरेच आपण देणार आहात काय? असल्यास, केव्हा देणार आहात? याचा उल्लेख उत्तराच्या भाषणामध्ये होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कोकणातील दापोली येथे कोकण कृषी विद्यापीठ आहे. माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी कोकण विकसित करण्यासाठी कृषी विद्यापीठाची भूमिका फार महत्वाची असल्याचे सांगितले. त्याकरिता कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम राबविण्यासाठी कृषी विद्यापीठ आणखी सक्षम करण्यासाठी कोणती उपाय योजना करणार आहात? त्याबाबत धोरणात्मक निर्णय जाहीर होणे आवश्यक आहे. कोकणामध्ये विशेषत: रत्नागिरी जिल्हयामध्ये वैद्यकीय महाविद्यालय निर्माण करावे यासाठी कोकणवासियांची अनेक वर्षापासून मागणी आहे. आदरणीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सातत्याने हा विषय सभागृहामध्ये मांडला. इतर विभागांमध्ये तेथील वैद्यकीय विकासाच्या दृष्टीकोनातून वैद्यकीय महाविद्यालय देण्यात आले परंतु कोकणामध्ये रत्नागिरी जिल्हयात एक वैद्यकीय महाविद्यालय आपण देणार आहात काय? त्या संदर्भात आपण निर्णय घ्यावा. सभापती महोदय, शासनाने कोकणामध्ये एच.एस.सी. बोर्ड स्थापन करण्याचे मान्य केले. त्या संदर्भात सभागृहामध्ये चर्चा झाल्यानंतर शासनाने ते देण्याचे मान्य केले व त्याबाबतची घोषणा चार वर्षापूर्वी केली. त्या संदर्भात आंदोलन केल्यानंतर देखील तो निर्णय फक्त कागदावरच राहिला आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील विद्यार्थी व शाळा त्या निर्णयाची आतुरतेने वाट पहात आहेत. कोकणामध्ये विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी कोल्हापूरला जावे लागते त्याऐवजी कोकणासाठी एक स्वतंत्र मंडळ स्थापन केले तर तेथील विद्यार्थ्यांची सोय होणार आहे. त्या मंडळाचा खर्च शासनाला परवडेल की नाही याचा विचार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. रामनाथ मोते...

न करता कोकणाला दिलासा देण्याचा, कोकणातील विद्यार्थ्यांना दिलासा देण्याचा धोरणात्मक निर्णय घ्यावा. आणि कोकणासाठी स्वतंत्र एच.एस.सी. मंडळ आपण केव्हा देणार आहात ते जाहीर करावे. मध्यंतरी याबाबत सभागृहामध्ये चर्चा करीत असतांना या मंडळासाठी जागा मिळत नाही असे शासनाकडून सांगण्यात आले. परंतु आता रत्नागिरीमध्ये जागा उपलब्ध झालेली असून त्याबाबतचा जी.आर. अजून काढण्यात आलेला नाही. आणि म्हणून माननीय वित्तमंत्र्यांनी हा विषय शालेय शिक्षण विभागाचा आहे असे सांगू नये. कारण शासनाने मान्य केलेली ही धोरणात्मक बाब आहे. कोकणातील लोकांचा हक्काचा विषय असल्यामुळे एच.एस.सी. मंडळ आपण केव्हा देणार आहात ते सांगावे. तसेच, मार्च 2011 मधील परीक्षा कोकण एच.एस.सी. च्या मंडळाच्या वतीने घेण्यात येतील असे शासनाने जाहीर करावे अशी विनंती करतो. व सभापती महोदय, आपण मला पुरेसा वेळ दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : सायंकाळी 5.30 वाजता प्रस्तावावरील माननीय सदस्यांची भाषणे संपल्यानंतर मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण सुरु होईल. मंत्रिमहोदयांनी उत्तराच्या भाषणाकरिता 45 मिनिटांचा वेळ मागितला आहे. या प्रस्तावावर अनेक माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. तसेच, शासकीय विधेयके व अन्य कामकाज शिल्लक आहे. त्यामुळे सर्व माननीय सदस्यांनी आपले विचार थोडक्यात मांडावेत अशी माझी सर्वांना विनंती आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, दुपारी 3.40 वाजता या प्रस्तावावर चर्चा सुरु झाली आहे. तसेच, या प्रस्तावावरील चर्चेची वेळ दुपारी 3 ते 5 असल्याचे सांगण्यात आले असता आम्ही वेळ वाढवून देण्याची मागणी केली होती.

**तालिका सभापती** : सायंकाळी 5.30 पर्यंत वेळ वाढवून देण्यात आली आहे.

श्री. हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 260 अन्वये कोकणच्या विकासासंदर्भात प्रस्ताव मांडला आहे.त्या संदर्भात सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. यापूर्वी देखील या प्रस्तावावर अनेक वेळा चर्चा झाली होती परंतु त्या चर्चेमधून फारसे काही निष्पन्न झाल्याचे दिसत नाही. महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर पहिल्यांदाच या कोकणाला अर्थ मंत्री लाभले आहेत. त्यामुळे या चर्चेच्या माध्यमातून अनेक माननीय सदस्यांनी माननीय अर्थ मंत्री श्री.तटकरे साहेबांकडे अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.

(यानंतर श्रीमती थोराम)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई...

सभापती महोदय, मी थोडक्यात माझे विचार मांडणार आहे. महाराष्ट्राच्या मागास विभागांसाठी वैधानिक विकास मंडळ निर्माण व्हावेत यासाठी मी अनेक वेळा जेलमध्ये गेलेलो आहे. कोकण वैधानिक विकास मंडळ व्हावे म्हणून आमचा आग्रह होता. वैधानिक विकास मंडळाच्या संदर्भात घोषणा झाल्यानंतर मराठवाडयासाठी आणि विदर्भासाठी वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यात आले पण कोकणला उर्वरित महाराष्ट्रामध्ये टाकण्यात आले. उर्वरित महाराष्ट्रामध्ये पश्चिम महाराष्ट्र येतो. पश्चिम महाराष्ट्रातील काही भाग मागासलेला असला तरी त्याची वेगळी व्यवस्था करता आली असती परंतु कोकणला त्यामध्ये टाकण्यात आले. त्यामुळे वैधानिक विकास मंडळाचा कोकणला काहीही फायदा झालेला नाही. कोकणसाठी वेगळे वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यात यावे यासंदर्भात पुन्हा दोन्ही सभागृहाचे ठराव झालेले आहेत तेव्हा केंद्र शासनाकडे या संदर्भात आग्रह धरुन कोकणसाठी वेगळे वैधानिक विकास महामंडळ स्थापन होणे आवश्यक आहे.

कोकणच्या विकासाचा विचार करीत असताना कुठे तरी विकासाच्या निकषासंबंधी देखील विचार करण्याची आवश्यकता आहे. उदाहरणार्थ चिपळूनमध्ये कोयनेचे पाणी मोठया प्रमाणात समुद्राकडे वहात जाते ते लिफ्ट करावे आणि समोरच्या डोंगराकडे आणावे यासाठी एक स्कीम तयार केली होती. त्या स्कीमचा गेली दहा वर्षे पाठपुरावा करण्यात येत आहे पण ती निकषामध्ये बसत नाही म्हणून ती स्कीम घेतली गेली नाही. ही स्कीम घेण्यात यावी यासाठी मी माननीय श्री. शरद पवार यांचे कडे दिल्लीला गेलो होतो. त्या स्कीमसाठी त्यावेळी फक्त 60 हजार रुपये खर्च येणार होता. माननीय श्री. पवार साहेब मला असे म्हणाले की, तुम्ही ही स्कीम सहकार तत्वावर का करीत नाही. मी म्हटले आमच्याकडचे सहकार क्षेत्र मजबूत नाही. आपण एक पायलट स्कीम द्यावी.त्यानंतर त्या स्कीमचे कसे फायदे आहेत हे आम्ही लोकांच्या लक्षात आणून देऊ त्यानंतर सहकार तत्वावर स्कीम करु पण दुर्दैवाने त्या स्कीमच्या संदर्भात काहीही झालेले नाही. दुर्दैव असे की, लघु पाटबंधाऱ्याच्या संबंधात जे निकष आहेत त्या निकषानुसार कोकणात ही स्कीम होऊ शकत नाही. म्हणून आज कोयना नदीचे सगळे पाणी समुद्राकडे जात आहे तेव्हा या पाण्याचा विचार करण्यात यावा अशी माझी सूचना आहे.

..2..

श्री. हुसेन दलवाई....

सभापती महोदय, कोकणा संबंधीचा विचार करीत असताना एका गोष्टीचा विचार केला पाहिजे की, कोकणात लेबर ओरिएंटेड उद्योग आणावयाला लागलो तर लोक त्यामध्ये भाग घेणार नाहीत. टेक्निकल उद्योग असतील डोक्याने काम करावयाचे असेल तर कोकणी माणूस उत्साहाने काम करतो. फळबागा करतो. गेल्या काही वर्षात या फळबागांना मोठया प्रमाणात गती मिळालेली आहे. कोकणात आंब्याचे उत्पादन इतके होते की, संबंध देशातून जितक्या आंब्याची निर्यात होते त्यापैकी 60 टक्के आंबा कोकणातून जातो तर काजू पंधरा टक्के जातो. कारण काजूवर प्रक्रिया करण्यासाठी या ठिकाणी जे कारखाने लागतात ते अभावानेच आहेत. काजूच्या बिया केरळला जातात. काजूच्या बोंडापासून मद्यार्क काढावा यासंदर्भात निर्णय झाला पण मद्यार्क निर्मितीची एकही फॅक्टरी कोकणात झालेली नाही.

सभापती महोदय, पर्यटनाच्या संदर्भात कोकणात गुहाघरला मोठया प्रमाणात लोक जातात पण तेथे चहा पिण्यासाठी रेस्टॉरन्ट नाही तर मग रहाण्याची व्यवस्थातर सोडाच. म्हणून मी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो की, त्या ठिकाणी ताबडतोब एमटीडीसीचा कॅम्प बांधण्यात यावा. सुट्टीच्या दिवसांमध्ये दापोलीला गेलो तर तेथील हॉटेलमध्ये किंवा रेस्टॉरन्टमध्ये रहाण्यासाठी जागा मिळत नाही इतक्या मोठया प्रमाणात पुणे व इतर ठिकाणाहून पर्यटक तेथे येतात. पण दुर्दैवाने तेथील स्थळापर्यंत जाण्यासाठी असलेल्या रस्त्यांची अवस्था इतकी वाईट आहे की, त्याचे वर्णन करणे कठीण आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई ....

ही सगळी स्थळे अत्यंत वाईट अवस्थेमध्ये आहेत. आपण पर्यावरणाच्या संदर्भात ही सगळी चर्चा करतो परंतु त्यासाठी ज्या सुविधा लागतात त्यांचा अभाव आहे. आपण मुंबई-गोवा रस्ता बघा. महाराष्ट्रामध्येच नव्हे तर संपूर्ण देशामध्ये सगळ्यात जास्त अपघात जर कोणत्या रस्त्यावर होत असतील तर ते या मुंबई-गोवा रस्त्यावर होतात. मी त्या रस्त्यावरुन नेहमी रात्रीचा प्रवास करीत होतो परंतु आता मला त्या रस्त्याने रात्रीचा प्रवास करण्याची भीती वाटते. कारण आता जास्त स्पीडच्या गाड्या आलेल्या आहेत तसेच मोठमोठे ट्रक आलेले आहेत. 28 ते 30 चाकांचे ट्रक आलेले आहेत आणि ते पार करीत असताना बऱ्याच वेळा अपघात होतात आणि माणसे मरतात. आता गणपती उत्सव जवळ येत आहे. त्या काळात बरेचसे अपघात त्या रस्त्यावर झालेले आपल्याला दिसतील. तो रस्ता ब्लॉक होतो. त्या रस्त्यावरुन जाणे-येणे अतिशय कठीण होते.

सभापती महोदय, कोकण रेल्वेची परिस्थिती अशी आहे की, आम्ही आमच्या मुलांना ती रेल्वे लांबून दाखववयाची एवढ्यापुरताच त्या रेल्वेचा आम्हाला उपयोग आहे. कारण त्या रेल्वेने आम्हाला प्रवास करता येत नाही. ती रेल्वे दक्षिणेमध्ये जाते. त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. ती रेल्वे तिकडे गेली पाहिजे तरच ती चालेल परंतु सावंतवाडी, रत्नागिरी, चिपळूण इथपर्यंत गाड्या सोडणे अत्यंत आवश्यक आहे. पण ते होत नाही. त्या रेल्वेचा कोकणाला फारसा उपयोग होत नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर लोक रस्त्याने प्रवास करतात आणि त्यासाठी हा रस्ता अपुरा आहे. मी या सभागृहाच्या माध्यमातून माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करु इच्छितो की, तो रस्ता चौपदरी जेव्हा व्हावयाचा तेव्हा होईल, त्याचे स्वप्न आम्ही बरीच वर्षे पाहात आहोत परंतु ताबडतोबीने एक गोष्ट करणे आवश्यक आहे. पाच वर्षाच्या अगोदर या सभागृहामध्ये मी सूचना केली होती की, किमान आताचा जो रस्ता आहे त्याच्या दोन्ही बाजूला पाच-पाच फूट रस्ता वाढविला पाहिजे. त्यासाठी फार खर्च येणार नाही. त्यामुळे तो रस्ता चौपदरी होणार नाही पण आताचा जो रस्ता आहे त्यापेक्षा रस्ता मोठा होईल आणि अपघात कमी होतील. त्यासाठी ताबडतोबीने तरतूद करणे सहज शक्य आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी ते करावे. याचा अर्थ तो

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई .....

रस्ता चौपदरी करण्याला आमचा विरोध आहे असा नाही. तो रस्ता चौपदरी झालाच पाहिजे पण जुना रस्ता सुध्दा चांगला होईल हे देखील पाहिले पाहिजे. जसे पुण्याला जाणारा जुना रस्ता चांगला केलेला आहे आणि नवीन रस्ताही चांगला आहे तशा पध्दतीने त्या ठिकाणी सुध्दा चांगला रस्ता होणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, 17 मे, 2000 साली रत्नागिरीला मंत्रिमंडळाची बैठक झाली होती. त्यावेळी मी मंत्रिमंडळामध्ये होतो. त्यावेळी अनेक मंत्री उपस्थित होते. त्यावेळी आम्ही खूप प्रयत्न करुन काही प्रश्न उपस्थित केले होते. त्यातील किती बाबी पूर्ण झाल्या याची मला कल्पना नाही. माझ्या माहितीप्रमाणे त्यापैकी काहीही झालेले नाही. त्यावेळेला असे ठरले होते की, 17 लहान बंदरे बांधावयाची तसेच 3 मोठी बंदरे बांधावयाची. त्यापैकी दिघी आणि जयगड ही बंदरे झालेली आहेत. त्यापेक्षा फारशी काही प्रगती झालेली नाही. तीन ठिकाणी मच्छिमारांसाठी कोल्ड स्टोअरेज निर्माण करण्याच्या संदर्भात निर्णय झालेला होता पण एकाही ठिकाणी कोल्ड स्टोअरेज झालेले नाही.

सभापती महोदय, संपूर्ण कोकण भागामध्ये 26 ऊर्जा प्रकल्प येणार आहेत. म्हणजे कोकणातील पर्यावरण सगळे संपणार आहे. याचा अर्थ कोकणामध्ये उद्योगधंदे आणण्यासाठी आमचा विरोध आहे असा नाही. पण सगळे पर्यावरण संपविणारे उद्योग आमच्याकडेच कशाला येतात हा प्रश्न जरुर मला विचारावासा वाटतो. कोकणामध्ये अनेक केमिकल उद्योग आलेले आहेत. महाड, लोटे-परशुराम, रोहा या ठिकाणी अशा प्रकल्पांनी उच्छाद मांडलेला आहे. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. धरमतर खाडीच्या संदर्भात काय चालले आहे तसेच नागोठणे येथे काय चालले आहे, हे माननीय मंत्रिमहोदयांना चांगले माहीत आहे. मी असे म्हणेन की, त्या भागात यापुढे केमिकल उद्योग येणार नाही असे बघावे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. चंद्रकांत पाटील )**

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई....

ऊर्जा प्रकल्पाला आमची हरकत नाही. परंतु त्याच्यापासून पर्यावरणाला धोका निर्माण होणार नाही ते पाहिले पाहिजे. आज कोकणात अनेक ठिकाणी जंगलतोड सुरु आहे. ही जंगलतोड बंद करु अशी या सभागृहात घोषणा केलेली आहे. आपल्याकडे तो कायदाच आहे. पण त्या उद्योगांनी तो कायदा मानला नाही. त्यांच्यामार्फत मोठया प्रमाणात जंगलतोड सुरु आहे. वन विभागाचे अधिकारीच अशी ऑर्डर झालेली नाही असे म्हणतात ही चिंतनीय बाब आहे. गरजेनुसार काही ठिकाणी झाडे तोडावीत, परंतु कोकणातील उद्योगधंदे कोळशावर चालू नयेत यासाठी कोळसा महाग केला जातो आणि मोठया प्रमाणावर लाकूड तोडले जाते आणि लाकूड तोडणारे गब्बर झाले आहेत. हे तातडीने थांबले पाहिजे.

सभापती महोदय, कोकणामध्ये नैसर्गिकरित्या विकास होऊ शकतो. फलोत्पादनाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर केवळ आंबा व काजूचे पीक वाढलेले आहे. परंतु आवळा, चिंच, जांभूळ,करवंद ही पिके सुध्दा कोकणात मोठया प्रमाणावर आहेत. या फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग निर्माण होणे गरजेचे आहे. फळ प्रक्रिया करण्याची केंद्र सरकारची योजना आहे. परंतु कोकणात फळ प्रक्रिया उद्योग आलेले नाहीत. करंजाडी, ता.संगमेश्वर येथे ठाकूर यांच्या मालकीचे अद्ययावत फळ प्रक्रिया केंद्र आहे. तेथे काजूवर प्रक्रिया केली जाते. तरी सुध्दा आपल्याकडील काजू प्रक्रिया करण्यासाठी केरळला जातो. हे फळ प्रक्रिया केंद्र कोकणात होण्यासाठी मार्गदर्शन झाले पाहिजे आणि योग्य तेवढा निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे.

सभापती महोदय, पर्यटनाचा विकास करीत असताना केवळ ताजमहाल उभे करण्याऐवजी इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करण्याचा विचार झाला पाहिजे. कोकणामधील मत्स्योद्योगाला मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. रत्नागिरी जिल्हयात नाईक फिशरीज व गर्दे फिशरीजने मोठे काम केलेले आहे. हा उद्योग वाढण्यासाठी शासनाने सुविधा दिल्या पाहिजेत अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, उरणच्या मच्छिमारांच्या प्रश्नासंबंधी मी माननीय मंत्री महोदयांना एक वर्षापूर्वी भेटलो होतो. त्या मच्छिमारांचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्यांच्या भागातील रासायनिक उद्योगांमुळे त्यांचे नुकसान झालेले आहे. जे सरकारी उद्योग आहेत

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई....

त्यांच्याकडून नुकसान भरपाई मिळण्याची त्यांची मागणी आहे. त्या कंपन्या नुकसान भरपाई देण्यास तयार आहेत. परंतु राज्याचा मत्स्योद्योग विभाग त्यादृष्टीने हालचाल करीत नाही. हे अधिकारी त्यांना दाद देत नाहीत, त्या लोकांना तेच तेच उत्तर देत आहेत. यासंदर्भातील प्रस्ताव तयार करावा असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगून सुध्दा त्यासंबंधीचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला नाही. या प्रश्नाकडे मंत्री महोदयांनी लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, यानंतर बेदखल कुळांसंबंधी मी बोलणार आहे. यासंबंधीचा निर्णय झाला आहे, परंतु तो अपूर्ण निर्णय आहे. त्याची नीट अंमलबजावणी होत नाही, ती झाली पाहिजे. त्याचप्रमाणे शामराव पेजे कुणबी महामंडळ निर्माण करण्याचा निर्णय जाहीर झाला होता, प्रत्यक्षात हे महामंडळ अद्याप अस्तित्वात आलेले नाही. कुणबी समाज मागासलेला आहे, या समाजाची संख्या मोठी आहे. त्यांच्यासाठी काही तरी करावयाचे असेल तर शासनाने हे महामंडळ अस्तित्वात येण्यासंबंधी तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये दुर्गम भाग आहे. शासनाने शाळांच्याबाबत अशी अट अशी घातलेली आहे की, 1 कि.मी.पर्यंत प्राथमिक शाळा असेल तर तेथे दुसरी शाळा घेता येणार नाही.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 16:50

(श्री. हुसेन दलवाई...

कुणब्यांच्या वस्त्या अशा डोंगर कपा-यामध्ये आहेत की तेथून 1 कि.मी.वरील शाळेत देखील मुलगा येऊ शकत नाही. 1 कि.मी.अंतर हे देखील अतिशय जास्त होते. म्हणून ही 1 कि.मीची अट आणि 3 कि.मी.ची अट देखील शिथिल करावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो. तसेच शाळातील वर्गामधून अमूक इतकेच विद्यार्थी असले पाहिजेत ही अट देखील शिथिल करावी. कोकण हा भाग असा आहे की, तेथील लोकसंख्या घटण्याचे प्रमाण जास्त आहे. तेव्हा कोकणाला जास्तीत जास्त इन्सेन्टीव्हज् द्यावेत एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी, सन्माननीय सदस्य सर्वश्री. हुसेन दलवाई, अनिल तटकरे, विजय सावंत आणि अन्य सन्मानीय सदस्यानी नियम 260च्या प्रस्तावान्वये कोकणाच्या विकासाच्या संदर्भात जी चर्चा येथे उपस्थित केलेली आहे त्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये कोकणाच्या विकासाच्या संदर्भात अनेकदा चर्चा झालेली आहे. माझ्या सहका-यांनी या चर्चेमध्ये भाग घेत असताना जे जे काही मुद्दे मांडलेले आहेत त्या मुद्यांची पुनरावृत्ती मी करणार नाही. परंतु काही महत्वाच्या मुद्यांकडे मी जरुर आपले लक्ष वेधू इच्छितो. सभागृहामध्ये माननीय अर्थमंत्री उपस्थित आहेत आणि ते देखील कोकणातील आहेत. कोकण पॅकेज-कोकण पॅकेज हा शब्द मी अनेक वर्षापासून ऐकतोय. कै. शंकराव चव्हाण हे राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी 1988 सालामध्ये फलोत्पादनाच्या माध्यमातून कोकणाला विशेष सहाय्य म्हणून कोकण पॅकेज जाहीर केले होते. तेव्हा पासून कोकण पॅकेज हा शब्द प्रचलित झाला आणि त्यानंतर तो शब्द इतका परवलीचा झाला की प्रत्येक जण तो शब्द वापरायला लागला. कै.शंकरराव चव्हाण यांनी जे काम सुरु केले ते अगदी श्री. शरद पवार, श्री. मनोहर जोशी यांच्या पासून आतापर्यन्त चालू आहे. आता माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी 2009 व 2010 या वर्षाकरिता कोकणासाठी पॅकेज जाहीर केलेले आहे. त्या पॅकेजचे पैसे कोकणाला मिळतील. अर्थमंत्री हे देखील कोकणाचे असल्यामुळे ते पैसे मिळण्याची जास्त खात्री वाटते. हे सांगण्याचे कारण असे आहे की, युतीच्या काळामध्ये हजारो कोटीच्या घोषणा केल्या गेल्या.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 16:55

श्री.भाई जगताप..........

त्या काळात कोकण विकासासाठी ३१३२ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. त्या साडेचार वर्षाच्या काळात या राज्याचे दोन्ही मुख्यमंत्री हे कोकणातील होते. असे असताना दुर्दैवाने त्या पॅकेजपैकी २० टक्के निधी देखील कोकणापर्यंत पोहोचू शकला नाही ही वस्तुस्थिती तुम्हा आम्हाला नाकारता येणार नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही यावर डिबेट करावयाचे का?

श्री.भाई जगताप : मी कोकण पॅकेजच्या संदर्भात बोलत आहे. माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळेल त्यावेळी त्यांना या विषयावर बोलता येईल. युती काळात काय झाले हे जसे सांगितले तसे मी देखील हे सांगू इच्छितो की, माननीय श्री.विलासराव देशमुख यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात कोकणासाठी घोषणा झाल्या, परंतु त्या घोषणांप्रमाणे अनेक गोष्टी झाल्याच नाहीत हे मी फार जबाबदारीने आणि आत्मियतेने बोलतो. माझा बोलण्याचा रोख युती शासनाबद्दल नव्हता. आतापर्यंत काय झाले हा महत्वाचा विषय आहे. मला एका गोष्टीबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांना धन्यवाद द्यावेसे वाटतात. त्यांनी ३०० कोटी रुपयांचा निधी कोकणासाठी जाहीर केला आणि प्रत्यक्षात तेवढा निधी उपलब्ध करुन दिला. कोकणासाठी त्यांनी जे औदार्य दाखविले तो भाग महत्वाचा आहे. माननीय महसूलमंत्री श्री.नारायण राणे हे विधानसभेचे विरोधी पक्षनेता असताना विरोधी पक्षाच्या आमदारांकडून प्रस्ताव मागवून त्याप्रमाणे ३०० कोटी रुपये खर्च करण्याचे काम या शासनाने केले, हे नाकारता येणार नाही. माननीय अर्थमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. ते मनापासून प्रयत्न करीत आहेत. त्यांनी चांगला अर्थसंकल्प मांडून कोकणाला झुकते माप दिले, याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. अर्थमंत्री या नात्याने त्यांना राज्याचा गाडा पुढे चालवायचा आहे. मागील २० वर्षाच्या काळात कोकण विकासासाठी हजारो कोटी रुपयांच्या घोषणा झाल्या, परंतु कोकणापर्यंत निधी पोहोचला नाही. याबद्दलची खंत मनात आहे. त्याबद्दलच्या आमच्या भावना समजून घ्याव्यात. पर्यटन, फलोत्पादन, पाटबंधारे प्रकल्प असतील त्या संदर्भातील निधी शासनाने उपलब्ध करुन दिला तर एका अर्थाने कोकणाला न्याय दिल्यासारखे होईल. मी कोणताही राजकीय अभिनिवेष न बाळगता माझे विचार मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

..२..

श्री.भाई जगताप..........

सभापती महोदय, कोकणातील पर्यटन, फलोत्पादन, मत्स्य व्यवसाय ही बलस्थाने आहेत. या बलस्थानांच्या विकासासाठी आतापर्यंत शासनाने काय केले? फारसे काही केले नाही असेच उत्तर देता येईल. पर्यटनाबाबत नेहमी गोव्याचे उदाहरण दिले जाते. गोवा राज्याचे क्षेत्रफळ फक्त १०७ चौरस कि.मी. आहे. परंतु कोकणातील एक-एक जिल्हा १४० चौरस कि.मी.चा आहे. प्रत्येक जिल्हयाला निसर्गसौंदर्याने नटलेली पर्वतराजी आणि समुद्रकिनारा लाभलेला आहे. जागतिक पर्यटनाबाबत चर्चा करीत असताना सागरी किनाऱ्याचे, पर्वतराजीचे उदाहरण दिले जाते. आपण पर्यटनाच्या निमित्ताने अशा ठिकाणी वास्तव्य करीत असतो. परंतु कोकणातील या क्षेत्राचा विकास करण्यासाठी ज्या घोषणा दिल्या त्यासाठी आवश्यक असलेला निधी कोण देणार? मी माननीय अर्थमंत्र्यांना विनंती करणार आहे, त्यांनी पर्यटनाकडे जास्तीत जास्त लक्ष दिले पाहिजे. पर्यटन हा जगभराचा विषय झालेला आहे. अनेक राष्ट्रांची अर्थव्यवस्था पर्यटनावर अवलंबून आहे. माननीय अर्थमंत्री अभ्यासू आहेत. आम्हाला त्यांच्याकडून खूप शिकायला मिळाले आहे. मला जे काही ज्ञात आहे ते मी याठिकाणी शेअर करु इच्छितो.

नंतर ३जे.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ......

जगभराच्या अर्थव्यवस्थेत 30 ते 40 टक्के वाटा हा टुरिझमचा असतो. आमच्या कोकणात अशा टुरिझम डेव्हलपसाठी सगळे काही आहे पण आम्ही त्याचा उपयोग किवा ते विकसित करण्यासाठी काही गोष्टी करीत नाहीत हीच आपली मानसिकता आहे. आपण या ठिकाणी इको टुरिझमसंबंधी बोलतो, बीच टुरिझमबाबत चर्चा करतो पण हे सर्व काही कोकणात होऊ शकते याचा विचार करुन त्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. सिंगापूर, सँटोसाला आपण जातो तेथे असलेले अंडर वॉटर ॲक्वेरियम पाहिले तर एक-दीड तास कसा निघून जातो हे लक्षातच येत नाही. अशा अनेक साईट्स कोकणात आहेत. अशा प्रकारच्या साईट्स आपल्याकडे ऑलरेडी आहेतच पण त्याकडे टुरिझमच्या माध्यमातून पाहणे व त्या विकसित करण्याची गरज आहे. माझे अनेक सहकारी मला सांगतात की, कोकणात फिरण्यासाठी खूप काही आहे, पाहण्यालायक बरेच आहे पण राहण्याची सोय नाही, इन्फ्रॉस्ट्रक्चर विकसित झालेले नाही. अशा प्रकारे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे मरिन टुरिझम, क्रुझ टुरिझमबाबत सुध्दा कोकणात विचार करता येईल. लॉर्ज ॲक्वेरियम प्रोजेक्टचा जो उल्लेख केला असे अनेक प्रोजेक्ट कोकणात घेता येऊ शकतात. कोकणात सर्वात महत्वाचे म्हणजे सह्याद्री माऊंटेन, वेस्टर्न गड आपण ज्याला म्हणतो तो पर्वत. आपण नशिबवान आहोत की कोकणात प्रचंड प्रमाणात पाऊस पडतो आणि ही निसर्गाची देणगीच आहे. दुसऱ्या देशात जे वेगवेगळे प्राणीसंग्रहालये आहेत त्यांचे जतन ज्याप्रकारे केले जाते तशाच प्रकारे आपण आहे त्या निसर्गाचे जतन केले तरी कोकणाच्या विकासात मोठया प्रमाणात भर पडेल. अनेक सन्माननीय सदस्यांनी येथे उल्लेख केला की कोकणात जाणारा रस्ता चौपदरी केला पाहिजे. मग त्यासाठी आपल्याला मुंबई-आग्रा रोडवर ज्याप्रमाणे माननीय शरदचंद्र पवार साहेब अडकून पडले होते त्यानंतर पटापट चक्रे फिरली आणि तो रस्ता चौपदरी झाला. त्याप्रमाणे मंत्री महोदयांनी देखील कोकणात जाणाऱ्या रस्त्यात अडकावे अथवा माननीय मुख्यमंत्र्यांनी अडकावे मग तो रस्ता होऊ शकेल. पण त्यापेक्षा मंत्री महोदयांनी या रस्त्याच्या रुंदीकरणाचा विचार करुन हारस्ता चौपदरी करावा अशी मी विनंती करतो. कारण हा रस्ता चौपदरी होणे हे कोकणच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे, त्यासाठी जो जुना हायवे आहे तो तयार झाला तेव्हा अवजड वाहने त्यावरुन जात नव्हती परंतु आता वाहतूक वाढलेली

.....2.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

असल्याने रस्त्याची रुंदी ही देखील काळाची गरज आहे. कारण अशा रस्त्यावरुन जाणे म्हणजे जिविताशी खेळण्यासारखेच आहे. म्हणून कोकणातील इन्फ्रास्ट्रक्चर वाढले पाहिजे, एकदा शक्य नसल तर टप्प्याटप्प्याने हा रस्ता चौपदरी करावा आणि त्यातील पहिला टप्पा म्हणजे महाड, चिपळूण ते रत्नागिरी यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा विचार करावा. आणखी मी अशीही विनंती करतो की, सन्माननीय सदस्य श्री. हुसैन दलवाई यांनी कोकणातील केमिकल इंडस्ट्रीजच्या बाबतीत सांगितले. संपूर्ण राज्यात आज जवळपास 76 एसईझेड मंजूर झालेले आहेत व त्यापैकी 36 एसईझेड एकट्या कोकणात आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

श्री. भाई जगताप .....

कामगारांचा विषय असल्यामुळे या विषयाच्या संदर्भात मला अधिक माहिती आहे. कोकणात 36 एसईझेड प्रकल्प येणार आहेत परंतु कोकणी माणसाने नेहमीच आंदण देण्याची भूमिका स्विकारावयाची का ? कोकणामध्ये जे छोटे छोटे प्रकल्प झाले त्यामध्ये सुध्दा कोकणी माणूस वंचित राहिलेला आहे, कोकण रेल्वेपासून ते सर्व प्रकल्पामध्ये कोकण भूमी पुत्रांवर अन्याय झालेला आहे, कोकण भूमी पुत्र वंचित राहिलेला आहे. कोकणात जे 36 एसईझेड प्रकल्प येणार आहेत त्यासाठी हजारो एकर जमीन लागणार आहे. या एसईझेड प्रकल्पासाठी लागणा-या जागेसाठी शासनाने धोरण आखलेले आहे. एसईझेडच्या बाबतीत शासनाचे नक्की धोरण काय आहे याची सुध्दा जनतेला माहिती मिळणे आवश्यक आहे. कोकणाच्या सर्वांगीण विकासामध्ये एसईझेडची महत्वाची भूमिका असेल तर कोकणीतील तरुणाला, शेतक-याला, कोकणी नागरिकाला आपण कसे त्यामध्ये अंतर्भूत करणार आहात याचीही माहिती मिळण्याची आवश्यकता आहे.

परवा माननीय अजित पवार यांनी जैतापूरच्या औष्णिक प्रकल्पाच्या जमिनीच्या संदर्भात सांगितले होते की, "या ठिकाणच्या जमिनींची खरेदी बाजार भावाने झाली होती परंतु अशा प्रकारची खरेदी सुध्दा अयोग्य आहे. त्या ठिकाणच्या शेतक-याला जास्तीच्या दराने पैसे मिळाले पाहिजे, बाजार भावानेच नव्हेत तर पुढील 5-10 वर्षाचा विचार करुन जमिनीच्या किमती किती दिल्या जातील" असे त्यांनी सांगितले होते. या ठिकाणी कोकणाच्या विकासाच्या संदर्भात चर्चा करीत असतांना मला सांगावयाचे आहे की, माननी वित्त मंत्री हे सुध्दा कोकणातीलच आहेत. आपल्याला कोकणाबद्दल प्रचंड तळमळ आहे. राजकारणाच्या गोष्टी आपापल्या जागी असतील परंतु कोकणाच्या विकासाच्या बाबतीत सर्व सदस्यांच्या भावना सारख्याच आहेत. फिशरीज टर्मिनल्सच्या बाबतीत या ठिकाणी उल्लेख झालेला आहे. मला आपल्याला एकच गोष्ट सांगावयाची आहे की, कोकणाच्या फिशरीजचा विषय निघतो परंतु फिशरीचे मुख्यालय नागपूर येथे आहे.

फिशरीजवर संशोधन कोकणात होणार असेल आणि मुख्यालय नागपूरमध्ये असेल तर त्याला न्याय कसा काय मिळू शकेल ? जेथे पिकते तेथे विकत नसेल तर त्याचा काय उपयोग ? शासन जर विभागीय समतोल करीत असेल तर आमच्या कोकणाचा समतोल कधी साधला जाणार आहे ? आपण फिशरीज टर्मिनल ॲथोरिटी बनविणार

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

आहात त्यामध्ये कोकणातील 5-6 जिल्हयातील सन्माननीय सदस्यांना घेतले पाहिजे. कारण स्थानिक प्रश्नाची माहिती तेथील जनतेलाच जास्त असते. कोकणाच्या विकासाच्या बाबतीत माननीय वित्त मंत्र्याकडून खूप अपेक्षा आहे. आपण कोकणाच्या सर्व अपेक्षा पूर्ण करु शकला नाहीत तरी सुध्दा कोकणासाठी आपण निधी उपलब्ध करुन द्याल अशी अपेक्षा व्यक्त करतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो व येथेच थांबतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र, जय कोकण

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांची लिंक लागलेली होती व ती मला तोडायची नव्हती म्हणून थांबलो होतो. परंतु आपल्या वक्तव्यामध्ये एक छान गोष्ट आपण व्यक्त केली आहे. पक्ष प्रमुखाचे आपल्या पक्षात एक वेगळेच स्थान असते. पक्ष प्रमुखासाठी पक्षातील व्यक्ती सर्व काही करण्यास तयार असतात. नाशिकच्या घाटात माननीय शरद पवार साहेब अडकल्यानंतर माननीय भुजबळानी जाहीर केले होते की, "हा रस्ता मोठा करुन या ठिकाणावरुन माननीय पवार साहेबांची गाडी थ्रू घेऊन जाईल". मला आज एका गोष्टीचा आंनद झाला आहे की, माननीय श्री. तटकरे साहेब कर्तृत्वाने आहेत हे सगळयांना माहिती आहे व आज श्री. भाई जगताप यांनी मा. श्री.तटकरेसाहेबांना पवार साहेबांच्या पंगतील नेऊन बसवले व पक्षातील इतरांपेक्षा ते किती श्रेष्ठ आहेत हे सांगितले. त्यांना अडकवले म्हणजे कोकणाचा विकास होईल असे आपण वक्तव्य केले. परंतु या ठिकाणी उपस्थित असलेले मा.श्री.भास्कर जाधव साहेबांना त्यांनी टाळले त्याबद्दल मला वाईट वाटते.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता पाच वाजले आहेत. या सभागृहात आज दोन निवेदने होणार होती परंतु अजूनर्यंत झालेली नाहीत. कोकणाची चर्चा संपल्यानंतर कदाचित हे अधिवेशन संपून जाईल. काल निवेदन होणार होते परंतु काल न होता ते आज होईल असे सांगण्यात आले. आज 1.00 वाजता निवेदन होणार होते परंतु अधिवेशन संपण्याची वेळ आली तरी सुध्दा निवेदन होत नाही असे जर शासनाकडून चालणार असेल तर ते योग्य नाही. सभागृहाला दिलेला शब्द शासनाकडून पाळला जात नसेल तर ते योग्य नाही. दोन्ही निवेदने केलर जाईल असे सरकार तर्फे सांगण्यात आले होते. यासंदर्भात माननीय सभापती महोदयांनी निर्देश दिले होते. काल छत्रपती शिवाजी महारांजाच्या संदर्भात निवेदन होणार होते परंतु कालचे निवेदन आजवर ढकलण्यात आले परंतु आता पाच वाजले तरी सुध्दा शासनाकडून त्यासंदर्भात निवेदन झालेले नाही. त्यामुळे आम्ही नेमके काय समाजायचे ?

प्रा. फौजिया खान : सभागृहाची बैठक संपण्या पूर्वी निवेदन केले जाईल.

श्री. दिवाकर रावते : सदर निवेदन सर्क्यूलेट करण्यात यावे एवढेच आम्ही सांगितलेले आहे. सर्क्यूलेट का होत नाही ते कळत नाही ? छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात निवेदन झाले तर आम्हाला त्याचा आनंद होईल.

प्रा. फौजिया खान : सभागृहाचे कामकाज संपण्याच्या पूर्वी निवेदन केले जाईल.

यानंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर विभाग) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी, श्री.हुसेन दलवाई, श्री.अनिल तटकरे आणि इतर सन्माननीय सदस्यांनी कोकणाच्या विकासासंबंधीचा नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. कोकणाच्या विकासाठी काय काय करणे गरजेचे आहे ते सांगण्याचा प्रयत्न या प्रस्तावाच्या माध्यमातून केला आहे. या सदनात कोकणातील अनेक सन्माननीय सदस्य आहेत. कोकणातील आंबा, भात, पर्यटन, रस्ते, आरोग्य सेवा इत्यादी प्रश्नावर सभागृहात चर्चा होते. हत्ती आला, माकड आला तरी चर्चा होते. पण प्रश्न काही सुटत नाही. हे आमचे दुर्दैव आहे. आम्ही आमदार म्हणून कमी पडतो की काय ? असा प्रश्न त्यामुळे माझ्या मनात निर्माण होतो. सदनात कोकणातील सर्व पक्षीय आमदार आहेत. त्याचे नेतृत्त्व माननीय मंत्री महोदय, श्री.सुनील तटकरे यांच्याकडे दिले आहे असे दिसते. सध्या त्यांच्याकडे राज्याची तिजोरी आहे. पण राज्याच्या तिजोरीतून कोकणाच्या विकासासाठी पैसा येत नाही, तेथे पायाभूत सुविधा विकसित केल्या जात नाही. कोकण विकास महामंडळ सुरू होते. ते बंद झाले. ते पुनरूज्जीवित होणार आहे काय ? असा माझा या निमित्ताने सवाल आहे. हा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांच्यासह अनेकांनी मांडला आहे. खरे म्हणजे कोकण विकास महामंडळ सुरू व्हायला पाहिजे होते. याचे कारण दोन्ही सभागृहाने 2 वेळा एकमुखाने ठराव पास केला आहे. तरीही कोकण विकास महामंडळ होत नाही, हे आमचे दुर्दैव आहे. त्यामुळे श्री.तटकरे साहेब, आता आपल्या कोर्टामध्ये बॉल असल्यामुळे एक तरी घोषणा कोकणचे मंत्री म्हणून करावी. ती घोषणा घेऊन कोकणातील आमदार आपल्या मतदार संघात जातील. कोकण विकास महामंडळ स्थापन करण्यात येईल अशी जरी घोषणा केली तरी ते या अधिवेशनाचे फलित ठरेल.

सभापती महोदय, येथे सन्माननीय सदस्यंनी अनेक प्रश्न मांडले आहेत. तथापि, एक प्रश्न मांडण्याचा राहिला आहे. कोकणातील महामार्गावर होणाऱ्या अपघातासंबंधी सगळ्यांनी विचार केला. दरवर्षी 1200हून अधिक अपघात होतात. हे अपघात वाळू उपसा ट्रकमुळे होतात ही गोष्ट दुर्लक्ष करून चालणार नाही. कोकणामध्ये वाळू उपसा फार मोठ्या प्रमाणात वाढत आहे, हे आकडेवारी बघितल्यानंतर लक्षात येईल.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

त्याठिकाणी अपघात होऊ नये म्हणून काय व्यवस्था केलेली आहे ? कोकणात होणारे अपघात हे वाहनचालकांच्या चुकीमुळे किंवा अरुंद रस्त्यामुळे होत असले तरी त्यामध्ये जे जखमी होतात त्यांचा प्रथम जीव वाचविला पाहिजे अशी शासनाची मनोमन इच्छा आहे काय ? कोकणात ट्रॉमा केअर सेंटर नाही. आज कोकणात एकही वैद्यकीय महाविद्यालय नाही त्यामुळे आरोग्यासाठी लागणारे इन्स्फ्रास्ट्रक्चर मिळत नाही. कोकणात आरोग्य विषयक बेसिक सुविधा नाहीत. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने कोकणात वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यास सांगितले. आपण लातूर आणि अकोला येथे वैद्यकीय महाविद्यालय उभी केली त्यास माझा विरोध नाही. प्रत्येकाला आरोग्य विषयक सुविधा मिळाल्या पाहिजेत. परंतु अशी व्यवस्था कोकणामध्ये का करण्यात आली नाही हा खरा प्रश्न आहे. आज कोकणात सीटी स्कॅन, एम.आर.आय. टेक्निशिअन्स, डॉक्टर्सची मागणी केल्यावर आमच्या तोंडाला पाने पुसली जातात.

सभापती महोदय, कोकणातील अलिबाग रायगड, रत्नागिरी, देवगड, कणकवणली, बांदा इत्यादी तालुक्यांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा नाही. माननीय वित्त मंत्री महोदयांच्या माणगाव तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्र नाही. चिपळूण येथे वालावलकर हॉस्पीटल आहे परंतु ते शासकीय हॉस्पीटल नाही. प्रसुतीच्या वेळी अनेक महिला मृत्युमुखी पडत आहेत. कारण आपल्याकडे तज्ज्ञ डॉक्टर्स नाहीत. तज्ज्ञ डॉक्टर्स का येत नाहीत याचे उत्तर आपल्याकडे डॉक्टरांकरिता राहण्याची चांगली सोय नाही. सभापती महोदय, याठिकाणी कोकणातील युरॉलॉजिस्टसबंधीचा प्रश्न उपस्थित झाला होता. कोकणात युरॉलॉजिस्ट नाहीत.परंतु कोल्हापूरमध्ये 16 युरॉलॉजीस्ट आहेत. इतकी विषमता का याचे उत्तर देताना मंत्रिमहोदयांनी सांगितले होते की, आपल्याकडे मूतखड्याचे प्रमाण फक्त 0.2 टक्के आहे. त्यामुळे आम्ही युरॉलॉजिस्ट देऊ शकत नाही. माननीय आरोग्य मंत्र्यांनी असे उत्तर दिले होते आणि ते रेकॉर्डवर आहे. कोकणातील माणूस, माणूस नाही काय ? त्यावेळी बराच गदारोळ झाला. तेव्हा कोकणातील आरोग्य विषयक प्रश्नावर एक चर्चा घेण्याचे ठरले, परंतु ती चर्चा होऊ शकली नाही. आज कोकणातील माणसाला हॉर्ट ॲटक आला तर त्याला उपचारासाठी गोवा किंवा कोल्हापूरमध्ये न्यावे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

लागते आणि वाटेतच त्याचा मृत्यू होतो. डोळ्याला काही इजा झाल्यास त्याला मुंबईला उपचारासाठी यावे लागते. कोकणात आय.सी.यु.नाहीत. व्हेन्टीलेटर्स नाहीत, मॉनिटर्स नाहीत कोणत्याही प्रकारच्या बेसिक सुविधा नाहीत. माणगाव तालुक्यात आरोग्य केंद्रामध्ये व्हेन्टीलेटर्ससाठी लागणारी सिलेंडर्स नाहीत. गेल्या दोन वर्षापासून तेथील व्हेन्टीलेटर्स सिलेंडर्स अभावी पडून आहेत. मी परवाच त्याठिकाणी जाऊन आलो. माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांनी कणकवली येथे ट्रामा केअर सेंटरचे उद्घाटन केले.परंतु तेथे युरॉलॉजीस्ट नाही. कोकणात आरोग्य विषयक अशी परिस्थिती असेल तर कोकणातील माणूस कसा जगेल ? कोकणातील माणसाला अगदी छोट्या छोट्या कारणांसाठी मुंबईला यावे लागते. सरकारी दवाखान्यामध्ये एक्स रे मशीन, एमआरआय सारख्या गोष्टी औषधाला सुध्दा मिळत नाही अशी परिस्थिती आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.अजित शिगम 17.20

डॉ.दीपक सावंत ...

सभापती महोदय, या नंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. कोकणातील आंबा पिकाचे नुकसान झाल्यानंतर संबंधित शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उपस्थित होत असतो व त्यावेळी हेक्टरी नुकसान भरपाई देण्यात येते. एका हेक्टरमध्ये किती झाडे लावावयाची ही पध्दत पूर्वी पासून ठरविण्यात आलेली आहे त्यामुळे हेक्टरी नुकसान भरपाई न देता प्रत्येक झाडा मागे नुकसान भरपाई देण्यात आली पाहिजे. दुसरी गोष्ट अशी की ही नुकसान भरपाई देत असतांना सात बाराचा उतारा मागण्यात येतो त्या उता-यावर दहा बारा व्यक्तीची नावे असतात त्यामुळे ही नुकसान भरपाई कोणाला द्यावयाची असा प्रश्न निर्माण होत असल्यामुळे प्रत्येक वेळी नुकसान भरपाईची ही रक्कम परत जाते. यामध्ये सुधारणा करण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी पुढाकार घ्यावा अशी माझी त्यानां विनंती आहे या विषयी माननीय महसूल मंत्र्यांना या पूर्वी आम्ही अनेकदा सागितले होते परंतु त्याचा काहीही उपयोग झालेला नाही. कोकणातील प्रश्न सोडविण्यामध्ये जर आपल्याला खरोखर रस असेल तर हा प्रश्न त्वरित सोडवावा असे मला पुन्हा एकदा सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला तिसरा महत्वाचा मुद्दा मांडावयाचा आहे . कोकणामध्ये कुणकेश्वर, हरिहरेश्वर, मार्लेश्वर, गणपतीपुळे आणि भराडी देवी इत्यादी देवस्थाने आहेत. या देवस्थानाच्या ठिकाणी अनेक भाविक लोक नेहमी जात असतात. श्रावण महिन्यामध्ये त्या ठिकाणी खूपच गर्दी असते तसेच संकष्टीच्या दिवशी गणपतीपुळे येथे प्रचंड गर्दी होत असते. परतु गणपतीपुळे सोडले तर इतर देवस्थानाचा विकास करण्यात आलेला नाही. या निमित्ताने मला असे सागावयाचे आहे की, पापभीरु आणि देवावर श्रध्दा ठेवणारे सर्वात जास्त लोक कोकणातील आहेत असे मानले जाते तेव्हा या देवस्थानाच्या विकासाचा माननीय मंत्र्यांनी विचार करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय,देवाकडे ज्याप्रमाणे मागणे मागितले जाते त्याप्रमाणे मी शासनाकडे एक मागणे मागत आहे कोकणातील सिंधुदूर्ग मधील विद्यार्थी कोल्हापूरच्या एस.एस.सी.बोर्डाच्या परीक्षेला बसतात.कोकणात सिंधुदुर्ग मध्ये एस.एस.सी.बोर्ड व्हावे यासाठी मागणी केली जाते परंतु

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

अजूनही ती मागणी पूर्ण झालेली नाही तेव्हा सिंधुदुर्ग साठी स्वतंत्र एस.एस.सी बोर्ड स्थापन करावे अशी विनंती करुन मी माझे भाषण सपवितो. धन्यवाद.

**तालिका सभापती ( श्री मोहन जोशी )** : 5.30 वाजता माननीय मंत्री महोदय उत्तर देण्यासाठी उभे राहतील तेव्हा सन्माननीय सदस्य श्री संजय केळकर यांनी भाषण सुरु करावे व दोन मिनिटात भाषण संपवावे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ( काकण विभाग पदवीधर ): सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड गुरुनाथ कुलकर्णी यांनी कोकणाच्या विकासाच्या संदर्भात नियम 260 अन्वये जी चर्चा उपस्थित केली आहे त्या चर्चेत भाग घेण्यासाठी आणि त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी माझे मुद्दे थोडक्यात मांडणार आहे. माननीय सदस्यांनी जी चर्चा उपस्थित केली आहे त्यातील विषय अत्यंत महत्वाचा आहे .नागपूरच्या अधिवेशनामध्ये देखील या विषयासबंधी चर्चा झाली होती परंतु पुढे काहीही प्रगती झाली म्हणून आता पुन्हा आवर्जून सन्माननीय सदस्यांनी ही चर्चा उपस्थित केली आहे.

सभापती महोदय, रायगड जिल्हयातील पनवेल शहर हे कोकणातील प्रवेशव्दार आहे .जे.एन.पी.टी.ची क्षमता वाढविण्यात आली असल्यामुळे या भागात ट्रकची वाहतूक मोठया प्रमाणावर वाढली आहे. ठाणें जिल्हयातील काही भाग कोकणामध्ये असला तरी ठाणे जिल्हा हा कोकणामध्ये धरला आहे की नाही असा मला प्रश्न पडतो. ठाणे जिल्हयाचे आठ तालुके दुर्गम भागात आणि किनारपट्टीवर येतात. महाराष्ट्राला 720 किलोमिटर लांबीची किनारपट्टी लाभली आहे त्यातील काही किनारपट्टी ठाणे जिल्हयातसुध्दा येते. परंतु ठाणे जिल्हयाची दखलच घेतली जात नाही असे आढळून आले आहे. वास्तविक ठाणे जिल्हा मोठा असल्यामुळे त्याचे विभाजन करावयास पाहिजे होते परंतु अजूनही ठाणे जिल्हयाचे विभाजन करण्यात आलेले नाही त्याचबरोबर ठाणे जिल्हा मुंबईत आहे की कोकणात आहे या बाबतीत प्रश्न निर्माण झाला असल्यामुळे ठाणे जिल्हयाची दुहेरी अवस्था निर्माण झाली आहे. वास्तविक पाहता ठाणे जिल्हा हा कोकणामध्ये आहे त्या जिल्हयाला किनारपट्टी आहे इतकेच नव्हे तर तो जिल्हा दुर्गम आणि डोंगराळ भागात आहे त्यामुळे ठाणे जिल्हयाच्या विकासाकडे शासनाने अधिक लक्ष दिले पाहिजे असे मला या चर्चेच्या निमित्ताने शासनाला सांगावयाचे आहे. जे.एन.पी.टी.ची क्षमता वाढविण्यात आल्यामुळे त्या भागातील ट्रकची वाहतूक मोठया प्रमाणावर वाढली आहे परंतु रस्त्याची दुरुस्ती व देखभाल ज्या प्रमाणात व्हावयास पाहिजे त्या प्रमाणात न झाल्यामुळे वाहतुकीचा खोळंबा होत असतो त्यामुळे रस्त्याच्या दुरुस्ती व देखभाल मोठया प्रमाणावर व्हावयास पाहिजे.

नंतर श्री.सरफरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

सभापती महोदय, कोकण रेल्वेच्या संदर्भात मी जास्त वेळ घेणार नाही. परंतु कोकण रेल्वेच्या प्रश्नासाठी आम्ही अनेक वेळा आंदोलन केले आहे, मागणी केली आहे. सावंतवाडीपर्यंत कोकण रेल्वेच्या गाडया वाढविल्या पाहिजेत म्हणून मागणी केली. निवसर येथील रेल्वेचा ट्रॅक खचल्याबाबत आपण रोज वर्तमानपत्रामध्ये बातमी वाचतो. दोन महिन्यापूर्वी मी रत्नागिरीच्या जिल्हाधिकाऱ्यांना भेटून एक पत्र दिले होते. त्याचप्रमाणे येत्या पावसाळयामध्ये या रेल्वे ट्रॅकवर अडचण निर्माण होणार आहे असे मी कोकण रेल्वेच्या अधिकाऱ्यांना भेटून सांगितले होते . आज दोन्ही बाजूनी रस्ते बंद आहेत असल्यामुळे गावातील लोकांना रेल्वे स्टेशनवर जाता येत नाही. तर मग हे रेल्वे स्टेशन आपण कशासाठी बांधले आहे? त्याकरिता त्याठिकाणी तात्काळ पूल बांधण्यात आला पाहिजे अशी तेथील लोकांची मागणी असून त्यांनी तसे निवेदन दिले आहे. त्याठिकाणी पाण्याचे साठे असून ते बुजवून त्याठिकाणी नवीन ट्रॅक टाकण्याचे काम सुरु आहे. परंतु भर पावसामध्ये पुन्हा ट्रॅक खचण्याचे प्रकार होत असल्यामुळे अडचणी निर्माण होतात. जिल्हाधिकाऱ्यांना या संदर्भात पत्र दिल्यानंतर त्यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना तात्काळ निदेश दिले. परंतु रेल्वेचे अधिकारी जिल्हाधिकाऱ्यांना व शासनाला अजिबात दाद देत नाहीत. म्हणून शासनाने त्याकडे तातडीने लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, कोकणातील अणु ऊर्जा प्रकल्पाबाबत अनेक माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. या प्रकल्पामध्ये कोकणातील बेकार तरुणांना काम मिळाले पाहिजे. त्याठिकाणी आय.टी. प्रशिक्षित तरुणांना रोजगाराची संधी मिळाली पाहिजे. आज तेथील 500 तरुण मुले आय.टी.चे प्रशिक्षण घेऊन मुंबई, पुण्यामध्ये रोजगारासाठी गेली आहेत. मागील आठवडयात मी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटून त्याठिकाणी आय.टी. इंडस्ट्रीसाठी, आय.टी. पार्कसाठी जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी केली. तसेच, रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिहयामध्ये आय.टी. पार्क निर्माण करण्यासाठी परदेशातील लोकांबरोबर टेलिकॉन्फरन्सिग केले. ते लोक कोकणामध्ये आय.टी. पार्कची उभारणी करण्यास तयार आहेत. परंतु त्याकरिता एम.आय.डी.सी. जमीन देत नसल्यामुळे कोकणामध्ये आय.टी. पार्क उभे राहू शकत नाहीत. म्हणून तातडीने आय.टी. पार्कची मागणी आपण मान्य करुन कोकणामध्ये आय.टी. इंडस्ट्री वाढविण्यात यावी आणि त्याव्दारे कोकणातील बेकार तरुणांना काम उपलब्ध करुन द्यावे अशी मी मागणी करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

सभापती महोदय, गावची सीमा चिन्हे व भूमापन दुरुस्तीचा कार्यक्रम होणे कायद्याने बंधनकारक आहे. परंतु असा कार्यक्रम शासनाने न राबविल्याने कोकणामध्ये गावठाणाच्या सीमा निश्चित होऊ शकल्या नाहीत. आणि सीमांकने नसल्यामुळे गावचा विकास आराखडा मंजूर होऊ शकला नाही. त्याचा परिणाम म्हणून जिल्हयाच्या विकास आराखडयामध्ये प्रक्रिया उद्योगांना उद्योग म्हणून मान्यता मिळत नाही. त्यामुळे कोकणी माणूस विकासापासून वंचित राहिला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. विलासराव देशमुख यांनी रत्नागिरीला शालांत परिक्षा मंडळ देण्याचे आश्वासन दिले होते. कोकणाला कर्तृत्ववान अर्थमंत्री लाभले असल्यामुळे शालांत परिक्षा मंडळाची आमची मागणी ते पूर्ण करतील याची मला खात्री आहे. अशाप्रकारे रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयासाठी शालांत परिक्षा मंडळ स्थापन करण्याकरिता तातडीने जी.आर. काढण्याबाबत ते निर्णय घेतील अशी मला आशा आहे.

सभापती महोदय, चिपळूण येथील खडपोली येथे रासायनिक उद्योग सुरु करण्यात आले आहेत. त्यांच्या विरोधात आमरण उपोषणाला बसलेल्यांपैकी चार जणांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले आहे. या रासायनिक उद्योगांमुळे तेथील जल प्रदूषण होत आहे, वायू प्रदूषण होत आहे. त्याला विरोध करण्यासाठी उपोषणाला बसलेल्या लोकांना भेटण्यासाठी कोणतेही अधिकारी गेले नाहीत. त्याठिकाणी प्रदूषणाच्या भेडसावणाऱ्या समस्येच्या विरोधात ते आंदोलन करीत आहेत. ही समस्या सोडविण्यासाठी ठोस कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. कोकणातील भूमी ही परशुरामाची भूमी समजली जाते. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांचे वास्तव्य कोकणामध्ये जास्त काळ होते. लोकमान्य टिळक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर,स्वातत्र्यवीर सावरकर अशी अनेक महान रत्ने कोकणाने महाराष्ट्रासाठी व देशासाठी दिली आहेत. परंतु कोकणासाठी कुणी काहीही देण्यास तयार नाही अशाप्रकारची भावना कोकणातील जनतेची झाली आहे. सुर्दैवाने राज्याचे अर्थमंत्री पद कोकणाकडे आले आहे. तेव्हा त्यांनी येत्या पुढील काळात कोकणाकडे अधिक लक्ष देऊन विकासाची गंगा कोकणामध्ये आणि तळ कोकणामध्ये आणावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कोकण विकासाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी याठिकाणी नियम 260 अन्वये प्रस्ताव उपस्थित करण्यात आला आहे. कोकणातील लोक हुशार आहेत. याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर माननीय माजी मुख्यमंत्री बॅ. अे. आर. अंतुले यांनी कोकणच्या विकासाचे स्वप्न पाहिले. त्यांना फक्त दीड वर्षे मुख्यमंत्रीपद लाभले होते. ते जर पूर्ण कालावधीकरिता मुख्यमंत्रीपदी राहिले असते तर कोकणचा विकास निश्चितपणे झाला असता. आणि आज हे विधानमंडळ आणि मंत्रालय उरणला गेले असते. त्यांची वैचारिक दृष्टी फार मोठी होती. त्यांनी कुलाब्यापासून उरणपर्यंत व शिवडीपासून न्हावा-शेवापर्यंत पूल बांधण्याकरिता टाटा कन्सल्टन्सीला आराखडा तयार करण्याचे काम दिले होते.परंतु तो अभ्यास अजूनपर्यंत पूर्ण झालेला नाही. हा पूल बांधून झाला तर मुंबईपासून रायगड जिल्हा फार जवळ येईल हे सरकारला समजले आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/ SBT/ KTG/ प्रथम श्री. सरफरे.... 17:30

श्री. विजय सावंत....

कोकणचा विकास होऊ शकेल आता त्या कामाला सुरुवात करण्यात येत आहे. आता त्या कामाचे टेंडर काढण्यात आलेले आहे. पण अद्याप ते काम पूर्ण झालेले नाही. त्यानंतर माननीय मंत्रिमहोदय, श्री.नारायण राणे हे मुख्यमंत्री झाले त्यांना फक्त आठ महिने मिळाले. माननीय श्री. अंतुले हे दीड वर्षे मुख्यमंत्री होते. माननीय श्री. नारायण राणे यांनी त्या आठ महिन्यात फक्त कोकणच्या टुरिझ ामचा प्लॅन केला. तो टुरिझमचा प्लॅन टाटा कन्सल्टन्सीने तयार केला. त्यामुळे फक्त टुरिझमचा विचार करण्यात आला. पण गोव्या सारखा विचार करण्यात आला नाही म्हणून कोकणचा विकास झ ाालेला नाही.

सभापती महोदय, माननीय अर्थ मंत्री श्री. तटकरे कोलाडचे आहेत. त्यांना माहीत आहे की, कोकणचा विकास करण्याकरिता जास्तीत जास्त प्रयत्न करावे लागणार आहेत आणि ते तसे प्रयत्न करणार आहेत. कोकणचा जास्त विकास करण्यात येईल असा त्यांनी शब्द दिलेला आहे. कोकणच्या विकासाच्या संदर्भात आम्ही ज्यांची नावे घेतो त्याप्रमाणे यांचेही नाव घेता आले पाहिजे इतका कोकणचा विकास त्यांनी करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, नॅशनल हाय-वे क्रमांक 17 हा खऱ्या अर्थाने नॅशनल हाय-वे करावयचा असेल तर पहिल्यांदा महाडपर्यंत सहा पदरी आणि त्याच्यापुढे चार पदरी रस्ता करावा लागेल त्यासाठी केंद्र शासन पैसे देईल. गोवा आणि महाराष्ट्र एकमेकांना जोडावयाचे आहे. प्रत्येक राज्य नॅशनल हाय-वेने जोडावयाचे आहे अशी केंद्र शासनाची भूमिका आहे तर मग महाराष्ट्र आणि गोवा राज्य का जोडले जात नाही? म्हणून महाराष्ट्राला गोवा राज्य जोडण्यात आले तर त्या रस्त्यासाठी केंद्र सरकार खर्च करील आणि तो रस्ता होऊ शकेल. त्या करिता प्रयत्न करावयास पाहिजेत.

सभापती महोदय, मच्छिमारांकरिता काहीच करण्यात येत नाही. फक्त मच्छिमारी करण्यात येते पण मासेच नसतील तर मच्छिमारी कशी करणार? सभापती महोदय, समुद्रामधून मासे फक्त काढले जातात पण ते परत समुद्रात सोडले जात नाहीत. तैवानला या बाबतीत एक चांगली सिस्टिम आहे. त्या ठिकाणी माशांचे उत्पादन केले जाते आणि लहान लहान मासे समुद्रात सोडले जातात त्यामुळे समुद्रातील मासे संपत नाहीत. पण आपल्या राज्यात समुद्रात मासेच मिळत नसल्यामुळे कोळी बांधव देशोधडीला लागलेले आहेत. त्याना पूर्वी जेवढे मासे मिळत होते तेवढे

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत....

मासे मिळत नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. सरकार त्यांना कुठलीच मदत करीत नाही. डिझेल, रॉकेल स्वत दरात देण्यात येत नाही. बंदरे चांगली नाहीत. बंदरांमध्ये गाळ साचलेला आहे तो गाळ काढला जात नाही. याबाबतीत फिशरीज ॲथॉरिटी निर्माण करण्यात येत आहे. मत्स्यव्यवसाय मंत्र्यांना माझी विनंती आहे की, फिशरीज ॲथॉरिटी रत्नागिरीमध्ये करण्यात यावी.पण केवळ फिशरिज ॲथॉरिटी निर्माण करुन चालणार नाही तर माशांचे उत्पन्न वाढण्याकरिता माशाची उत्पत्ती समुद्राच्या बाहेर लहान लहान तलावमध्ये करुन त्यांना समुद्रामध्ये सोडण्यात यावे जेणे करुन मच्छिमारांना जास्त मासे मिळू शकतील.

सिंधुदुर्ग जिल्हयाचा जो टुरिझम प्लॅन तयार करण्यात आलेला आहे तो रिव्हाईज करण्याची आवश्यकता आहे. गोव्याच्या टुरिझम प्लॅन मुळे गोव्याचा चांगला विकास झालेला आहे. तशा प्रकारे कोल्हापूर साईडला नॉन पोल्यूटेड इंडस्ट्रिज काढावयास पाहिजेत आणि समुद्राच्या बाजूला टुरिझम डेव्हलप करावयास पाहिजे. थोडयावेळा पूर्वी सन्माननीय सदस्य भाई जगताप म्हणाले की, सिंगापूरला मत्सालय चांगले असून त्या ठिकाणी वेगवेगळया प्रकारची मासे पहावयास मिळतात. मालवणमध्ये तारकर्ली या ठिकाणी पाचशे ते सहाशे प्रकारचे मासे आहेत. त्या ठिकाणचा किनारा डेव्हलप करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, धरणांकरिता पैसे देण्यात येत आहेत. महमदवाडी धरणाचे काम पूर्ण होत आलेले आहे या धरणाला थोडेसे पैसे दिले तर त्या धरणाचे काम पूर्ण होईल आणि संपूर्ण कणकवली तालुक्यातील पाण्याची लेव्हल वाढेल. या धरणाचे पणी देवगड आणि मालवणपर्यंत येऊ शकेल तेव्हा पूर्ण होत आलेल्या महमदवाडी धरणासाठी पैसे देण्यात यावेत अशी माझी सूचना आहे.

ताळंबा धरण करण्यासाठी गेल्या तीस ते पस्तीव वर्षापासून जमीन संपादन करण्यात आलेली आहे परंतु ताळंबा धरण झालेले नाही. त्याठिकाणचे 18065 टी.एम.सी. पाणी फुकट चाललेले आहे. ते अडविण्याचा कुठेही प्रयत्न करण्यात आलेला नाही. कोकणासाठी बजेटमध्ये पैशांची तरतूद करण्यात येत पण ते पैसे खर्च करण्यात येत नाहीत त्यामुळे ते पैसे शेवटी पश्चिम महाराष्ट्रात जातात. आणि कोकणला काहीच दिले जात नाही. माननीय वित्त मंत्री कोकणातील आहेत आपण आता कोकणचे पैसे पश्चिम महाराष्ट्राकडे जाऊ न देता त्या पैशातून कोकणातील

..3..





श्री. विजय सावंत...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सर्व कामे करुन घ्यावीत. कोकणातील सर्व कामे केली तर जशी इतर नेत्यांची नावे घेतली जातात की, माननीय श्री. अंतुले असते तर कोकणचा विकास झाला असता. त्याप्रमाणे आता माननीय वित्त मंत्री हे कोकणातील असल्यामुळे कोकणचा जास्त विकास झाला पाहिजे आणि इतर नेत्यांप्रमाणे माननीय मंत्रिमहोदय श्री. तटकरे यांचे नाव देंखील घेता आले पाहिजे. आता पर्यंत कोकण पॅकेजचे पैसे पूर्णपणे मिळालेले नाहीत. तेव्हा कोकण पॅकेजचे पूर्ण पैसे देण्यात यावेत. कोकणात विद्यापीठ करण्यात येणार होते. त्यासाठी पैसे आहेत. जागा आहे पण ते सुरु झालेले नाही. तेव्हा पुढाकार घेऊन सरकारने हे विद्यापीठ सुरु केले पाहिजे. कोकणाच्या संदर्भात फक्त आश्वासने देण्यात येतात पण कामे पूर्ण केली जात नाहीत तेव्हा हे विद्यापीठ लवकर करण्यात यावे. तसेच रस्त्याची कामे देखील लवकर करण्यात यावीत.

सभापती महोदय, देशावरील ऊसाच्या नुकसानीची भरपाई दिली जाते. द्राक्षाचे पीक खराब झाले तर नुकसान भरपाई देण्यात येते. पण कोकणात काजूची बोंडे फुकट चालेली आहेत. या काजूच्या बोंडावर प्रक्रिया करुन वाईन तयार करण्याचा किंवा दारु तयार करण्याचा एक कारखाना काढला तर फायदा होऊ शकेल. शासनाने नागपूरला संत्र्यांचा रस काढण्याकरिता नोगा कंपनी काढली आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत .......

नोगाला दरवर्षी 2 ते 3 कोटी रुपयांचा लॉस होतो. पण कोकणामध्ये जर आपण मध्यवर्ती ठिकाणी कारखाना काढला आणि त्या ठिकाणी काजूच्या बोंडाचा उपयोग केला तर आमच्या शेतकऱ्यांना चांगले पैसे मिळू शकतील. कोकणाकरिता हे कोणी करण्यास तयार नाही. जर या सरकारने ते केले तर जास्त फायदा होऊ शकेल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सर्वप्रथम मी सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी साहेबांचे अभिनंदन करतो तसेच सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी कोकणप्रेमामुळे जे विषय मांडले त्या सर्व सन्माननीय सदस्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. माननीय मंत्रिमहोदय उत्तर देण्याची घाई करीत आहेत त्यामुळे ते नक्कीच काही तरी घोषणा करणार असे मी समजतो. मी फक्त हे बोलण्यासाठी उभा आहे की, कोंकणाला आतापर्यंत गेल्या 45 वर्षात आपले सरकार जे वारंवार फसवत आलेले आहे तसे कृपाकरुन फसवू नये. महाराष्ट्रामध्ये पॅकेज सिस्टीम चालू झाली. कोकण पॅकेज का आले ? त्यावेळी कोकणातून काही लोक निवडून येणार नव्हते पण या कोकण पॅकेजमुळे ते लोकांना फसवून निवडून येऊ शकले. म्हणून कोकण पॅकेज प्रसिध्द झाले. ही पॅकेज सिस्टीम आपण बंद करावी. कोकणाला 1800 कोटी रुपये मिळणार होते आणि वर्षाला 600 कोटी रुपये मिळावयास पाहिजे होते पण फक्त 50 कोटी रुपये मिळाले. ज्या पध्दतीने कोकण पॅकेजमध्ये फसविले आहे त्याच पध्दतीने माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये असा उल्लेख आहे की, प्रत्येक तालुक्याला 200 शेततळी करण्यात येतील. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आठ तालुक्यात फक्त 20 शेततळी आहेत. त्यामुळे आपण फसविणे बंद करा.

पर्यटनासाठी आपण 20 वर्षामध्ये ज्या जागा घेतलेल्या आहेत त्यातील एका कुटुंबातील मुलीला मी भेटलो. तिला रिसेप्शनिस्ट व्हावयाचे होते. आता तिचे वय 45 वर्षे झाले असेल. आता तिला रिसेप्शनिस्ट म्हणून कोण घेणार ? 20 वर्षापूर्वी या जागा ओबेरॉय आणि ताजला दिल्या गेल्या. 160 एकर जागा आहे ती परत घ्यावी. पर्यटनाच्या नावावर आपण चिपीला एअरपोर्ट तयार करण्यासाठी तीन वेळा भूमिपूजन केले. त्यासाठी लागणाऱ्या जागेपेक्षा चारपटीने जागा संपादित केलेली आहे. त्या जागा कोकणवासीयांना परत द्याव्यात. आपण रोजगाराच्या बाबतीत ढोल बडवून सांगत आहात की, रोजगार मिळणार आहे. कोकण रेल्वे आली तरी रोजगार मिळाला नाही. मुरबाड पासून कुडाळ पर्यंत एमआयडीसी आहे पण वायमन गार्डन सारखी मोठी एमआयडीसी बंद पडली त्याच पध्दतीने या एमआयडीसीमध्ये पुष्कळ गाळे बंद आहेत, ते तरी चालू करावेत. त्यामुळे रोजगार मिळेल. फक्त कोकणाचे निसर्गसौंदर्य बघावयाचे, उद्योगपतींना घेऊन जावयाचे आणि दलालाची भूमिका बजावून तिकडच्या जमिनी हडप करावयाच्या हे या सरकारने थाबवावे तसेच कोकणवासीयानां लुबाडण्याचे काम थांबवावे. एवढे बोलून माझे भाषण संपवितो

----

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. सुनील तटकरे ( वित्त मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, हुसेन दलवाई, अनिल तटकरे, विजय सावंत, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री राजन तेली आणि जयंत प्र. पाटील यांनी विधान परिषद नियम 260 अन्वये कोकणाच्या महत्वाच्या प्रश्नांच्या संदर्भात जो प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्या प्रस्तावाला सरकारच्या वतीने उत्तर देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कालपासून सुरु झालेल्या या चर्चेमध्ये कोकणाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. कोकणच्या विकासाच्या महत्वपूर्ण कल्पना मनामध्ये ठेवत कोकणाच्या निसर्गरम्य भूमीमध्ये अधिक मोठ्या प्रमाणावर विविध योजना राबविल्या जाव्यात, पर्यटनाच्या माध्यमातून, कृषी पर्यटन असेल, मत्स्य व्यवसाय असेल अशा वेगवेगळ्या योजनांची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणावर करत केवळ कोकणी माणसांच्या उत्पन्नामध्येच नव्हे तर राज्याच्या आणि देशाच्या उत्पन्नामध्ये अधिक भरीव पध्दतीने मदत करावी अशाच भावना सर्व सन्माननीय सदस्यांनी या निमित्ताने या ठिकाणी व्यक्त केल्या. मला सुरुवातीलाच सांगितले पाहिजे की, राज्य सरकारने जाहीर केलेल्या पॅकेजच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा झाली आणि विशेषकरुन कोकण पॅकेजच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा झाली. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी या पॅकेजच्या संदर्भात भावना व्यक्त करीत असताना निवडणुकीसाठी जाहीर केलेले हे पॅकेज होते असे सांगितले. आम्ही पुन्हा सत्तेवर येण्यासाठी लोकांच्या भावनेशी राजकीयदृष्ट्या खेळ करत सत्तेवर येण्याचा मार्ग मोकळा व्हावा म्हणून हे पॅकेज जाहीर केले अशा प्रकारची भावना विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मांडली..

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

एक गोष्ट निश्चित आहे की, मी या विषयावर राजकीय भाष्य करणार नाही. कोकणी माणसांनी, कोकणी जनतेने एकेकाळी शिवसेना व भारतीय जनता पक्षाला मोठया प्रमाणावर ताकद दिली होती. 1995 साली सत्तांतर होण्यामध्ये मुंबई व कोकणाचे मोठया प्रमाणावर योगदान होते. परंतु साडेचार वर्षाच्या कालावधीत जे घडले त्याचा विचार कोकणी माणसांनी केला, तुम्हीच सांगितले की, कोकणी माणूस चिकित्सक आहे, विचारी आहे. या सर्व गोष्टींचे पृथक्करण करण्याची मानसिकता आहे. त्यांनी योग्य पध्दतीने विचार केला आणि म्हणूनच आता झालेल्या निवडणुकीमध्ये भरघोस पध्दतीचे मतदान आघाडीला केले. (अडथळा) कोकणी जनता पॅकेजला भुलली नाही. त्या पॅकेजचे उत्तरदायित्व कोकणील जनतेने समजून घेतले आहे, हे शासन ते पॅकेज पूर्ण करणार असा विश्वास कोकणातील जनतेने आमच्यावर दाखविला आहे. (अडथळा) सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकलेली आहेत. सन्माननीय सदस्य ज्या मातीतून आलेले आहेत त्याच मातीतून मी आलो आहे, ज्या गावच्या बाभळी त्याच गावच्या बोरी असतात, त्यामुळे मी बोलणारच. याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. (अडथळा) मी राजकीय अभिनिवेशाने बोलत नाही. मी कॉंक्रीटच बोलणार आहे. कारण आपणा सर्वांना कॉंक्रीट काम करावयाचे आहे. कोकणाला मजबूत करण्याचे काम करावयाचे आहे. आम्ही केलेले बांधकाम पावसामध्ये कधीच वाहून जाणार नाही. वाहणार नाही, याची आम्ही पूर्ण खबरदारी घेतो. कोकणाच्या विकासाची चर्चा व्हावी, एक नवीन दालन निर्माण व्हावे, एक मार्ग खुला व्हावा अशाप्रकारची अपेक्षा या निमित्ताने सभागृहात व्यक्त करतो.

सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कोकणामध्ये सर्वात जास्त पर्जन्यमान होते. कोकणात 240 ते 250 मिमी पाऊस पडतो. शेजारच्या पश्चिम घाटमाथ्यावर पडणारे पर्जन्यमान पाहता मग सांगली, कोल्हापूरचा काही भाग असेल, सातारा, पुणे, सोलापूर जिल्हा असेल या जिल्हयातील काही तालुक्यांमध्ये काही वेळेला अवर्षणग्रस्त परिस्थिती निर्माण होते. कोकणामध्ये एका दिवसामध्ये पडणारे पर्जन्यमान आणि राज्यातील उर्वरित भागात पूर्ण वर्षामध्ये पडणारे पर्जन्यमान हे अनेक वेळा सारखेच असते. असे असताना कोकणात सिंचनाच्या मोठया

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

प्रमाणावर योजना राबविल्या गेल्या नाहीत. 250 मिमी पाऊस असताना सुध्दा सिंचनाचे प्रकल्प ज्या पध्दतीने झाले पाहिजे होते, दुर्दैवाने त्या पध्दतीने ते झाले नाहीत ही वस्तुस्थिती कोणी नाकारलेली नाही.

सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी ठाणे जिल्हयाचा उल्लेख केला आहे. राज्यात मुंबई, पुणे, अमरावती, नाशिक, नागपूर व औरंगाबाद हे महसूल विभाग निर्माण झाले आहेत. या महसूल विभागामध्ये मुंबईसह ठाणे याचा त्यामध्ये अंतर्भाव आहे. याचा अर्थ कोकणातील प्रांतामध्ये सर्व जिल्हे मोडतात. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या सहा जिल्हयांचा मिळून एक महसूल विभाग निर्माण झाला आहे. या महसूल विभागाच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर कामे व्हावीत अशी सर्वांची अपेक्षा आहे. उपनगरामध्ये त्या काळात बांधले गेलेले प्रकल्प आहेत, त्यानंतर ठाणे जिल्हयामध्ये जे प्रकल्प बांधले गेले त्या प्रकल्पातून मुंबई शहराला 75 टक्के पाणी पुरवठा होत आहे. एका बाजूला मुंबई सारख्या देशाच्या आर्थिक राजधानीला पाणी पुरवठा करण्याचे महत्वपूर्ण योगदान ठाणे व रायगड जिल्हयातून नव्याने निर्माण झालेल्या सिडकोच्या माध्यमातून, ठाणे जिल्हयातील काही परिसर असेल या सर्व परिसरातून होत असताना दुर्दैवाने सिंचनाचे मोठे प्रकल्प होऊ शकले नाही. मधल्या काळामध्ये वैधानिक विकास मंडळाची संकल्पना आपण स्वीकारली. राज्यपाल महोदयांच्या निर्देशानुसार समतोल विकासाचा कार्यक्रम हाती घेतला. त्या कालावधीमध्ये सिंचनाच्या अनुशेषानुसार निर्णय घेण्यात आला त्यामुळे गेल्या 10 वर्षामध्ये ठाणे व रायगड जिल्हयामध्ये नवीन प्रकल्प सुरु होऊ शकले. त्या काळातील बांधले गेलेले प्रकल्प बहुतांशी पिण्याच्या पाण्यासाठी वापरले जातात, त्याच्यातील 90-95 टक्के साठा सिंचनाऐवजी पिण्यासाठी वापरला जातो. परंतु सिंचनाच्या लाभक्षेत्रामध्ये ते सर्व अंतर्भूत केल्यामुळे गेल्या 10 वर्षामध्ये सिंचनाची क्षमता असून सुध्दा पाणी व अडविण्याची क्षमता मोठया प्रमाणावर असतानाही दुर्दैवाने तेथे नवीन प्रकल्प होऊ शकले नाही. 2000 साली मंत्रिमंडळाच्या बैठका झाल्या होत्या. सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई हे त्यावेळी मंत्रिमंडळातील सदस्य होते. रत्नागिरी येथे मंत्रिमंडळाची बैठक झाली होती त्यावेळी रत्नागिरी जिल्हयाचा मी पालकमंत्री होतो.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

यानंतर श्री.शिगम.....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 17:45

श्री. सुनील तटकरे...

त्यावेळी श्री.विलासराव देशमुख हे राज्याचे मुख्यमंत्री होते. लोकशाही आघाडीचे सरकार नुकतेच सत्तेवर आलेले होते. कोकणामध्ये मंत्रिमंडळाची बैठक घेऊन कोकणाच्या विकासाला चालना द्यावी अशा प्रकारचा निर्णय त्या बैठकीमध्ये झाला. कोकणामध्ये अधिक जलसंपदा निर्माण करावी, पाटंबधा-याच्या विविध प्रकल्पासाठी निधी द्यावा, रस्त्यांचे फार मोठे जाळे विणले जावे, मत्स्यशेतीच्या माध्यमातून फार मोठे परकीय चलन मिळू शकते म्हणून लाभलेल्या समुद्र किना-याचा मत्स्यव्यवसायाच्या संदर्भात विकास व्हावा, बंदरे व्हावीत असे धोरण ठरवून त्यासाठी त्या काळामध्ये तरतूद केली. तद्‌नंतर 2003सालामध्ये श्री. सुशीलकुमार शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री झाले.त्यावेळी 300 कोटीचे पॅकेज कोकणासाठी जाहीर केले. कोकणाच्या भौगोलिक परिस्थिती नुसार कोकणासाठी नवीन योजना देण्याचे धोरण राज्य सरकारने स्वीकारले. श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी जे पॅकेज जाहीर केले त्यामध्ये रस्ते,पिण्याच्या पाण्याच्या योजना तसेच अधिकाधिक पोटॅन्शियल निर्माण करण्याच्या गोष्टींना प्राधान्य देण्याचे धोरण अवलंबिले गेले.

श्री. शरद पवार हे राज्याचे मुख्यमंत्री असताना गणपती पुळे येथे येणा-या भाविकांची संख्या लक्षात घेता निवळी फाट्यापासून गणपती पुळे पर्यन्तच्या रस्त्याचे रुंदीकरण करण्याचा निर्णय घेतला. गणपती पुळे येथे महाराष्ट्राच्याच नाही तर देशाच्या कानाकोप-यातून भाविक येत असतात. तेथील रस्त्याचे रुंदीकरण करण्याचा निर्णय घेतला. अशा विविध योजना कोकणासाठी करीत असताना कोकणामध्ये रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून 100 टक्के फलोत्पादन योजना राबविण्याचा निर्णय घेतला. फलोत्पादनाच्या माध्यमातून कोकणातील माणसाच्या उत्पन्नामध्ये भर पडावी यादृष्टीने हा निर्णय घेतला. या विधानपरिषदेमध्ये 50 टक्के सदस्य हे कोकणातील आहेत. कोकणातील माणूस हा रोजगाराच्या निमित्ताने, गिरण्यामध्ये काम करण्यासाठी 100 वर्षापूर्वी मुंबईमध्ये आला. त्याच्या तीन-चार पिढया या मुंबईमध्ये गेल्या. आमचे हे सर्व सहकारी मुंबईतील आहेत. आम्ही जरी मुंबईमध्ये जन्मलो असलो तरी आमची नाळ कोकणाशी जोडलेली आहे. आपण विविध पक्षामध्ये जरी असलो तरी देखील पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून ज्या निसर्गरम्य मातीतून आपण आलो आहोत त्या कोकणाचा सर्वांगीण विकास आपल्याला मिळालेल्या संसदीय अधिकारांचा वापर करुन अधिक व्यापक प्रमाणात करण्याचा प्रयत्न करावा अशी भावना प्रत्येक लोकप्रतिनिधीच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

मनामध्ये निश्चितपणे आहे. श्री. शरद पवारसाहेबांनी कोकणामध्ये फलोत्पादन योजनेला चालना दिली.

सभापती महोदय, कोकण रेल्वेची संकल्पना सर्वप्रथम बॅ. नाथ पै आणि वालावलकर यांनी मांडली होती. कोकण रेल्वेचे स्वप्न हे स्वप्नच राहील की काय अशी शंका कोकणातील लोकांच्या मनामध्ये होती. जेव्हा मधु दंडवते हे देशाचे अर्थमंत्री झाले त्यावेळी जॉर्ज फर्नांडिस हे रेल्वेमंत्री होते. कोकणातील डोंगरी भाग, नद्यांची विस्तीर्ण पात्रे, बांधावयाचे बोगदे याचा विचार केला तर कोकण रेल्वे आर्थिकदृष्टया व्यवहार्य होऊ शकत नाही असे रेल्वे महामंडळाला वाटत होते. म्हणून कोकणासाठी स्वतंत्र रेल्वे महामंडळ केले पाहिजे ही आग्रही भूमिका श्री.शरद पवार साहेबांनी राज्याचे मुख्यमंत्री असताना घेतली आणि कोकण रेल्वेसाठी राज्य शासनाचा आर्थिक वाटा दिला. बाजूच्या गोवा, कर्नाटक, केरळ या राज्यांची त्यांचा वाटा देण्याइतकी आर्थिक स्थिती नव्हती. परंतु आपल्या राज्य सरकारने पुढाकार घेतला आणि आज कोकण रेल्वेचे स्वप्ने पुरे झाल्याचे आपण पहात आहोत. कोकण रेल्वेसाठी लागणा-या जमिनीच्या भूसंपादनाचे पैसे राज्य सरकारने दिले. या ठिकाणी असे बोलले गेले की, अनेक योजना पश्चिम महाराष्ट्रामध्ये गेल्या. त्या जरुर गेल्या असतील. योजना आणण्यासाठी आत्मबल आणि राजकीय इच्छाशक्तीची गरज असते. कोकणातील लोकप्रतिनिधींनी राजकीय इच्छाशक्ती आणि आत्मबल दाखवले, पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र काम करण्याचे ठरविले तर निसर्गरम्य अशा या कोकणाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने निश्चितपणे यश मिळेल. कोकणामध्ये औद्योगिक क्षेत्रात वाढ झाली. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी, सन्माननीय सदस्य श्री अनिल तटकरे, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी कोकणाच्या काही समस्या सांगितल्या.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.........

जसे कोकणातील काही प्रश्न सुटले गेले पाहिजेत तसे भवितव्याच्या दृष्टीने काही उपाययोजना सुध्दा केल्या गेल्या पाहिजेत. प्रदूषण हा कोकणातील महत्वाचा प्रश्न आहे. नवनवीन उद्योग येत आहेत. औद्योगिक धोरण आपण स्वीकारले आहे. एसईझेड प्रकल्प नेमके किती घ्यायचे याचा निर्णय नक्की घेतला जाईल. त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. अर्थमंत्री आणि रायगड जिल्हयाचा पालकमंत्री या नात्याने स्पष्ट करु इच्छितो की, कोकणात औद्योगिक प्रकल्प येतील, परंतु एकही रासायनिक उद्योगावर आधारित असलेला प्रकल्प येऊ दिला जाणार नाही ही स्पष्ट भूमिका राज्य सरकारच्या वतीने अधिकृतपणे मी जाहीर करु इच्छितो. कोकणाचा विकास करायचा असेल, कोकणी माणसाचे आर्थिक उत्पन्न वाढवायचे असेल, ७२० कि.मी. सागरी किनाऱ्यावरील अनेक बंदरांचा विकास करावयाचा असेल तर बंदरांचा विकास केल्यानंतर येणाऱ्या औद्योगिकीकरणाचे स्वागत करण्याची गरज भासणार आहे. एका बाजूला औद्योगिकीकरण स्वीकारीत असताना त्यातून हवेचे प्रदूषण होणार नाही, पिण्याच्या पाण्याचे प्रदूषण होणार नाही, कोकणातील निसर्गसमृध्दीचा, फलोत्पादनाचा किंचितही ऱ्हास होणार नाही याची पूर्णपणे खबरदारी घेण्याचे काम भविष्यकाळात कोकणात निश्चितपणे केले जाईल.

सभापती महोदय, याठिकाणी औष्णिक प्रकल्पाचा उल्लेख करण्यात आला. मी सरकारमध्ये ठामपणे भूमिका मांडली. २६ ते २७ औष्णिक प्रकल्प कोकणाच्या भूमीत येत आहेत असे सांगितले गेले. सरकारच्या वतीने सामंजस्य करार झालेला आहे. मी स्पष्टपणे भूमिका मांडली, त्या भूमिकेशी मी आजही ठाम आहे. पहिल्या टप्प्यात ५ औष्णिक प्रकल्प केले जातील. ते प्रकल्प करीत असताना मघाशी आपण सर्वांनी सांगितल्यानुसार, त्याबाबत सन्माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी जाहीर केल्याप्रमाणे संपादित केली जाणारी जमीन केवळ रेडी रेकनरच्या दरानुसार संपादित केली जाणार नाही. आजच्या बाजारभावानुसार केली जाईल. रेडी रेकनरचे दर आणि बाजारभाव यामध्ये तफावत आहे. रायगड जिल्हयात टाटाचा प्रकल्प होत आहे. या प्रकल्पासाठी २० लाख रुपये एकरी भाव शेतकऱ्यांना नुकसानभरपाईसाठी देण्यात येत आहे. प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबातील एक व्यक्तीला नोकरी देत असताना त्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण सुरुवातीपासून त्या कंपनीने मोफत दिले पाहिजे या अटीसह त्या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे. पाच प्रकल्प येथे महानिर्मिती कंपनीच्या माध्यमातून एका प्रकल्पाचे नियोजन केले गेले आहे. आरपीजीपी

...२...



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

म्हणजे पूर्वीच्या एन्रॉन प्रकल्पाची जी जागा आहे तेथे आज वीज उत्पादन सुरु झाले आहे. त्या प्रकल्पामध्ये भारत सरकारने गुंतवणूक केली आहे. राज्य सरकारने सुध्दा वित्तीय संस्थांच्या माध्यमातून गुंतवणूक केली. एन्रॉन प्रकल्प त्या काळात वादग्रस्त ठरला होता. त्या प्रकल्पातून १८०० मे.वॅट वीज आज राज्याला मिळत आहे. त्याठिकाणी उपलब्ध असलेल्या जागेमध्ये प्रदूषण न होता गॅसवर आधारित असलेला प्रकल्प करावा, ज्या माध्यमातून १२०० ते १५०० मे.वॅट अधिकची वीज राज्याला मिळू शकेल. या प्रकल्पासाठी अधिक जमीन संपादित करावी लागणार नाही. पाण्याची व्यवस्था झालेली आहे. आवश्यक असलेल्या जेटीचे बांधकाम त्या काळात झालेले आहे. आज उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांमध्येच अशा प्रकारचा विजेचा प्रकल्प निर्माण होत आहे. त्यातून राज्याची विजेची तूट भागविता येऊ शकते. त्या दृष्टीने या प्रकल्पाचा विचार केला आहे. जैतापूर येथील औष्णिक प्रकल्पाबाबत सभागृहात चर्चा झाली, त्यावेळी मी आणि सन्माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार सभागृहात उपस्थित होतो. मी ठामपणाने भूमिका घेतली होती. या प्रकल्पातून १० हजार मे.वॅट वीज उत्पादन होणार आहे. राज्यात आज ४५००-५००० मे.वॅट विजेची तूट आहे, भविष्यात गरज वाढणार आहे त्यामुळे वीज उत्पादनामध्ये वाढ करावी लागेल. हा प्रकल्प पूर्ण झाला तर १० हजार मे.वॅट वीज उत्पादन होईल. एखाद दुसरा प्रकल्प जो मी मघाशी नमूद केला तो प्रकल्प होईल, त्यापेक्षा कोणताही भार कोकणावर टाकू नये अशी चर्चा मी सन्माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार यांच्याशी केली आणि त्यांनी मान्यता दिली आहे. पाच प्रकल्प पूर्ण होऊ शकले तर त्या माध्यमातून राज्याच्या विकासाला गती मिळू शकते. विजेशिवाय कोणतेही प्रकल्प उभारु शकत नाही. औद्योगिकीकरण, नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. त्यासाठी आवश्यक असणारी वीज उत्पादन करणे हे आपले काम आहे. कोकण किनारपट्टी शाप की वरदान अशा प्रकारच्या विचारधारेमध्ये प्रकल्प थांबले असतील तर कोकणाला लाभलेल्या या वरदानाच्या माध्यमातून कोकणाचा चांगला विकास करता येईल असा सर्वांगीण विचार राज्य सरकारच्या माध्यमातून निश्चितपणे करण्यात येईल. जलसंपदा विभागाच्या माध्यमातून काही प्रकल्प सुरु आहेत. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी आणि इतर अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. मी सर्वांचे नाव घेतले नाही तर कृपा करुन गैरसमज करुन घेऊ नये. आपल्या सर्वांच्या मुद्यांची नोंद घेतली आहे. महत्वाचे प्रकल्प आज त्या ठिकाणी सुरु आहेत. त्या प्रकल्पापैकी तिलारी हा एक आंतरराज्य प्रकल्प आहे.

नंतर ३यू.१...

अशुध्दीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .....

या तिलारी प्रकल्पाची किंमत जरुर वाढली आणि त्याच्या तपशीलात मी जाऊ इच्छित नाही. पण एका विशिष्ट टप्प्यावर जाऊन हा प्रकल्प आता पूर्ण होत आहे. आंतरराज्यीय प्रकल्प असल्याने गोवा राज्याकडून येणारा आवश्यक तो निधी अशा सर्व गोष्टींची आकडेवारी माझ्याकडे आहे पण त्याच्या तपशीलात मी जाणार नाही. हा तिलारी प्रकल्प केव्हा पूर्ण होणार यादृष्टीने सुध्दा शासनाने नियोजन केलेले आहे. हे करीत असताना शासनाच्या सुधारित किमतीनुसार एआयबीपी कडून या प्रकल्पासाठी आपल्याला मान्यता मिळाली आहे म्हणूनच सन 2012 पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने नियोजन केले आहे. या कामासाठी एआयबीपी अंतर्गत निधी तर मिळवूच पण अनेक वेळा खबरदारी घेतलेली आहे की असे प्रकल्प मंजूर केले जातात तेव्हा केंद्राकडून हिस्सा मिळेपर्यंत त्यांचे काम थांबू नये म्हणून आपल्या तिजोरीतून अशा प्रकल्पांना आपण रकमा दिलेल्या आहेत. त्यामुळे तिलारी प्रकल्पाचे काम निर्धारित वेळेमध्ये पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही हे देखील मी या निमित्ताने सांगू इच्छितो. कुडाळ तालुक्यातील टाळंबा हा एक महत्वपूर्ण प्रकल्प असून त्यातून 297.150 दलघमी एवढ्या पाण्याचा साठा होणार आहे. त्या प्रकल्पाची आजची किंमत 816 कोटी एवढी असून तो देखील विशिष्ट कालमर्यादेतच पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाचा प्रयत्न आहे. सभागृहात कोकणाला मागील वर्षी जे पॅकेज दिले त्याचा उल्लेख झाला. या पॅकेजच्या माध्यमातून कोकणाला किती निधी देणार अशीही विचारणा करण्यात आली. मागील वर्षी 350 कोटीचा नियतव्यय आपण सांगितला होता त्यापेक्षा जास्त नियतव्यय देण्याच्या दृष्टीने शासनाचा प्रयत्न आहे. मी अधिकृत रित्या सांगू इच्छितो की, कोकण पाटबंधारे प्रकल्पाचा नियतव्यय जेवढा निश्चित केला होता त्यापेक्षा जास्त निधी उपलब्ध करुन दिला आहे. एक गोष्ट मात्र नक्की आहे की, 350 कोटी इतका अधिकचा निधी देण्याच्या दृष्टीने माननीय राज्यपालांबरोबर पत्रव्यवहार केलेला असून त्याबाबतीत माननीय राज्यपालांनी माहिती मागितलेली आहे. यासंदर्भात माननीय जलसंपदा मंत्री श्री. अजितदादा पवार यांच्याशी देखील माझी चर्चा झालेली आहे तसेच माननीय राज्यपालांकडे ही माहिती पाठवित असताना पुन्हा आवश्यकता भासली तर राज्याचा अर्थमंत्री म्हणून माननीय राज्यपालांना पुन्हा मी भेटणार आहे. तसेच या 350 कोटीसाठी असे मोठे प्रकल्प थांबणार नाहीत तर त्यातील अनेक

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

प्रकल्पांची कामे वेगाने सुरु आहेत अनेक धरणांची घळभरणी करणे, सांडव्याची कामे सुरु करणे, भूसंपादनासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देणे यासंदर्भात गेल्या 6 महिन्यात मी प्रकल्पनिहाय आढावा घेतला तेव्हा ही माहिती मिळाली. तसेच त्यात कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक असतील अथवा जलसंपदा विभाग असेल अशा सर्व स्तरावर अर्थमंत्री म्हणून मी आढावा घेत असताना निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असेल तसा निधी देण्याची भूमिका स्वीकारलेली आहे. हा निधी देऊन नियोजित काळातच ही कामे पूर्ण होतील अशी मी ग्वाही देतो. कणकवली मधील प्रकल्पाचा येथे उल्लेख करण्यात आला असून त्याबाबतची माहिती मी मागविलेली आहे. अशा प्रकारे कोकणातील कोणतेही प्रकल्प असोत, त्या प्रत्येक प्रकल्पाच्या बाबतीत मी स्वत: राज्यस्तरावर बैठक घेऊन जलसंपदा विभागाच्या बाबतीत असेल तर त्या विभागाचे मंत्री सक्षम आहेत. अशा प्रकारे हे प्रकल्प विशिष्ट वेळेतच पूर्ण होणार नाहीत असे उत्तर भविष्यात द्यावे लागणार नाही याचीही खबरदारी निश्चितपणे घेतली जाईल. कोयनेचे पाणी अडविण्यासंबंधीची भावना सभागृहात सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली. कोयनेचे 67 टीएमसी पाणी तसेच पश्चिम घाट माथ्यावरुन पडणारे सर्व पाणी अरबी समुद्रात वाहून जाते ही वस्तुस्थिती नाकारुन चालणार नाही. या निमित्ताने मी सांगणार आहे की, कोयनेचे पाणी अडविण्याबाबत मंत्रिमंडळामध्ये निर्णय झालेला आहे. काही सन्माननीय सदस्यांनी कोकणात आलात तर मासे खायला मिळतील असाही उल्लेख केला पण मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण विदर्भात जातो तेव्हा आपल्याला देखील आपले सहकारी भोजनासाठी निमंत्रित करतात. तेव्हा अशा प्रकारे बोलून दाखविणे म्हणजे त्यांच्या आदरातिथ्याचा अवमान करण्यासारखे असते म्हणून अशा प्रकारे बोलणे योग्य नाही तर त्यांच्या निमंत्रणाचा अथवा आपण दिलेल्या निमंत्रणाचा सकारात्मक दृष्टीनेच विचार करावा, एवढेच मी सांगणार आहे. माननीय श्री. नारायण राणे साहेब हे कोकणातील मंत्री असून पालक मंत्री देखील आहेत, त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव हे देखील आमचे सहकारी आहेत. आपण याच प्रांतातून या सभागृहात निवडून येतो तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब हे देखील माझ्याच जिल्ह्यातील आहेत त्यामुळे त्या मातीशी आपले नाते अतूट आहे.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकर....

त्यावेळी आम्ही शब्द दिला होता की, कोकणातील पावसाचे पाणी वाया जाते, त्या बाबतीत सर्व्हेक्षण करण्यासाठी समिती नेमली जाईल. त्यासाठी एक कोटी रुपयाचे नियतव्यव ठेवले होते. अधिवेशन सुरु होण्याच्या आठ दिवस आधी विधान भवनामध्ये मा. अजित पवार साहेबांबरोबर या विषयाच्या संदर्भात एक बैठक झाली होती. आराखडा, माहिती संकलन, घाट माथ्यावर पडणारे पाणी कोकणामध्ये कसे नेऊ शकतो, त्यासाठी येणारा खर्च, याची सर्व माहिती आता काढली जाणार आहे. लिफ्ट करुन पाणी पलिकडे न्यावे, असे अपेक्षित नाही. कोकणातील पाणी कोकणामध्येच वापरले गेले पाहिजे. मग हे पाणी सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी, ठाणे किंवा काही प्रसंगी मुंबईला जरी लागले तरी ते दिले जाईल. कोकणातील पाण्याचा उपयोग कोकणातील भागासाठीच करण्यात येईल व त्या पध्दतीने नियोजन केले जाईल. या ठिकाणी मी जे काही सांगत आहे ते राजकीय अभिनिवेशाने सांगत नाही. पुढील वर्षी अर्थसंकल्प मांडण्याची संधी माननीय श्री. पवार साहेबांनी दिली तर पुढील अर्थसंकल्पात कोकणात जे पाणी वाया जाते त्याचे नियोजन करण्यासाठी निश्चितपणे तरतूद केली जाईल. कोकणातील वाया जाणा-या पाण्यासाठी प्रकल्प निश्चितपणे कार्यान्वित होईल, हे मी या प्रसंगी सांगू इच्छितो. कोकणातील वाया जाणा-या पाण्याचा प्रश्न हा केवळ एका व्यक्तीचा किंवा सुनील तटकरेचा नाही तर हा प्रश्न संबंध महाराष्ट्राचा आहे. पाण्यासाठी आज मोठया प्रमाणात संघर्ष होतो आहे हे आपण पाहतो आहे.बाभळीच्या पाण्याचे राजकारण सुध्दा आपण पाहिलेले आहे. हे राजकारण कोणी केले, का केले याच्या तपशिलात मी आता जाऊ इच्छित नाही. पाणी हा महत्वाचा विषय आहे. कोकणाच्या पाण्याचा प्रश्न हा कृष्णेच्या लवाद वाटपातील नाही. कृष्णेच्या पाण्याचा उपयोग कर्नाटक, आंध्र प्रदेश, महाराष्ट्राने किती करावा याबाबत निश्चितपणे बंधन आहे. कोयनेचा जो विद्युत प्रकल्प आहे, त्यातून विद्युत निर्मितीनंतर वाया जाणारे पाणी कोठे वापरावे यासाठी बंधन नाही. हे वाया जाणारे पाणी वापरले गेलेच पाहिजे याबाबत कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. कोयनेचे वाया जाणारे पाणी जास्तीत जास्त वापरले जाईल हे मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

आपल्याला एका बाजूला जुने प्रकल्प पूर्ण करावयाचे असून दुस-या बाजूला नवीन प्रकल्पाचे नियोजन करावयाचे आहे. मी माननीय राज्यपाल यांना विनंती केली की, ठाणे आणि रायगड जिल्हयात प्रकल्प मोठया प्रमाणात होऊ शकतात परंतु या ठिकाणी आपल्या निर्णयामुळे गेल्या दहा वर्षात नवीन प्रकल्प सुरु करु शकलो नाही. भौतिक ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकर....

अनुशेषाच्या विवादामध्ये मी आता जाऊ इच्छित नाही. आर्थिक आणि भौतिक अनुशेषाच्या संदर्भात शासन निश्चितपणे भूमिका घेईल. कोकणामध्ये दर वर्षी दोन अडीचशे इंच पाणी पडूनही त्या पाण्याचे नियोजन योग्य रितीने न झाल्यामुळे सामाजिक प्रश्न वेगवेगळया पातळीवर निर्माण झालेले आहेत. रायगड जिल्हयातील काही प्रकल्पांना तसेच ठाणे जिल्हयातील काही प्रकल्पांना 30 वर्षा पूर्वी प्रशासकीय मान्यता मिळाली होती. आता या प्रकल्पांच्या रक्कमेमध्ये वाढ झाली आहे. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या प्रकल्पांमध्ये आता 800-900 पट वाढ झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे. 1980 साली या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता मिळाली होती. सभापती महोदय, गेल्या 30 वर्षामध्ये जवळपास सर्व क्षेत्रामध्ये दर वाढ झालेली आहे, ही गोष्ट आपल्याला कोणालाही नाकबूल करुन चालण्ार नाही. प्रकल्पाच्या बाबतीत जी काही दर वाढ होती ती लक्षात घेऊन प्रकल्पाचे काम सुरु करुन एका विशिष्ट कालावधीत प्रकल्पांचे काम पूर्ण झाले पाहिजे याबाबत नियोजन केले जाईल. एकाच वेळेस 10 प्रकल्प सुरु न करता 3-4 प्रकल्पाचे काम सुरु करुन ते पूर्ण केले जातील, त्याचा फायदा आपल्या सर्वांना चांगल्या प्रकारे दिसू शकेल व याच पध्दतीने भविष्यात नियोजन केले जाईल. काळंभे प्रकल्पाची उभारणी 30 वर्षा पूर्वी केली गेली होती. स्वामीनाथन समितीने यासंदर्भात अहवाल दिला होता. त्याच घाटमाथ्यावर रायगड जिल्हयातील पाचडच्या खो-यात 25 मेगावॅट विजेची निर्मिती होणार आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

दुसऱ्या बाजूला काही प्रमाणात लाभ क्षेत्रामध्ये वाढ होईल. मुंबई-नवी दिल्ली कॉरिडोर जाहीर झाला आहे. त्यामाध्यमातून प्रकल्प येतील. वेगवेगळे उद्योग येत असताना रासायनिक उद्योग येता कामा नये अशी माझी भूमिका आहे. खाजगी बंदरांची उभारणी करीत असताना या साऱ्या गोष्टीकडे लक्ष देण्याची जबाबदारी शासनामार्फत घेतली जाईल. कोकणातील प्रकल्पासंबंधी अनेक माननीय सदस्यांनी चिंता व्यक्त केली आहे.

कोकणात खार भूमी आणि धूप प्रतिबंधक बंधारे हे प्रश्न देखील फार महत्त्वाचे आहेत. मधल्या काळात लाटांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. उधाण वाढले आहे. त्यामुळे किनारपट्टीवरील गावांना धोका निर्माण झाला आहे. ती गावे आपल्याला सुरक्षित ठेवायची आहेत. त्यामुळे धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याची गरज आहे. ती कामे वेळेवर होणे आवश्यक आहे. खार भूमीचा प्रश्न देखील महत्त्वाचा आहे. प्रकल्प होत असताना आवश्यक असणारा स्टाफ मेरी टाईम बोर्ड, मत्स्यव्यवसाय विभागाकडे आहे की नाही ? हा देखील एक प्रश्न आहे. मोठ्या प्रमाणावर कालबद्ध कार्यक्रम करण्याचे ठरविले असून त्यासाठी लागणारे मनुष्यबळ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यासंबंधी चिंता देखील व्यक्त करण्यात आली आहे. यासाठी आर्थिक नियोजन होईल. किमान मान्यता मिळेल. योग्य ती देखरेख करणारा अभियांत्रिकी वर्ग उपलब्ध करून देणे हा एक भाग आहे. आता आपण धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे एक नवीन मॉडेल तयार केले आहे. आता पर्यंत मोठ्या प्रमाणावर दगड टाकून धूप प्रतिबंधक बंधारे बांधत होतो. मोठे दगड टाकून पाणी अडविण्याचा, पाण्याचा वेग कमी करण्याचा प्रयत्न करीत होतो. त्यातून फारसे यश मिळत नव्हते. पण आता नवीन तंत्रज्ञान विकसित झाले आहे. याबाबतचा प्रयोग रत्नागिरीमध्ये केला आहे. त्याच धर्तीवर धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यासाठी 13 व्या वित्त आयोगातून 289 कोटी रूपये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासंबंधी मी माझ्या विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक देखील घेतली आहे. मुरूड, श्रीवर्धन, अलिबाग, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथे धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याची आवश्यकता आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवबाग परिसराचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्यामुळे आपल्याला नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी उत्तम पद्धतीचे बंधारे बांधावे लागतील. जेवढ्या मीटरचा आवश्यक असेल तेवढा धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्यात येईल. किनारपट्टीवरील गावांचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

होणारे नुकसान लक्षात घेऊन कालबद्ध कार्यक्रम आखून गावांचे नुकसान रोखण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यासाठी या वर्षी 200 कोटी रूपयाचा नियतव्यय उपलब्ध करून देण्यात येईल. यासाठी पाच वर्षाचा कार्यक्रम कोकणातील सर्व आमदांराना विश्वासात घेऊन करण्यात येईल. गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले कोकणातील प्रश्न विशिष्ट कालावधीत सुटले पाहिजेत या निग्रही भूमिकेतून काम करण्याचा प्रयत्न करूया.

खार लँड हा देखील एक महत्त्वाचा विषय आहे. शेतकरी बारा महिने मेहनत करतो. आज कोकणातील मिठागरे संपुष्टात आली. पेण, उरण येथे मिठाचे उत्पादन होत होते. आता तेथे कारखानदारी आली. येथे जेएनपीटीचा देखील उल्लेख झाला. त्यामुळे मच्छिमारीचा व्यवसाय धोक्यात आला. त्यासंबंधी मी नंतर बोलणार आहे. पूर्वी पेण येथे राष्ट्रीय महामार्गावर मिठाच्या 100 ते 200 बैलगाड्या रांगा लावून उभ्या असल्याचे चित्र पहायला मिळत असे. पण ते चित्र आज पहायला मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. आज उधाणामुळे येथील जमीन उद्ध्वस्त होत आहे. त्यामुळे हाता-तोंडाशी आलेले उत्पन्न पूर्णपणे बेचिराख होत आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

पूर्वी खार भूमी बोर्ड होते, परंतु मध्यंतरी ते बरखास्त झाले. आता पुन्हा खार भूमी बोर्डाची आवश्यकता असेल तर ते पुनर्जीवित करण्यात येईल. नाबार्डच्या माध्यमातून आपण धूपप्रतिबंधक बंधारे बांधणार आहोत त्याचप्रमाणे आपण खार भूमीचा कार्यक्रम घेऊ. अनेक वेळा खार भूमी बंधारा बांधला जातो, परंतु पुढील वर्षी पावसाच्या उधाणामुळे तो आहे की नाही अशी स्थिती असते. तेव्हा ज्या अधिकाऱ्यांमार्फत बंधाऱ्याचे काम करण्यात येईल त्याच्यावर त्या बंधाऱ्याची जबाबदारी टाकण्यात येईल. यासाठी माननीय महसूल व खार जमीन मंत्री श्री.नारायण राणे आणि माननीय जलसंपदा मंत्री श्री.अजित पवार यांच्याशी चर्चा करण्यात येईल कारण त्या विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत ती कामे केली जातात. अशाप्रकारे खार भूमीवर खर्च होणाऱ्या निधीची योग्य प्रकारे खबरदारी घेतली जाईल. धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्याच्या कार्यक्रमाप्रमाणे खार भूमी प्रतिबंधक बंधाऱ्याचे देखील काम हाती घेण्यात येईल.

सभापती महोदय, कोकणासंबंधी वारंवार चर्चा होते परंतु त्यातून काहीही निष्पन्न होत नाही असा याठिकाणी उल्लेख करण्यात आला. याबाबत सांगू इच्छितो की, मी वित्त मंत्री पदाचा कार्यभार स्वीकारल्यास 8-9 महिन्यांचा कालावधी लोटला आहे. आपणास माझ्याकडून काही रिझल्टस पाहिजे असतील तर त्यासाठी थोडा वेळ द्यावा लागेल. आपणास दोन दिवसात रिझल्टस मिळतील अशी असत्य माहिती मी देणार नाही. तेव्हा कामाच्या रिझल्टसाठी आपणास थोडी वाट पहावी लागेल. आपण इतकी वर्षे वाट पाहिली आहे. आपण मला काही महिन्यांचा अवधी दिल्यास आपणास निश्चितपणे बदल झालेला दिसून येईल.

सागरी महामार्ग हा पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. पनवेल-पळस्पे-पणजी या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 17 चे चौपदरी करण्याचे काम आहे. राज्यातील वेगवेगळ्या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण झालेले आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी माननीय केंद्रीय कृषी मंत्री नामदार श्री.शरद पवांर साहेबांचा याठिकाणी उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, माननीय श्री. शरद पवार नाशिकला जात असताना वाहतुकीच्या कोंडीत अडकले



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

म्हणून त्या मार्गाचे चौपदरीकरण झाले. काही वेळी काही गोष्टींसाठी योगायोग व्हावा लागतो. कोकणासाठी विशिष्ट वेळेत कालबध्द कार्यक्रम करण्याची मुभा त्यांनी मला पूर्णपणे दिलेली आहे. तेव्हा माननीय श्री.शरद पवार यांना आपण वाटेत कुठेही अडविण्याची गरज नाही. त्यांना अडविण्याची पाळी मी कधीही येऊ देणार नाही... (अडथळा).. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा उल्लेख केल्याशिवाय भाषण कसे पूर्ण होईल ? ते शिवसेना पक्षाचे गट नेते आहेत...पळस्पे ते इंदापूर हा रस्ता खाजगीकरणातून करावयाचा आहे. नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात या रस्त्याचे काम सुरु होईल अशी अपेक्षा आहे. कारण कामाच्या निविदा प्रक्रियेसाठी थोडा वेळ द्यावा लागणार आहे. पळस्पे-पत्रादेवी पर्यतचा रस्ता पूर्ण होत आला असून यावर्षी तो वाहतुकीसाठी खुला होईल. इंदापूर ते चिपळूण आणि चिपळूण ते पत्रादेवी अशा दोन टप्प्यामध्ये या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाची विभागणी झाली आहे.

मध्यंतरी मी दिल्ली येथे गेलो होतो त्यावेळी माननीय श्री.शरद पवार यांच्याशी या विषयावर बोललो होतो. त्यावेळी त्यांनी केंद्रीय भूपृष्ठ मंत्री श्री.कमलनाथ यांच्याशी माझ्यासमोर संपर्क साधला. संसदेचे अधिवेशन सुरु झालेले आहे तेव्हा पुढील आठवड्यात या विषयासंदर्भात माननीय श्री.शरद पवार यांच्या उपस्थितीत श्री.कमलनाथ यांच्याबरोबर जरुर बैठक होईल. पळस्पे ते इंदापूर हा टप्पा सुरु होत असताना इंदापूर ते पत्रादेवी टप्प्यासाठी सुध्दा केंद्र सरकारने त्यांच्या निधीतून कामास लवकरात लवकर सुरुवात करावी अशाप्रकारचा ठामपणे आग्रह राज्य सरकारकडून केंद्र सरकारकडे धरला जाईल. या कामाची नेमकी स्थिती काय आहे असा प्रश्न पुढील हिवाळी अधिवेशनात उपस्थित होण्यापूर्वी मी त्याबाबतची माहिती सभागृहाला देईन असा विश्वास मी आपणास देऊ इच्छितो.. (अडथळा) चार किलोमीटरच्या कामात अडचण आहे तेवढा भाग सोडून आपण बाकीचे काम करीत आहोत...

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KTG/ KGS/ प्रथम श्री.अजित शिगम 18.15

श्री.सुनील तटकरे... सभापती महोदय, चार किलोमिटर लांबीच्या रस्त्याला पर्यावरण विभागाने अजून परवानगी दिली नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु पर्यावरण विभागाने असेही सांगितले होते की, या रस्त्याला पर्यायी मार्ग शोधण्यात यावा परंतु तो होत नाही. याच रस्याचे काम आपण करणार आहोत . आज त्या ठिकाणचा रस्ता अत्यंत अरुंद आहे त्यामुळे चार लाईनचा रस्ता करीत असतांना त्यासाठी लागणारी जमीन देखील आपल्याला मिळवावी लागणार आहे.आपण सर्वचजण नेहमी या रस्त्यावरुन प्रवास करीत असतो आणि आपण सर्वानी हे पाहिलेले आहे की, मुंबई गोवा रस्त्यावरील सर्वात अरुंद खिंड हीच आहे. त्या ठिकाणी ही अडचण असली तरी बाकीचे काम थांबविण्याचे पाप केले जाणार नाही. उरलेले काम सुरुच राहील . चार किलोमिटर रस्त्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जे काही सांगितले होते तेच मी सांगणार होतो. त्या व्यतिरिक्त मी काहीही सागणार नव्हतो. त्या ठिकाणी जी अडचण आहे ती मलाही ज्ञात आहे. त्याबाबतीत सुध्दा पर्यावरण मंत्रालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, झाराप ते पत्रादेवी रस्त्याच्या बाबतीत मी मघाशी विवेचन केले आहे त्यानंतर रेवस पासून ते रेड्डी पर्यतच्या सागरी राज्य मार्गासंबंधी या ठिकाणी उल्लेख करण्यात आला आहे. त्याचबरोबर शिवडी - न्हावा - शेवा पुलाच्या बाबतीत देखील उल्लेख करण्यात आला होता. खाजगीकरणाच्या प्रकल्पासंबधी गेल्या तीन चार वर्षापासून राज्यात सतत चर्चा सुरु आहे. शिवडी - न्हावा - शेवा हा रस्ता अत्यंत महत्वाचा असल्यामुळे या पुलाच्या बाबतीत मी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री यांच्या बरोबर चर्चा केली होती . सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले तेही खरे आहे . उरणला एका कार्यक्रमासाठी मी काही आमदारांबरोबर गेलो होतो तेव्हा मला असे सांगण्यात आले होते की, एका महिन्यात उरण ते पनवेल या रस्त्यावर 20 लाख वाहने जात येत असतात. तेव्हा एका महिन्यात जर 20 लाख वाहने जात येत असतील तर वाहतुकीची कोंडी सुध्दा होत असते. नॅशनल हायवे चार लाईनचा झालेला असला आणि जुना पनवेल - उरण रस्ता असतांनासुध्दा या रस्त्यावर वाहतूकीची प्रचंड कोंडी होत असते म्हणून शिवडी पासून वाशी पर्यतची वाहतुक अधिक सुरळीत करावयाचे असेल आणि मुंबईतील वाहतुकीचे अधिक डी - कन्जंक्शन करावयाचे असेल तर शिवडी - न्हावा - शेवा या पुलाच्या बांधकामाची

2..

श्री.सुनील तटकरे...

आवश्यकता आहे. या पुलाचे बांधकाम एम.एम.आर.डी.ए.ने करावयाचे की एम.एस.आर.डी.सी.ने करावयाचे, की केन्द्र सरकारच्या निधीतून करावयाचे ही बाब माननीय मुख्यमंत्री किवा त्यासाठी नेमण्यात आलेली पायाभूत समिती ठरवील. या वर्षी या पुलाच्या बांधकामाची निविदा निश्चित करुन या कामाला सुरुवात होईल. एवढेच मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो. त्याचप्रमाणे रेवस - रेड्डी या सागरी मार्गशी निगडीत हा रस्ता नाही. कारण रेवस हे नंतर येते व त्या अगोदरच्या टप्यातील हे काम आहे त्याचबरोबर उरण पासून रेवस पर्यत जाणा-या रस्त्यावर पूल बांधावयाचे होते. ही कामे ज्या कालावधीत प्रत्यक्षात सुरु झाली होती त्यावेळी करंजा ते रेवस या पुलाचे बांधकाम सागरी महामार्गामध्ये होते. आता काही बंदरे विकसीत होत आहेत आणि मघाशी सन्माननीय सदस्यांनी त्याबाबतीत उल्लेख केला होता त्याप्रमाणे दिघीचे बंदर विकसीत होत आहे. जयगड बंदराच्या परिसरात जे विविध प्रकल्प आले आहेत त्यामुळे जयगड बंदराचा विकास आपोआप झाला आहे.रायगड जिल्हयातील रेवस आयरे बंदर खाजगी करणाच्या माध्यमातून विकसीत होत आहे. या बाबतीत मी माहिती घेतली तेव्हा मला अशी माहिती मिळाली आहे की, ज्यांच्या माध्यामातून पोर्टस् विकसीत केली जाणार आहेत त्यांनी हे बांधकाम करण्याचे एम.ओ.यु.च्या माध्यामतून शासनाला कबूल केले होते आता त्याची साईट बदलण्यात आली होती आणि त्या बाबतीतही बैठक घेण्यात आली होती. कोणत्याही परिस्थितीत त्या पुलाचे बांधकाम एक तर खाजगी विकासकाने सुरु करावे किंवा जर त्याने सुरु केले नाही तर राज्य सरकार त्यासाठी निधी उपलब्ध करुन देईल परंतु त्यासाठी जी काही रक्कम लागणार आहे ती रक्कम खाजगी विकासकाने दिलीच पाहिजे. यासाठी त्याच्याकडे आग्रह धरला जाईल अन्यथा त्याला ज्या काही सवलती दिल्या गेल्या आहेत त्यातील कोठली तरी एक बाब कमी केली जाईल या पुलाचे बांधकाम त्याने करुन देण्याच्या बाबतीत सरकार कोठल्याही प्रकारची तडजोड करणार नाही.रेवस पासून रेड्डी पर्यतचा जो रस्ता आहे त्यावर 4 मोठे आणि 5 लहान असे एकूण 9 पूल आहेत गेल्या आठ नऊ वर्षात त्या पुलाचे काम ब-याच प्रमाणात पूर्ण झालेले आहे हे कोणीही नाकारणार नाही. जैतापूर खाडीवरील पूल असो, गणपतीपुळे ते रत्नागिरीच्या रस्त्यावरील पूल असो अशा अनेक पुलांची कामे ब-याच प्रमाणात पूर्ण् झाली आहेत. दापोली ते मंडणगड रस्त्यावरील पुलाचे काम

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

सुरु करण्यात आले होते परंतु उच्च न्यायालयामध्ये हरकत घेतल्यामुळे ते काम सध्या थांबलेले आहे. त्या रस्त्याची अलाईनमेन्ट बदलावयाची असून त्याबाबतीत मी सबंधित सचिवाबरोबर तसेच मुख्य अभियंत्याबरोबर चर्चा केली होती .

सभापती महोदय,अर्थसंकल्पाच्या भाषणात मी सांगितले होते की, बाणकोट ते बागमांडला हा रत्नागिरी ते रायगड या दोन जिल्हयाला जोडणारा महत्वाचा पूल आहे. तसेच दिघी ते आगरदांडा हा देखील एक पूल महत्वाचा आहे. या पुलाच्या बाधकामासाठी त्याचबरोबर रत्नागिरी जिल्हयातील दोन महत्वाच्या पुलाच्या बांधकामासाठी नाबार्डकडून निधी मिळावा म्हणून नाबार्डचे अध्यक्ष श्री सरंगी यांना बोलावून त्यांच्याशी चर्चा केली होती......

नंतर श्री.सरफरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

राज्याच्या नियतव्ययाच्या मर्यादा लक्षात घेत असतांना सागरी महामार्गाचे महत्व माननीय सदस्यांनी विशद केले. त्यांच्या भावना लक्षात घेऊन मी सदनाला सांगू इच्छितो की, बाणकोट ते बागबांडला या पूलाच्या बांधकामाची किंमत 250 कोटी रुपये असून हे काम नोव्हेंबर महिन्यामध्ये नक्की सुरु केले जाईल असे ठाम अभिवचन या सभागृहात देतो. आम्ही जनतेची मते घेऊन निवडून आलो, त्यामुळे आपली राजकीय मते वेगळी असू शकतील. परंतु जनतेचा आमच्यावर असलेला विश्वास आणखी वाढेल. यामधील राजकीय भाग बाजूला ठेवून या पूलाचे बांधकाम अग्रक्रमाने करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. येत्या तीन वर्षामध्ये आखीव सागरी मार्गावर असलेले चार पूल नवीन टेक्नॉलॉजीचा वापर करुन बांधणार आहोत. ज्यावेळी खाडयांवर पूल बांधतो त्यावेळी त्या पूलाचे बांधकाम सात ते आठ वर्षे सुरु असते. परंतु नवीन विकसित झालेल्या तंत्रज्ञानामुळे तीन ते साडे तीन वर्षात मोठया पूलाचे बांधकाम सुध्दा आपण करु शकतो. त्याकरिता दर्जेदार ठेकेदाराची निवड करुन व नाबार्डच्या अर्थसहाय्यातून ही पूलाची बांधकामे पूर्ण केली जातील. या सागरी मार्गाची रुंदी 3.80 आहे. म्हणून त्याला केंद्र सरकारने राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा द्यावा यासाठी राज्याच्या मंत्रिमंडळानें एकमताने ठराव करुन तो केंद्र शासनाकडे पाठविला आहे. त्यामुळे एका बाजूने त्याचे रुपांतर राष्ट्रीय महामार्गामध्ये करणे हा एक भाग व तोपर्यंत सागरी मार्गावर किमान 5 मीटरच्या रुंदीचे सरफेस तयार झाले तर त्या परिसरात प्रचंड प्रमाणात पर्यटन व्यवसाय वाढणार आहे. त्याला आपल्याला निश्चितपणे न्याय देता येईल.

सभागृहामध्ये एका बाजूला हे सांगत असतांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांना तुम्ही कोकणातील पर्यटन क्षेत्राला जोडणाऱ्या रस्त्यांसाठी नवीन लेखाशीर्ष मागा अशी सूचना केली आहे. आणि ते उघडण्यास आपण परवानगी देणार आहोत. त्यामध्ये ठाणे जिल्हयाचा सुध्दा समावेश केला असून डहाणूपासून त्याची सुरुवात होणार आहे. 720 कि.मी. लांबीचा किनारा नजरेसमोर ठेवून कोकण किनारपट्टीला जोडणारे रस्ते बांधण्यासाठी मुख्य अभियंता व सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना माझ्या स्तरावर सूचना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे कोकणाच्या कार्यक्रमामध्ये वाडीजोड आणि साकवाच्या कामांना सुध्दा प्राधान्य दिले आहे. त्याचप्रमाणे जलसंपदा विभागामार्फत 5 कोटींचा निधी दिला आहे.. काही माननीय सदस्यांनी दुरुस्तीसाठी कुठे पैसे दिले असे विचारले आहे. त्याची माहिती माझ्याजवळ असून मी ती आपल्याला देऊ शकेन. हे पैसे आम्ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

दरवर्षी देणार आहोत. यावर्षी दुरुस्ती झाल्यानंतर रायगड जिल्हयामध्ये नवीन कोणताही प्रकल्प सुरु झालेला नाही. म्हणून रायगड जिल्हयातील कर्जत तालुक्यामधील राजनाला प्रकल्पासाठी आपण 5 कोटी दिले. काही खर्च सुधागड तालुक्यामध्ये झाला आहे तर काही खर्च डोलवा प्रकल्पाकरिता झाला आहे. म्हणून जी काही दुरुस्ती करावयाची आहे त्यासाठी 5 कोटींचा निधी आपण राखून ठेवला आहे. तो तर आपल्याला मिळेलच, परंतु साकवासाठी सुध्दा 5-5 कोटींचा निधी आपण दिला आहे. मघाशी माननीय सदस्यांनी उल्लेख केला म्हणून सांगतो की, जिल्हा नियोजनाची तरतूद सर्व जिल्हयांमध्ये वाढवून देण्यात आली आहे. गेल्या वर्षी ठाण्याचा 81 कोटींचा प्लॅन होता तो यावेळी 180 कोटींचा करण्यात आला. रायगडचा 63 कोटींचा प्लॅन होता तो 101 कोटींचा झ ाला. रत्नागिरीचा 84 कोटींचा प्लॅन होता तो 102 कोटींचा झाला. सिंधुदुर्ग जिल्हा भोगोलिकदृष्टया लहान आहे, त्याठिकाणी 40 कोटी देता येत होते, परंतु सर्वांनी आग्रह धरल्यानंतर आपण यावेळी 90 कोटी रुपये दिले आहेत. राज्याचा निधी देत असतांना क्षेत्रफळ व लोकसंख्या यांचे सूत्र ठरवून आम्ही जिल्हयाचे आर्थिक नियोजन केले आहे. असे असतांना निकषाच्या बाहेर जाऊन सर्वाधिक निधी सिंधुदुर्ग जिल्हयाला दिला आहे हे मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो. कामे करण्याचा अधिकार लोकप्रतिनिधींना आहे, तुम्ही देखील एखाद-दुसरी कामे सुचवावीत. माझ्याकडे आणखी चार-पाच कामे सुचविलीत तर मी ती कामे घेण्याचा प्रयत्न करीन. माननीय श्री.राणे साहेबांना विनंती करीन की, तुमचे माननीय आमदार श्री. उपरकरांवर पूर्वी प्रेम होते, आता कामासाठी तरी त्यांच्यावर प्रेम करा. त्याचप्रमाणे कोकणामध्ये रस्त्याचा एक कालबध्द कार्यक्रम राबविला जाणार आहे.

आपण उल्लेख केला की, दापोली येथे पर्यटनाचे क्षेत्र फार प्रचंड आहे. त्याठिकाणी पर्यटक येतात म्हणून मुरुडच्या किनारपट्टीवर व तेथील सर्व किनारपट्टीवरील रस्ते पर्यटनाच्या निधीमधून करण्याची भूमिका घेतली जात आहे. आपण मघाशी उल्लेख केला की, होम पर्यटन, ब्रेड अँड ब्रेकफास्ट हे कोकणामध्ये प्रचंड प्रमाणात सुरु झाले आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे......

त्यांना व्यापारी दराने दर आकरण्यात येत होते. मधल्या काळात ज्यावेळेला माझ्याकडे ऊर्जा विभाग आला त्यावेळी त्यांना डोमेस्टिकप्रमाणेच दर आकारणी केली जावी अशा प्रकारचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आज कोकणात ज्यांच्या घरामध्ये पर्यटकांची राहण्यासाठी व्यवस्था केली जाते त्यांच्या वीजबिलामध्ये वाढ होणार नाही याची खबरदारी घेण्यात आलेली आहे. कुणकेश्वर आणि भराडी देवीच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर व इतर अनेक सन्मानीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. यावर्षी या देवस्थानासाठी दहा कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. भराडीदेवी आणि कुणकेश्वरला दोन कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे त्यापेक्षाही आणखी जास्त नियतव्यय देण्यात येईल यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्याकडून प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे.याबाबतीत सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असल्यास त्यांनी त्या द्याव्यात.

सभापती महोदय,धामापूरच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण पोडतिडिकीने बोलले यावेळी धामापूरला निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. धामापूरच्या कामासाठी उर्वरित निधी सुध्दा निश्चितपणे उपलब्ध करुन दिला जाईल.

सभापती महोदय, शिवसृष्टीच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, रायगडच्या परिसरामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी 350 वर्षापूर्वी किल्ला उभा केला आणि तेथे राजधानी झाली. पाषाणच्या परिसरामध्ये या शिवसृष्टीच्या बाबतीतसुध्दा पर्यटन विभागाच्या मार्फत ईओआर मागविले.तीन जण त्यामध्ये सहभागी झालेले आहेत. त्या तिघांना निश्चित केले गेलेले आहे. त्यांच्याकडून फायनान्शिअल बिडही मागविले जाईल. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे शिवसृष्टीची उभारणी केली जाईल. जगातल्या अनेक राष्ट्रांची व्यवस्था पर्यटनावर अवलंबून आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य नेपोलीयन किंवा ॲलेक्झांडरपेक्षा सुध्दा फार मोठे होते त्यांच्या पेक्षा उच्च प्रतीचा योध्दा तुमच्या आणि माझ्या भूमीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या रुपाने मिळाल्याचा जाज्वल्य अभिमान प्रत्येकाच्या मनामध्ये आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बद्दल कोणी कुठून आले आणि काय लिखाण केले त्याबद्दल काय भूमिका घ्यावयाची ती शासन घेईल. परंतु शिवसृष्टीची उभारणी अशा पध्दतीने केली जाईल की, जगातल्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

कानाकोपऱ्यातून इतिहासप्रेमी नागरिक छत्रपती शिवाजी महाराजांची शिवसृष्टी पाहण्यासाठी रायगडच्या पायथ्याशी पाषाणला येतील. आणि या शिवसृष्टीचे काम 2010 या आर्थिक वर्षातच शंभर टक्के सुरु होईल.

सभापती महोदय, सागरी किल्ल्यांचे आज मोठे आकर्षण आहे. त्या कालावधीमध्ये सागरा मध्ये किल्ले उभारले गेले. छत्रपती शिवरायांच्या राज्याचे एक वैशिष्टय होते की, त्यांनी सागरामध्ये सागरी किल्ले, सागरी आरमार, जलदूर्ग उभे केले. ते एक सर्किट आहे. त्याठिकाणी पर्यटनाची व्यवस्था करण्यात येईल आणि त्या दृष्टिकोनातून आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा त्याठिकाणी निर्माण करण्यात येतील.(अडथळा) सन्माननीय सदस्यांनी मंदिराचा उल्लेख केला होता ते मंदिर करण्यात येईल पण त्याचे आराखडे नक्की होऊ द्या. आराखडे नक्की होत असताना त्यामध्ये पुन्हा वाद निर्माण करण्याचे कारण शोधूनही सापडणार नाही याची खबरदारी घेऊन काही कामे करावी लागतात.त्यातील हे काम असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. परशुरामजी त्याची खबरदारी शासन घेत आहे. तुमचे नाव परशुराम आहे. परशुरामाची भूमी आहे. (अडथळा) शापित भूमी आपण म्हणालात त्या शापापासून आता मुक्त होऊ या. शापापासून मुक्त होण्याचे वरदान श्री. पवार साहेबांनी दिलेले आहे. त्या मुक्त होण्याच्या कामामध्ये आपण सगळेजण लागू या अशी अपेक्षा मी या निमित्ताने व्यक्त करतो.

सभापती महोदय, पर्यटनासाठी प्रसिध्दी द्यावी लागते असे सर्व सन्माननीय सदस्यांनी सांगितले या कामासाठी पहिल्या प्रथम पाच कोटी रुपये निधी देण्यात आलेला आहे. मी ज्यावेळी माहिती घेतली त्यावेळी मला अशी माहिती मिळाली की, पर्यटनाच्या बाबतीत प्रसिध्दी देण्यात आलेली नाही. त्यांना पाच कोटी रुपयाचा नियतव्यय मी वित्त मंत्री या नात्याने मंजूर केला आहे. त्यामधून किती प्रसिध्दी देता येते ते पाहू. पण पुढच्या वर्षी जगाच्या स्तरावर महाराष्ट्रातील सर्व पर्यटन स्थळांची माहिती देण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन दिला जाईल. कोकण किनारपट्टीच्या बाबतीत प्रसिध्दी देण्यात येईलच पण महाराष्ट्रात अनेक ठिकाणे आहेत. खानदेशमध्ये आहेत. मराठवाडयामध्ये आहेत. पश्चिम महाराष्ट्रात आहेत. विदर्भाच्या भूमीत सुध्दा आहेत. पर्यटन अधिक वाढवावयाचे असेल, पर्यटनाला उद्योगाच्या माध्यमातून अधिक क्रयशक्ती निर्माण करायची असेल तर या साऱ्या गोष्टीची आवश्यकता निश्चितपणे आहे. पर्यटन विभाग

...2..



SMT/ KTG/ KGS/ SBT/ MMP/ 18:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

जाहिरातीच्या बाबतीत कमी पडणार नाही, अशी भूमिका निश्चितपणे घेण्यात येईल. कोकणामध्ये फलोत्पादन महत्वाचे आहे. फलोत्पादनात आज वाढ होतच आहे. पण होणाऱ्या फलोत्पादनावर फळ प्रक्रिया करणारे कारखाने निर्माण करु शकलो नाही हे वास्तव आहे. या उद्योगातील अधिक प्रकल्प शेजारच्या जिल्हयातून येत आहेत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्यावेळी आपण असेही बोलून गेला की, घाट विरुध्द कोकण असा संघर्ष तयार होईल. पण तेथील सहकाराने यामध्ये अधिक उत्सुकता दाखविली तर त्यामध्ये काही गैर आहे असे मानण्याचे काही कारण नाही. आपण सर्वांनी मिळून हा प्रयत्न करु या की, फळ प्रक्रिया प्रकल्पासाठी सुध्दा कोकणातील उद्योजकांनी आणि कोकणातील शेतकऱ्यांनी पुढे यावे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .....

मी आज आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्याकडे जे काही प्रस्ताव आहेत ते काही कारणांमुळे मधल्या कालावधीमध्ये राहिले कारण एनसीडीसीकडे पाठविण्याचे या प्रोसेसिंग युनिटचे प्रस्ताव खूप आहेत. पण आता आम्ही ठरविलेले आहे. मी माननीय पणन मंत्री यांच्याशी चर्चा केली. माननीय मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा केली. माननीय उपमुख्यमंत्री यांच्याशी बोललो तसेच माननीय मंत्रिमहोदय श्री. अजितदादा पवार यांच्याशी बोललो की, सर्व प्रक्रिया करणारे कारखाने आज अन्य ठिकाणी मोठ्या प्रमाणावर सुरु झाले आता यावेळचे प्राधान्य कोकणातील फळ प्रक्रिया प्रकल्पाला अधिक दिले पाहिजे. एकदा त्याचे धोरण नक्की होईपर्यंत कोकणातील फळ प्रक्रिया करणारे जे प्रकल्प आले असतील ते प्रकल्प एका विशिष्ट कालावधीमध्ये एनसीडीसीकडे पाठविले जातील. आपण एक अट घालू शकतो. कोणीही येऊन प्रकल्प करण्यापेक्षा त्या सोसायटीमध्ये, त्या प्रकल्पामध्ये सहभागी असणारे कोकणातील असले पाहिजेत असे आपण म्हणू शकत नाही पण त्या प्रत्येक सभासदाची जमीन कोकणामध्ये असलीच पाहिजे अशी अट त्यामध्ये घालण्याची माझी तयारी आहे जेणेकरुन कोकणातील उद्योजक यामध्ये अधिक मोठ्या प्रमाणात येऊ शकतील आणि या फळ प्रक्रिया उद्योगाला अधिक चालना मिळू शकेल.

सभापती महोदय, पोस्ट हार्वेस्टिक कॉलेज काढणार असे मी म्हणालो होतो. कोकण कृषी विद्यापीठाच्या किल्ल्याच्या ठिकाणी जे युनिट आहे त्याबाबतीत मी म्हणालो होतो. इस्त्रायलच्या काही तत्रज्ञांना आपण बोलविले होते त्यांच्याशी चर्चा झाली. त्याची निश्चिती झाली. मंत्रिमंडळापुढे तो प्रस्ताव येईल आणि फळ प्रक्रियेचे पोस्ट हार्वेस्टिंग कॉलेज या वर्षापासूनच सुरु होईल. देशामध्ये पोस्ट हार्वेस्टिंग कॉलेज कोठेही नाही. देशातील पहिले पोस्ट हार्वेस्टिंग कॉलेज जे महाराष्ट्रात सुरु होईल ते आपल्या कोकणच्या किनारपट्टीवर सुरु होईल आणि ते याच वर्षापासून सुरु होईल या बाबतीत आज मी सभागृहाला आपल्यामार्फत आश्वस्त करु इच्छितो. काही पर्यटनाची स्थळे आहेत जसे माथेरान, मुरुड, हरिहरेश्वर त्याचप्रमाणे तिलारीचे पाणी वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवणला देण्याच्या बाबतीत मंत्रिमंडळाने जरुर अभिवचन दिलेले आहे. त्याचा प्रकल्प तयार करण्याच्या बाबतीत पाणीपुरवठा खात्याचे प्रधान सचिव किंवा जे माननीय मंत्रिमहोदय आहेत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .....

त्यांच्याशी माझी चर्चा झाली. महिन्या दोन महिन्यामध्ये प्रकल्पाच्या बाबतीतील माहिती निश्चितपणे आपल्याकडे येईल. या तीन नगरपालिका आणि त्यामध्ये येणारी गावे यांना तिलारी पाण्यातून जे काही पाणी द्यावयाचे आहे त्यादृष्टीकोनातून सुध्दा आवश्यक ती तरतूद केली जाईल. काही सन्माननीय सदस्यांनी वाईनच्या प्रकल्पाबाबत सांगितले. जांभळापासून वाईन उत्पादन करणारा प्रकल्प सुरु झाला आहे पण त्याला एक्साईजमधून काही सूट दिली गेली नाही असे सन्माननीय सदस्यांनी मघाशी सांगितले. जो सुरु झालेला प्रकल्प आहे त्याला राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून निश्चित किती कर घेतला जाईल किंवा काय दिले जाणार आहे याचे काही धोरण ठरले नाही असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. मी स्वत: राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांशी नक्की बोलेन. त्यांनाही बोलवून घेऊ तसेच आपणही यावे. आता अशी परिस्थिती आहे की, वाईनचे उद्योग हा एक वादाचा विषय आहे. त्या वादामध्ये मी जाऊ इच्छित नाही परंतु अशा पध्दतीचे जे प्रकल्प होऊ शकतात, ज्यांच्यातून अधिक क्रयशक्ती निर्माण होऊ शकते अशा दृष्टीकोनातून राज्य सरकारचे धोरण सकारात्मक राहील.

सभापती महोदय, पर्यटन उद्योगाला चालना देण्याच्या दृष्टीकोनातून सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितले की, त्यांना हॉटेलमध्ये काही सुट द्यावी. म्हणूनच आपण काही नवीन पर्यटनाचे धोरण स्वीकारलेले आहे त्याची सुध्दा अंमलबजावणी निश्चित स्वरुपामध्ये केली जाईल. हे करीत असतानाच मत्स्य हा एक महत्वाचा विषय आहे. आपल्यापैकी काही सन्माननीय सांगितले की, त्यावेळी माननीय श्री. पवार साहेबांनी कृषी, पर्यटन आणि मच्छीमार व्यवसाय असा त्रिसूत्री कार्यक्रम दिला. मच्छिमाराची बंदरे, पर्यटनाची बंदरे, सागरी प्रवासी वाहतूक या बाबतीत सांगावयाचे तर एकेकाळी येथून जाणारा सबंध कोकणातील माणूस सागरी प्रवासाने जावयाचा. माझे वडील ज्यावेळी गावाला जावयाचे तेव्हा येथून धरमतरला जाणे आणि धरमतरवरुन नागोठण्याला आणि तेथून पुढे जाणे असा सगळा प्रवास होता. आता नॅशनल हायवे झालेला आहे तरी सुध्दा सागरी प्रवासी वाहतूक वाढविण्यावर भर देणे आवश्यक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील उपस्थित नाहीत. यामध्ये त्यांचा मोठा उद्योग आहे. कॅटरामनचा व्यवसाय

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ KTG/ MMP

श्री. सुनील तटकरे .....

त्यांनी सुरु केला पण नेमके कोठे काय थांबले आहे, काय अडले हे मला कळले नाही. आपल्याला मांडव्याला जो काही मरिना करावयाचा आहे याबाबत मी माननीय मंत्रिमहोदय श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याशी बोललो. कारण अर्थसंकल्पामध्ये घोषणा आहे की मांडव्याला मरिना होईल. मांडव्याला ब्रेक वॉटर डॅम म्हणजे जो मरिना केला जाणार आहे तो खाजगीकरणातून केला जाणार आहे. त्यामध्ये मेरिटाईम बोर्डाचा सहभाग 11 टक्के असेल. उरलेला सहभाग खाजगी व्यावसायिकांचा असेल. त्याच्यामध्ये मांडव्याचा ब्रेक वॉटर डॅम करता येईल. मघाशी सांगण्यात आले की, त्यासाठी जवळपास 42 कोटी रुपयांचा खर्च आहे, हे निश्चित आहे. यामध्ये त्याचा अंतर्भाव केला जाईल. खाजगी विकासकाकडून योग्य तो प्रस्ताव आला तर ठीक नाही तर राज्याच्या निधीतून सुध्दा मांडव्याच्या जेटीची प्रवासी वाहतूक काही कालावधी सोडला तर वर्षाचे बारा महिने कशी सुरळीतपणे होईल याची दखल घेऊन योग्य ती तरतूद केली जाईल. आरोग्य विषयक बाबतीत सन्माननीय सदस्य नेहमी बोलत आले आहेत. महाडला ट्रॉमा केअर युनिट आहे. मी त्याचा आढावा घेतला. त्याच्या बांधकामासाठी लागणारा निधी मी आताच उपलब्ध करुन दिला. सन्माननीय सदस्य कणकवलीचा उल्लेख करीत आहेत. मी महाडबाबत बोलत आहे. सन्माननीय सदस्य मला कणकवलीची आठवण कशाला करुन देत आहेत ? मला कणकवलीची आठवण राहणार नाही तर कोणाला राहणार ? मी टप्प्याटप्प्याने तिकडे येणार आहे. पण त्याची सुरुवात इथून होते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

पोलादपूर आहे, चिपळूण आहे. कोकणात इकडून या, तिकडून या कोठूनही या, पण कणकवली सोडून कोठे जाता येणार नाही आणि रायगड सोडूनही मुंबईला येता येत नाही. त्यांना बायपास करण्याचा कोणताही मार्ग तुम्ही शोधला तरी त्याचा उपयोग होणार नाही. आमच्या मार्गावरुनच तुम्हाला प्रवास करावा लागेल हे सत्य आहे. ट्रॉमा केअर युनिट करण्यासंबंधी (अडथळा) बोलले गेले. ते राष्ट्रीय महामार्गावर होतीलच. परंतु अलिबागच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये आयसीयू युनिट आहे. मी रत्नागिरीचा पालक मंत्री होतो त्यावेळी तेथील हॉस्पिटलचा विस्तार झाला होता. तेथेही आयसीयू युनिट आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण रुग्णालयामध्ये, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये, जिल्हा रुग्णालयामध्ये मध्यंतरीच्या काळामध्ये एनआरएचएममधून वैद्यकीय अधिका-यांची भरती केली होती. परंतु जिल्हा रुग्णालयामध्ये, उप जिल्हा रुग्णालयामध्ये, ग्रामीण रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिका-यांची कमतरता आहे ही वस्तुस्थिती आहे. म्हणून एमपीएससीच्या माध्यमातून डॉक्टर्स मिळविण्याचा प्रयत्न करीत असताना सरकारच्या माध्यमातून वैद्यकीय अधिका-यांची भरती करावी अशी मंत्रिमंडळाने अनुमती दिली आहे. मला वाटते की, सार्वजनिक आरोग्य विभाग या भरतीची प्रक्रिया सुरु करील. जेणे करुन आरोग्यविषयक सुविधा निश्चितपणे दिली जाईल.

कोकण रेल्वेच्या बाबतीत बोलावयाचे झाल्यास सावंतवाडी, मडुरे यापैकी एका ठिकाणी टर्मिनल तयार करण्यासाठी जमीन संपादित करावयाची आहे, त्यासाठी लागणारा निधी राज्य सरकारकडून दिला जाईल. त्याचबरोबर काही महत्वाचे मुद्दे मांडलेले आहेत. मत्स्यव्यवसायासाठी सुध्दा काही बंदरांची गरज आहे. मत्स्यव्यवसायातून मोठया प्रमाणावर परकीय चलन निर्माण होऊ शकते. ड्रेझर्समार्फत गाळ काढण्यासाठी मेरिटाईम बोर्डाला पैसे दिलेले आहेत. त्यांनी निविदा नक्की केलेली आहे. याबाबत मी कालच त्यांच्याबरोबर चर्चा केलेली आहे. शासनाने या कामासाठी 20 कोटी रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत. मेरिटाईम बोर्डाचे 4 स्वतंत्र ड्रेझर्स असतील. त्यामुळे गाळ उपसण्याचे काम गतीने करण्यात येईल.

2.....

NTK/ SBT/ MMP/

श्री.सुनील तटकरे....

मधल्या काळात फूल शेतीला प्राधान्य मिळावे म्हणून फूल शेतीचे कर्ज आमच्या शासनाने माफ केले आहे. उलट त्यामध्ये सुध्दा 10 कोटींचे मूळ कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला होता. त्यापैकी 5.50 ते 6 कोटींचे कर्ज माफ झाले आहे आणि राहिलेल्या मूळ कर्जातही फूल शेती व्यवसायिकांना अधिक मदत कशी मिळू शकते याचा विचार केला जात आहे.

कृषी व जलसंधारणाच्या विभागामार्फतही मेगा पाणलोट करण्यासंबंधीची भूमिका घेतली जात असताना कोकणातील मच्छिमारी या व्यवसायाला अधिक न्याय देण्यासाठी किंवा प्रोत्साहन देण्यासाठी एक 'फिशरीज टर्मिनल ॲथोरिटी' करावी अशी सर्वांनी मागणी केली आहे. या विभागाचे मंत्री महोदय श्री.नितीन राऊत सभागृहात उपस्थित आहेत. त्यांच्याबरोबर मी चर्चा केली आहे. त्यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे त्यामध्ये मत्स्य बंदरे, मत्स्य जेट्टी, लिलाव केंद्रे, यार्ड दुरुस्ती, इंधन व बर्फ पुरवठा, उभारणी, मत्स्य प्रक्रिया केंद्रे, वखारी व मत्स्य बाजार इत्यादीचा विकास व देखभाल व्यवस्थापन व प्रशासन करण्यासाठी येत्या काही कालावधीमध्ये 'फिशरीज टर्मिनल ॲथोरिटी' निश्चितपणे स्थापन केली जाईल. जेणे करुन या माध्यमातून मत्स्यव्यवसायाला अधिक चालना मिळू शकेल. मी तर सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, ससून डॉक मच्छिमार या संस्थेने स्वत:चा कोल्ड स्टोअरेजचा प्लान्ट उरणच्या परिसरामध्ये उभा केला आहे. तसाच सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये, रत्नागिरी जिल्हयामध्ये किंवा रायगड जिल्हयामध्ये मच्छिमारी सहकारी संस्थांनी पुढाकार घेतला आणि त्यांच्यामार्फत कोल्ड स्टोअरेजची चेन संस्थेमार्फत उभी करावयाची असेल तर त्यासाठी आवश्यक असलेली सुविधा, कर्ज देण्यासंबंधीची भूमिका निश्चितपणे घेतली जाईल.

कोकण पर्यटनासंबंधी सन्माननीय सदस्यांनी काही मते मांडलेली आहेत त्याबाबतचे योग्य ते निर्णय घेतले जातील.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री खंदारे 18:40

(श्री. सुनील तटकरे..

सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री. अनिल तटकरे, परशुराम उपरकर, रामनाथ मोते, हुसेन दलवाई, रामदास कदम, संजय केळकर, भाई जगताप, किरण पावसकर, विजय सावंत, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत तसेच अन्य सन्माननीय सदस्यांनी कोकणाच्या कालबद्ध विकासाच्या संदर्भात या चर्चेच्या माध्यमातून या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. आपण चर्चेच्या माध्यमातून बोलूच. पण किमान दर दोन महिन्यातून कोकणातील सर्व आमदारांची बैठक बोलावून आपण जे जे काही केलेले आहे त्याची सुरुवात कशी झालेली आहे त्याचा आढावा घेऊ. कोकण पॅकेजचाही आढावा घेऊ. कोकण पॅकेजपेक्षाही भरपूर काही आपण केलेले आहे. शिवसृष्टी त्या पॅकेजमध्ये नव्हती. तसेच कुणकेश्वर, भराडी देवी, परशुराम देवस्थान या गोष्टी पॅकेजमध्ये नव्हत्या. तरी सुध्दा त्या गोष्टींचा अंतर्भाव आपण केलेला आहे. जे.एन.एम. नर्सिंग कॉलेज सुरु करण्यासंबंधीचा निर्णय घेतलेला आहे.

सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी वैद्यकीय महाविद्यालयाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. या महाविद्यालयासाठी आपण अलिबाग जवळ जमीन निश्चित केलेली आहे. हा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडे आहे. येत्या काही दिवसामध्ये तो राज्य सरकारकडे येईल. रत्नागिरी येथे मेडिकल कॉलेज करावयाचे असेल तर खाजगी शैक्षणिक संस्थेने त्याबाबतीत मागणी केली तर त्याही बाबतीत राज्य शासन निर्णय घेईल. सरकारच्या वतीने जे कॉलेज करावयाचे होते ते रत्नागिरी की रायगड येथे करायचे या वादामध्ये आपले खूप नुकसान झाले. त्या वादामध्ये न जाता हे कॉलेज आता रायगड येथे होईल. रत्नागिरी येथे मेडिकल कॉलेज सुरु करण्यासंबंधी एखाद्या खाजगी शैक्षणिक संस्थेने परवानगी मागितली तर ती देण्याचा निर्णय निश्चितपणे होईल. यावर्षी रायगडमध्ये 100 विद्यार्थ्यांचे मेडिकल कॉलेज नक्की होईल. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे जर तेथे शिकविण्यासाठी गेले तर त्यांचे स्वागत करण्यात येईल. त्यांच्या वैद्यकीय ज्ञानाचा फायदा नवीन पिढीला मिळेल. हे वैद्यकीय महाविद्यालय कोकणामध्ये निश्चितपणे सुरु होईल. हे होत असताना सागरी किनारपट्टीचे रक्षण करण्यासाठी सागरी किनारपट्टी-रक्षकाच्या प्रशिक्षण केन्द्राची देखील सुरुवात होईल. कोकणामध्ये आपण पोलीस ट्रेनिंगही सुरु करणार आहोत. त्याच्याही जागा जिल्हाधिका-यांकडून निश्चित झालेल्या आहेत. त्यासंबंधातील प्रस्ताव

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

महसूल विभागाकडे आलेला आहे. कोकणाच्या वेगवेगळया विकासाच्या बाबतीत जे जे काही तुम्हा-आम्हाला अभिप्रेत आहे ते करण्याचा प्रयत्न आपण करु. अनेक गोष्टी करण्यासारख्या आहेत.

पेण येथे गणेशमूर्ती फार मोठ्या प्रमाणावर तयार केल्या जातात, तेथील गणपती मूर्ती व्यावसायिकांना मदत करणे, कृषी पर्यटनासाठी भाग भांडवल देऊन त्यासाठी अधिक सुविधा देणे यादृष्टीकोनातून निश्चितपणे विचार केला जाईल. कोकणासाठी साडेतीन हजार कोटीचा नाही तर पाच हजार कोटीचा नियतव्यय तीन वर्षासाठी दिलेला आहे. या वर्षी साडेपंधराशे कोटीचा निधी दिलेला आहे. पुढच्या वर्षी त्यामध्ये वाढ होईल, पण तो कमी होणार नाही असे अभिवचन देऊन निर्धारित वेळेत प्रत्येक गोष्टीची सुरुवात होईल अशी स्पष्ट ग्वाही देतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी काही उपयुक्त अशी चर्चा उपस्थित केली त्याबद्दल आपणा सर्वांना मनापासून धन्यवाद देऊन यासंदर्भातील शासनाची भूमिका मांडून मी थांबतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अॅड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय वित्तमंत्री श्री. सुनील तटकरे यांनी चर्चेला अत्यंत चांगल्या प्रकारे उत्तर दिलेले आहे. त्यांनी विविध विषयांना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी असा उल्लेख केला की, कोकणाच्या विकासासाठी दिलेले पैसे मग ते पर्यटनासाठी दिलेले असोत, पाटबंधा-यासाठी दिलेले असोत, ते पैसे कोकणाच्या बाहेर जाणार नाहीत याची शाश्वती राज्याच्या वित्तमंत्र्यांनी द्यावी. तसेच कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ होण्याबाबत दोन्ही सभागृहामध्ये दोन वेळा चर्चा झालेली आहे. तेव्हा त्याही बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी मी विनंती करतो.

श्री. सुनील तटकरे : घटनेच्या 371(2)कलमानुसार आपल्या राज्यामध्ये तीनच मंडळ स्थापन करण्याची तरतूद आहे. कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ होण्याच्या बाबतीत पाठपुरावा होईलच. या वर्षी वैधानिक विकास मंडळाला मुदतवाढ देत असताना कोकण आणि खानदेशासाठी उर्वरित वैधानिक विकास मंडळातूनच दोन वेगळी मंडळे निर्माण करावीत, वेगवेगळया समित्या कराव्यात जेणेकरुन उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाला मिळणारा निधी हा कोकणाला आणि खानदेशातील तीन-चार जिल्ह्यांना देखील मिळेल. सन्माननीय सदस्य अॅड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितल्याप्रमाणे कोकणातील कोणताही निधी बाहेर जाणार नाही. परंतु अधिकचा निधी कोकणाला कसा मिळेल याची शंभर टक्के ग्वाही मी आपणास देतो.

**उपसभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

--

..नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. LXIII OF 2010.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सन्माननीय सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन २०१० चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३-मुंबई महानगरपालिका अधिनियम; मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९; नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्यागिक नगरी अधिनियम, १९६५ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०१० चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३-मुंबई महानगरपालिका अधिनियम; मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९; नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्यागिक नगरी अधिनियम, १९६५ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते ९ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०१० चे वि.स.वि.क्रमांक-६३ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन २०१० चे वि.स.वि.क्रमांक-६३ संमत झाले आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LV OF 2010.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.)

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन २०१० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५ महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०१० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५ महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ व ३ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०१० चे वि.स.वि.क्रमांक-५५ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती :** सन २०१० चे वि.स.वि.क्रमांक-५५ संमत झाले आहे.

------

नंतर ४एफ.१..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारणे

**मु.शी.**: अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारणे या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, विनायक मेटे यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून माननीय सामान्य प्रशासन राज्यमंत्र्यांचे निवेदन.

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्य मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, विनायक मेटे यांनी "अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारणे" या विषयासंबंधी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून मी पुढील निवेदन करीत आहे :--

(**सभापतीस्थानी माननीय सभापती**)

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्याची घोषणा दिनांक 6 जुलै, 2009 रोजी शासनाच्या वतीने करण्यात आली होती. या घोषणेला आज एक वर्ष पूर्ण झाले असून या संदर्भात अजूनपर्यंत केवळ अभ्यासच सुरु आहे. त्यामुळे यासंदर्भात मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, किती कालावधीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे भूमी पूजन केले जाणार आहे व या स्मारकासाठी बजेटमध्ये किती रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक किती कालावधीत पूर्ण होणार आहे याची माहिती आता मला देता येणार नाही. परंतु यासंदर्भात लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल व यासंदर्भातील जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपविण्यात आलेली आहे.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** :खानदेशसाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करणे

**मु.शी.**: खानदेशसाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करणे या विषयावर श्री. अरुण गुजराथी , वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**सभापती** :या अल्पकालीन चर्चेसंबधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) सन्माननीय सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान परिषद नियम 97 अन्वये खानदेशच्या संदर्भात अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"दिनांक १३ जुलै, २००६ रोजी खानदेश वैधानिक विकास मंडळ व्हावे. म्हणून विधिमंडळात एकमताने ठराव मंजूर होणे, तथापि ४ वर्षाचा कालावधी लोटला तरी देखील अद्याप खान्देश वैधानिक मंडळाची स्थापना झाली नसणे, केंद्र शासनाकडे या संदर्भात शासनाकडून आग्रही भूमिका किंवा पाठपुरावा करण्यात आला नसणे. खान्देश विभागाचा समावेश उर्वरित महाराष्ट्रात होणे, उर्वरित महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचा समावेश असणे, पश्चिम महाराष्ट्रापेक्षा खानदेशातील जिल्हे तुलनेने फार मागासलेले असणे, नंदुरबार व धुळे जिल्ह्याचा मानवी निर्देशांक फारच कमी असणे, त्यामुळे आतापर्यंत विकासाच्या बाबतीत हा विभाग मागासलेला असणे, खानदेश वैधानिक विकास महामंडळाची स्थापना त्वरित करण्यात यावी अशी खानदेशातील तमाम लोकप्रतिनिधी व जनतेची होत असलेली मागणी यावर शासनाची भूमिका व करावयाची कार्यवाही."

सभापती महोदय,या विषयाच्या संदर्भात मी माझे विचार अतिशय थोडक्यात मांडणार आहे. आज या सभागृहात कोकणच्या विकासाच्या संदर्भात चर्चा झाली. या चर्चेला सन्माननीय वित्त मंत्र्यांनी अतिशय सकारात्मक उत्तर दिलेले असून माझ्याही चर्चेला माननीय वित्तमंत्री त्याच तळमळीने सकारात्मक उत्तर देतील व खानदेशसाठी निधी उपलब्ध करुन देतील अशी आशा करतो.

सभापती महोदय, दिनांक 13 जुलै, 2006 रोजी म्हणजे चार वर्षापूर्वी खानदेशासाठी वेगळे

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ...

वैधानिक विकास मंडळ व्हावे यासाठी ठराव पारित झाला होता. विधानसभा आणि विधानपरिषदेने हा ठराव एकमताने पारीत केला होता. विशेषत: जळगाव, धुळे, नंदूरबार या तीन जिल्हयासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन व्हावे यासाठी हा ठराव होता. या ठरावाला नंतर एक सुधारणा देण्यात आली व या सुधारणेमध्ये नगर जिल्हयाचा व नाशिक जिल्हयाचाही समावेश व्हावा अशी सूचना दिली होती. उत्तर महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्याचा हा विषय होता. विदर्भाचा, मराठवाडयाचा अनुशेष किती आहे हे आपल्याला कळते परंतु खानदेशचा अनुशेष किती आहे याची कोणालाही माहिती नाही. त्यामुळे खानदेशचा अनुशेष वेगळा काढावा म्हणून आग्रह धरण्यात आला होता. खानदेशचा अनुशेष वेगळा काढण्यात यावा यासाठी सन 2000 मध्ये माननीय राज्यपाल महोदयांकडे हा ठराव पाठविण्यात आला होता. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी माननीय राज्यपाल महोदयांना पत्र पाठविले होते. त्या पत्राच्या संदर्भात माननीय राज्यपालांनी असे उत्तर पाठविले की, "जोपर्यंत वैधानिक विकास मंडळ होत नाही तोपर्यंत तुमचा अनुशेष काढला जाणार नाही". खानदेशचा अनुशेष किती आहे याची अद्याप पर्यंत कोणालाही माहिती नाही.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ SBT/ MMP/ जुन्नरे 19:00

श्री.अरूण गुजराथी....

तत्कालीन मंत्रिमंडळाने प्रयत्न करून 385 कोटी रूपये खानदेशसाठी विशेषत: पाटबंधांऱ्यांसाठी उपलब्ध करून दिले होते. खानदेशासंबंधी मी 3-4 मुद्दे मांडणार आहे. पहिला मुद्दा दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचा आहे. प्रत्येक जिल्ह्याचा यासंबंधातील आकडा दिलेला आहे.जळगाव जिल्ह्यात 3,14,787 दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे आहेत. महाराष्ट्रात सर्वात जास्त दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे जळगाव जिल्ह्यामध्ये आहेत. जळगाव 3,14,787 धुळे 1,85,919, नंदूरबार 1,83,238 यांची बेरीज केली तर ती 6,83,944 एवढी येते. तेवढी कुटुंबे खानदेशात दारिद्र्य रेषेखाली येतात. महाराष्ट्रात 52,65,953 कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली येतात. महाराष्ट्रातील या तीन जिल्ह्यामध्ये दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी 13 टक्के आहे. नाशिक आणि नगरचा विचार केला तर टक्केवारीचे प्रमाण वाढेल.

दुसरा मुद्दा मी दरडोई उत्पन्नाचा मांडणार आहे. महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न 54,867 आहे. मुंबईचे दरडोई उत्पन्न 89,000 आहे. कोकण विभागाचे दरडोई उत्पन्न 78961 आहे. जळगावचे दरडोई उत्पन्न 43184 आहे. म्हणजे महाराष्ट्राच्या सरासरी पेक्षा दरडोई उत्पन्न कमी आहे. धुळे जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न 33869 आहे. नंदूरबार जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न 30516 आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्हे लक्षात घेतले तर नंदूरबार जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न कमी असून नंदूरबार जिल्ह्याचा पाचवा क्रमांक लागतो.

तिसरा मुद्दा मानवी विकास निर्देशांकाचा आहे. नंदूरबार जिल्ह्याचा 0.28, जळगाव जिल्ह्याचा 0.50, धुळे जिल्ह्याचा 0.36 मानवी विकास निर्देशांक आहे. याच्यात देखील आमचा खालून चौथा क्रमांक आहे. गडचिरोली जिल्ह्याचा 0.21, यवतमाळ जिल्ह्याचा 0.22, जालना जिल्ह्याचा 0.27 सर्वात कमी मानवी विकास निर्देशांक आहे. त्यानंतर नंदूरबार आणि त्यानंतर धुळयाचा आहे. वित्त मंत्री ज्या रायगड जिल्ह्यातून येतात त्याचा मानवी विकास निर्देशांक 0.70 आहे. पुणे जिल्ह्याचा 0.76, कोल्हापूर जिल्ह्याचा 0.64, नागपूर जिल्ह्याचा 0.71, भंडारा जिल्ह्याचा 0.46 मानवी विकास निर्देशांक आहे. कुठलाही निकष आपण लावला तर आपल्या लक्षात येईल की, दरडोई उत्पन्न, दारिद्र्य रेषेखालील कुटुंब, मानवी विकास निर्देशांक यामध्ये खानदेश मागे आहे. त्यामुळे तेथे जादा निधी देण्याची आवश्यकता आहे. वैधानिक विकास मंडळ व्हावे म्हणून कोकणाचा 16 वर्षापासूनचा ठराव होता. तो झाला नाही. आमचा चार वर्षापासूनचा ठराव आहे.

..2..

BGO/ SBT/ MMP/ जुन्नरे 19:00

श्री.अरूण गुजराथी....

वैधानिक विकास मंडळ ज्यावेळी होईल त्यावेळी होईल. यासंबंधी आपण काय पाठपुरावा केला यासंबंधी विदित केले तर अधिक बरे होईल.

सभापती महोदय, आपण पाटबंधाऱ्यांचा विचार केला तर आमच्या येथे धरणांची संख्या कमी आहे. धरणाच्या माध्यमातून भिजणाऱ्या जमिनीची टक्केवारी फार कमी आहे. पर्यटन विकासामध्ये तोरणमाळ, पाल आणि नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी यांचा समावेश व्हावा अशी मी विनंती करीत आहे. वणीची श्री सप्तश्रृंगी देवी, गरम पाण्याचे झरे असलेले उन्नतदेव, चाळीसगावची पाटणा देवी, एरंडोलचा गणपती, धुळ्याची एकवीरा देवी, येथील तीर्थक्षेत्र विकासासाठी अनेक वर्षापासून निधी उपलब्ध झाला नाही. तो देखील उपलब्ध करून द्यावी अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदय, आमच्या खानदेशात रूग्ण आजारी पडला तर त्याला औरंगाबाद येथे न्यावे लागते. नाशिकला पाठवावे लागते किंवा मुंबईला पाठवावे लागते. त्यामुळे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल धुळ्याला द्यावे, जळगावला द्यावे. ते कुठे द्यावे ही मी सांगणार नाही. पण त्याची अत्यंतिक अशी गरज आहे. आज आरोग्य सेवेमध्ये देखील आमचा खानदेश मागे आहे.

सभापती महोदय, शिक्षणासंबंधी देखील आमची मागणी आहे. आदिवासी बहुल क्षेत्रासाठी गोंडवाणा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी..

धुळे, नंदूरबार, नाशिक, जळगाव या जिल्ह्यांसाठी एक आदिवासी विद्यापीठ मंजूर करण्यात यावे अशी मागणी करीत आहे. खानदेशात शेती अत्यंत चांगल्या पध्दतीने करण्यात येते. परंतु खानदेशात एकही कृषी विद्यापीठ नाही. तेव्हा खानदेशात कृषी विद्यापीठ स्थापन करुन त्यास निधी द्यावा अशी माननीय वित्त मंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, एखादा विभाग किती मागासलेला किंवा पुढे आहे याचा विचार करताना दरडोई विजेचा वापर किती आहे याचा विचार झाला पाहिजे. त्याठिकाणी रोजगाराची टक्केवारी किती आहे याचा विचार झाला पाहिजे. कृषीसाठी वापरण्यात येणाऱ्या विजेची दरडोई आकेडवारी पाहिल्यास धुळे जिल्ह्यात 55 टक्के, नंदूरबार जिल्ह्यांत 51 टक्के तर जळगाव जिल्ह्यात 89 टक्के आहे. घरगुती वीज वापराचा विचार केल्यास नंदूरबार जिल्ह्यात ती 33 टक्के आहे तर औद्योगिकदृष्टया 34 टक्के आहे. मराठवाड्यातील हिंगोली आणि जालना हे जिल्हे मागासलेले आहेत. गेल्या 35-40 वर्षात खानदेशासाठी निधीची उपलब्धता झाली नाही. त्यामुळे खानदेशात विकासासाठी पायाभूत सुविधा नाहीत. तेव्हा खानदेशसाठी जादा निधी उपलब्धत करुन दिली पाहिजे.

सभापती महोदय, सात-आठ महिन्यापूर्वी खानदेशासाठी 6509 कोटी रुपयांचे पॅकेज दिले त्याबद्दल मी शासनाने अभिनंदन करतो. खानदेशामध्ये नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदूरबार आणि जळगाव या पाच जिल्ह्यांचा समावेश आहे. सन 2009-2010 मध्ये 2085 कोटी, 2010-2011 मध्ये 2189 कोटी रुपये तर सन 20011-2012 मध्ये 2079 कोटी रुपये असे एकूण 6509 कोटी रुपये दिलेले आहेत. परंतु हा निधी अपुरा आहे. आम्हाला यापेक्षा जादा निधीची आवश्यकता आहे. तेव्हा खानदेशासाठी जे पॅकेज जाहीर करण्यात आले आहे ते रिव्हाईज करुन जास्तीचा निधी तीन वर्षात देण्याचा प्रयत्न करावा अशी माननीय वित्त मंत्र्यांना विनंती आहे. ते एक अत्यंत कार्यक्षम मंत्री आहेत. त्यांनी कोकणच्या प्रश्नाबाबत, विकासाबाबत जे उत्तर दिले आणि त्यावरुन त्यांच्याबद्दलची एक भावना दिसून आली. याठिकाणी कोकणातील 50 टक्केपेक्षा जास्त सदस्य आहेत आम्ही खानदेशातील सदस्य फक्त पाच-सहा आहोत. मी आपला जास्त वेळ घेणार नाही. मी कमी बोलतो,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी..

परंतु आमच्या विभागाला जास्त निधी द्यावा अशी माझी विनंती आहे. खानदेशाला दरवर्षी पाच हजार कोटी रुपये पॅकेजच्या माध्यमातून मिळतील असे आश्वासन माननीय वित्त मंत्री महोदयांनी द्यावे. माझे सहकारी दोन-दोन मिनिटांत आपले विचार मांडतील त्यानंतर माननीय वित्त मंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी नियम 97 अन्वये खानदेश वैधानिक विकास मंडळावर चर्चा घडवून आणली त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

खानदेश वैधानिक विकास मंडळ व्हावे अशी खानदेशातील लोकांची अनेक वर्षापासूनची मागणी आहे. लोकप्रतिनिधींनी ही मागणी लावून धरल्यानंतर दिनांक 13 जुलै, 2006रोजी खानदेश वैधानिक विकास मंडळाचा ठराव झाला. त्यानंतर जवळपास चार वर्षाचा कालावधी उलटून गेला, परंतु अजूनही खानदेश वैधानिक विकास मंडळाची स्थापना झालेली नाही. राज्य सरकारने केंद्राकडे आग्रही भूमिका मांडलेली नाही की त्याबाबत पाठपुरावा केलेला नाही.

उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाकडून आमची घोर निराशा झालेली आहे. उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळामध्ये नाशिक, अहमदनगर, नंदूरबार, धुळे आणि जळगाव या पाच जिल्ह्याचा समावेश आहे. परंतु आम्हाला आतापर्यंत कोणत्याही प्रकारचा न्याय मिळालेला नाही. आमच्या विभागाबाबत साधी चर्चा देखील होत नाही, विचार तर कधी झालाच नाही. अशा पध्दतीने आमच्यावर अन्याय होत आहे. सिंचनाच्या निधीपासून आम्ही वंचित आहोत.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे..

तसेच आमच्या भागात धरणे कमी आहेत. ज्या धरणांना मान्यता देण्यात आली आहेत त्याची कामेदेखील पूर्ण् होत नाही. आमच्या भागात सिंचन क्षेत्र कमी असल्यामुळे विकासही झालेला नाही. उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळामध्ये पश्चिम महाराष्ट्राच्या जिल्हयाचा समावेश करण्यात आला आहे परंतु त्याच्याशी तुलना करता आम्ही मागे आहोत. विकास कामांना पुरेसा निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. धुळे, नंदूरबार या दोन जिल्हयांचा मानवी विकास निर्देशांक फारच कमी आहे . त्यामुळे मानवी निर्देशांकामध्ये त्या जिल्हयांचा खालून तिसरा व चौथा क्रमांक लागतो.

सभापती महोदय, आम्ही अहिराणी भाषा बोलणा-या पट्टयातील लोक असून आमची भाषा अत्यंत गोड आणि मृदू आहे परंतु आमच्या भागावर सातत्याने अन्याय केला जात असून आमच्याकडे दुर्लक्ष होत आहे. खानदेश पॅकेज जाहीर करण्यात आले होते परंतु त्याही बाबतीत आम्ही वंचित राहिलो आहोत. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी मागणी केल्याप्रमाणे आमच्या भागाच्या विकासाकरिता जास्तीत जास्त निधी देण्यात यावा अशी विनंती करतो आणि हा निधी देण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी राजकीय इच्छा शक्ती दाखवावी व खानेदश वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यासाठी भरीव प्रयत्न करावेत अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधान सभेने निवडलेले ): सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी यांनी खानदेश साठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याच्या संदर्भात नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे त्यावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

. सभापती महोदय, माननीय वित्त मंत्री केवळ कोकणाचे नाही तर संपूर्ण राज्याचे वित्त मंत्री आहेत त्यामुळे आमच्या ज्या न्याय्य मागण्या आहेत त्याचा विचार करुन त्यांनी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा एवढेच मला सांगावयाचे आहे.धन्यवाद.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.अजितशिगम 19.10

श्री.सुनील तटकरे (वित्त मंत्री) : सभापती महोदय, सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आणि आमचे मार्गदर्शक श्री अरुण गुजराथी यांनी नियम 97 अन्वये खानदेशाच्या विकासाच्या संदर्भात अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे त्याला उत्तर देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय , राज्य घटनेतील कलम 371(2) मध्ये वैधानिक मंडळ स्थापन करण्यासंबंधीचा उल्लेख करण्यात आला आहे . खानदेश आणि कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक मंडळ स्थापन करण्या संबंधीचा ठराव सभागृहाने एक मताने मंजूर करुन त्यासबंधीचा प्रस्ताव मंत्रीमंडळाने केन्द्र सरकारकडे पाठविलेला आहे. त्यासंबंधीची मान्यता मिळवत असतांना या मागासलेल्या भागांना विविध पॅकेजच्या अंतर्गत जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न राज्य शासनाने केला आहे. सन्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी यांनी अशी भावना व्यक्त केली होती की, जळगाव,नंदुरबार आणि धुळे या जिल्हयांचा मानवी विकास निर्देशांक अत्यंत कमी आहे राज्यामध्ये सरासरी 50 टक्क्या पेक्षा कमी असलेल्या अनेक जिल्हयांमध्ये अशी परिस्थिती आहे म्हणून गेल्या तीन वर्षापासून राज्य शासन मानव विकास अभियान राबवत होतो त्यावेळी पाच कोटी रुपयांचा निधी देण्यात येत होता परंतु या वर्षी 500 कोटी रुपयांचा नियतव्यय त्यासाठी ठेवण्यात आला असून राज्यातील 172 तालुक्यामध्ये या वर्षापासून कामे सुरु करण्यात येणार आहेत धुळे, नंदूरबार ,जळगाव या तीन जिल्हयातील बहुतेक तालुक्यांचा त्यामध्ये समावेश असू शकेल दरडोई उत्पन्न एक लाख रुपयापर्यत नेले जाईल व मानवी विकास निर्देशांक उंचाविण्यात येईल असे आश्वासन लोकशाही आघाडीने जनतेला दिले होते या दृष्टीकोनातून दरवर्षी 500 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.खानदेशसाठी पॅकेज मंजूर करण्यात आले आहे आणि त्याबाबतीत वेळोवेळी आढावा घेण्याचे काम सुरु आहे.या पॅकेजव्दारने वेगवेगळया विभागाच्या अंतर्गत खानदेश् ंमधील चार जिल्हयासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासबंधी सांगण्यात आले होते त्यानुसार हा निधी निश्चितपणे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पर्यटन विकासाच्या मार्फत तीर्थक्षेत्राच्या व पर्यटनाच्या विकासाच्या योजनेमध्ये काही कामांचा तसेच काही गावाचा समावेश करण्यात यावा असा उल्लेख सन्माननीय सदस्य सर्वश्री अरुण गुजराथी ,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.सुनील तटकरे ....

दिलीपराव सोनवणे यांनी केला होता  त्याचबरोबर सन्माननीय  सदस्या डॉ नीलम गो-हे यांनीसुध्दा पत्र पाठवून तशी  मागणी केली होती. त्या सबंधी  सरकारच्या मार्फत निश्चतपणेविचार केला जाईल त्याचबरोबर कोकण आणि मराठवाडयाच्या विकासासाठी जसा कालबध्द कार्यक्रम हाती घेऊन त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला होता त्याच माध्यमातून खानेदशातील विविध जिल्हयातील विविध योजनांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल अशी सरकारच्या वतीने स्पष्ट ग्वाही देऊन मी माझे भाषण संपवितो.

**सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

---

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** :पावसाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

एकूण बैठकीची संख्या - 12 एकूण काम - 90 तास 35 मि.

मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ - 50 मि.

अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ - 45 मि.

प्रत्यक्षात झालेले कामकाज - 89 तास

रोजचे सरासरी कामकाज 7 तास 25 मिनिटे

( विधान परिषद नियमानुसार बैठकीची वेळ 5 तास आहे. म्हणजेच आपण एकूण 18 दिवसांचे ( जवळ जवळ 3 आठवड्यापेक्षा अधिक ) काम केले आहे. )

तारांकित प्रश्न

एकूण आलेले तारांकित प्रश्न - 2242 कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न - 1707

स्वीकृत प्रश्न 761 सभागृहात तोंडी उत्तरीत झालेले तारांकित प्रश्न 51

उत्तरित झालेले अल्पसूचना प्रश्न - 2

नियम 93 सूचना --

एकूण प्राप्त झालेल्या सूचना -205, स्वीकृत सूचनांची संख्या 90, चर्चा झालेला सूचना 27

लक्षवेधी सूचना --

प्राप्त झालेल्या सूचना -1015, मान्य झालेल्या सूचना 196, चर्चा झालेल्या सूचना - 42

विशेष उल्लेखाच्या 67 सूचना मांडण्यात आल्या.

नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा -प्राप्त झाल्या 9 , मान्य झाली 6 , चर्चा झाली 5

शासकीय विधेयके संमत- 9 ( परिषद 2 - सभा 7 )

नियम 260 अन्वये 6 प्रस्तावावर चर्चा झाली.

अशासकीय विधेयके विचारार्थ - 4

शासकीय ठराव - सूचनांची संख्या 2

अर्धा तास चर्चा - प्राप्त झाल्या 87 मान्य झाल्या 63 चर्चा झाली 2
अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली - 1

...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

**सभापती** : मी जाहीर करतो की, महाराष्ट्र विधान परिषदेचे पुढील अधिवेशन बुधवार, दिनांक 1 डिसेंबर, 2010 पासून नागपूर येथील विधान भवनात बोलवावे अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे.

---

**पृ.शी./मु.शी.** : सत्र समाप्तीसंबंधी घोषणा

**सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपले आहे.आता मी सत्र-समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा आदेश वाचून दाखवितो.

"भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2) उपखंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी के. शंकरनारायणन, महाराष्ट्राचा राज्यपाल, याव्दारे महाराष्ट्र विधान परिषदेचे सत्र संस्थगित करीत आहे."

(यानंतर राष्ट्रगीत झाले)

(सायंकाळी 7.18 वाजता सत्र संस्थगित झाले.)

********

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही